
# भारतीय राष्ट्रपुरुष



म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १२८५
१९५६
REFBK-0008910

भी. गो. देशपांडे

# भारतीय राष्ट्रपुरुष

[ सुबोध, सुरस व संस्कारकारी चरित्रें ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप
अनुक्रम २०८२५ दि. ५।८।

प्रस्तावना ०३८ नों दि: 98।20

आचार्य काकासाहेब कालेलकर

लेखक

प्रा. भी. गो. देशपांडे, एम्. ए., बी. टी.
हिंदु विश्वविद्यालय, बनारस

८८९०
REFBK-0008910

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली : १९५१
आवृत्ति दुसरी : १९५६

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

: प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार पेठ : पुणें २

: मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ : पुणें २

भारतीय स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपले देह चंदनाप्रमाणे झिजविले, अनंत आपत्तींना धैर्याने तोंड दिलें, कठोर कारागृहवास हसतमुद्रेने कंठिले व प्रसंग विशेषीं आपल्या सारसर्वस्वाचें बलिदान दिलें, अशा दिवंगत, थोर राष्ट्रपुरुषांच्या पुण्य स्मृतीस मी हें अक्षरभावपुष्प विनम्रतेने अर्पण करीत आहें.

—लेखक

# हृद्गत

**थोर महात्मे होउनि गेले, चरित्र त्यांचें पहा जरा ।**
**आपण त्यांच्या समान व्हावें, हाच सापडे बोध खरा ॥**

'भारतीय राष्ट्रपुरुष' हें पुस्तक सुंदर आहे कीं नाही तें मला माहीत नाही, परंतु हें **संस्कारकारी** आहे, असें मी नम्रतापूर्वक सांगूं शकतों. हें माझ्या अनेक प्रेमळ विद्यार्थ्यांच्या व सन्मित्रांच्या आग्रहाचें अपत्य आहे. हीं **बोलकीं चरित्रें** मीं वर्गांत वाचून दाखविलीं. त्यांच्या श्रवणाने संस्कार-सुलभ कुमारांचीं हृदयें आदराने आणि उत्साहाने उचंबळून व भावनाभराने गहिंवरून आलेलीं मीं पाहिलीं. माझ्या हृदयांत गेल्या तीन दशकांपासून वाढत गेलेल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांसंबंधीच्या प्रेम, श्रद्धा आणि कृतज्ञता अशा स्फूर्तिप्रद भावना ह्यांत ओतलेल्या आहेत. प्रस्तुत पुस्तकाचें स्वरूप विवेचनात्मक नसून **गुणवर्णनात्मक** आहे. ह्यांत कोणत्याहि मताच्या, ध्येयाच्या व धोरणाच्या इष्टानिष्टतेचें तर्ककर्कश विश्लेषण नाही. भारतीय स्वातंत्र्य-संपादनाच्या उदात्त ध्येयाने प्रेरित होऊन ज्या थोर देशभक्तांनी आपले सार-सर्वस्व भारतमातेच्या चरणीं वाहिलें, त्यांच्या अनुकरणीय प्रयत्नांचें आणि सद्गुणांचें यथार्थ चित्रण व कार्याचें यथामति मूल्यमापन ह्यांत आढळेल. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहासहि यांत गुंफला गेला आहे. सद्गुणांचें आकलन सद्गुण वाढवितें, हें ह्या पुस्तकाच्या बाबतींत अन्वर्थक ठरावें. विस्तारभयास्तव ह्यांत फक्त पंधरा अर्वाचीन राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें गुंफलीं आहेत. द्वितीय व तृतीय खंडांत सर्व मतांच्या भारतीय राष्ट्रपुरुषांच्या चरित्रांचा समावेश होईल.

अत्यंत कार्यव्यग्र असतांनादेखील माझ्या विनंतीला मान देऊन प्रथितयश राष्ट्रीय साहित्यिक आचार्य काकासाहेब कालेलकर यांनी प्रस्तावनावजा "राष्ट्रीय-चरित्र-कीर्तन" लिहिलें याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. तसेंच वेळांत वेळ काढून प्रो. कुसुमावती देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, नागपूर, यांनी पुस्तक वाचून त्यावर अभिप्राय पाठविले

याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. मुखपृष्ठावरील सुंदर चित्र काढणारे माझे कलावंत सहकारी शिक्षक श्री. त्र्यं. ग. पाठक, बी. ए., बी. टी. यांचेहि मी आभार मानतों. पुण्याच्या व्हीनस प्रकाशनचे संचालक श्री. स. कृ. पाध्ये ह्यांनी ही द्वितीयावृत्ति इतकी सुंदर काढली, याबद्दल मी त्यांचे हार्दिक आभार मानतों. शेवटीं **साहाय्यक टीपा** जोडल्या आहेतच. सरतेशेवटीं जगन्नियंत्याला अशी माझी प्रार्थना आहे कीं, 'भारतीय राष्ट्रपुरुषां'चें हें अक्षरस्मारक तरुण वाचकांच्या हृदयांत स्वदेशप्रेम उत्पन्न करून भारतीय स्वातंत्र्याच्या संरक्षणाला व संवर्धनाला त्यांना अग्रेसर करो !

काशी
२ जानेवारी १९५६

विनीत
भी. गो. देशपांडे

# राष्ट्रीय चरित्रकीर्तन

उपदेशापेक्षा इतिहासाचा मनुष्याच्या मनावर अधिक परिणाम होतो आणि इतिहासापेक्षादेखील जीवनचरित्रांचा परिणाम तरुणांच्या मनावर अधिक होतो असा अनुभव आहे. शिक्षणकार्याला ज्यांनी स्वतःला वाहून घेतलें आहे अशा लोकांना वरील सिद्धान्त पटला असल्यामुळे ते आपल्या शिक्षणकार्यांत उपदेश, इतिहास आणि चरित्रकीर्तन या तिन्ही गोष्टींचा सुंदर मिलाफ करतात.

लहान मुलांना ऐतिहासिक घटनांची किचकट माहिती नको असते. एखादी वस्तु सोपी आणि आकर्षक करण्यासाठी जर घटनांना मुरड घातली, तर लहान मुलांना त्याचें वैषम्य वाटत नाही. गोष्ट गोड व्हावी, उठावदार व्हावी, गोष्टींतील बोध ठसठशीतपणें दिसूं लागावा, एवढीच त्यांची अपेक्षा असते. सत्य घटनांपेक्षाहि सत्य बोधालाच महत्त्व अधिक आहे. हा सिद्धान्त पुराणकारांनींहि स्वीकारला आहे आणि म्हणूनच पुराणांतील इतिहास, स्थळकाळाची ऐतिहासिकता सोडून सनातन इतिहास होऊन बसला आहे. पुराणांतील ऐतिहासिक घटनांची कोशिंबीर केली असली, तरी मनुष्यस्वभावाचें आकलन आणि सामाजिक प्रवाहांची मीमांसा पुराणांनीं अचूक केली आहे आणि विशेष म्हणजे त्यांनी ती मीमांसा भोळ्या लोकांना पटावी म्हणून लोकभोग्य बालबोध शैलींत मांडली आहे.

अशा पौराणिक शैलीचा निःसंकोचपणें उपयोग करून, तरुणांचीं हृदयें जागृत करणारी शैली मराठींत दाखल केली बालशिक्षणप्रवीण श्री. साने यांनी. म्हणूनच त्यांना विद्यार्थिजगानें ‘ साने गुरुजी ’ असें नांव दिलें. सानेगुरुजी मराठी भाषेचे एक शैलीकार लेखक आहेत. त्यांच्या शैलीला ‘ अश्रुशैली ’ म्हणणें हें त्यांचें सामर्थ्य न ओळखण्यासारखें आहे. त्यांची शैली भावना जागृत करणारी प्रवाही शैली आहे. या शैलीचें अनुकरण करणारे लेखक महाराष्ट्रांत तयार होणार आहेत. आणि गुरुजीसाहित्याचींहि भाषांतरें इतर भाषांतून होतील, तेव्हां त्या त्या भाषेंतहि ही **गुरुजीशैली** अवतार घेईल.

शिक्षणाला—केवळ पुस्तकी शिक्षणाला-नव्हे तर **जीवनशिक्षणाला** वाहून घेतलेल्या श्री. देशपांडे यांनी मुलांच्यासाठीं हल्लींच्या दोन तीन पिढ्यांतील पंधरा प्रमुख राष्ट्रपुरुषांचीं जीवनचरित्रें **गुरुजीशैलींत** लिहून काढलीं आहेत. हीं विद्यार्थ्यांच्यासाठी लिहिलीं आहेत. त्यांच्या भावना जागृत करण्यासाठी लिहिलीं आहेत. गुणग्रहणाची सवय लावण्या-साठी लिहिलीं आहेत. या चरित्रांच्या वाचनानें जिज्ञासातृप्ति होत नाही, पण जिज्ञासा जागृत होते. तरुणांच्या शिक्षणाच्या दृष्टीने हेंच योग्य आहे. स्वराज्याची प्रथम दीक्षा देणारे दादाभाई, स्वराज्याची एकाग्र घोषणा करणारे लोकमान्य टिळक, स्वराज्याचा आदर्श उच्च कोटीला पोहोंचून तें मिळवून देणारे महात्मा गांधी आणि त्या स्वराज्याचा गाडा खूप शर्थीने चालविणारे पं. जवाहरलाल नेहरू या चौकटींत बसणारे बहुतेक सगळे राष्ट्रपुरुष या पुस्तकांत गोवले गेले आहेत. या पुस्तकाचें वाचन विद्यार्थ्यांच्या मनांत सात्त्विक महत्त्वाकांक्षेचें बीजारोपण करील.

वर्धा<br>ता. २५-७-५१

आचार्य काकासाहेब कालेलकर

# थोरांचे अभिप्राय

**प्रा. कुसुमावती देशपांडे**, एम्. ए., नागपूर

"श्री. भी. गो. देशपांडे यांनी 'भारतीय राष्ट्रपुरुष' हें पुस्तक लिहून विद्यार्थ्यांना एक बहुमोल देणगी दिली आहे. पुस्तकाची भाषा विद्यार्थिसुलभ असून भावनोद्दीपक व विषयानुरूप आहे. या पुस्तकांत विद्यार्थ्यांना केवळ थोर व्यक्तींचें दर्शन घडेल असें नाही, तर त्यांना नवभारताच्या उत्क्रांतीचीहि स्पष्ट कल्पना येईल. ही परंपरा चालू ठेवण्याइतकें आत्मसामर्थ्यहि त्यांना लाभेल अशी मला आशा आहे."

**डॉ. वि. भि. कोलते**, एम्. ए., पीएच्. डी.

नागपूर महाविद्यालय, नागपूर

"मीं 'भारतीय राष्ट्रपुरुष' हें पुस्तक वाचलें. मला तें फार आवडलें. प्रत्येक राष्ट्रपुरुषाच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या राजकीय घटना आपण मार्मिकपणें निवडल्या असून, त्यांचा राष्ट्रोन्नतीला कसकसा उपयोग झाला हेंहि कौशल्याने वर्णन केलेलें आहे. आपली लेखनशैली मला मोठी चित्तवेधक वाटली. त्यामुळे हीं सर्व चरित्रें वाचतांना मन एकसारखें आपल्या लेखणीबरोबर पुढे पुढे खेचलें जातें. विद्यार्थ्यांना आपलें हें पुस्तक चांगलें मार्गदर्शक होईल अशी मला खात्री वाटते."

**डॉ. मा. गो. देशमुख**, एम्. ए.; पीएच्. डी.

नागपूर महाविद्यालय, नागपूर

"स्वावलंबी विद्यालयाचे प्राचार्य श्री. भी. गो. देशपांडे यांनी लिहिलेलें 'भारतीय राष्ट्रपुरुष' हें पुस्तक मी संपूर्ण वाचलें. त्यांनी केलेली राष्ट्रपुरुषांची निवड, त्यांची चरित्रविषयक माहिती व विशेषेंकरून एकंदर ग्रंथाची मांडणी ही लेखकाच्या अत्यंत प्रभावशाली भाषाशैलीला अनुरूप व पोषक

अशीच आहे. राष्ट्रपुरुषांची हीं बोलकीं चरित्रें लेखकाने देशानुरागाच्या कुंचल्याने रंगविलेलीं आहेत. स्वदेशप्रेम हा या ग्रंथांतील एकमेव रस आहे. या ग्रंथाच्या लेखनाने मराठी भाषेला एक नवीन ' शैलीकार ' मिळाला आहे, असें माझें प्रांजल मत आहे. कुमारवय हें किती संस्कारक्षम असतें व त्या वयांत विद्यार्थ्यांच्यासमोर व्यक्ति, विचार व भाषा यांचा कोणता आदर्श असणें जरूर आहे, याचें समर्पक गमक प्रा. देशपांडे यांनी हेरलें आहे व हें पुस्तक संस्कारक्षम विद्यार्थ्यांच्या वाचनांत आल्यास लेखकाच्या ओघवती भाषाशैलीचा आणि समुचित श्रुतयोजनांचा अनुकूल व इष्ट असा परिणाम होईल, याबद्दल माझी खात्री झाली आहे. लेखकाच्या या पहिल्याच ग्रंथकृतीला मी मनापासून सुयश चिंतितों. ''

**साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास**, नागपूर

" ' भारतीय राष्ट्रपुरुष ' या पुस्तकांत पंधरा राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें दिलीं आहेत. भारतांत केवळ एवढेच राष्ट्रपुरुष झाले असें श्री. देशपांडे यांचें मत नाही. पण शेवटीं पुस्तकाच्या विस्ताराला कांही मर्यादा असतेच. त्यांच्या संकल्पित योजनेंतील केवळ एक भाग म्हणजे हें पुस्तक होय. आणखीहि कांही विभागांत त्यांना हें प्रतिपादन पूर्ण करावयाचें आहे. ज्या राष्ट्र-पुरुषांचीं चरित्रें श्री. देशपांडे यांनी लिहिलीं आहेत, त्यांपैकीं प्रत्येकाच्या चरित्रावर एक मोठा ग्रंथ निर्माण होऊं शकतो. असें असतांहि आपलें मन आवरून व चेचक बुद्धीने त्या त्या महापुरुषांच्या चरित्रांतील सर्वस्पर्शी तेवढेच भाग उचलून देशपांडे यांनी प्रत्येकाच्या चारित्र्याची व चरित्राची योग्य कल्पना दिलेली आहे. पुस्तक विद्यार्थ्यांसाठी असून विद्यार्थ्यांच्या मनाची पकड घेण्याचें देशपांडे यांच्या लेखनशैलींत निश्चित सामर्थ्य आहे. त्यांची भाषा प्रवाही व शैली चित्तवेधक असून शिवाय दृष्टि सांप्रदायिक दोषाने डागळलेली नसल्यामुळे त्या त्या महापुरुषांच्या जीवनांतील विभूतिमत्त्वाच्या दिक्कालातीत विशेषांचें ते सहज आकलन करूं शकतात. अशीं पुस्तकें मराठी भाषेंत जितकीं निघतील तितकीं तीं आवश्यक आहेत. पण लेखकांनी अशीं पुस्तकें लिहून व प्रकाशित करून भागत नाही. हीं अशीं पुस्तकें शिक्षण-खात्यानें शालेय अभ्यासक्रमांत नियुक्त करणें हें खरें आवश्यक आहे. आता स्वातंत्र्याचा

काळ आहे. आपले वीर कोण हें राष्ट्राला कळणें अत्यंत आवश्यक आहे. मुलांच्या संस्कारक्षम मनावर काल्पनिक गोष्टीपेक्षा या सत्य घटना जे परिणाम घडवून आणतील ते निश्चितपणें अधिक चिरस्थायी स्वरूपाचे राहतील. देशपांडे यांचें प्रस्तुत पुस्तक शालेय अभ्यासक्रमांत समाविष्ट करण्यांत यावें असें आम्हांस वाटतें."

'महाराष्ट्र'
२–९–१९५१

"वर्ध्याचे एक ध्येयनिष्ठ शिक्षक श्री. देशपांडे यांनी विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करण्यास कारणीभूत व्हावें या हेतूने हें पुस्तक लिहिलें आहे. ब्रिटिश सत्तेचें जोखड फेकून देण्यासाठी सनदशीर मार्गांने व कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली ज्यांनी यत्न केला, अशा १५ राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें श्री. देशपांडे यांनी येथे थोडक्यांत सादर केलीं आहेत.

श्री. देशपांडे यांची लेखनशैली आकर्षक असून तिच्यावर सानेगुरुजींच्या शैलीची छाप पडलेली स्पष्टपणें दिसते. हीं चरित्रें वाचून विद्यार्थ्यांना भारताला ललामभूत झालेल्या राष्ट्रपुरुषांच्या जीवनकार्यांचें ज्ञान तर होईलच; पण त्याचबरोबर अधिक माहिती मिळविण्याची जिज्ञासाहि त्यांच्या मनांत जागृत होईल. व भारताच्या स्वातंत्र्यार्थ कांग्रेसच्या नेतृत्वाखाली करण्यांत आलेल्या प्रदीर्घ लढ्याचें एक धावतें चित्रहि त्यांच्या दृष्टिसमोर उभें राहील. त्या त्या पुरुषाचें जीवनदर्शन घडवितांना श्री. देशपांडे यांनी अनेक संस्कारक्षम घटनांचा परिणामकारक उपयोग करून घेतलेला आहे; व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हाच त्यांच्या लेखनाचा महत्त्वाचा आणि आकर्षक विशेष होय. आपल्या देशाविषयी गौरवाची भावना आणि राष्ट्रपुरुषांविषयी प्रेम व श्रद्धा विद्यार्थ्यांच्या मनांत रुजविण्याला या पुस्तकाचा निःसंशय उपयोग होईल. भारताच्या राष्ट्रजीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत कर्तृत्व गाजविलेल्या आणखी अनेक थोर पुरुषांचीं चरित्रें त्यांनी आपल्या गोड शैलीने विद्यार्थ्यांसमोर ठेवावींत, अशीच कोणीहि इच्छा करील."

'तरुण भारत' नागपूर
१६–९–१९५१

# अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पृष्ठ |
| १. | राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजी | ... | १ |
| २. | वंगसिंह सुरेन्द्रनाथ बॅनर्जी | ... | ११ |
| ३. | मुंबईचे सिंह सर फिरोजशहा मेथा | ... | १६ |
| ४. | भारत-सेवक गोपाळ कृष्ण गोखले | ... | २० |
| ५. | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक | ... | २९ |
| ६. | पंडित मदनमोहन मालवीय | ... | ४५ |
| ७. | पंजाबकेसरी लाला लजपतराय | ... | ५६ |
| ८. | विश्ववंद्य महात्मा गांधी | ... | ६५ |
| ९. | पंडित मोतीलाल नेहरू | ... | ८७ |
| १०. | देशबंधु चित्तरंजन दास | ... | ९३ |
| ११. | भारतकोकिला सरोजिनी नायडू | ... | १०१ |
| १२. | भारताचे लोहपुरुष सरदार पटेल | ... | १११ |
| १३. | अजातशत्रु बाबू राजेंद्रप्रसाद | ... | १२३ |
| १४. | मौलाना अबुल कलाम आझाद | ... | १३६ |
| १५. | भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू | ... | १४८ |

अनुक्रम 20624 दि. ...
क्रमांक ..634... नों: दि: 9.8.1201

रा ष्ट्र पि ता म ह

# दादाभाई नौरोजी


( १८२५ ते १९१७ )

ग्रंथ संग्रहालय
(690)

न तच्छस्त्रैर्न नागेंद्रैर्न हयैर्नच पत्तिभिः ।
कार्यं संसिद्धिमभ्येति यथा बुद्ध्या प्रसाधितम् ॥

—पंचतंत्रम्

पुण्यश्लोक शिवरायानें प्रज्वलित केलेली भारतीय स्वातंत्र्याची ज्योत १८१८ मध्ये मालवली. पारतंत्र्याच्या घनतिमिरामध्ये हिंदराष्ट्र दिङ्मूढ झालें. इंग्रजी राज्याच्या व संस्कृतीच्या झोतामुळे भारतीयांचे डोळे दिपून गेले.



इंग्रजी विद्येचें आणि वेषाचें, विचारांचें आणि आचारांचें सर्वत्र प्राबल्य वाढूं लागलें. नवें राज्य व नवे राज्यकर्ते, नवी विद्या व नवीं शास्त्रें यांच्या आहारीं सर्व गेले होते. इंग्रज भारतांत आले ते युरोपांतील सांस्कृतिक व औद्योगिक क्रांतीचीं सुफळें पाठीशीं बांधूनच आले. इंग्रज आले नसते तर आजच्या सर्वसामान्य यांत्रिक व भौतिक सुधारणांचा भारताला लाभ झाला नसता, असा अव्वल इंग्रजींतील पदवीधर सुशिक्षितांचा दृढ विश्वास होता. नव्हे त्यांना इंग्रजी राज्य (दास्य)

ईश्वराचें देणें वाटे. 'धन्य इंग्रजी संस्कृति ! धन्य इंग्रजी विद्या !! धन्य इंग्रजी सत्ता !!!' असे सहजोद्गार सर्वांच्या मुखांतून बाहेर पडत. 'आता कमींत कमी पांचशें वर्षें इंग्रजांच्या अंमलांत भारताला राहावें लागेल' अशी सार्वत्रिक समज झाली होती. पारतंत्र्याच्या या दीर्घ निशेमध्ये भारतीय राष्ट्रपुरुषाचे कोण हाल होतील, काय दुर्दशा होईल याची कोणालाहि खंत नव्हती. अशा अंधकारमय अव्वल इंग्रजीच्या पहिल्याच दशकांत भावी हिंदी स्वातंत्र्य-उषेचा सूचक, दादाभाई नौरोजीरूपी शुक्राचा तारा उदयास आला. या शुक्राने आपल्या बुद्धिबलाच्या किरणांनी दिशाभूल झालेल्या हिंदराष्ट्र-पुरुषाला स्वातंत्र्याचा पथ दर्शविला व त्याच्याच मार्गदर्शनाने आज भारत स्वातंत्र्यमंदिरांत प्रविष्ट झाला. म्हणून या थोर राष्ट्रपितामहाच्या जीवन-वृत्तान्ताचें आपण सिंहावलोन करूं या.

## जन्म व शिक्षण

१८२५ सालच्या सप्टेंबर महिन्याच्या चवथ्या तारखेस एका व्रतनिष्ठ पारशी पुरोहिताच्या घराण्यांत, मुंबापुरींत, आपल्या चरित्र-नायकाचा जन्म झाला. त्यांच्या मातोश्रीचें नांव माणकबाई होतें. माणकबाई नर-रत्नालाच प्रसवणार ! अमृतवल्लीला का विषफळें लागतात ? प्रकाशांतून का अंधार निर्माण होतो ? दादाभाईंचे वडील दोर्डी पडले उपाध्ये. त्यांची प्राप्ति तरी काय असणार ? सदाचरण व ईशभक्ति हेंच त्यांचें धन. माणकबाई कोंड्याचा मांडा करून आपला गरिबीचा संसार सुखावह करीत असे. 'जिच्या हातीं पाळण्याची दोरी, तीच जगातें उद्धारी' ही म्हण माणकबाईच्या बाबतींत सत्यसृष्टींत उतरली. Early difficulties are blessings in disguise असें म्हणतात दुर्दैवाचा घाला बाळ दादाभाईवर आला. निर्दय काळाने दादाभाई केवळ चार वर्षांचे असतांनाच त्यांच्या पित्याला ओढून नेलें. माणकबाईवरच त्यांच्या पालन-पोषणाचा भार पडला. पण माणकबाई स्वनाम-धन्य होती. ती जगांतील थोर मातांच्या मालिकेंत शोभणारी होती. जिजाबाईने ज्याप्रमाणे शिवरायाला, सम्राट् नेपोलियनच्या आईने जसें त्याला पूर्वजांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगून त्यांच्या बालमनांत तसेंच जगद्विख्यात होण्याची प्रेरणा निर्माण

केली व तिचें योग्य संवर्धन केलें; तसेंच माणकबाईंनी बाळ दादाभाईंच्या आमर्तीत केलें. त्यांच्या आईच्या चारित्र्याचा, चरित्राचा व शिकवणुकीचा त्यांच्या संस्कारक्षम मनावर चिरकाल टिकणारा परिणाम झाला. स्वतः दादाभाईंनी वयाच्या साठाव्या वर्षीं गद्‌गद कंठानें असे अत्यादरपूर्वक उद्‌गार काढले की, " मी स्वतःच्या कृतीचें फळ नसून माझ्या थोर आईच्या बुद्धिमत्तेचें व कष्टाचें फळ आहे. " धन्य ती माता व धन्य तो मातृनिष्ठ पुत्र ! वयाला पांचवें वर्ष लागतांच बाल दादा विवाहबद्ध झाला. पारशी समाजांत त्या काळीं बालविवाह रूढ होता ! त्याला बालपणीं दादी म्हणत. विवाहित दादा आता मेथार्जी नांवाच्या पंतोजीच्या शिशुवर्गांत दाखल झाला. ' छडी लागे छमछम, विद्या येई घमघम ' असल्याच पद्धतीची ही शाळा होती. दादीची कुशाग्रबुद्धि व विद्याभिरुचि पाहून गुरु मेथाजी त्यावर बेहद्द खूष असत, नव्हे, ते त्यावर पुत्रप्रेम करीत. दादीच्या सुदैवानें म्हणा कीं भरतभूमीच्या थोर भाग्यानें म्हणा, त्याचें इंग्रजी शिक्षण मोफत झालें. नाहीं तर दरिद्री माणकबाई आपल्या सुपुत्राला इंग्रजी शिक्षण देऊंच शकली नसती. नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी शाळेंतून दादाभाई मॅट्रिक उत्तीर्ण झाले. वर्गांत दादाचा नंबर सदाच पहिला ठेवलेला. प्रत्येक विषयांत तो मोठ्या उत्साहानें मन घाली. विषयाच्या पाठान्तरापेक्षा विषय समजून घेण्याकडे त्याचें विशेष लक्ष असे. या इंग्रजी शाळेंत शिकत असतांना दादाभाईंनी खेळण्यांत व बागडण्यांत आपला काल व्यर्थ घालविला नाहीं. विद्यार्थी खेळण्यांत दंग असत, तर ' चिंता लागली विश्वाची ' अशी दादाची विचारसमाधि लागलेली असे. ' आयुष्य हें कर्तव्य करण्यासाठीं आहे; चैनींत घालविण्यासाठीं नाहीं ' अशी त्यानें खूणगांठ बांधली व आमरण तिचें पालन केलें. इटलीचा उद्धारक जोसेफ मॅझिनी यानें आपल्या सुप्रसिद्ध निबंधग्रंथांत—" Duties of Man " " मानवी कर्तव्यें "–असें म्हटलें आहे कीं, When I slept I found life was beauty. When I woke I found life was duty. झालें, कुमार दादाभाईंना आपल्या जीवितकर्तव्यांची जाणीव झाली व तीं कर्तव्यें यशस्वी रीत्या पार पाडण्या-साठीं ते कॉलेजमध्ये सामुग्री जमा करूं लागले. त्याच सोसायटीच्या कॉलेजांत

त्यांनी उच्च शिक्षण घेतलें. दादाभाई हे परीक्षार्थी नसून खरे विद्यार्थी होते. विविध ग्रंथांचें अध्ययन करावें, बुद्धीस तेज देणारे विषय अभ्यासावे, शील-संवर्धक उक्तींचा संग्रह करावा, सुविचारांची नोंद करावी, हाच त्यांचा बुद्धिवर्धक उद्योग. अशा रीतीने वाचनव्यासंगामुळे त्यांचे विचार प्रगल्भ व अंतर्मुख होऊं लागले. जीवनसंदेश त्यांना उमजला आणि देशसेवेच्या अढळ ध्रुवताऱ्याकडे दृष्टि लावून त्यांनी जीवननौका वल्हविण्याचा निश्चय केला. इ. सन १८४५ मध्ये दादाभाई बी. ए. झाले.

## अध्यापकाचे प्राध्यापक

मातेच्या इच्छेला मान न देतां दादाभाईंनी १४० रु. ची सेक्रेटरीएट-मधील कारकुनाची नोकरी नाकारून ते नेटिव्ह एज्युकेशन सोसायटींत अध्यापक झाले. नाहीं तर भारवर्षातील एक असामान्य पुरुष सरकारी कारकुनीच्या चरकांत चिपून गेला असता. आपली वृत्ति व प्रवृत्ति पाहूनच माणसाने चरितार्थाचें साधन स्वीकारावें; अन्यथा गळ्यांत शिला बांधून पोहण्याचा दुष्कर प्रयत्न करण्यांत शक्तीचा अपव्यय होतो व अपयशाचे धनी व्हावें लागतें. शिक्षक या नात्याने दादाभाईंची सर्वत्र वाखाणणी होत होती. अध्यापक दादाभाई १८५४ मध्ये त्याच कॉलेजांत प्राध्यापक झाले. दादाभाई नौरोजी हे पहिले हिंदी प्रोफेसर होते—म्हणून त्यांचें नांव सर्वांना माहीत झालें. ते अखिल भारतवर्षाला परिचित झाले. आपलीं व्याख्यानें विद्यार्थ्यांस माहितीने भरलेलीं, सुलभ आणि सुश्राव्य वाटावीं म्हणून ते हरप्रयत्न करीत. प्रयत्न फुकट थोडेच जातात? पडलेलें शेणसुद्धा माती घेऊन उठतें. डॉ. रा. गो. भांडारकर हे दादाभाईंचे विद्यार्थी होते. त्यांनी अनेक वेळां असें बोलून दाखविलें कीं, "दादाभाईंचें शिकवणें व विद्यार्थ्यांवरील अकृत्रिम प्रेम आम्ही जन्मभर विसरणार नाही." चिंतनशील व विद्याव्यासंगी दादाभाईंनाहि 'प्रोफेसर' म्हणवून घेण्यांत धन्यता वाटे. अशी धन्यता सर्वांच्याच नशिबीं नसते. परंतु गणिताचे प्रोफेसर होण्यांतच दादाभाईंच्या आयुष्याची सिद्धता नव्हती. त्यांच्या मोठेपणाच्या शिडीची ही पहिली पायरी होती, त्यांच्या जीवनगंगेची ही 'गंगोत्री' होती.

## सार्वजनिक सेवेचा श्रीगणेशा

'कन्याशाळा' स्थापून दादाभाईंनी सार्वजनिक कार्यांत पदार्पण केलें. हिंदी मातांना सुविद्य करण्यांत त्यांचें थोर दूरदर्शित्व होतें हें खास. दादाभाईंना 'हिंदी कन्याशाळांचे जनक' म्हटल्यास सत्यापलाप मुळींच होणार नाही. म्हणून ही अत्यंत उपयुक्त समाजसुधारणा हातीं घेतल्याबद्दल सर्व स्त्रीसमाज त्यांना कृतज्ञतेने धन्यवाद देतो. विद्यार्थिवर्गांत नवचैतन्य निर्माण करण्यासाठी त्यांनी 'स्टूडन्टस् लिटररी अँड सायन्टिफिक सोसायटी'ची प्रस्थापना केली. या विद्यार्थिमंडळांत वाङ्मय व विविध शास्त्रें यांवर चर्चा होई. स्त्रीवर्गांत व विद्यार्थिवर्गांत जागृति निर्माण करण्याचें कार्य यशस्वी होत आहे हें पाहून त्यांनी लोकजागृति करण्याकरिता वर्तमानपत्राद्वारें लोक-शिक्षणाचें कार्य प्रारंभिलें. जनसमूहाला सुशिक्षित करून त्याच्या विचाराला योग्य वळण लावण्यास वर्तमानपत्र हें एक योग्य व अत्युत्तम साधन आहे. १८६१ मध्ये ते 'रास्तगोफ्तार'-'सत्यवादी'—या गुजराथी वर्तमानपत्राचे संपादक झाले. दादाभाईंच्या समाजसेवेचें वर्तुळ एकसारखें वाढतच होतें. त्यांनी पारशी धर्म-सुधारक मंडळ निर्मिलें व मुंबईतील आद्य 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' आणि 'व्हिक्टोरिया आल्बर्ट म्युझियम'ची स्थापना केली. आता दादाभाईंची दृष्टि राजकीय बाबींकडे वळली. ईस्ट इंडिया कंपनीचा राज्यकारभार अन्यायी व जुलमी होता. याचें कारण भारतीय जनतेचें स्वतःच्या हक्काविषयी गडद अज्ञान. जनतेंत राजकीय जागृति व्हावी म्हणून दादाभाईंनी १८५३ मध्ये "बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन" स्थापन केली. लहान-मोठ्या राजकीय बाबींची या सभेंत चर्चा होऊन व्याख्यानाद्वारें लोकांस त्यांचे हक्क समजावून देण्यांत येत सारांश, दादाभाईंच्या समाजकार्याचें स्वरूप सर्वंकष होतें, त्यांत एकदेशीयता नव्हती.

## लंडनला प्रयाण व कार्य

कोणत्याहि खऱ्या कार्यकर्त्याला शिक्षणखात्यांतील अगर इतर कोणत्याहि खात्यांतील नौकरी बंधनकारक ठरते. परावलंबनाच्या बेड्या त्याला पदोपदीं नडतात. म्हणून दादाभाईंनी प्राध्यापकपदाच्या शृंखला जरी

त्या सुवर्णाच्या होत्या तरी तटातट तोडल्या व स्वतंत्र होऊन व्यापार करण्याचें ठरविलें. सात हजार मैलांवरून ब्रिटिश व्यापारी येऊन आपल्या मायभूमीची अपार आर्थिक लूट करतात हें त्यांना बघवेना. म्हणून त्यांनी खास इंग्रजांच्या देशांत जाऊन व्यापार थाटण्याचें निश्चित केलें. 'कामा कंपनी'ची शाखा लंडनला उघडण्याचें ठरलें व सुदैवाने त्यांना दादाभाई-सारखा हुशार प्राध्यापक व्यवस्थापक म्हणून मिळाला. दादाभाईंनी लंडन येथे हिंदी व्यापाऱ्यांची बेअब्रू होऊं नये म्हणून अत्यंत प्रामाणिकपणें व्यवहार केले. तसेंच सार्वजनिक कार्याकडेहि त्यांचा ओढा असेच. नव्हे लोकसेवा, देशसेवा ही त्यांची प्रकृतिच बनली. ते निरनिराळ्या इंग्रजी वर्तमानपत्रांत हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीसंबंधी लेख लिहून हिंदी जनतेच्या दुर्दशेचें चित्र विलायती जनतेसमोर मांडीत. हिंदी रयतेच्या दु:खांची गाऱ्हाणीं त्यांनीच विलायतसरकारपुढे मांडलीं. याच सदुद्देशाने त्यांनी तेथे दोन संस्था स्थापन केल्या. त्या अशा : "लंडन हिंदी मंडळ" व "ईस्ट इंडिया असोसिएशन." या दोन्ही संस्थांद्वारें हिंदी प्रजेच्या राजकीय मागण्या ते बिनधोकपणें सरकारपुढे मांडीत. दादाभाईंना विश्रांति म्हणून माहीत नव्हती. त्यांचें म्हणणें असें कीं, "जीवन हें चैनीसाठी नसून तें एक विस्तीर्ण कार्यक्षेत्र आहे. मी जनतेसाठी आहें, कारण जनतेच्या अपार कृपेमुळेच मी वाढलों आहें तेव्हा हें माझें पवित्र कर्तव्य आहे कीं, जनतेच्या सेवेंत माझी सर्व क्षमता, शक्ति आणि मन अर्पण व्हावींत." अहाहा! केवढें उदात्त हृदय! केवढें थोर ध्येय! किती पवित्र विचार! या पावन-कारी विचारांचा दादाभाईंनी उभ्या आयुष्यांत आचार केला. लंडनला असतांना तेथील विश्वविद्यालयाच्या उपकुलगुरूंच्या विनंतीमुळे त्यांनी गुजराथी विषयाच्या प्राध्यापकाचें एक-दोन वर्षें कार्य केलें.

## मायभूमीस आगमन व दारिद्र्याचें निरीक्षण

एक तपभर विलायतेंत भारतासाठी चळवळ करून दादाभाई नौरोजी १८६९ मध्ये मायभूमीस परत आले. मुंबईच्या बंदरावर भारतीय जनतेने त्यांचें विराट् स्वागत केलें. याच सुप्रसंगीं त्यांना जनतेकडून तीस हजार रुपयांची थैली अर्पण करण्यांत आली. परंतु ते सर्व रुपये दादाभाईंनी 'ईस्ट

इंडिया असोसिएशन 'च्या कार्याला देऊन टाकले. कोण ही निस्पृहता ! भारतांत येतांच राजकीय जागृति उत्पन्न करण्याच्या कामगिरीस त्यांनी प्रारंभ केला. त्यांनी देशभर दौरा केला. या देशभ्रमणांत त्यांना भारतीय सर्वसामान्य जनतेच्या भीषण दारिद्र्याचें यथातथ्य आकलन झालें. त्यांनी त्याचें सखोल अध्ययन केलें, कारण-मीमांसा शोधून काढली व उपायांचीहि योजना निश्चित केली. हें सर्व त्यांनी आपल्या "Poverty and the Un-British Rule in India" या माहितीपूर्ण ग्रंथांत ग्रथित केलें आहे. व्याख्यानोद्भूत जागृति म्हणजे पाण्यावरील रेषा. वक्त्याची पाठ फिरली की ती मिटली. म्हणून त्यांनी मुंबई येथे 'ईस्ट इंडिया असोसिएशन'ची शाखा स्थापून लंडन व भारतामधील चळवळींचा संबंध जोडला. १८७३ मध्ये त्यांना पार्लमेंटच्या सिलेक्ट कमिटीपुढे साक्ष द्यावयास जावें लागलें. तें कामहि त्यांनी अत्यंत जिव्हाळ्याने व चोखपणें पार पाडलें. ब्रिटिश नोकरशाही हिंदी प्रजेची कशी आर्थिक लूट करीत आहे व हिंदी राज्यकारभार कसा डोईजड आहे हें विशद केलें.

## बडोद्याचे यशस्वी दिवाण

१८७४ मध्ये ब्रिटिश सरकारने बडोद्याच्या राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी एक कमिशन नेमलें. महाराज मल्हाररावांची पांचांवर धारण बसली व त्यांनी राज्यकार्य-धुरंधर दादाभाईंना दिवाण होऊन संस्थानची अब्रू वांचविण्याची विनंती केली. दयार्द्र दादाभाई महाराजांच्या मदतीला धावून गेले. पगारासंबंधी अवाक्षर न काढतां दादाभाईंनी राज्यकारभाराचा गाडा हाकण्यास सुरुवात केली. त्यांनी राज्यकारभारांत चिरस्थायी सुधारणा घडवून आणल्या. त्यांत न्यायखात्याची शुद्धता, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, वाचनालयांची वाढ वगैरे प्रमुख सुधारणा होत. परंतु लहरीलाल व विलासी मल्हाररावांशीं त्यांचे आंकडे जमेनात. दादाभाई दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणारे नव्हते. स्वाभिमानाची ते ज्वलन्त मूर्तीच होते. म्हणून निर्विकार चित्ताने त्यांनी दिवाणगिरी सोडली. कृतकार्याचें त्यांना समाधान मात्र होतें.

## काँग्रेसची स्थापना व पार्लमेंटमधील कार्य

आता दादाभाईंनी पुन्हा राष्ट्रजागृतीचें कार्य हातांत घेतलें. आपल्या

राष्ट्रीय चळवळींत जोम व सामर्थ्य आणावयाचें असेल तर अखिल भारतीय स्वरूपाची एक प्रभावी संस्था स्थापन करण्याची तीव्रता त्यांना भासूं लागली, व त्यांनी बंगालमधील ' इंडियन असोसिएशन ', मद्रासची 'महाजन सभा' आणि ' बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन ' ह्यांच्या एकीकरणांतून " इंडियन नॅशनल कॉंग्रेस " ही संस्था स्थापण्याचें ठरविलें व त्यांत ते त्वरित यशस्वी झाले. कॉंग्रेसच्या पहिल्याच अधिवेशनांत दादाभाईंनी असें जाहीर केलें कीं, विलायतमधील पार्लमेंटांत शिरून हिंदुस्थानविषयी पूर्णतया अनभिज्ञ असलेल्या विलायती जनतेचें लक्ष हिंदी प्रश्नांकडे वेधावयाचें. विलायतेंत जाऊन त्यांनी पार्लमेंटची निवडणूक लढविली, पण ते तींत यशस्वी होऊं शकले नाहीत. पाण्यांत शिरून मगराला मारण्यांत यश कसें येईल ? परंतु मारणाऱ्याची मात्र धडाडी सिद्ध होते. त्यांनी भारतास प्रत्यागमन केलें.

## कॉंग्रेसचे तीन वेळा अध्यक्ष

भारतीय जनतेने त्यांच्या धडाडीच्या राष्ट्रसेवेचें ऋण उचितपणें फेडलें. त्यांना १८८६ मध्ये कलकत्ता कॉंग्रेसचे एकमताने अध्यक्ष निवडण्यांत आलें. दादाभाई कांहीं कच्च्या गुरूचे चेले नव्हते. ते पुन्हा लंडनला गेले व त्यांनी निवडणुकींत यश मिळवून पार्लमेंटांत प्रवेश केला. ते ब्रिटिश पार्लमेंटचे पहिले हिंदी सभासद होते. त्यांनी ठरावाद्वारें व प्रश्नाद्वारें पार्लमेंटचें लक्ष हिंदी राज्यकारभाराकडे वेधलें. ते निर्भीडपणें हिंदी प्रजेचीं गाऱ्हाणीं त्यांत मांडीत. तेव्हा अशा लोकोत्तर पुढाऱ्याविषयी हिंदी जनतेला आदर वाटणें नैसर्गिक होतें. म्हणून लाहोरच्या कॉंग्रेसचें अध्यक्षपद ( १८९३ ) सुशोभित करण्याची त्यांना विनंती करण्यांत आली व त्यांनी ती स्वीकारली. हिंदी जनतेची सेवा केव्हाहि व कोठेहि करण्यास ते सदैव सज्जच असत. ते पुन्हा विलायतेला गेले व पार्लमेंटांत त्यांनी अनेक हिंद-हितैषी ठराव आणले. परंतु इंग्रजांच्या बाबतींत ते निराश व खिन्न झाले. केवळ सनदशीर मार्गाने इंग्रजसरकारचे डोळे उघडतील असें नाही. कांही तरी जनतेचें दडपण निर्माण करण्याची आवश्यकता त्यांना वाटूं लागली जनतेच्या चळवळीचा ते विचार करूं लागले. इकडे भारतांतहि योग्य अशीच भूमिका तयार होत होती. लोकमान्य टिळकांचा उदयोन्मुख

जहाल पक्ष व गोखले-मेथांचा मवाळ पक्ष यांच्यांत काँग्रेसच्या आधिपत्यासाठी स्पर्धा सुरू होती. अशा आणीबाणीच्या वेळीं कलकत्ता काँग्रेसचा अध्यक्ष कोणाला निवडावें हा मोठा पेंच पडला होता. परंतु दादाभाई नौरोजींच्या बाबतींत जहाल व मवाळ पक्ष यांचें एकमत झालें. त्यांच्याबद्दल दोघांनाहि आदर होता. मवाळांना वाटलें कीं, कांही झालें तरी दादाभाई ऐंशी वर्षांचे वृद्ध तेव्हा धाडशी तरुण जहालांकडे ते झुकणें शक्य नाही. उलट लो. टिळकांना खात्री होती कीं, काळ व परिस्थिति लक्षांत घेऊन दादाभाई त्यांना साथ दिल्याशिवाय राहणार नाहीत. दादाभाई देहाने वृद्ध होते, पण अंतःकरणाने तरुण होते. ते जनतेची क्षमता पाहून तिचें धुरीणत्व स्वीकारावयास सिद्ध असत. तेव्हा १९०६ च्या कलकत्ता काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून त्यांनी जहाल पक्षाच्या कार्यक्रमाचें समर्थन केलें. कांही मवाळांना भीतियुक्त आश्चर्य वाटलें. मवाळ थिजले, निराश झाले; जहाल हर्षले व वर्धित-उत्साह झाले. हिंदी जनतेचें ध्येय "स्वराज्य" आहे, असें त्यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून उद्घोषिलें.

### अखेरचा इषारा

आता त्यांचें वय ८२ च्या वर गेलें होतें, परंतु त्यांचा उत्साह अदम्य होता. देशसेवेची तळमळ त्यांना विसावा घेऊं देईना. आशा उत्साहाला खतपाणी घालीत, म्हणून ते पुन्हा एकदा विलायतेला गेले. लंडनला त्यांनी हिंदी जनतेच्या 'स्वराज्याचें' स्वरूप समजावून सांगितलें व यापुढे हिंदी जनता स्वराज्याचें ध्येय संपादण्यासाठी प्रत्यक्ष चळवळ करील असेंहि ब्रिटिश सरकारला व इंग्रज जनतेला स्पष्ट सांगितलें. हें त्यांचें शेवटचें दौत्य होतें. ही त्यांची शेवटची लंडनची वारी होती. इंग्रजांनी स्वखुषीने हिंदी प्रजेला स्वराज्याचे हक्क द्यावेत म्हणून त्यांनी हा शेवटचा सलोख्याचा प्रयत्न केला. परंतु तो प्रयत्नच ठरला.

### स्वर्गारोहण

दादाभाई निराश होऊन भारताला परतले. त्यांचा देह थकला. डॉक्टरांनी त्यांना विश्रांति घेण्याची सल्ला दिली. नाइलाजाने त्यांनी ती स्वीकारली. चैतन्य झालें तरी तें देहबद्धच असतें. अमूर्त आत्मा कार्य करूं

शकत नाही; कार्य देहधारणाच करूं शकते. ते विश्रांतीसाठी वर्सोवा गावीं जाऊन राहिले. गुजराथेंतील 'वर्सोवा' खेडें कांही वर्षे तीर्थच बनलें. मोठमोठे राष्ट्रीय कार्यकर्ते त्यांचें दर्शन व सल्ला घेण्यास जात. तेहि अत्यंत प्रेमाने व कळकळीने त्यांना सल्ला देत. पुढारी त्यांच्या दर्शनामुळे प्रेरणा घेऊन वर्धित-उत्साह परत येत. मरणापूर्वी कांही महिनेच मुंबई विद्यापीठाने दादाभाईंना 'डॉक्टरेट' ही बहुमानदर्शक पदवी अर्पण केली. पण त्यांत मुंबई विद्यापीठाने आत्मसन्मानच करून घेतला ना! अखेर ता. ३० जून १९१७ चा दुर्दिन उजाडला आणि दादाभाईंनी त्यांची इहलोकाची यात्रा संपविली. अखिल भारत हळहळलें. राष्ट्राचा पितामह दीर्घ आयुष्यांत प्रदीर्घ राष्ट्रकार्य करून चालता झाला!

अनुक्रम २०... दि.
क्रमांक ......८३६ नों: दि: २८/१०/५५

वं ग सिं ह


# सुरेन्द्रनाथ बॅनर्जी

## ( १८४८ ते १९२५ )

शतेषु जायते शूरः । सहस्त्रेषुच पंडितः ।
दशसहस्त्रेषु वक्ता च । दाता भवति वा न वा ॥

### जन्म व शिक्षण

ज्यांच्याविषयी ' न भूतो ' असें यथार्थतेने म्हणतां येतें, त्यांच्यापैकी एक वंगसिंह सुरेन्द्रनाथ बॅनर्जी होत. त्यांचें नांव १८८५ ते १९२० पर्यंत प्रत्येकाच्या ओठावर नाचत होतें. त्यांचें नांव माहीत नसणारा सुशिक्षित दुर्दैवी विरळाच. काश्मीर ते कन्याकुमारी व कराची ते कलकत्ता या वंगसिंहाच्या कलापूर्ण वक्तृत्वाच्या आरोळ्या निनादत होत्या. अशा वाग्देवतेचा जन्म एका कुलिन ब्राह्मण घरांण्यांत १८४८ मध्ये वंगराजधानी कलकत्ता शहरांत झाला. सुरेन्द्रनाथांचे वडील दुर्गाचरण बॅनर्जी, कलकत्याचे प्रसिद्ध डॉक्टर होते.



त्यांच्या हाताला यश असल्यामुळे ते लक्ष्मीच्या कृपेला पात्र झाले होते. दुर्गाचरण बॅनर्जींनी आपल्या चिरंजिवाची बुद्धिमत्ता पाहून त्याचें नांव

अँग्लो-इंडियन शाळेंत दाखल केलें. बाल सुरेन्द्राने सर्वांना आपल्या असामान्य बुद्धिमत्तेने आश्चर्यचकित केलें. सुरेन्द्र केवळ पंधराव्या वर्षी लॅटिन भाषा ऐच्छिक विषय घेऊन पहिल्या वर्गांत मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. वयाच्या विसाव्या वर्षी बी. ए. होऊन इंडियन सिव्हिल सर्व्हिसच्या (I. C. S.) परीक्षेसाठी ते विलायतेला रवाना झाले. त्या कालांत सरकारी नौकरीचें मोहजाल प्रत्येक होतकरू, हुशार व तरतरीत तरुणाला आकर्षक वाटत असे. सुरेन्द्र याला अपवाद नव्हते. परंतु ईश्वरी इच्छा कांही निराळीच होती.

## सरकारी नौकरींतून हकालपट्टी

१८७१ मध्ये सुरेन्द्र आय्. सी. एस्. होऊन हिंदुस्थानला परतले. त्यांची सिल्हेटचे जिल्हा मॅजिस्ट्रेट म्हणून नियुक्ति झाली. त्या काळीं हिंदी गृहस्थास एवढें उच्च पद मिळणें अहोभाग्याचें लक्षण होतें. अशा गृहस्थाला स्वर्ग दोन बोटें उरे. हे सरकारी अधिकारी " ब्रिटिश खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान " होऊन जात. त्यांना आपल्या भाषेचा, भूषेचा, संस्कृतीचा व देशाचा अभिमान वाटण्याऐवजी तिरस्कार वाटे. असें असूनहि त्यांच्या-वर आंग्ल प्रभूची अत्यंत करडी नजर असे. एखाद्या अधिकाऱ्याने चुकून अंधारांत जरी देशहिताचें कृत्य केलें किंवा विचार प्रदर्शित केले तर तो सरकारच्या अवकृपेला पात्र होई. अशा पोलादी सरकारी नौकरीच्या चौकटींत सुरेंद्र सापडले. कोणाच्या कागाळीवरून जिल्हा मॅजिस्ट्रेट सुरेन्द्रांवर सरकारी नौकरीच्या नियमांचा भंग केल्याच्या आरोपाखाली खटला भरण्यांत आला. सुरेन्द्रांनी आपली उघड चौकशी व्हावी म्हणून मागणी केली. पण व्यर्थ ! केवळ मासिक रु. ५० पेन्शनावर तरुण सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांची सरकारी नौकरींतून हकालपट्टी करण्यांत आली. ते पडले प्रयत्नवादी. ते आपली कैफियत घेऊन लंडनला गेले. त्यांनी भारतमंत्र्यापुढे आपली बाजू जातीने मांडली. परंतु विधिलिखित निराळेंच होतें. ते निराश होऊन मायभूमीला परतले. वाइटांतून चांगलें निर्माण व्हावयाचें होतें. मातृभूमीला सुरेन्द्रांसारख्या तरुणांची आवश्यकता होती. एवम् सुरेन्द्रांना मिळालेली सजा देशाला आशीर्वाद-स्वरूप भासली.

## देशसेवेचा श्रीगणेशा

सुरेन्द्रनाथ बॅनर्जींनी एक हायस्कूल स्थापून सार्वजनिक कार्यांत पदार्पण केलें. खाजगी शिक्षणसंस्थांशिवाय इष्ट ते देशसेवेचे संस्कार उदयोन्मुख पिढीवर करतां येणें शक्य नाही असें कै. वि. कृ. चिपळूणकर, लो. टिळक व कै. गो. ग. आगरकर यांच्याप्रमाणेच सुरेन्द्रांचें मत होतें. म्हणून रिपन हायस्कूल व कॉलेज स्थापून त्यांनी त्यांत स्वदेशी वातावरण निर्माण केलें. लो. टिळकांप्रमाणे ते स्वतः शिक्षक म्हणून ह्या संस्थांत राबले. त्यांच्या देशसेवेच्या महत्त्वाकांक्षेचें क्षितिज विस्तृत होऊं लागलें. ते आता लोकजागृतीकडे वळले. लोकशिक्षणाद्वारें म्हणजे वर्तमानपत्राद्वारें त्यांनी सेवेला सुरुवात केली. 'बंगाली' नांवाचें साप्ताहिक त्यांनी संपादिलें. ह्या साप्ताहिकाच्या एका अंकांत 'इलबर्ट बिला'वर सडेतोड व निर्भीड टीका आली. सरकारच्या नाकाला मिरच्या झोंबल्या. त्यांच्यावर खटला भरण्यांत आला. लो. टिळक व आगरकरांप्रमाणे १८८३ मध्ये त्यांना दोन महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा भोगावी लागली. ते तुरुंगांतून बाहेर पडले, तेव्हा जनतेने त्यांचें प्रचंड हार्दिक स्वागत केलें. ते जनतेचे आवडते नेते झाले. त्यांची लोकप्रियतारूपी गंगा दुथडी भरून वाहूं लागली. यशस्वी देशभक्त संपादक म्हणून अखिल भारतवर्षांत त्यांची ख्याति झाली. ते अखिल भारतीय पुढारी झाले. या लोकप्रिय 'बंगाली'च्या संपादकास इम्पीरिअल प्रेस कॉन्फरन्सला भारताचे प्रतिनिधि म्हणून आमंत्रण देण्यांत आलें. या पत्रपंडितांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेंत त्यांच्या वक्तृत्वाचा अनन्यसामान्य प्रभाव पडला. एक विदेशीय पत्रपंडित तर उद्गारला की, "जर हिंदुस्थानांत सुरेन्द्रांसारखे दहा-वीस मुत्सद्दी असतील, तर ब्रिटिशांनी त्याला स्वराज्य देऊन टाकावें."

युरोपांतून परत येतांच मुंबईला त्यांचें प्रचंड स्वागत झालें, व त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाचा पहिला अनुभव हिंदी जनतेने मुंबईच्या विराट् सभेंत घेतला. हजारो श्रोते त्यांचें सिंहनादी, रसाळ वक्तृत्व ऐकून केवळ मंत्रमुग्ध झाले. त्यांचा उत्तर हिंदुस्थानांत दौरा निघाला. शहरोशहरीं या वक्तृत्व-देवतेच्या दर्शनाला व श्रवणभक्तीला अलोट जनसंमर्द लोटे. 'बंगाली'

दैनिकांतील त्यांचे लेख जितके प्रभावी व रसाळ असत त्यापेक्षाहि कांकण-भर जास्त प्रभावी, रसाळ व चैतन्यदायी त्यांचीं भाषणें असत.

## राजकीय कार्य

१८७६ मध्ये कलकत्याला 'इंडियन असोसिएशन' स्थापून त्यांनी राजकारणांत प्रवेश केला. कुयोग असा कीं, तिच्या स्थापनेच्या दिवशीं सकाळीं त्यांच्या प्रिय पुत्राचें निधन झालें. पुत्रवियोगाचें असह्य दुःख गिळून ते सायंकाळीं स्थापनासमारंभाला हजर राहिले व निर्विकारपणें त्यांनी एक प्रभावी भाषणहि केलें. सार्वजनिक कार्याची केवढी ही कळकळ ! कॉंग्रेसच्या आद्यसंस्थापकांत ते मोडतात. १८८९ सालीं ते कॉंग्रेसने पाठविलेल्या शिष्टमंडळाचे सभासद म्हणून लंडनला गेले. त्यांचीं वक्तृत्वपूर्ण भाषणें ऐकून इंग्रज श्रोत्यांना पिट्, बर्क, आणि फॉक्स यांची आठवण होई. इंग्लंडांतील अत्यंत सुप्रसिद्ध वक्ते त्यांच्यापुढे निष्प्रभ ठरले. सूर्यापुढे ताऱ्यांचें तेज फिकेंच पडणार ! मुंबईचे सिंह सर फिरोजशहा मेथा यांनी त परत मुंबईला येतांच त्यांची तोंडभर स्तुति केली.

## कॉंग्रेसचे अध्यक्ष

यशोगिरीवर आरोहण करणाऱ्या सुरेन्द्रांना पुणें येथे भरलेल्या कॉंग्रेसच्या अकराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष एकमताने निवडण्यांत आलें. पुण्याला मतभेदाच्या खडकावर कॉंग्रेसचें तारूं फुटण्याची शक्यता होती, परंतु सुरेन्द्रांच्या नाविक–कार्यकुशलतेने हा प्रसंग टळला. त्यांच्या तीन तासांच्या अस्खलित अध्यक्षीय भाषणाने कॉंग्रेसमधील दुफळीला विरजण पडलें. अशी त्यांच्या वाणीची मोहिनी असे. केवळ त्यांचें भाषण ऐकण्यासाठी कांही लोक कॉंग्रेसच्या अधिवेशनाला जात व त्यांच्या वाग्वेणूच्या सुधापानाने उत्साहित होत. भाषेवरील प्रभुत्व व भाषाशैली, उच्च भावनोत्कटता, कल्पनेचा विलास इत्यादि गुणांनी त्यांचें वक्तृत्व विनटलेलें होतें. १९०२ सालीं अहमदाबाद येथे भरलेल्या कॉंग्रेस-अधिवेशनाचे ते दुसऱ्यांदा अध्यक्ष झाले. १९०५ साल उजाडलें व सुरेन्द्रनाथ बॅनर्जींच्या खमंग वक्तृत्वाला जहाल कार्यक्रमाची साथ मिळाली.

## वंगभंग व प्रागतिक संघाची स्थापना

वंगभंगाच्या चळवळींत ते तन-मन-धनानें पडले. त्यांनी आपल्या आरोळ्यांनी बंगाली प्रदेश हादरून सोडला. त्यांच्या अचूक वाक्-शरसंधानानें ब्रिटिश नौकरशाही जर्जर झाली, जनसंमर्द उफाळला व राष्ट्रजागृतीला भरती आली. जनता त्यांना " बंगालचा सिंह " म्हणून संबोधूं लागली. सुरेन्द्रनाथांच्या लोकप्रियतेचा सूर्य आकाशाच्या मध्यबिंदूवर पोंचला. पुढे उतार—खरोखरच ओहटी. सुरेन्द्रनाथांची गोतावळ पडली मवाळ व काँग्रेस गेली जहालांच्या हातांत. त्यांच्यासारखा ज्वालामुखी वक्ता मवाळांच्या जाळ्यांत गुरफटला हें एक नवलच. त्यांचे व काँग्रेसचे संबंध दुरावत गेले आणि १९१६ मध्ये ' प्रागतिक संघा '-( Liberal Federation ) चे ते अध्यक्ष नियुक्त झाले. " ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य " हेंच त्यांचें ध्येय होतें. ब्रिटिश राज्यघटना, संस्कृति, न्यायबुद्धि ह्या सर्वांवर त्यांची अढळ श्रद्धा होती. फक्त ब्रिटिश नौकरशाहीच्या बेदरकार राज्यव्यवस्थेवर ते लेखणीचे व वाणीचे कोरडे ओढीत. होतां होतां १९२१ सालीं अमलांत आलेल्या मॉंटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणान्वयें ते बंगालचे पहिले लोकनियुक्त शिक्षणमंत्री झाले. त्यांनी प्राथमिक व दुय्यम शिक्षणक्रमांत कांही सुधारणा घडवून आणल्या. अशा रीतीनें विधायक देशकार्य करून वयाच्या ७५ व्या वर्षीं त्यांनी राजकारणांतून संन्यास घेतला.

## महाप्रयाण

बाबू सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांची दिनचर्या आदर्श होती. दररोज स्वतःच्या बगीच्यांत ते जातीनें एक तास अंग-मेहनत करीत. आरोग्याबद्दल ते सतत दक्ष असत. म. गांधींशिवाय दुसरा कोणताहि राष्ट्रपुरुष त्यांची या बाबतींत बरोबरी करूं शकणार नाही. म्हणूनच त्यांनी दीर्घ आयुष्यांत प्रचंड चळवळी केल्या व नाना प्रसंगांना तोंड दिलें. असा दैवी वक्ता व महान् राष्ट्रपुरुष १९२५ मध्ये इहलोक सोडून स्वर्गारोहण करता झाला. परंतु त्यांच्या कीर्तीचा प्रतिध्वनि भारतवर्षांत अद्यापहि गर्जत आहे.

● ● ●

मुंबईचे सिंह


# सर फिरोजशहा मेथा

## (१८४५-१९१५)

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके। जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन्द्रैः।
इति महति विरोधे विद्यमाने समाने। नृपति-जनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥

[ राजाच्या हितकर्त्यांचा जनता द्वेष करते. उलट जनतेचा उद्धारक राजेलोकांकडून उपेक्षिला जातो. म्हणून दोघांच्याहि आदरास पात्र असणारा कार्यकर्ता दुर्मिळ. ]

सिद्धान्त अपवादाने सत्य ठरतो. वरील सिद्धान्तास सर फिरोजशहा मेथा अपवाद होते. अशा अपवादभूत पुरुष-श्रेष्ठाचें चरित्र आपण पाहूं. कॉंग्रेसच्या संस्थापकांपैकी फिरोजशहा मेथा ही एक अनुपेक्षणीय व्यक्ति होय. भारताचे 'लोहपुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांचा जसा कॉंग्रेसमध्ये दरारा होता, तसा १८९५ ते १९०५ पर्यंत मुंबईचे सिंह फिरोजशहा मेथा यांचा होता. मेथा, गोखले व वाच्छा या त्रिमूर्तींच्या ताब्यांत जवळ जवळ एक तप कॉंग्रेस होती. अशा थोर राष्ट्रपुरुषाचा जन्म एका धनाढ्य व व्यापारी पारशी कुळांत मुंबई येथे ता. ४ ऑगस्ट १८४५ मध्ये झाला.



## शिक्षण

बालवयांतच कुमार फिरोजने आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेने शिक्षकांना आश्चर्यचकित करून सोडलें. केवळ सोळाव्या वर्षी ते मॅट्रिक झाले. विसाव्या वर्षी मुंबई विश्वविद्यालयाचे ते बी. ए. झाले. नंतर एम्. ए. झाले. विसाव्या वर्षी एम्. ए होणारा विद्यार्थी त्या काळांत तरी विरळाच व असामान्य. पुढे बॅरिस्टर होण्यासाठी त्यांनी विलायतेला प्रयाण केलें. त्यांचें विलायतेंत तीन वर्षें शिक्षणसंपादनाप्रीत्यर्थ वास्तव्य होतें. परंतु याच तीन वर्षांत त्यांच्या भावी सार्वजनिक आयुष्याची मूस ओतली गेली. त्यांच्या संस्कार-सुलभ तरुण मनावर चिरस्थायी परिणाम झाले. राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजींच्या भाषणांमुळे देशसेवेची तळमळ तरुण फिरोजशहांच्या अंतःकरणांत निर्माण झाली. दादाभाई नौरोजींना त्यांनी सार्वजनिक कार्यांचे गुरु म्हणून निश्चित केलें. त्यांतच तेथे असणाऱ्या दोन देशभक्तांची, उमेश-चंद्र बॅनर्जी व मनमोहन घोष यांची आणि त्यांची मैत्री झाली. " समसमां संयोग कीं जाहला " समानध्येयी तीन व्यक्ति एकत्र आल्या व त्यांनी एक " वाङ्मय मंडळ " स्थापन केलें. याचेंच रूपान्तर ' ईस्ट इंडियन असोसिएशन ' मध्ये झालें. या मंडळाच्या नैमित्तिक सभांत फिरोजशहा आपले विचार अस्खलितपणें व निर्भीडपणें मांडीत.

## वकिली व देशसेवेचा श्रीगणेशा

बॅरिस्टरीची पदवी संपादून फिरोजशहा १८६८ मध्ये मायभूमीस परतले व त्यांनी मुंबईला वकिली सुरू केली. या धंद्यांत ते लवकरच चमकले. अखिल हिंदुस्थानांत कुशाग्र व यशस्वी बॅरिस्टर म्हणून ते ख्यात-नाम झाले. ऋद्धि आणि सिद्धि त्यांच्या घरीं पाणी भरूं लागल्या. फिरोज-शहांच्या देशसेवेचा श्रीगणेशा १८६९ मध्ये राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजी यांना मुंबईच्या नागरिकांनी २०,००० रुपयांची थैली देण्याच्या कार्यापासून झाला. हा वीस हजारांचा निधि गोळा करण्यांत फिरोजशहा मेथांचाच विशेष भाग होता. १८७२ त ते मुंबईच्या कॉर्पोरेशनचे लोक-नियुक्त सभासद झाले. ते सतत ३५ वर्षें कॉर्पोरेशनमध्ये होते. या प्रदीर्घ

काळांत ते मुंबई कॉर्पोरेशनचे तीन वेळां मेयर झाले. दबलेल्या हिंदी प्रजेच्या गाऱ्हाणीं वेशीवर टांगून सरकारवर दडपण आणण्यासाठी त्यांनी "बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन" स्थापण्यांत प्रमुख भाग घेतला. ते १८६८ पासून मुंबई कौन्सिलचे सभासद होते. त्या काळांत–कीं जेव्हा सरकारी राज्य-कारभारावर टीका करणें महापातक समजलें गेलें होतें–ते निर्भीड टीका करीत. एकदा जमीनमहसुलाच्या बिलाला विरोध म्हणून त्यांनी सभा-गृह-त्याग 'वॉक औट' हि केला होता. त्यांची ही निर्भय कृति त्या काळीं सर्व वर्तमानपत्रांतून गाजली व त्यांचें तें सिंहनादी वक्तृत्व ऐकून जनतेने त्यांना 'मुंबईचा सिंह' म्हणून संबोधण्यास सुरुवात केली.

## कॉंग्रेसची सेवा व अध्यक्ष

मुंबई येथे १८८५ मध्ये भरलेल्या कॉंग्रेसच्या प्रथमाधिवेशनाचे ते स्वागताध्यक्ष होते. कॉंग्रेसला जेव्हा जेव्हा आर्थिक चणचण भासे तेव्हा तेव्हा ते सढळ हाताने तिला मदत करीत. त्यांनी कुबेरासारखा अलोट पैसा संपादन केला व कर्णासारखें जनकार्याला दान दिलें. कॉंग्रेसच्या राजकीय धोरणाचें कट्टर समर्थक "बॉम्बे क्रॉनिकल" वर्तमानपत्र त्यांनीच प्रथम सुरू करून संपादिलें. कॉंग्रेसच्या कलकत्ता येथे भरलेल्या सहाव्या अधिवेशनाचे ते एकमताने अध्यक्ष नियुक्त झाले. जनतेने त्यांच्या कार्यांचा व नेतृत्वाचा उचित गौरव केला. इकडे हिंदुस्थानसरकारनेहि "सर" ही बहुमानाची पदवी त्यांना बहाल केली. राजा व प्रजा यांच्या प्रीतीचें भाजन होण्याचा दुर्मिळ मान फिरोजशहांना मिळाला खरा, पण तो अल्पजीवी ठरला. कारण परकीय राजसत्तेच्या कृपेच्या सावलींत वाढणारी वल्ली प्रजेच्या असंतोषाच्या रखरखीत उन्हांत केव्हाच सुकून जाते. फिरोजशहांसारख्या अत्यंत प्रतिभा-शाली, वक्तृत्वसंपन्न व वैभवशाली व्यक्तीलादेखील आपलें स्थान टिकविणें कठिण झालें. कॉंग्रेसमध्ये लोकमान्य टिळकांचा जहाल पक्ष फिरोजशहांच्या नेतृत्वाच्या गडाला सुरुंग लावण्यांत यशस्वी होत होता. मानी व रुबाबदार फिरोजशहांना हें दृश्य असह्य होत होतें. १९०६ च्या कलकत्याच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत फिरोजशहा पराभूत झाले. लोकमान्य टिळक जहाल पक्षाचा कार्यक्रम बहुमताने पसार करण्यांत यशस्वी झाले. मुंबईच्या सिंहाने

पुन्हा धडपडीला सुरुवात केली व असें म्हणतात कीं, १९०७ च्या सुरतेच्या चखेड्यास फिरोजशहा मेथा कारणीभूत होते. पुन्हा एकदा १९०९ मध्ये लाहोरला भरलेल्या चोविसाव्या कॉंग्रेसचे त्यांना अध्यक्ष निर्वाचित करण्यांत आलें होतें. परंतु करारी फिरोशहांनी तें झिडकारलें व कॉंग्रेसचा त्याग केला. यानंतर त्यांनी राजकारणांतून संन्यास घेतला. ते १९१५ मध्ये स्वर्गवासी झाले.

सर फिरोजशहा अनन्यसामान्य वक्ते होते. त्यांचा सिंहसदृश मुखवटा, खणखणीत आवाज, समयसूचकता, बिनतोड कोटिक्रम व परिणामकारक भाषणशैली वगैरे गुणांमुळे त्यांची तत्काळ जनमनावर छाप पडे. सरकारी अधिकारीहि त्यांना वचकून असत. म्हणूनच ‘ मुंबईचे सिंह ’ हें यथार्थ अभिधान त्यांना मिळालें. त्यांच्या एकंदर सार्वजनिक कार्याकडे पाहून त्यांचें चिरकाल टिकणारें पंचधातूंचें स्मारक मुंबईला कॉर्पोरेशनपुढे उभारण्यांत आलें. ज्यांनी मुंबई-सिंह फिरोजशहांना जिवंत पाहिलें नाही, अशांनादेखील त्यांचा भव्य, कलापूर्ण पुतळा पाहून त्यांच्याविषयी एक प्रकारचा आदर वाटतो खास.

भारत-सेवक

# गोपाळ कृष्ण गोखले

## ( १८६६–१९१५ )

मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरम् ।

केवळ दृढनिश्चय व सततोद्योग यांच्या जोरावर अत्यंत सामान्य स्थितींत जन्मलेला मनुष्य काय करूं शकतो व कोण होऊं शकतो याचें गोपाळ कृष्ण गोखले हें मूर्तिमंत उदाहरण आहे. तेव्हा या महाराष्ट्रीय राष्ट्रपुरुषाचें जीवन-चरित्र आपण अभ्यासूं या.



### बालपण व शिक्षण

रत्नागिरी जिल्हा खरोखरच स्वनाम-धन्य आहे. त्याने गेल्या शतकांत भारतास अनेक नररत्नें दिलीं. न्या. मू. म. गो. रानडे, लो. टिळक, कर्मवीर कर्वे व भारत-सेवक गो. कृ. गोखले हे त्यांत प्रमुख होत. अशा पवित्र जिल्ह्यांतील कोतळूक गावीं ता. ९ मे १८६६ मध्ये आपल्या चरित्र-नायकाचा जन्म झाला. वडील कृष्णराव पडले कोर्टांचे मामुली कारकून. त्यांचा संसार होता गरिबीचा. आई सत्यभामाबाई फार सुशील व देव-भोळी होती. असेल त्यांत सुखाने संसार करण्यांत ती तरबेज होती. अशा 'शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं' कां बरें आढळणार नाहीत? आम्रवृक्षाला का चिंचा लागतात? 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात'

असें म्हणतात. गोखल्यांच्या बाबतींत तें अगदी सत्य आहे. गोखल्यांच्या प्रामाणिकपणासंबंधी असें सांगण्यांत येतें कीं, 'एकदा वर्गात त्यांचेंच उदाहरण बरोबर आलें, म्हणून गणिताच्या अध्यापकांनी त्यांची तोंडभर स्तुति केली, पण सत्यवादी शिशु गोखल्याला ती बोचली व तो रडूं लागला. कारण विचारलें असतां त्याने सत्य कथन केलें कीं, मीं तें गणित दुसऱ्याच्या मदतीने सोडविलें.' कोण ही सत्याची चाड! दुसरी एक गोष्ट अशी सांगतात कीं, बाल गोपाळ गोखले एकदा आट्यापाट्या खेळत असतांना त्याचे वडील बंधु गोविंदराव जे विरुद्ध बाजूने खेळत होते, कोंडींत सांपडले. तेव्हा त्यांनी आपल्या धाकट्या बंधूला त्यांना सोडून देण्यासंबंधी विनंति केली. परंतु गोपाळरावांनी त्यांना स्पष्ट उत्तर दिलें कीं, "छे, भाऊ! पाहिजे तर मी खेळ सोडून जाईन, पण तुला खोटेपणाने सोडून माझ्या पक्षाचा घात करणार नाही." कोण ही सत्यप्रियता व पक्षनिष्ठता! याच गुणांचा वृक्ष पुढे फोफावला. पुढे वडील लवकरच वारले व गोपाळरावांना अत्यंत हालअपेष्टांतून व कष्टांतून आपला शिक्षणक्रम पुरा करावा लागला. ते वेळप्रसंगीं मुंबईला म्युनिसिपालिटीच्या दिव्यावर अभ्यास करीत. पण त्यांनी दैन्य व अपमान सहन केला नाही. अशा रीतीने मुंबईच्या एल्फिन्स्टन् कॉलेजांतून वयाच्या केवळ अठराव्या वर्षीं ते बी. ए. झाले. त्यांची ग्रहण-शक्ति व स्मरणशक्ति कांही औरच होती. विद्यार्थिदशेंत ग्रे, गोल्डस्मिथ, शेक्स्पियर वगैरे आंग्ल कवींचीं सर्वोत्कृष्ट काव्यें त्यांचीं तोंडपाठ असत.

**अध्यापकाचे प्राध्यापक**

बी. ए. झाल्यानंतर वकील व्हावें कीं इंजीनिअर व्हावें यांत ते कांही दिवस घुटमळले व शेवटीं लो. टिळक व आगरकर यांनी स्थापून चाल-विलेल्या पुणें येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ते दरमहा ३५ रुपयांवर शिक्षक झाले. याच वेळीं ते ज्यूरिस्प्रूडन्सची परीक्षा उत्तीर्ण झाले. नामांकित व फर्डें इंग्लिश बोलणारा वकील व्हावें हीच त्यांची मनीषा. परंतु 'दैवम् अन्यत्र चिन्तयेत्!' गोपाळरावांच्या हातून सर्व भारतवर्षाची परराष्ट्रांत वकिली व्हावयाची होती. अपार समुद्रांत तरंगणारी आगबोट लहानशा नदींत चालूं शकत नाही. आता गोखले हे टिळक-आगरकरांच्या सहवासांत

होते. असें म्हणतात कीं, मोठे लोक 'आपणासारिखे करिती तात्काळ' असे असतात. तेव्हा गुणग्राही व संस्कारसुलभ गोखले टिळक-आगरकरांच्या दैवी गुणांपासून कसे मुक्त राहणार? त्यांची स्वार्थत्यागाची वृत्ति दृढावली व लवकरच ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य झाले. आता ते कॉलेजांत इंग्रजी विषयाचे प्राध्यापक झाले. वर्गांत जाण्यापूर्वी ते पूर्वतयारी करीत व प्रतिपाद्य विषयाचें यथार्थ ज्ञान विद्यार्थ्यांस करून देत. कोणतेंहि स्वीकृत कार्य कायावाचामनाने करण्याचें त्यांचें ब्रीद होतें. ते अत्यंत कष्टाळू प्राध्यापक होते. याच वेळीं त्यांनी अंकगणिताचीं पुस्तकें लिहिलीं. या पुस्तकांच्या रचनेप्रीत्यर्थ मॅक्मिलन कंपनी त्यांना दरमहा १२५ रुपये देई. पुढे त्यांच्या अविषया प्रज्ञेने अर्थशास्त्र व उच्च गणित हे विषय हाताळले व ते या विषयांचे प्राध्यापक झाले.

## न्या. मू. रानड्यांचें राजकीय शिष्यत्व

महत्त्वाकांक्षी मनुष्याची ध्येय-क्षितिजें नेहमी विस्तारत असतात. आपल्या हातून भरीव देशसेवा व समाजसेवा व्हावी अशी त्यांची वृत्ति बळावूं लागली. इतक्यांत आगरकरांचा अपमृत्यु झाला. तेव्हा तरुण गोखले योग्य अशा गुरूच्या शोधांत होते. पूर्वी एकदा आगरकरांनी रानड्यांजवळ सहज बोलतांना अकपट मन, सरळ हृदय, उल्हास व समाजकार्य करण्याचा दुर्दम उत्साह वगैरे दुर्मिळ गुण गोपाळराव गोखल्यांत कसे आहेत हें सांगितलें होतें. तेव्हा समाजकार्यांत रत झालेल्या न्या. मू. रानडे यांनादेखील अशा होतकरू तरुणास भेटण्याची इच्छा झाली. अशा तऱ्हेने उभय बाजूंनी इच्छा दुणावत होती. सन १८८६ त एके शुभ दिनीं त्यांची गांठ पडली. गुरुस शिष्य मिळाला, शिष्यास गुरु लाभला. 'आंतर: कोऽपि हेतु'ची एकमेकांस ओळख झाली. 'समसमां संयोग कीं जाहला!' रामदासांना कल्याण गवसला. गुरु-शिष्य परमानंद पावून घरीं गेले. न्यायमूर्ति रानडे गोखल्यांचे राजकारणाचे गुरु झाले. राजकारणाचे धडे गोखले पायरी-पायरीने शिकूं लागले.

## सार्वजनिक कार्य

न्या. मू. रानडे यांनी संस्थापून चालविलेल्या पुणें येथील "सार्वजनिक

सभे"चे गोखले हे सेक्रेटरी झाले. सभेच्या-त्रैमासिकाचें संपादकत्वहि त्यांच्याकडे आलें. ते निर्वेतन काम करीत. ते स्वभावतः पडले सत्यान्वेषी, त्यामुळे हें त्रैमासिक संपादन करतांना त्यांना विविध विषयांचा सखोल अभ्यास करावा लागे. तसेंच सार्वजनिक सभेचे सन्माननीय मंत्री म्हणून अनेक सार्वजनिक जिव्हाळ्याच्या व महत्त्वाच्या विषयांवर त्यांना सभेचें मत द्यावें लागे किंवा सरकारपुढे प्रजेच्या तक्रारी व गाऱ्हाणीं मांडावीं लागत. तेव्हा सर्व विषयांचा व राज्यव्यवस्थेच्या बाबींचा त्यांना सांगोपांग अभ्यास करावा लागे. आळस हा गोखल्यांचा शत्रु असल्यामुळे त्यांनी Blue Books चा सूक्ष्म अभ्यास केला. एवम् राजनीतीचें परिशीलन खडतर तपश्चर्येप्रमाणे गोखल्यांनी रानड्यांच्या सेवेंत राहून केलें. प्रयत्नदेव गोखले आता पुढारीपणाच्या शिडीच्या पायऱ्या आक्रमूं लागले.

## कॉंग्रेस-कार्य

न्या. मू. रानडे यांच्या चरणापाशीं राजनीति, अर्थशास्त्र यांचे धडे घेऊन युयुत्सु नवयुवक गोपाळराव गोखले १८८९ सालीं राष्ट्रीय सभेच्या प्रांगणांत शिरले. १८९० मध्ये राष्ट्रीय सभा कलकत्त्यास भरली. या अधिवेशनांत गोखल्यांनी एक लहानच पण चटकदार आणि मुद्देसूद भाषण केलें. प्राप्तीचा कर ( Income Tax ) रद्द व्हावा असें त्यांनी साधार प्रतिपादिलें. हें त्यांचें पहिलेंवहिलें भाषण सर्वांस आवडलें. या वेळीं गोपाळरावांचें वय केवळ २४ वर्षांचें होतें. त्यांना एका मार्मिकाने "भारतीय धाकटा पिट" म्हणून संबोधिलें. भारतीय राजकीय क्षितिजावर एक तेजोमय तारा उदय पावत आहे, नव्हे पावला आहे असा सर्वांना भास झाला. १८९१ च्या नागपूरच्या कॉंग्रेस अधिवेशनांतहि त्यांचें एक प्रभावी भाषण झालें. पूर्वतयारीशिवाय ते कधीच बोलत नसत. भाषा कशी असावी, विचार कसे मांडावे, प्रतिपक्षाबद्दल योग्य आदर कसा दर्शवावा व आपलें मत ठासून कसें प्रतिपादावें याचा त्यांनी शास्त्रोक्त अभ्यास केला होता. न्या. मू. रानडे यांचें नेमस्तपणाचें निशाण हातीं घेऊन हा युवक राष्ट्रीय सभेंत दाखल झाला. अशा रीतीने गोखल्यांच्या मनाची व बुद्धीची तयारी होत होती.

१८९५ मध्ये गोपाळराव गोखले लो. टिळकांच्याबरोबर पुणें काँग्रेस कमिटीचे सहमंत्री झाले. त्यांच्या कार्याचा व्याप सारखा वाढतच होता. याच वर्षी गोपाळराव पदवीधरांतर्फे मुंबई विद्यापीठाचे फेलो म्हणून निवडून आले. मरेपर्यंत ते युनिव्हर्सिटीचे फेलो होते. सुशिक्षितांची त्यांच्यावर निष्ठा होती. १८९६ त पुण्याला न्या. मू. रानडे यांनी 'डेक्कन सभे'चा सार्वजनिक सभेच्या विरुद्ध सवतासुभा उभा केला. या नवस्थापित सभेचे गोपाळराव गोखले हेच मुख्य मंत्री होते. १८९६ मध्ये कलकत्त्यास राष्ट्रीय सभा होती. न्या. मू. रानडे व गोखले ही गुरु-शिष्यांची जोडी तेथे गेली. या अधिवेशनांत ब्रिटिश राजवटीच्या डोईजड खर्चावर त्यांनी साधार व सडकून टीका केली. गोखले, तीस वर्षांचा तरतरीत व वाक्पटु तरुण सर्वांच्या डोळ्यांत भरला. गुरूला, न्या. रानड्यांना आंतरिक समाधान वाटलें. त्याच काँग्रेसने वेल्बी कमिशनपुढे, लंडन येथे साक्ष देण्यास श्री. वाच्छा व गोपाळराव गोखले यांना प्रतिनिधि म्हणून नियुक्त केलें. आतां युयुत्सु गोखले विलायतेंत जाऊन आपल्या प्रतिभेने तेथील लोकांना चकित करणार! To a man of Spirit opportunities are duties. कर्तृत्वसंपन्नास संधी म्हणजेच कर्तव्यकर्म! गोखले तर हाडानेच प्रयत्नदेव होते. मग या सुवर्ण-संधीचा ते कसा बरें फायदा घेणार नाहीत? वेल्बी कमिशनपुढे त्यांची प्रदीर्घ साक्ष झाली. त्यांनी आपली आंकडे-शास्त्राने परिपुष्ट व माहितीगर्भ लेखी साक्ष एखाद्या मोठ्या वक्त्याच्या आवेशांत वाचून दाखविली. त्याचा सर्वांवर फार प्रभाव पडला. त्यांच्या वाक्‌कौशल्याचें कौतुक झालें. गोखले म्हणजे जिज्ञासा, उत्साह व अकपटपणाची मूर्ति. ते प्रसिद्ध लेखक व राजकारणधुरंधर मोर्लेसाहेबांस भेटले. अनेक शिक्षण-शास्त्रज्ञांची त्यांनी ओळख करून घेतली. अशा रीतीने अनुभवसंपन्न होऊन विजयी गोखले मातृभूमीस परतले.

## कौन्सिलांतील कामगिरी

हिंदी जनतेने त्यांचें उचित स्वागत केलें. याच वर्षी गोखले मुंबई प्रांतिक कौन्सिलमध्ये लोकनियुक्त सभासद म्हणून निवडून आले. सनदशीर मार्गावर गोखल्यांचा अढळ विश्वास होता. म्हणून आता त्यांच्या धिम्या

प्रकृतीला योग्य क्षेत्र मिळालें; त्यांच्या अभ्यासू वृत्तीला वाव मिळाला व त्यांच्या वाग्वल्लरीला बहरण्यास मंडप मिळाला. १९०० पासून तों मृत्यूपर्यंत गोपाळराव गोखले हे प्रांतिक नाही तर मध्यवर्ति वरिष्ठ, कोणत्या ना कोणत्या तरी कौन्सिलचे सभासद होते. या वर्षींच्या पाहिल्याच भाषणांत त्यांनी दुष्काळपीडितांची कष्टप्रद कथा आंकडे देऊन कौन्सिलांत कथन केली व सरकारचें त्यासंबंधी काय कर्तव्य होतें तेंहि सुचविलें. आपला सत्शिष्य कौन्सिलांत सरकारशीं झगडण्यांत तरबेज झाला हें पाहून न्या. मू. रानड्यांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. १९०१ सालीं मुंबईचे सिंह फिरोजशहा मेथा यांच्या जागीं गोपाळराव गोखले वरिष्ठ कायदेकौन्सिलाचे सभासद झाले. आता त्यांच्या सूक्ष्म बुद्धीचा व सखोल अभ्यासाचा फायदा अखिल भारताला मिळूं लागला. गोखल्यांची वरिष्ठ कौन्सिलांतील सर्वश्रेष्ठ व अत्यंत महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांचीं अंदाज-पत्रकांवरील भाषणें. ह्या महाराष्ट्रीय तरुण-आंकडेबहादूर अंदाज-पत्रकावर अशी कांही टीका करी कीं, सरकारास तोंड उघडतां येऊं नये. राज्यकारभारासंबंधी आपले जे विचार असतील ते सर्व विचार गोखले अत्यंत प्रभावीपणें व निर्भीडपणें मांडीत. " शिल्लक पडली तर कर कमी करा, हिंदी लोकांस जास्त जागा द्या, शिक्षणावर जास्त खर्च करा, गोऱ्या लष्कराचा खर्च कमी करा, शेतकऱ्यांची स्थिति सुधारा, प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचें करा." हीं ध्येयें मांडून त्यांच्यावर ते व्यवस्थित व देशभक्तीच्या ओलाव्याने थबथबलेलीं भाषणें देत. त्यांच्या वाग्वल्लरीला तर वरिष्ठ कौन्सिलांत वासंतिक बहर येत असे. लोकांनी जेव्हा आपल्या हक्कांचें समर्थन करणारा सरकारी जुलमी राज्यव्यवस्थेवर निर्भीड टीका करणारा व लोकपक्षाची बाजू प्रभावीपणाने मांडणारा तरुण पुढारी गोखले पाहिला, तेव्हा त्यांना आनंदाचें भरतें आलें. गोखल्यांच्या लोकप्रियतेचा चंद्र कलाकलांनी वर्धिष्णु होत होता. गोखले १९०४ मध्ये काँग्रेसचे उपमंत्री ( Joint Secretary ) झाले. इकडे गुणग्राही परंतु कुर्रेबाज लॉर्ड कर्झन साहेबांनी गोखल्यांना सी. आय्. ई. ही पदवी अर्पण केली. ही पदवी देतांना कर्झन साहेबांनी असें लिहिलें कीं, " मी तुमच्या मुद्देसूद मांडणी, भारदस्तपणा,

सखोल अभ्यास, देशहिताची कळकळ व विवेकशीलता या गुणांनी प्रभावित होऊन ही पदवी बहाल करीत आहें.'' खरोखरच ' गुणी: गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुण: । '

याच वर्षी कॉंग्रेसने विलायतेला, लॉर्ड कर्झन यांनी जाहीर केलेल्या ' वंग-भंगाला ' विरोध करण्यासाठी एक शिष्टमंडळ पाठविलें. या शिष्टमंडळांतले ' अंगद ' म्हणजे नामदार गोखले. त्यांचा विलायतेंत पन्नास दिवस मुक्काम होता. एवढ्या अल्पावधींत त्यांनी ४५ शहरीं व्याख्यानें दिलीं. " वसाहतींचें स्वराज्य हिंदुस्थानला द्या ", " वंगभंग करूं नका " असें त्यांनी आंग्ल जनतेला कळकळीने व परिणामकारकपणें पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाची व वक्तृत्वगुणाची गुणी जनांनी मुक्तकंठाने स्तुति केली. त्यांच्या स्पष्टोक्तीनें सर्व देशबांधव त्यांच्याकडे आकृष्ट झाले होते. ते विजयी वीराप्रमाणे मायभूमीस परतले.

**कॉंग्रेसचे अध्यक्ष**

जनतेने १९०५ च्या काशीच्या कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडून त्यांना गौरविलें. गोखल्यांनी वयाच्या ३९ व्या वर्षी अत्युच्च बिंदु गांठला. राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष म्हणजे भारताचा अनभिषिक्त राजा, लोकहृदयसम्राट्. देशाने त्यांच्या कामगिरीचा उचित गौरव केला. एवढ्या अल्प वयांत कॉंग्रेसचा अध्यक्ष होण्याचा मान गोखल्यांनी प्रथम मिळविला. गोखल्यांनी " बहिष्काराचा पुरस्कार " केला. त्यांचें अध्यक्षीय भाषण जहालांना व मवाळांनाहि आवडलें. गोखले पडले मवाळाग्रणी, परंतु त्यांनी पुरस्कारलेल्या बहिष्काराला जहालाग्रणी लो. टिळकांनी उचलून धरलें. १८८९ सालीं कॉंग्रेसचा प्रेक्षक म्हणून उपस्थित असणारे गोखले १९०५ सालीं कॉंग्रेसचे एकमताने अध्यक्ष झाले. कोण ही कर्तबगारी व कार्य करण्याची धडाडी !

**ना. गोखले व म. गांधी**

१९०५ च्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून गोखल्यांनी ' बहिष्कारा 'चें रणशिंग फुंकलें. त्या रणशिंगाच्या आवाजाने दक्षिण आफ्रिकेंत काम करीत

असलेले म. गांधी गोखल्यांकडे आकृष्ट झाले. या बहिष्काराच्या अमोघ शस्त्राचा उपयोग म. गांधी दक्षिण आफ्रिकेंत करीत होते. तेव्हा म. गांधींनी ना. गोखल्यांना आफ्रिकेंत येऊन तेथील परिस्थितीचें अवलोकन करा व मार्गदर्शन करा म्हणून विनंती केली. ना. गोखले १९०८ मध्ये दक्षिण आफ्रिकेंत गेले. त्यांनी म. गांधींच्या कार्याचें सूक्ष्म अवलोकन केलें व त्यांची पाठ थोपटली. १९०९ च्या कॉंग्रेस अधिवेशनांत गोखल्यांनी म. गांधींच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांना ५० हजारांचा निधि, 'सत्याग्रहाला' मदत म्हणून पाठविला. याचा परिणाम इष्ट तोच झाला. म. गांधी हे गोखल्यांचे अनुयायी म्हणवून घेऊं लागले. गांधीजींनी आत्मचरित्रांत असें लिहिलें आहे कीं, "माझ्या हृदयसिंहासनावर गोखले विराजमान आहेत." जेव्हा म. गांधी भारतवर्षांत सार्वजनिक कार्यांत पदार्पण करण्याच्या सद्हेतूने आले, तेव्हा त्यांनी सर फिरोजशहा मेथा, लो. टिळक व नामदार गोखले यांच्या भेटी घेतल्या. म. गांधींनी अत्यंत सुंदर व मार्मिक शब्दांत या तीन देशभक्तांचें वर्णन केलें. तें असें : "सर फिरोजशहा मला हिमालयासारखे वाटले, लो. टिळक सागरासारखे भासले व नामदार गोखले गंगेसारखे वाटले. हिमालयावर आरोहण करणें दुष्कर वाटलें व समुद्रांत उतरणें भयावह भासलें, म्हणून गंगेच्या मांडीवरच खेळण्याचें मीं निश्चित केलें." ना. गोखल्यांनीच म. गांधींना भारतवर्षांत येऊन देशकार्य करण्याला प्रोत्साहन दिलें. म. गांधींची महत्ता गोखल्यांनीच सर्वांआधी ओळखली. असा या दोन थोर देशभक्तांमध्ये जिव्हाळ्याचा संबंध होता.

## भारतसेवकसमाज

गोपाळ कृष्ण गोखल्यांची अत्यंत भरीव विधायक कामगिरी म्हणजे 'भारतसेवक समाज.' सनदशीर मार्गाने चळवळ करून देशाची सर्वांगीण उन्नति करणें व ती उन्नति करण्यास देशांतील सुशिक्षित तरुणांस तयार करणें हें या संस्थेचें ध्येय होतें. जसें रामदासांनी सतराव्या शतकांत कार्यकर्त्यांचें संघटन केलें तसेंच गोखल्यांना करावयाचें होतें व ते त्यांत यशस्वी झाले. केवळ ७५ रुपये जीवन-वेतन घेऊन पदवीधर तरुण या समाजाद्वारें समाजसेवा करीत. याच मंडळातर्फे राज्यशास्त्राचे व

अर्थशास्त्राचे वर्ग चालविण्यांत येत, अशा प्रकारच्या सुविद्य, त्यागनिष्ठ देश-सेवकांचें हें मंडळ गोखल्यांचें जिवंत स्मारक होय.

**त्यांची थोरवी**

नामदार गोपाळराव गोखल्यांची राहणी अत्यंत साधी असे, म्हणूनच त्यांच्या चारित्र्याचा व प्रेमळ स्वभावाचा गांधींवर विलक्षण परिणाम झाला. सरकारी उच्च पगाराची जागा त्यांना कित्येकदा अर्पण करण्यांत आली, परंतु त्यांनी ती स्वाभिमानपूर्वक नाकारली. असा थोर देशभक्त १९१५ मध्ये इहलोक सोडून गेला. सर्व राष्ट्र हळहळलें. ना. गोखल्यांचे राजकारणांतील कट्टर प्रतिस्पर्धी, जहालाग्रणी लो. टिळक यांनी त्यांच्या-संबंधी मृत्युलेखांत असें लिहिलें कीं, "भारताचा हिरा, महाराष्ट्राचें रत्न आणि देशभक्तांचा शिरोमणि गोखल्यांच्या मृत्यूने नाहीसा झाला."

• • •

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

## (१८५६–१९२०)

नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने ।
विक्रमार्जित-सत्त्वस्य स्वयमेव मृगेन्द्रता ॥

"स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच" असा संजीवनमंत्र घोषित करणाऱ्या लोकमान्यांनी आपला देह राष्ट्रकार्यार्थ अक्षरशः चंदनाप्रमाणे झिजविला. अर्वाचीन जर्मन राष्ट्राला जसें प्रिन्स बिस्मार्कने, अर्वाचीन इटलीला जसें जोसेफ मॅझिनीने व अमेरिकेला जॉर्ज वाशिंग्टनने राष्ट्र म्हणून घडविलें तसेंच इंग्रजी राजवटींतील भारताला स्वतंत्र राष्ट्र म्हणून निर्माण करण्याचा भगीरथ प्रयत्न लोकमान्यांनी केला. गुलामगिरीच्या पंकांत रुतलेल्या हिंदुस्थानचा उद्धार करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या गुणांची संपदा लोकमान्यांच्या जवळ होती. आपल्या त्यागाने, तपस्येने व सिंहकर्तृत्वाने ते अखिल भारतीय जनतेचे हृदयसम्राट् झाले, लोकमान्य झाले ! लोकमान्यत्वाचा बहुमान दुसऱ्या कोणाच्या वांट्यास आला आहे ? म्हणून या युगपुरुषाच्या चरित्राचें अध्ययन करूं या.



### जन्म व शिक्षण

आपल्या विशाल शाखांनी व गडद पर्णांनी शेकडो त्रस्त वाटसरूंना आश्रय देणाऱ्या वृक्षराजाचा, वटवृक्षाचा जन्म जसा मोहरीएवढ्या सूक्ष्म

वियांत होतो, तद्वतच आपल्या कर्तृत्वाने अखिल भारताला व इंग्रजी साम्राज्यशाहीला हलवून सोडणाऱ्या लो. टिळकांचा जन्म कोकणांतील चिखलगावांत अत्यंत सामान्य कुलांत झाला. त्यांचे वडील गंगाधर-शास्त्री पडले शिक्षणखात्यांतील अत्यंत सामान्य अधिकारी. त्यांनी नोकरीला सुरुवात केली ५ रु. पगारावर! ते सामान्य शिक्षकाचे झाले असिस्टंट डेप्युटी इन्स्पेक्टर. पण गणित व संस्कृत हे त्यांचे आवडते विषय व ह्या विषयांत त्यांची प्रगतीहि वाखाणण्यासारखी होती. कांही शालोपयोगी ग्रंथरचना–नव्हे पुस्तिका लिहून त्यांनी थोडें फार द्रव्यार्जन केलें होतें. त्यांच्या सुशील पत्नीचें नांव पार्वतीबाई. ती खरोखरच गंगाधराची पार्वतीच होती. पार्वतीची तपस्या, चारित्र्य व पातिव्रत्य तिच्यांत एकवटलेलीं होतीं. तिने पुत्रप्राप्तीसाठी सूर्योपासना केली. सूर्यनारायण तिच्या व्रताने संतुष्ट झाले व पार्वतीबाईंना ता. २३ जुलै १८५६ रोजीं सूर्यासारखा तेजस्वी पुत्र सूर्योदयानंतर केवळ दोन घटिकांनी प्राप्त झाला. गंगाधरशास्त्रींच्या व पार्वतीबाईंच्या संसारवेलीला अमृतफल लागलें. त्यांचा हर्ष गगनांत मावेना. मुलाचें नामसंस्करण 'बलवंत' करण्यांत आलें. पण आईबाप 'बाळ' म्हणूनच लडिवाळपणाने त्याला संबोधीत. पार्वती-गंगाधराचा बाळ भारतमातेचा लाडका 'बाळ' झाला आहे हा अपूर्व योगायोग नव्हे काय?

गंगाधरशास्त्र्यांनी बाळाला 'अमरकोश' मुखोद्गत करावयास लावला. बाळ पडला एकपाठी. त्याशिवाय गणितांतहि त्यांची चांगलीच प्रगति झाली. केवळ दहाव्या वर्षीच बाळ टिळक सर्वसामान्य संस्कृत श्लोकांचा अर्थ लावीत. एवम् विद्याधन बाळ टिळकाला गंगाधरशास्त्र्यांकडून–बापाकडून मिळालें. या वडिलोपार्जित अल्प भांडवलावर बाळ टिळकांनी अखिल भारतीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय बौद्धिक व्यापार यशस्वी रीत्या कसा केला हेंच आपणांस पाहावयाचें आहे.

सामान्यतः संस्कृत व गणित या विषयांचा छत्तीसाचा आंकडा आढळतो. पण बाळ टिळकाला हे दोन्ही विषय करतलामलकवत् होते. त्यांची बुद्धि अविषया होती. त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेने प्राथमिक, माध्यमिक व विद्या-

पीठांतील अध्यापकांना व प्राध्यापकांनाच चकित केलें नाही; तर खुद्द जन्म देणाऱ्या गंगाधरपंतांनाहि क्षणभर स्तंभित केलें. एकदा बाळाने बाणाच्या कादंबरीची मागणी केली. गंगाधरपंत गालांतल्या गालांत हसले. त्यांना वाटलें ही त्याची मागणी म्हणजे बालहट्ट! पण बाळाचा हिरमोड कां करा? त्यांनी एक युक्ति लढविली. त्यांनी बाळाला एक अत्यंत कठीण असें उदाहरण सोडवून दाखविण्याची अट घातली. पण बालवीर, नव्हे बुद्धिवीर बाळ टिळकांनी दोन तासपर्यंत त्या उदाहरणाशीं झुंज घेतली व त्याला चीत केलें. गंगाधरपंतांना 'कादंबरी'चें बक्षिस देणें भाग पडलें. बाळाची अचाट बुद्धिमत्ता पाहून बापाला व मातेला एक प्रकारची आत्मसमाधानयुक्त धन्यता वाटली. निशासमयीं नभोमंडळांत चंद्राचें अस्तित्व जसें इतर ताऱ्यांना निस्तेज करतें, तसेंच बाळ टिळकांचें बुद्धितेज वर्गांतील इतर विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर शिक्षकालादेखील प्रसंगविशेषीं निस्तेज करी. शाळेंतील उदाहरणें बाळ टिळक तोंडींच सोडवीत. गणित व संस्कृत विषयांचे धडे विद्यार्थी टिळक शिक्षकांपेक्षा उत्तम रीतीने वर्ग-बंधूंना नेहमी देत.

## सत्यप्रीति व आग्रही वृत्ति

शिकत असतांना टिळक, वयाच्या १५ व्या वर्षी, त्या काळच्या रूढी-प्रमाणे विवाहबद्ध झाले. त्यानंतर अल्पावधींतच गंगाधरपंतांचें देहपतन झालें. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणक्रमांत बाळ टिळकांच्या अंगचे दोन गुण विशेषत्वाने प्रकट झाले. 'हुशार पण तंटेखोर' या विशेषणद्वयांनी त्यांचा उल्लेख होई. ते भांडण उकरून काढीत नसत. पण सत्यासाठी आग्रह धरीत व आग्रहाचें रूपान्तर भांडणांत होई. ते सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे ठराविक चाकोरीने विद्यार्जन करीत नसत. कांही तरी असामान्यता, अलौकिकता आचरावी असा त्यांचा मूळ स्वभाव. अगदी प्राथमिक शाळेंत असतांना शिक्षकाने त्यांना "संत" हा शब्द लिहावयास सांगितला. ते पडले स्वयंभू! त्यांनी तो शब्द सन्त, सनॄत व संत अशा तीन तऱ्हांनी लिहिला. रुळलेल्या मार्गाने जाणाऱ्या सामान्य अध्यापकाला हें बोचलें. शिक्षक रुसले व बाळ टिळक हसले. त्यांच्या भांडणाचा निकाल न्यायी व विचारी मुख्या-

ध्यापकाने टिळकांच्या बाजूने दिला व त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचें आणि धाडसी स्वभावाचें कौतुक केलें.

केवढीहि शिक्षा झाली तरी सत्याचा बाणा सोडावयाचा नाही असा त्यांचा निग्रह. एकदा वर्गातील सर्व मुलांनी, बाळ टिळक सोडून, भुईमुगाच्या शेंगा खाल्ल्या. त्यांचीं टरफलें वर्गात पडलीं. त्या काळचे तात्या पंतोजी मारक्या म्हशीच्या वृत्तीने वर्गात शिरले व त्यांनी क्रुद्ध स्वरांत "कोणीं टाकलीं हीं टरफलें ?" असें विचारलें. सर्व विद्यार्थी भीतीने थरथर कांपूं लागले. बाळ टिळक वादळांतील खडकाप्रमाणे अचल होता. शिक्षक सर्व वर्गाला शिक्षा करण्याच्या बेतांत असतांना बालवीर उठला व त्याने सांगितलें कीं, "आपण हा अन्याय करतां. निरपराध्यांना शिक्षा देतां. मी निरपराधी आहें. म्हणून मी शिक्षा स्वीकारणार नाही." असें म्हणून पाटी-दप्तर घेऊन घरीं चालते झाले. अखेर या प्रकरणांतहि बाळ टिळकच विजयी झाले.

पुण्याला इंग्रजी शाळेचे हेडमास्तर होते जेकब. ते पडले शिस्तखोर. सर्वांवर त्यांच्या दबदबा असे. त्यांच्या डोळ्याशीं डोळा कोणी लावीत नसे. एकदा कोणीं कांही खोडी केली, पत्ता लागेना. जेकबसाहेबाने रौद्र रूप धारण केलें व प्रत्येक मुलास, अपराधी-निरपराधी न पाहतां दोन दोन छड्या ते देऊं लागले. बाळ टिळकांनी या अन्यायाला बेधडक विरोध केला. अखेर जेकबसाहेबांनी वर्ग सोडून जाण्याची त्यांना आज्ञा केली. आश्चर्य हें कीं, सर्व विद्यार्थी त्यांच्यामागून बाहेर पडले. विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्त संप केला, नव्हे बालवीर टिळकांना स्वयंस्फूर्तीने पुढारी नियुक्त केलें.

पुढील आयुष्यांत "लोकमान्य" झालेले टिळक पूर्वाश्रमीं "विद्यार्थिमान्य" होते. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात ते असे ! म्हणूनच त्यांचे गणित विषयाचे हुशार शिक्षक केरोपंत छत्रे त्यांच्याविषयी असें म्हणाले कीं, "हा पोर कांही दिग्विजय करील. ह्याचें पाणी कांही औरच दिसतें." एवम्, सत्यनिष्ठा व आग्रही वृत्ति बाल्यांतच बीजांकुरित झाल्या होत्या. ह्याच वृत्ति पुढे फोफावणार, बहरणार. पुढारीपणा किंवा नेतृत्व याच वेलींचीं फुलें व फळें होत.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ... , ठाणे स्थळ
अनुक्रम २०७२५ विः ...
क्रमांक ५३६ नों: दि: १९/७

## टिळक व आगरकर

१८७३ मध्ये टिळक मॅट्रिक परीक्षा उतरले व त्यांनी डेक्कन कॉलेजच्या गंधर्व-नगरींत प्रवेश केला. कॉलेजचें जग म्हणजे सुख, विलास व संपन्नता यांचें माहेरघर. त्या अव्वल इंग्रजीच्या काळांत इंग्रजी भाषेने, वेषाने व भूषेने सर्व नवसुशिक्षित आकृष्ट झालेले. तरुणवर्गाला स्वभाषेची, संस्कृतीची, समाजाची व देशाची बिलकुल कदर नव्हती, नव्हे वरील सर्व त्यांच्या अनादरास प्राप्त झालीं होतीं. इंग्रज सरकारच्या नोकरीचें सोनेरी मोहजाल सर्वांना गुरफटत होतें. जो तो विचाराने, वेषाने, आचाराने व भाषेने 'इंग्रज' अथवा 'नकली साहेब' होण्यांत चूर होता. अशा विलासी यक्षभूमींत 'पाण्यांतील कमळाप्रमाणे' राहणें किती दुष्कर! परंतु असामान्यांचें सर्वच असामान्य. वैभवालाच विरक्तता शोभते. पौरुषालाच ब्रह्मचर्य सतेज करतें. असामान्यांचें सत्त्व विपरीत परिस्थितींतच कसाला लागतें. सामान्यजन पडले प्रवाहपतित; असामान्यजन प्रवाहाला तीराप्रमाणे सरळ चिरून जातात. आमचा बालवीर टिळक पडला असामान्य. त्याला या विलासांनी वेधलें नाही. "समानशीले व्यसनेषु सख्यम्" समानध्येयी लोकांची मैत्री होत असते. तेव्हा याच डेक्कन कॉलेजांत, विलासी संसारांत, दोन विरक्त व विचारदृढ युवक एकत्र आले. त्यांचें सख्य झालें. ते म्हणजे बाळ गंगाधर टिळक व सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकर. हे समध्येयी युवकद्वय रात्रीच्या रात्री राष्ट्रोद्धारक विचार करण्यांत व ध्येय निश्चित करण्यांत घालवूं लागले. यांचें जग वेगळें व हे जगावेगळे! गहन विचारांतीं दोघांनी 'प्रवृत्ति' निश्चित केली, ध्येय ठरविलें. आता 'साधना' कडे ते वळले. ध्येयसिद्धीसाठी लोखंडी देहयष्टीची व आरोग्य-संपदेची परमावश्यकता आहे. "Health is the wealth" "आरोग्य हीच खरी संपत्ति," हें टिळकांनीं हेरलें, नव्हे कृत्यंतर केलें. खूप व्यायाम करावा व यथेच्छ पौष्टिक अन्न सेवावें असें त्यांनी एक वर्ष केलें. त्याचें इष्टफल म्हणजे त्यांच्या वयाच्या पन्नासाव्या वर्षीं गंगा पोहून जाणें किंवा सिंहगडावर न थांबतां चढणें. टिळकांनी आपलें देहबल चंदनाप्रमाणे

भारतमातेच्या सेवेंत झिजविलें. एवम्, डेक्कन कॉलेजांत सरस्वतीची आराधना करीत असतांना टिळकांनी आपला देह जसा पुष्ट, सुदृढ व काटक बनविला तसेंच आपलें मनोबल त्यागबुद्धीने व देशभक्तीने वाढविलें. केवळ परीक्षेंतील यशावर त्यांची दृष्टि नव्हती. तर विषयाचें सखोल ज्ञान हेंच त्यांचें साध्य होतें. ते परीक्षार्थी नव्हते, विद्यार्थी होते. त्यांनी गणितांत प्रावीण्य संपादिलें होतें, पण हें त्यांचें वैशिष्ट्य नव्हे. प्रावीण्य संपादणारे शेकडो विद्यार्थी दरवर्षीं विद्यापीठाच्या चरकांतून निघत आहेत. पण टिळक ते टिळक ! इतर ते इतर ! बी. ए. नंतर ते एल्एल्. बी. झाले. तें वर्ष १८७९ होतें. वकिलांची समाजाला गरज होती, नव्हे तो धंदा बढतीचा होता. त्यांच्याच वर्ग-बंधूंनी वकिली करून खोऱ्यांनी पैसा ओढला व आपल्या आयुष्याची फुलबाग केली. पण स्वतःचें टीचभर पोट भरण्यापेक्षा राष्ट्राची वकिली करण्यासाठी स्वसुखावर तिलाञ्जलि देणारे टिळक असामान्यच. अशा लोकोत्तर जीवनाचा प्रारंभ, राष्ट्रकार्याचा श्रीगणेशा, लोकमान्यांनी कसा केला हें पाहणें स्फूर्तिप्रद व मार्गदर्शक होणार हें खास.

## शिक्षणकार्याचा श्रीगणेशा

लो. टिळकांनी आगरकरांच्या साहाय्याने व 'मराठीचे शिवाजी' मालाकार विष्णु कृष्ण चिपळूणकर यांच्या मार्गदर्शकत्वानुसार नवोदित पिढीच्या शिक्षणाचा प्रश्न पहिल्यांदा हातीं घेतला. उगवत्या पिढीमध्ये स्वदेश, स्वभाषा व स्वसंस्कृति यांच्यासंबंधी जळजळीत प्रेम निर्माण करावयाचें असें त्यांनी ठरविलें. सरकारी शाळांतून हें होणें शक्य नव्हतें. त्या शाळा म्हणजे कारकुंडे निर्माण करण्याचे कारखाने. स्वतंत्र विचाराची तेथे मुस्कटदाबी. पददलित देशांतील तरुण पिढीच्या मनांत पहिल्यांदा क्रांति घडवून आणली पाहिजे, असें त्यांनी ठरविलें.

## अध्यापकाचे प्राध्यापक

प्रथम मानसिक क्रांति नंतर राजकीय अथवा सामाजिक क्रांति करावी, या उदात्त ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी १८८० च्या जानेवारी महिन्यांत न्यू इंग्लिश स्कूलची प्रस्थापना केली. पांच वर्षांच्या अल्पावधींत ह्या शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या हजारावर गेली. फुलांमागून फळें यावींत तद्वतच ह्या

शाळेंतून १८८५ मध्ये फर्ग्युसन कॉलेज विकसित झालें. लो. टिळक, आगरकर व चिपळूणकर यांनी वरील संस्थांत केवळ जीवन-वेतनावर अध्यापकांचीं व प्राध्यापकांचीं कामें केलीं. टिळक फर्ग्युसन कॉलेजांत गणित व संस्कृत हे विषय शिकवीत. ते वर्गांत विषयाला सोडून बोलतच नसत. विद्यार्थ्यांच्या शंका-कुशंका तत्काळ दूर करीत. फळ्याचा उपयोग न करतां तोंडींच उदाहरणें ते भराभर सोडवीत. कविकुलगुरु 'कालिदासा'चें 'मेघदूत' हें महाकाव्य तर त्यांचें तोंडपाठ होतें. राजा भर्तृहरीचें 'नीति-शतक' ते अत्यंत मार्मिकपणें शिकवीत. एवम्, यशस्वी अध्यापक व प्राध्यापक म्हणून त्यांनी आपल्या पूर्वायुष्याचीं दहा वर्षें घालविलीं. पण देवाला टिळकांना दुसरीकडे विशालतर कार्याकडे न्यावयाचें होतें. संस्था वाढली तशा तिचा व्यापहि वाढला. अध्यापकांची व प्राध्यापकांची संख्या दसपट वाढली. मूळ संस्थापकांचा, टिळक-आगरकरांचा स्वार्थत्याग नव्यांना झेपेनासा झाला. मतभेद झाले, पक्ष निर्माण झाले. टिळकांसारख्या कर्तव्य-निष्ठुर संस्थापकाला तेथे राहणें दुःसह झालें. त्यांनी १८९० मध्ये व्यथित हृदयाने डेक्कन एज्युकेशन सोसायटीचें त्यागपत्र दिलें. ज्या संस्थेला—'डेक्कन एज्युकेशन सोसायटीला'— त्यांनी आपल्या रक्ताचें खत-पाणी देऊन फुलांफळांना आणलें, त्याच संस्थेला सोडतांना टिळकांना किती मनःक्लेश झाले असतील याची वाचकांनीच कल्पना करावी. त्यांनी त्यागपत्रांत असे दुःखोद्गार काढले कीं, "मीं आज ही शैक्षणिक संस्था सोडल्यामुळे, सर्व जन्माचें ध्येय सोडलें असेंच मला वाटतें." लो. टिळक पडले हाडाने विद्याव्यासंगी, देशाची एक विशिष्ट परिस्थिति म्हणून ते राजकारणाकडे वळले व दैवयोगाने 'राष्ट्रजनक' म्हणूनच अजरामर झाले. पण त्यांची आंतरिक इच्छा त्यांच्याच शब्दांत नमूद करावयाची म्हणजे "स्वराज्य मिळाल्यानंतर गणिताचा प्राध्यापक म्हणूनच राहीन" हीच होती. परंतु "Man proposes and God disposes." जें मनुष्य ठरवितो त्याच्या नेमकें विरुद्ध परमेश्वर करतो. परमेश्वराला त्यांच्या शिक्षणाचें क्षेत्र विस्तृत करावयाचें होतें. चार भिंताडांच्या आंतील कार्य त्यांचें नव्हतें. तें करणारे अनेक सामान्य शिक्षक आहेत. देवाला त्यांना लोक-शिक्षक करावयाचें होतें.

## केसरीचें संपादन व कारागृहवास

लोकजागृतीचें प्रभावी साधन म्हणजे ‘ वृत्तपत्र ’! तोफांपेक्षा वृत्तपत्रांना सम्राट् नेपोलियन जास्त भीत असे. फ्रेंच राज्यक्रांति रूसो व व्हॉल्टेयरच्या लिखाणाने घडवून आणली; मॅझिनीने आपल्या लेखणीने इटली देश पेटाविला. मालाकार चिपळूणकरांनी आठ वर्षें निबंधमाला संपादून इंग्रजी विद्यावारुणीला बळी पडलेल्या आंग्ल-विद्याविभूषित समाजाच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घातलें. टिळक पडले त्यांचे प्रशिष्य. गुरूचें अपुरें कार्य त्यांनी हातीं घेतलें. शास्त्रीबुवांनी सुरू केलेल्या ‘ केसरी ’ चे ते संपादक झाले. अध्यापकाचे प्राध्यापक व प्राध्यापकाचे संपादक, लोकशिक्षक ही त्यांची चढती कमान आहे. हिंदी नागरिकांच्या रोजच्या अडचणींना वाचा फोडून त्या सरकारास दूर करावयास लावणें व प्रौढ नागरिकांना स्वराज्याभिमुख बनविणें हेंच त्यांचें ध्येय. ‘ केसरी ’ म्हणजे ‘ सिंह ’ हें त्याचें प्रतीक. केसरीचा प्रमुख गुण म्हणजे निर्भयता, पराक्रमशीलता. “ सिंह भुकेलेला झाला म्हणून कांही गवत खात नसतो ” ही मराठी म्हण सुपरिचित आहे. दैन्यावस्थेपेक्षा मरण त्याला श्रेयस्कर वाटतें. हतबुद्ध, दीनवाण्या हिंदी समाजापुढे टिळकांनी ‘ केसरी ’चें उद्दीपक व स्फूर्तिदायी प्रतीक ठेवलें. केवढें अन्वर्थक कार्य ! लोकमान्य टिळकांचा ‘ केसरी ’ बेदरकारपणें इंग्रजी नोकरशाहीवर आपल्या विषारी लेखांचा पंजा मारी. आपल्या भीषण आरोळ्यांनी तो निद्रिस्त हिंदी जनतेला खडबडून जागी करी. लो. टिळकांचा एक एक संपादकीय अग्रलेख म्हणजे पारतंत्र्याच्या गडाला सुरुंग. सत्यप्रतिपादन, निर्भीडपणा व सडेतोडपणा हीं त्यांचीं वैशिष्ट्यें, राष्ट्रीय स्वातंत्र्य हें साध्य व लोकजागृति हें साधन अशा बाण्याने लो. टिळकांनी ‘ केसरी ’ चें आमरण संपादन केलें. केसरीचें संपादन म्हणजे सुळावरची पोळी. हें करीत असतांना त्यांना व आगरकरांना कोल्हापूरच्या महाराजांवर सत्य पण कटु टीका केल्याबद्दल १८८२ मध्ये सर्वप्रथम ‘ डोंगरीच्या किल्ल्यांत ’ चार महिन्यांचा सश्रम कारावास घडला. केसरीची लोकप्रियता वाढली. सत्कार्यासाठी तुरुंगाचे हाल सोसणाऱ्या टिळकांविषयी लोकांना आदर वाटूं लागला. ते टिळकांकडे नेता म्हणून पाहूं

लागले. चाणाक्ष टिळकांनी हें ओळखलें. ते तात्काळ लोक-जागृतीच्या व संघटनेच्या कार्याला लागले.

### गणेशोत्सव व शिवजयंती

गणपति उत्सवाचें वैयक्तिक, घरगुती व केवळ धार्मिक स्वरूप नाहींसें करून त्याला त्यांनी सार्वजनिक स्वरूप दिलें व कीर्तन-भाषणद्वारा राजकीय जागृति करण्याचें ठरविलें. तसेंच शिवाजी-उत्सवाचें ऐतिहासिक साधनहि त्यांनी चातुर्यानें हाताळलें. राष्ट्रांतील महापुरुषांचें स्मरण हें राष्ट्रीयत्व जागृत करण्याचें प्रभावी साधन आहे. शिवाजीसंबंधी यच्चयावत् महाराष्ट्रीयांना आदर व पूज्यभाव, म्हणून त्यांनी रायगडावर १८९६ मध्ये शिवजन्मोत्सव मोठ्या थाटांत व वैभवांत साजरा केला. तो पुढे गावोगावीं झाला. अवघा महाराष्ट्र या उत्सवाने गदगद हलला. टिळकांकडे जनतेचें लक्ष जास्तच वेधलें.

### काँग्रेसची सेवा

हिंदी राष्ट्रसभा म्हणजे काँग्रेस. तेव्हा "हिंदी राजकीय असंतोषाचे जनक" लो. टिळक तीपासून अलग कसे बरें असूं शकतील ? अमृताला माधुर्य सोडूं शकतें का ? रक्ताला देह दूर करूं शकतो का ? शाळेला रामराम ठोकतांच टिळकांनी राष्ट्रसभेच्या कार्यांत लक्ष घातलें. १८८९ च्या मुंबई अधिवेशनाची त्यांनी वर्गणी गोळा केली. 'केसरी' मुंबईला हलवून अधिवेशनाच्या सप्ताहांत दैनिक केला. प्रत्यक्ष काँग्रेसच्या अधिवेशनांत कौन्सिल-निवडणुकीसंबंधीच्या एका ठरावावर ते बोलले. काँग्रेसच्या प्रांतिक परिषदांमध्येंहि ते प्रमुख होऊन भाग घेत. होतां होतां ते प्रांतिक काँग्रेस परिषदेचे चिटणीस झाले १८९५ सालीं वंगसिंह सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनाचे ते एक चिटणीस होते. त्यांनी हें चिटणीसपद त्यागिलें व पुण्यास भंग होऊं पाहणारें काँग्रेसचें अधिवेशन जहालांचा, स्वपक्षाचा रोष पत्करूनहि घडवून आणलें. कोण हें औदार्य व व्यक्तिनिरपेक्षता ! राष्ट्रीय सभा संपली व टिळकांचें वर्चस्व पुण्याला निखालस प्रस्थापित झालें पुण्याच्या सार्वजनिक सभेचें नेतृत्व त्यांच्याकडे चालून आलें. सिंहाला वनराज म्हणून कोणीं अभिषेक केला का ? नाही.

त्याचें स्वयंभू तेज व पराक्रम सर्व वन्य–पशु आपणहून मान्य करतात. तीच गोष्ट नरकेसरी टिळकांची. खऱ्या योद्धयाला कोणतेंहि हत्यार चालतें, तद्वतच हातीं येईल त्या साधनांनी टिळकांनी राष्ट्रपुरुषाची सेवा, विधायक सेवा चौफेर चालविली. कोणत्याहि सार्वजनिक संकटावर ते झडप घालीत. हिंदु-मुसलमानांचे दंगे, प्लेगचा कहर, दुष्काळाची अस्मानी आपत्ति, नौकरशाहीचा राक्षसी जुलूम अशा दैवी व मानवी संकटपरंपरेच्या वेळीं लोकांना आपला त्राता व नेता एक बळवंतराव टिळकच वाटावा अशी कामगिरी त्यांनी १८९७ पर्यंत केली.

## दुसरा कारागृहवास व दोन ग्रंथांची रचना

" देशास्तव जो नित्य जळफळे उदार नरवीर। बंदीशाळा लोह-शृंखला तदीय शृंगार " हें सुभाषित टिळकांना अक्षरशः लागू पडतें. स्वातंत्र्याच्या संग्रामांत टिळकांना तुरुंग म्हणजे भूषण. ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना दीड वर्षाची सश्रम कारा-वासाची शिक्षा ठोठावली. टिळकांनी ती हसतमुखाने स्वीकारली. माफीची सवलत त्यांना बहाल करण्यांत आली. भूक लागली म्हणून सिंह गवत खातो का? मानी मनुष्याला मानहानि मरणापेक्षाहि दुःसह असते. १८९७ सालीं अमरावतीला भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत या शिक्षेचा निषेध झाला. सारी राष्ट्रसभा टिळकांविषयी आदर दाखविण्यास उभी राहिली. राष्ट्रसभेने टिळकांचा जयजयकार केला. या कारागृह-वासांत टिळकांनी दोन ग्रंथ लिहिले. ते म्हणजे " आर्यांचें मूळ वसतिस्थान " व " वेदकाल-निर्णय." ह्या ग्रंथांमुळे टिळकांच्या अद्वितीय विद्वत्तेची ख्याति विश्वभर झाली. त्यांच्या बुद्धीला खाद्य मिळालें. ती जास्त सतेज झाली. सुवर्णाप्रमाणे अग्निदिव्यांतून अधिक शुद्ध व तेजस्वी होऊन टिळक तुरुंगाच्या बाहेर पडले. जनतेने त्यांचें प्रचंड हार्दिक स्वागत केलें.

## कॉंग्रेसमध्ये जहाल पक्षाची स्थापना

१९०० च्या लाहोरच्या राष्ट्रसभेंत लो. टिळक व्यासपीठावर चढतांच सर्व प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. सर्वांनी टिळकांना अभिवादन केलें. टिळकांनीहि कंठ भरून सर्वांना–जनताजनार्दनाला–नमन केलें.

जनतेला नवा पुढारी हवा होता. नव्हे ती त्याच्या शोधांत होती. मवाळांचा सनदशीर मार्ग टाकाऊ ठरत होता. सरकारी अधिकाऱ्यांवर निर्भय टीका करणारा पुढारी त्यांना हवा होता. टिळकांनी हें हेरलें व काँग्रेस मुठींत घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न चालविले. हे प्रयत्न १९०६ पर्यंत चालले. कर्झनशाहीला कसून विरोध केल्यामुळे लो. टिळकांची लोकप्रियता व पक्षबल झपाटून वाढत होतें. लॉर्ड कर्झनच्या उद्दामप्रियतेची कमाल म्हणजे राष्ट्रीय दृष्ट्या जागृत झालेल्या बंगालचे पूर्व व पश्चिम बंगाल म्हणून तुकडे करणें. वंगभूमीच्या हृदयांत खुपसलेली ही सुरी होती. ‘ राज्यकारभाराच्या सोर्यांचा सोनेरी मुलामा ’ तिने चढविला होता. सुरी सोन्याची झाली म्हणून काय कमी घातक असते ? बंगालचें हृदय चर्र झालें. असंतोषाच्या ज्वाला त्यांत भडकूं लागल्या. स्मशानवत् शांत असणारा हिंदुस्थान ज्वालामुखी बनला. बंगालने विलायती मालावर बहिष्कार पुकारला. लो. टिळकांच्या ‘ केसरी ’ने बेदरकारपणें कर्झनच्या जुलमी धोरणाचा धिक्कार करून बंगालचा पाठपुरावा केला, सक्रिय विरोधाचा प्रचार केला व आचार अंगीकारला. बहिष्काराचें शस्त्र त्यांना फारच आवडलें. मवाळांच्या अर्ज-विनंत्या कर्झनने ठोकरल्या, राष्ट्रसभेचे ठराव फोल ठरण्याची पाळी आली. इतक्यांत नारसिंह अवताराप्रमाणे लो. टिळकांचा “ चतुःसूत्रीचा ” कार्यक्रम प्रगट होऊन त्याने हिंदी जनतेला प्रतिकारक्षम बनविलें.

## स्वराज्याचा मंत्र व चतुःसूत्री

१९०६ मध्ये कलकत्ता येथे राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचें युगप्रवर्तक अधिवेशन भरलें. या अधिवेशनांत टिळकांनी काँग्रेसचें ध्येय “ स्वराज्य ” ठरवून घेतलें. “ **स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच** ” असें त्यांनी सिंहनादांत जाहीर केलें व तत्प्राप्त्यर्थ “ स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ” अशी विधायक चतुःसूत्री योजना काँग्रेससमोर मांडली. देहाने जर्जर झालेल्या परंतु मनाने तरुण असलेल्या दादाभाईंनी लो. टिळकांचा जहाल कार्यक्रम काँग्रेसला अंगीकारण्याची आग्रहाची व परिणामकारक विनंती केली. झालें, काँग्रेसवर लोकमान्यांचें आधिपत्य स्थापित

झालें. मवाळ थिजले व जहाल हर्षले. एवम् , लो. टिळकांनी आपली कर्तृत्व-थोरवी सिद्ध केली. सहा महिन्यांच्या आंतच बंगालची फाळणी रद्द झाली. लो. टिळकांनी स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीची आग अखिल भारतवर्षांत पेटवून दिली. दडपशाहीचा हैदोस सुरू झाला. तिने शेकडो तरुणांना तुरुंगांत डांबलें. लो. टिळकांनी वाग्बाणांनी व लेखणीच्या तलवारीने सरकारवर चौफेर मारा सुरू केला. मवाळांनी पुन्हा एकवार कॉंग्रेसवर अधिकार जमविण्याचा सुरतेला घाट घातला. युयुत्सु टिळक दोन हात करावयास सिद्धच होते. ते सुरतेस गेले व त्यांनी सत्याग्रही दृढनिष्ठेने मवाळांची चालबाजी हाणून पाडली. ते अध्यक्षांच्या खुर्चीपुढे उभे राहिले व त्यांनी निर्भयपणें सांगितलें कीं, ही अध्यक्षीय निवडणूक बेकायदेशीर व लोकशाहीच्या तत्त्वाला सोडून आहे. त्यांची ती बेदरकार वृत्ति व छातीवर हात ठेवून पुतळ्याप्रमाणे उभें राहण्याचें धैर्य पाहून शत्रूदेखील स्तंभित झाले. माणूस असावा तर असा असे उद्गार सर्वत्र निघाले. कॉंग्रेसचें अधिवेशन मोडलें. प्रकाशाने अंधकारावर विजय संपादन केला. वीरत्वाने भीरुत्वाचा फडशा उडविला ! लो. टिळक संकटाग्नींतून जास्त सतेज होऊन बाहेर पडले. लोकमान्य टिळकांची लोकप्रियता सरकारला कशी खपणार ? कशी मानवणार ?

## हद्दपारीचा वज्राघात

१९०८ सालच्या जून महिन्यांत इंग्रज सरकारने आपले पाश टिळकांच्या गळ्यांत टाकले. खटल्याचें नाटक ९ दिवसांतच संपलें. गुळाचाच गणपति आणि गुळाचाच नैवेद्य. लो. टिळकांना राजद्रोहाच्या गंभीर आरोपाखाली सहा वर्षें काळेंपाणी व एक हजार रुपये दंड ठोठावण्यांत आला. एखाद्या योग्याप्रमाणे स्थिर चित्ताने लो. टिळकांनी त्याचा स्वीकार केला. ज्यूरीला त्यांनी असें खडसावून सांगितलें कीं, " मी निरपराधी आहें. जगांतील व्यवहारांचें नियमन करणारी श्रेष्ठ शक्ति अस्तित्वांत आहे. आणि कदाचित् त्या परमेश्वरी इच्छेनेच मी बाहेर राहण्यापेक्षा तुरुंगांतील हाल-अपेष्टांनीच माझें अंगीकृत देशकार्य अधिक उत्कर्षाप्रत जाईल. " हे निर्विकारपणें उच्चारलेले उद्गार ऐकतांच सर्वजण आश्चर्यचकित झाले.

ही खवळलेल्या सिंहाची गर्जना होती, हा जाळणाऱ्या विजेचा कडकडाट होता; वर्षाव करणाऱ्या मेघांचा गडगडाट होता! वयाच्या ५२ वर्षी टिळकांची ही वीरोचित वृत्ति कुणाला आदरणीय वाटणार नाही?

**गीतारहस्याची रचना**

कुरुक्षेत्रावर नरवीर पार्थाला, किंकर्तव्यमूढ झालेल्या सव्यसाची योद्धयाला गीतेचा चैतन्यदायी उपदेश देणाऱ्या भगवान् श्रीकृष्णाचा जन्म भीषण कारागृहवासांत झाला. तद्वतच हतबुद्ध झालेल्या भारतवर्षाला कर्तव्य-पथावर दृढ करण्यासाठी लो. टिळकांनी मंडालेच्या तुरुंगांत गीता-रहस्याची रचना केली. गीतेचें अध्ययन व चिंतन लो. टिळकांनी चाळीस वर्षें केलें. गीतातत्त्वांचें आचरण ते करीतच होते, नाही तर सहा वर्षांची प्रदीर्घ हद्दपारीची शिक्षा ऐकल्यानंतर त्याच रात्रीं त्यांनी दहा तासांची गाढ झोप घेतली नसती व त्यांची निर्विकारता ढळली असती. याशिवाय अनेकविध लोक-संग्रह करून, प्रतिकाराची यशस्वी योजना करून त्यांनी निष्काम कर्मयोगाचें भरीव उदाहरण जनतेपुढे ठेवलें. "गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र" म्हणजे लो. टिळकांच्या समतोल व सखोल तत्त्वमंथनाचें नवनीत, कर्मयोगी टिळकांचा कोहिनूर, प्रतिभा-वल्लीचें सुरस शेंडेफळ! त्यांनी ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोगाचें त्यांत प्रतिपादन केलें. ज्ञान, भक्ति व कर्म यांचा त्रिवेणीसंगम घडवून आणला. मराठी भाषेमध्ये 'गीतारहस्या'सारखा सुरस, चिकित्सामूलक व मूलगामी विचारांना चालना देणारा अन्य ग्रंथ नाही. हें "कर्मयोगशास्त्र" त्यांनी 'श्रीशाय जनतात्मने' समर्पण केलें. कर्मयोगी टिळकांचें अक्षर स्मारक म्हणजे "कर्मयोगशास्त्र". ॲडॉल्फ हिटलरने आपल्या आत्मचरित्रांत असें लिहिलें आहे कीं, "The Union of theorist, organiser and leader in one man is the rarest phenomenon on this earth." एकच पुरुष तत्त्वसंशोधक, संघटक व नेता असणें या भूतलावर विरळा. लोकमान्य टिळक विरळा पुरुष होते म्हणूनच ते युगपुरुष होते. अशा रीतीने सहा वर्षांची कठोर हद्दपारीची शिक्षा भोगून लो. टिळक भग्न देहाने पण भरीव हृदयाने तुरुंगांतुन बाहेर पडले. "तप्तं तप्तं पुनरपि पुनः काञ्चनं याति तेजम्" किंवा घासल्याने चंदनाचा सुवास अधिकच दरवळतो, तद्वतच लोकमान्यांची

लोकप्रियता शतगुणित झाली. १९१४ सालीं कारागृहमुक्त लोकमान्य भारताचे अनभिषिक्त राजे झाले.

**कॉंग्रेस व स्वराज्य-संघाचें तुफानी कार्य**

जागतिक महायुद्धाचा डोंब उफाळला. इंग्लंडने भारताची मदतीसाठी याचना केली. गव्हर्नरने मुंबईला लोकधुरीणांची सभा बोलाविली. लोकमान्यहि तेथे उपस्थित होतेच. बरीच भवति न भवति झाली. पण लो. टिळकांइतकी राजकीय दूरदृष्टि, व्यवहारचातुर्य व निर्भय देशनिष्ठा कोणींहि दर्शविली नाही. ब्रिटिश सरकार हिंदुस्थानला स्वराज्य देण्याचें आश्वासन देत असेल तर हिंदुस्थानने सशर्त युद्धाला मदत करावी, हें लो. टिळकांचें सडेतोड धोरण. बाप दाखव नाहीं तर श्राद्ध कर हा त्यांचा बाणा. हिंदी स्वराज्य हाच त्यांचा सदैव विषय. टिळक = स्वराज्य हें हिंदी राजकारणांतील अटळ समीकरण झालें. टिळक सरकार-निमंत्रित सभेंतून निराश होऊन बाहेर पडले. कॉंग्रेसमध्ये बहुमत त्यांनी मिळाविलेंच.

इकडे बीझंटबाईंनी " हिंदी स्वराज्य संघ " स्थापून देशांत स्वराज्याच्या जागृतीसाठी तुफानी दौरा काढला. लो. टिळकांनी बिकट परिस्थिति लक्षांत घेऊन बीझंटबाईंना सहकार्य दिलें. नव्हे त्यांनी तशी इच्छाच प्रदर्शित केली. कॉंग्रेसच्या इभ्रतीला धक्का न लावतां लो. टिळकांनी हें कार्य केलें. महाराष्ट्रांत व वऱ्हाडांत गावोगावीं त्यांनी व्याख्यानें दिलीं. त्यांच्या दर्शनासाठी माणसांची रीघ लागत असे. भाषणासाठी जनसमूह एकवटत असे.

**हीरकोत्सव-समारंभ**

देशकार्याचे आघात सहन करतां करतां लो. टिळकांनी साठी गाठली. लोकांनी कृतज्ञतापूर्वक त्यांना एक लक्षाचा निधि एकत्र करून बहाल केला. ही त्यांच्या कार्याची किंवा देशभक्तीची किंमत नव्हती, तर जनप्रीतीचें तें गमक होतें. परंतु निष्कामकर्मयोगी टिळकांनी तेंहि स्वार्थासाठी स्वीकारलें नाही. त्याचा त्यांनी एक विश्वस्त निधि बनविला.

**सरकारी नजराणा**

लो. टिळकांचें आयुष्य म्हणजे ऊन-सावलीचा खेळ. इकडे जनता त्यांचें एकसष्टाव्या वाढदिवसा-निमित्त हार्दिक स्वागत करीत आहे, तर तिकडे सरकारी रोषाचें सुदर्शनचक्र त्यांचा शोध करीत होतें. त्याच

मंगल दिनीं एक वर्षपर्यंत चांगली वर्तणूक ठेवून शांतता राखण्याची हमी म्हणून २० हजारांचा जातमुचलका सरकारने त्यांचेपाशी मागितला. टिळक पडले धैर्यमेरु. त्यांनी समचित्ताने सरकारी नजराणा स्वीकारला. स्थितप्रज्ञ टिळक अशा विषमावस्थेंत डगमगणारे नव्हते. हायकोर्टाने टिळकांना दोषमुक्त ठरविलें.

## लखनौची राष्ट्रसभा

१९१६ ची लखनौची राष्ट्रसभा म्हणजे टिळकांचें अनन्य-सामान्य राष्ट्रकार्य. तेच तिचे प्राण व चैतन्य लो. टिळकांनीच कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांच्यांत सलोखा घडवून आणला. तो शुक्रवारचा दिवस होता. या जुम्मे दिनीं मुसलमानबंधूंनी हिंदी राष्ट्रिय स्वातंत्र्यासाठी लढण्याचें व्रत घेतलें. राजकीय ऐक्य साधलें. तृतीय पक्ष इंग्रज भेदरला. लो. टिळकांना कृत-कृत्यता वाटली. हा सुदैवी प्रसंग पुन्हा आला नाही. लखनौ-करार भंग पावता ना, तर भारतदेखील आज दुभंगला नसता. लो. टिळकांचें राजकीय दूरदर्शित्व यावरून स्पष्ट निदर्शनास येतें.

## विलायतेंतील शिष्टाई व राष्ट्रसभेचें नियोजित अध्यक्षपद

१९१८ मध्यें मॉंटेग्यू सुधारणा जाहीर झाल्या. मुंबईस राष्ट्रीय सभेचें खास अधिवेशन भरलें. उलटसुलट बाजूंचें म्हणणें ऐकून घेतल्यानंतर असें ठरलें कीं, कॉंग्रेसने विलायतेला एक शिष्टमंडळ पाठवावें. लो. टिळक त्याचे मुखंड ठरले. ते आता भारताची वकिली विलायतेंत करणार होते. त्याच वेळीं राष्ट्राने स्वयंस्फूर्तीने व एकमताने त्यांना दिल्ली येथे भरणाऱ्या राष्ट्रसभेचे अध्यक्ष निर्वाचित केलें. टिळकांनी उत्सवमूर्ति होण्याचें नाकारलें, कारण ते होते, कार्यमूर्ति ! कार्यापुढे मानसन्मान ते तुच्छ मानीत. तरी पण नियोजित राष्ट्राध्यक्ष म्हणून त्यांना इंग्लंडांत कार्य करतां आलें. त्यांच्या बोलण्याला प्रातिनिधित्व प्राप्त झालें.

## हिंदी स्वराज्याचा विलायतेंत प्रचार

लो. टिळकांनी ब्रिटिश मजूरपक्षाशीं मैत्रीचें नातें बांधलें. पार्लमेंट-मध्ये " हिंदी होमरूल बिल " आणण्याचे प्रयत्न केले. शेकडो ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. भारतांतील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी भारताला स्वराज्याचें दान त्वरित दिलें जावें असें त्यांनी सडेतोडपणें प्रतिपादन केलें.

पण स्वराज्य भिक्षा मागून मिळत नसतें, हें त्यांच्या ध्यानीं प्रखरतेनें आलें. ते चवताळलेल्या सिंहाप्रमाणे भारताला परतले. पण ते दांत पडलेला सिंह झाले होते, चरफडण्यापलीकडे काय करूं शकणार ?

**भारताला आगमन**

इकडे म. गांधींनी आसेतुहिमाचल चळवळ प्रारंभिली लो. टिळकांचे पाय २७ नोव्हेंबर १९१९ ला मुंबईला लागले. त्यांनी म. गांधींचें हार्दिक अभिनंदन केलें. प्रत्यक्ष प्रतिकाराचें समर्थन केलें. वीरच वीराची किंमत करतो. टिळक अमृतसरच्या कॉंग्रेसला गेले. ही टिळकांची शेवटची कॉंग्रेस होय. लो. टिळकांच्या मताचा कॉंग्रेसने पुरस्कार केला. सारी राष्ट्रसभा टिळकांच्या शब्दावर झुलली. तीन तपांच्या प्रखर राष्ट्रतपस्येचें फळ त्यांच्या हातांत राष्ट्रानें दिलें. त्यांचें लोकमान्यत्व प्रत्ययास आलें. सर व्हॅलंटाईन चिरोल यांनी त्यांना " भारतीय राष्ट्रक्षोभाचे जनक " म्हणून संबोधलें. परतंत्र राष्ट्रांतील राजकीय पुढाऱ्याचें खरें मोजमाप याच शब्दांत होतें.

**स्वर्गारोहण**

झालें, दुर्दैवी १९२० साल उजाडलें. लो. टिळक कोर्टाच्या कामासाठी मुंबईला गेले. ती जुलै महिन्याची अभागी १२ वी तारीख होती. त्यांच्या अंगांत थोडा ताप होता. काळाने तापाचा फासा फेकला. जर्जर झालेला देह किती टिकाव धरूं शकणार ! या अखेरच्या आजारीपणांत, बेशुद्धपणांतहि ' स्वराज्या 'शिवाय इतर विषयाचा त्यांना ध्यास नव्हता. बेशुद्धावस्थेच्या प्रारंभींच " हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्याखेरीज तरणोपाय नाही, " असें ते आत्मविश्वासपूर्वक म्हणाले. विव्हळणाऱ्या सिंहाची ही भीषण आरोळी होती, विझणाऱ्या दीपकाचा हा भडका होता, पडणाऱ्या विजेची ही कडाडी होती ! लोकमान्यतेच्या गौरीशंकर शिखरावरून टिळकांनी ता. ३१ जुलैला रात्रीं १ वाजतां स्वर्गारोहण केलें. अखिल भारत शोकसागरांत बुडालें. या स्वराज्य-मंत्राच्या द्रष्ट्याचा मुंबईच्या चौपाटीवरील भव्य पुतळा म्हणजे हिंदी जनतेला स्वराज्याचें संवर्धन व रक्षण करण्यासाठी अदम्य उत्साहाचा स्रोतच आहे. पारतंत्र्याच्या कृतान्ता, गंगाधरसुता लोकमान्या, तुझे चरणकमलीं आमचें शतशः वंदन असो !

● ● ●


# पंडित मदनमोहन मालवीय

( १८६१–१९४६ )

वाण्येका समलङ्करोति पुरुषं या संस्कृता धार्यते ।
क्षीयन्ते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम् ।।

## जन्म व शिक्षण

'मराठी भाषेचे शिवाजी' कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे जसे विद्वान् पित्याचे,—कै. कृष्णशास्त्रींचे विद्वद्वर चिरंजीव, तसेच पं. मदनमोहन



मालवीय हे पं. ब्रजनाथ मालवीयांचे सवाई पंडित चिरंजीव. मालवीयांच्या घराण्यांत पंडितपरंपरा पाहावयास सापडते. पं. ब्रजनाथ मालवीय संस्कृतचे सखोल विद्वान् होते. त्यांची पुराण कथन करण्याची शैली अत्यंत मधुर व आकर्षक होती. श्रोतृवृंद त्यांच्या अमृतमधुर वाणीने केवळ मोहून जात असे. त्यांनी संस्कृतमध्ये 'सिद्धान्तदर्पण' नांवाचें सुंदर पुस्तक लिहिलें.

पं. ब्रजनाथांना दरभंग्याचे महाराज आपला गुरु मानीत. अशा सुचरित्र, पंडित, धर्मनिष्ठ पित्याचा पुत्र कसा निघेल याची आपण कल्पना करूं शकतों. लवकुशांचा पराक्रम पाहून रामाला जितकें समाधान वाटलें असेल तितकेंच समाधान पं. ब्रजनाथ मालवीयांना सत्पुत्र मदनमोहनाचें

बुद्धिवैभव पाहून वाटलें नसेल का? अशा पं. मालवीयांचा जन्म गंगा-यमुनांच्या संगमाने पवित्रतम झालेल्या प्रयागक्षेत्रीं १८६१ मध्ये झाला. त्यांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा संस्कृतमधून झाला. 'श्रीगणेशाय नमः', 'सत्यं वद। धर्मं चर।' आदि सूत्रांचें त्यांना प्रथम ज्ञान करून देण्यांत आलें. ज्ञान आचरणांत आणणारे महापुरुष किती थोडे असतात! ज्ञान असणें वेगळें व आचरणांत येणें वेगळें. बाल मदनमोहनावर वरील धार्मिक शिक्षणाचा इष्ट तोच परिणाम झाला. त्यांच्या बालपणांतील कित्येक प्रसगीं त्यांच्या सत्यवादित्वाने इतरांना आश्चर्यचकित करून सोडलें. बाल मदनमोहन कारुण्यमूर्ति होता. एकदा एक गरीब भिकारी दाराशीं आला. त्याच्या अंगावर फाटके-तुटके कपडे होते. तो जवळ जवळ अर्धनग्न होता; थंडींत कुडकुडत होता. बाल मदनमोहनला हें पाहवेना. त्याने आपलें लहान धोतर त्याला दान केलें व तो भोंगळा होऊन घरांत गेला. आईला हें कळतांच किंचित् राग आला, पण तो लवकरच कौतुकांत विरघळला. बाळ मोहन पडला शीघ्रग्राही. जों जों वडील शिकवीत तों तों त्याची ग्रहणशक्ति वाढत जाई. संस्कृत शिकल्यानंतर मदनमोहनने हिंदीचें ज्ञान करतलामलकवत् केलें. एवम्, धार्मिक शिक्षण प्रथम संपादन करून मदनमोहनने आपला मोर्चा इंग्रजी शिक्षणाकडे वळविला, म्हणूनच तथाकथित इंग्रजी सभ्यतेचा मदनमोहन मालवीयांवर कांहीच परिणाम झाला नाही. १८७९ मध्ये ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी अलाहाबादच्या मूर कॉलेजात बी. ए. पर्यंत शिक्षण घेतलें. परंतु याच कॉलेजांत त्यांना बनविणारा शिल्पकार होता. पं. आदित्यराम भट्टाचार्य हे संस्कृतचे प्राध्यापक होते. त्यांचे आवडते विद्यार्थी मदनमोहन. पं. भट्टाचार्य मोठे देशानुरागी होते. त्यांनी देशाभिमानाचा स्फुलिंग आपल्या पट्टशिष्यांत-मदनमोहनांत-चेतवून दिला व त्याचें प्रज्वलन योग्य वाचनाचें इंधन देऊन केलें आणि मदनमोहनला ख्यातनाम देशभक्त झालेला पाहून त्यांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. धन्य तो गुरु व धन्य तो शिष्य! प्रिन्सिपॉल हॅरिसन मदनमोहनची नैसर्गिक वक्तृत्वशैली बघून त्याच्यावर अत्यंत प्रेम करीत. मदनमोहनच्या भावनात्मक देशप्रेमाने ओथंबणाऱ्या भाषणाचें ते हार्दिक स्वागत करीत. मदनमोहनचें भाग्यच थोर कीं त्याला असे प्राध्यापक व आचार्य मिळाले.

कॉलेजमध्ये असतांनाच मदनमोहन सार्वजनिक कार्यांत मग्न असत. त्यांनी एक 'हिंदी साहित्यसभा' व 'हिंदु समाज' अशा दोन संस्था प्रस्थापित केल्या होत्या. ध्येय हें कीं, इंग्रजी भाषेच्या मादक मोहिनींत गुरफटलेल्या नवशिक्षितांना हिंदी साहित्याची गोडी लागावी व त्यांनी हिंदु-धर्म व संस्कृति यांना पारखें होऊं नये. कोण हें भाषाप्रेम व संस्कृतीचा अभिमान ! मदनमोहन १८८४ मध्ये बी. ए. झाले. एम्. ए. होण्याची त्यांची मनीषा होती. पण प्रतिकूल आर्थिक स्थितीमुळें कॉलेजांत नांव दाखल झाल्यानंतर त्यांना कॉलेजला रामराम ठोकावा लागला. स्वर्गस्थ पित्याने त्यांना फक्त विद्याधनाचा व शीलधनाचा वारसा दिला होता. बाकी विद्वानाचें भूषण दारिद्र्य !

**अध्यापक**

१८८५ ते १८८८ पर्यंत मदनमोहन मालवीय बी. ए., एका सरकारी शाळेंत ५० रुपये मासिक वेतनावर अध्यापक होते. त्यांची असामान्य बुद्धिमत्ता व अध्यापनकुशलता बघून शिक्षणाधिकाऱ्याने त्यांना २० रुपयांची बढती देवविली. पण त्यांना मनःशांति मिळेना. कशाची तरी उणीव, तळमळ त्यांना भासूं लागली. हें अमोल जीवन सरकारी नौकरींतच सडणार का ? माझ्या देशाची व समाजाची या देहावर कांहीच सत्ता नाही का ? माझी विद्वत्ता परकीयांच्याच दास्यासाठी आहे का ? वगैरे मूलगामी उदात्त प्रश्नांचीं वादळें त्यांच्या डोक्यांत उठत. डोकें भणाणून जाई. गुरूच्या-पं. आदित्यराम भट्टाचार्यांच्या-उपदेशानुसार त्यांनी सरकारी नौकरीच्या सुवर्णशृंखला तोडल्या-ताडकन् तोडल्या व कॉंग्रेसच्या द्वितीय अधिवेशनासाठी ( १८८६ ) ते कलकत्त्याला गेले.

**कॉंग्रेसमध्ये पहिलें भाषण**

राष्ट्रपितामह नौरोजींच्या अध्यक्षतेखाली हें द्वितीय अधिवेशन भरलें. युवक मदनमोहन मालवीयांचें यांत पहिलें भाषण झालें. वाणीचें माधुर्य, भाषेचा प्रवाह आणि भावनांची प्रखरता यांचा जणू काय तो त्रिवेणी-संगम ! सर्व पुढारी व श्रोते तें ऐकतांच आकर्षित झाले. त्याच वेळीं भविष्य वर्तविण्यांत आलें की, मदनमोहन कॉंग्रेसश्रेष्ठींपैकी एक होणार.

मदनमोहन सर्वांच्या डोळ्यांत भरले. त्यांच्या भाग्य-रवींचा हा उदयकाल होता. त्यांची भाग्यगंगा वक्तृत्वाच्या गंगोत्रींतून उगम पावली. गुरूला— पं. आदित्यराम भट्टाचार्यांना—आनंदातिशय झाला. कां बरें होऊं नये ?

## यशस्वी संपादक

कलकत्त्याच्या अधिवेशनाने मदनमोहनांच्या जीवनगंगेला एक निराळें वळण लागलें. आतापर्यंत ते विद्यार्थ्यांचे शिक्षक होते. पुढे ते लोकशिक्षक झाले. याच वेळीं कालाकांकरचे उदार व प्रगतिप्रिय तालुकदार स्व. राजा रामपालसिंह यांचें लक्ष युवक मदनमोहनने वेधून घेतलें. राजेसाहेबांनी आपण होऊन त्यांना त्यांच्या 'हिंदुस्थान' नामक साप्ताहिकाचे संपादक होण्याची विनंती केली. वाग्देवतेने तात्काळ प्रसाद दिला व मदनमोहन संपादक होऊन कलकत्त्याहून परतले. त्यांनी हें पत्र यशस्वी रीतीने संपादन करून त्याची उत्तर प्रदेशांत प्रतिष्ठा वाढविली. पुढे पं. मालवीय प्रयागच्या 'इंडियन युनियन' नांवाच्या इंग्रजी साप्ताहिकाचे संपादक नियुक्त झाले. यशाने यश वाढतें, आत्मविश्वास वाढतो. पगारी संपादक न राहतां त्यांनी 'अभ्युदय' हिंदी साप्ताहिक व 'लीडर' इंग्रजी साप्ताहिक स्वतंत्ररीत्या संपादन केलें. स्वतंत्र विचारांचें हिंदी व इंग्रजी साप्ताहिक संपादून हिंदी वर्तमानपत्र-सृष्टींत त्यांनी एक अमूल्य भर टाकली व तद्द्वारें लोकजागृतीचें व शिक्षणाचें बहुमोल कार्य केलें. यशस्वी संपादक म्हणून ते लौकिकास चढले. त्यांचा भाग्यरवि लोकप्रियतेच्या व यशाच्या प्रांगणांत वर वर चढूं लागला.

## सात्त्विक वकील मालवीय

प्रयाग येथील 'हिंदुस्थान' या इंग्रजी साप्ताहिकाचें संपादनकार्य करीत असतांनाच त्यांच्या मित्रमंडळींच्या व गुरूच्या आग्रहामुळे मदन-मोहनांनी वकिलीचा अभ्यास सुरू केला व ते वकीलहि झाले. प्रेमी जनांची अशी अपेक्षा कीं, त्यांनी फिरोजशहा मेथा, तेलंग, वाच्छा वगैरे तत्कालीन कॉंग्रेसश्रेष्ठींप्रमाणे मशहूर वकील म्हणून प्रसिद्धि मिळवावी व तें त्यांच्या दैवी वाक्‌शक्तीमुळे सहज साध्य होतें. त्यांची अपेक्षा सबळ व साधार होती. त्यांनी वकिली सुरू तर केली. एक-दोन वेळां अलाहाबाद

हायकोर्टांत वकील म्हणून ते उभे राहिले. न्यायाधिशांना त्यांनी चकितहि केलें व त्यांच्या मुखांतून स्तुतिहि ऐकली. पण तींत त्यांचें सात्त्विक मन रमेना. वकिली म्हणजे बुद्धीची कसरत. बुद्धीची केवळ विक्री. त्यांत न्यायान्यायाचा भेद नाही; सत्यासत्यतेचा विवेक नाही. सत्यनिष्ठ, धर्मनिष्ठ मदनमोहन यांत कसे रमणार ? त्यांचें मन व्यावहारिक नव्हतें, दैवी मन होतें. ते दैवी मार्गानेच जाणार. वकिलीच्या रूपाने लक्ष्मी त्यांच्या घरीं चालून येत होती, पण त्यांनी तिला पाठ दाखविली. कोण ही स्वार्थनिरपेक्षता व सच्चरित्रता !

## दैवी वक्तृत्व व कॉंग्रेससेवा

१८८६ मध्ये एक नवोदित युवक वक्ता म्हणून पं. मदनमोहन मालवीयांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला, तों तहत मृत्यूपर्यंत (१९४६) ते कॉंग्रेसचे अनन्यपुरस्कर्ते होते. कॉंग्रेसची सेवा अखंडपणें अर्धशतक करण्याचें भाग्य फारच थोड्या राष्ट्रपुरुषांच्या वांट्यास आलें असेल. या प्रदीर्घ कालखंडांत मतभेदांचीं वादळें उठलीं. कॉंग्रेसचे दोन तुकडे होऊन ‘प्रागतिक सभा’ जन्मली. कॉंग्रेसचें अस्तित्वच दोन-तीन वेळां धोक्यांत होतें. अशाहि विपरीत कालांत त्यांनी कॉंग्रेसमातेला सोडलें नाही. कॉंग्रेसच्या हाकेला त्यांनी नेहमी ‘ओ’च दिली. ही हकीकत मोठी रम्य आहे. नदीला जसे अनेक वळसे असतात, तसेच त्यांच्या कॉंग्रेस-सेवेच्या प्रवाहाला वळसे होते. पण प्रवाह तोच, जीवन तेंच. कलकत्त्याच्या अधिवेशनानंतर ते पंढरीच्या वारीप्रमाणे कॉंग्रेस अधिवेशनाला जात. त्यांच्या ओजस्वी वाणीने व जादूने भारलेल्या वक्तृत्वाने त्यांना कॉंग्रेसमध्ये अल्पावधींत मानाचें स्थान मिळवून दिलें. १८९१ मध्ये नागपूरला कॉंग्रेस भरली. तींत भारताच्या गरिबीवर पं. मालवीयांचें भाषण झालें. पं. मालवीयांचें हृदयच जणू बोलत होतें, हृदयच जणू टपकत होतें. त्यांच्या भाषणाने सर्वांचीं हृदयें विरघळलीं. डोळ्यांतून मोत्यासारखे अश्रु गळूं लागले. सर्व मंडप शोकविव्हल झाला. वातावरण शोकमय झालें. केवढी ही रससिद्ध वाणी ! कायद्याच्या किचकट ज्ञानाने कठोर झालेलीं हृदयें पं. मालवीयांच्या हृदयस्पर्शी वक्तृत्वाने हललीं, केवढी ही भावनोत्कटता !

उत्तम वक्त्याचे सर्व गुण मालवीयजींत समाविष्ट झाले होते. भावना, कल्पना व बुद्धि यांच्या त्रिवेणीसंगमाने त्यांच्या मधुर व खणखणीत वाणीला जणू धारच परजली होती. अभिनयाची साथ असल्यामुळे मालवीयजींचें भाषण म्हणजे एक 'दृश्य काव्य'च वाटे. तें ऐकत असतांना वाणीला कर्णेंद्रिय फुटावें असें वाटे, तर कर्णेंद्रियांना रसना असावी असें वाटे. कोण ही रससिद्धता व हृद्‌गम्यता ! लीडरचे संपादक सी. वाय्. चिंतामणींनी असे उद्गार काढले कीं, "Pandit Malviya is nothing but hear from head to foot." "पंडित मालवीय डोक्यापासून पायापर्यंत हृदयच हृदय आहेत." हें पं. मालवीयांचें किती यथार्थ चित्रण आहे ! केवळ भावनोत्कटता, हृदय-प्रधानता राजकारणांत यशस्वी व प्रभावी होऊं शकत नाही. भावनोत्कट व्यक्ति लोकप्रिय होईल, पण पक्षनेता होऊन राजकारणाला गति किंवा आकार देणार नाही. अशा व्यक्तीला लोकमताच्या प्रवाहाबरोबरच वाहत जावें लागेल, प्रवाहपतित व्हावें लागेल. अशा व्यक्तीच्या जीवनांत परस्परविरोधी घटना घडतात; न कळणारी विसंगति निर्माण होते. अशा परस्परविरोधी घटनांनीच पं. मालवीयांचें जीवन मंडित केलें आहे. हृदय व मेंदू यांचा अविरत झगडा म्हणजे मालवीय. त्यांचें हृदय गरम होतें तर मेंदू थंड होता. जेव्हा ते अंतःकरणपूर्वक बोलत, तेव्हा आग भडकावून देत; पण जेव्हा त्यांचा मेंदू काम करावयास लागे, तेव्हा पुढे सरसावणाऱ्या समाजाला थोपवून धरण्याचें काम ते करीत. कॉंग्रेसमधील त्यांचें धोरण असें अनपेक्षित वळसे घेणारें असे. आपल्या प्रभावी वाणीने जहाल भासणाऱ्या पं. मदनमोहन मालवीयांनी १९०७ सालीं सुरतेला मवाळ पक्षाला साथ दिली व सर्वांना आश्चर्यचकित केलें. उलगडा न होणारा हा पहिला प्रसंग.

### कॉंग्रेसचे अडचणींतील अध्यक्ष

इंग्रजी राज्य दैवी देणगी समजणाऱ्या मवाळांपैकीच ते होते. पण ज्या वेळीं मवाळ पुढारी कॉंग्रेसला सोडून चालते झाले, तेव्हा पं. मालवीय कॉंग्रेसलाच चिकटून राहिले. ते जहालांतील मवाळ व मवाळांतील जहाल

होते. पक्षनिष्ठा नव्हे, संस्थानिष्ठा हाच त्यांचा विशेष ! प्रामाणिकता व सतत कार्यरतता ही त्यांच्या यशाची गुरुकिल्ली. पं. मदनमोहन मालवीयांचें भाग्यच असें कीं, जेव्हा कॉंग्रेसला आवश्यकता किंवा अडचण पडावी तेव्हा ते तिचे अध्यक्ष व्हावेत. असें चारदा झालें. पहिला प्रसंग लाहोरचा. वास्तविक पाहतां मुंबईचे सिंह फिरोजशहा मेथा निवडलेले अध्यक्ष, पण ऐन वेळीं त्यांच्या अनुपस्थितीमुळे अध्यक्षाची माळ पडली पं. मालवीयजींच्या गळ्यांत. याचीच पुनरावृत्ति झाली १९१८ सालीं. लो. टिळक नियुक्त अध्यक्ष पण ते गेले लंडनला, म्हणून पं. मालवीय पुन्हा एकदा दिल्ली कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. नंतर त्यांना म. गांधींचा बहिष्कारयोग मानवला नाही. त्यांनी विरोधहि केला पण व्यर्थ ! स्वराज्यपक्ष स्थापन होतांच १९२३ सालीं कॉंग्रेसमध्ये त्यांनी जातीने भाग घेतला व असेंब्लींत ते सभासद म्हणून गेले. तेथे सरकारी बिलांना त्यांनी कसून विरोध केला. तसेंच पाहावयाचें तर १९०२ पासून पं. मालवीय मध्यवर्ती कौन्सिलचे सभासद होते. दिल्लीच्या असेंब्लींत १९१९ सालीं जालियनवाला बागेंत घडलेल्या अत्याचाराचा निषेध करणारें त्यांचें एक हृदयस्पर्शी भाषण झालें. ह्या भाषणाच्या वेळीं सर्व सभागृहांत हुंदक्यांचा आवाज व स्त्रियांच्या किंकाळ्या ऐकूं येऊं लागल्या. भारताचे 'शेरेडन' म्हणून इंग्रजी वर्तमानपत्रांनी त्यांना गौरविलें व त्यांचें तें 'शेरेडनछाप वक्तृत्व' जगजाहीर झालें. कॉंग्रेसने कायदेभंगाचें रणशिंग फुंकतांच पं. मालवीय एखाद्या योद्ध्याप्रमाणे लढावयास तयार झाले. १९३० सालच्या आगस्टच्या पहिल्या तारखेचा मुंबईचा तो रोमांचकारक देखावा जनतेच्या स्मृतिपटलावरून नाहीसा होणें शक्य नाही.

## तुरुंगवास

सत्तर वर्षांच्या शेलारमामासारखे दिसणारे ते वृद्ध पं. मदनमोहन मालवीय, सरदार वल्लभभाईंच्याबरोबर चौपाटीवरील प्रचंड सभेंत भाषण करावयास गेले. लो. टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त ही विराट् सभा लो. टिळकांच्या दहनभूमीजवळ भरली होती. इकडे उफाळणारा अफाट समुद्र तर इकडे खवळलेला अफाट जनसमुद्र. अध्यक्ष सरदार वल्लभभाई व वक्ते

महामना पं. मदनमोहन मालवीय. भारतांतील सर्वश्रेष्ठ वक्ता अशा गंभीर प्रसंगीं दोन सागरांमध्ये उभा राहून भाषण करीत होता. कल्पना करा कीं, पं. मदनमोहनांच्या हृत्सागरांत भावनांच्या किती पर्वतप्राय लाटा उसळत असतील ! त्या लाटांचा पारतंत्र्याच्या किनाऱ्यावर आदळणारा आवाज किती भयंकर असेल ! ! महामना पंडितजींनी अभूतपूर्व भाषण केलें. लो. टिळकांचें ' स्वराज्य ' संपादण्याचें अपूर्ण कार्य करण्यासंबंधीं त्यांनी जनतेला आवाहन केलें. जनसागर हेलावला व एक प्रचंड मिरवणूक निघाली. वरून मुसळधार पाऊस पडत होता, पण स्वातंत्र्याचा जयघोष करीत ही प्रचंड मिरवणूक चालली. ब्रिटिश सरकारला हें कसें पाहवेल ? हिंदी जनतेचा विजय कसा पाहवेल ? मिरवणूक सशस्त्र पोलिसांनी अडविली. घनघोर अंधकार पसरला पण लोक हटेनात. पुरुषहि हटेनात व स्त्रियाहि हटेनात. पाऊस म्हणतो मी मी, वारा व अंधकार सूं सूं करीत होते, पण जनतेची देशभक्तीची ज्वाला विझेना. सरकारी विरोधाने ती जास्तच भडकली. जनसागर उफाळला पण त्याने मर्यादा सोडली नाही, शिस्तभंग केला नाही. ही स्वयंस्फूर्त शिस्त होती. आठ-दहा तास सरकार व अहिंसक जनता यांच्यांत झटापट झाली. सरकार चिडलें व पं. मालवीय व सरदारादि पुढाऱ्यांना अटक करण्यांत आली. इतरांवर मग लाठीहल्ला झाला. हा पं. मालवीयजींच्या जीवनांतील भव्योदात्त समरप्रसंग आहे. या वेळीं पं. मालवीय भीष्म-द्रोणासमान वाटले. कायदेभंगाच्या राष्ट्रीय संग्रामांत त्यांना सहा महिन्यांचा सश्रम कारागृहवास झाला. वय सत्तराच्या घरांत, पण उत्साह तरुणांना लाजविणारा. मवाळाग्रणी मालवीय सेनानी झाले धन्य काल-महिमा ! तुरुंगांतून मुक्तता झाल्यानंतर ते लंडनला वर्तुळ-परिषदेचे प्रतिनिधि म्हणून गेले. त्यांनी तींत राष्ट्रीय दृष्टि कायम ठेवून हिंदुहित रक्षण करण्याची शिकस्त केली. १९३२ व ३३ सालच्या बेकायदेशीर ठरविलेल्या कॉंग्रेस अधिवेशनांचे नियोजित अध्यक्ष म्हणून त्यांना दोनदा अटक करण्यांत आली. जर्जर झालेल्या योद्ध्याप्रमाणे रणदुंदुभीचा आवाज कर्णीं पडतांच ते लढावयास सिद्ध होत. पुढे देह थकला व त्यांची प्रत्यक्ष कॉंग्रेस-सेवा खंडित झाली.

## हिंदुसमाजाची सेवा

हिंदुधर्म, हिंदुसंस्कृति व हिंदुसमाज यांच्याबद्दल पं. मदनमोहन मालवीयजींच्या मनांत ज्वलन्त अभिमान व आदर होता. इतरधर्मीयांची हितरक्षा करून हिंदुसमाजाची सर्वांगीण उन्नति व्हावी अशी त्यांची प्रबळ मनीषा. १९२३ ते २७ पर्यंत भारतांत जातीय दंगे झाले. राष्ट्रीय म्हणविणारे मुसलमान पुढारी इंग्रजी सत्तेच्या 'फोडा व झोडा'च्या धोरणाला बळी पडून मुसलमान समाजाला जास्तच भडकावीत. अशा वेळीं हिंदुसमाजाचें संरक्षण व्हावें, त्याची एकता भंग पावूं नये व हिंदूंचें राजकीय प्रतिनिधित्व कमी होऊं नये म्हणून पं. मालवीयांनी हिंदुसभेचा तनमनधनानें पुरस्कार केला. पंजाब-सिंह लाला लजपतरायांप्रमाणे ते दोनदा हिंदु-महासभेचे अध्यक्ष झाले. संपूर्ण राष्ट्रवादी असूनदेखील ते सोळा आणे हिंदु होते. त्यांचा एक पाय कॉंग्रेसमध्ये तर दुसरा हिंदुमहासभेंत होता. पण ते जातीयतेला बळी पडले नाहीत किंवा जात्यंध झाले नाहीत. कॉंग्रेसने जेव्हा जेव्हा स्वातंत्र्यसंग्राम पुकारला, तेव्हा तेव्हा ते त्यांत भाग घेण्यास एका पायावर सिद्ध असत.

पं. मालवीय सुधारकांतील सनातनी व सनातन्यांतील सुधारक होते व त्यांना सांधणारा हा एक लवचिक दुवा होता. सामाजिक कुप्रथा आणि विषमता पाहून त्यांचें कोमल मन विदीर्ण होई. त्यांच्या या वृत्तीमुळे त्यांच्या आचरणांत व धोरणांत विसंगति निर्माण होई. पण ती थोरांची विसंगति होती म्हणून तिच्यांतहि एक प्रकारची रम्यता आहे. सनातनी असूनहि ते अस्पृश्यांना मंत्रदीक्षा देत व मंदिरांत घेऊन जात. समुद्रपर्यटनाने त्यांनी सामाजिक रूढीला उल्लंघिलें, पण परत आल्यानंतर 'शास्त्रोक्त प्रायश्चित्तहि' घेतलें. न उकलणारी विसंगति ती ही !

## अमर स्मारक "हिंदु विश्वविद्यालय"

'वाराणशी' आधुनिक बनारस, प्राचीन काळापासून संस्कृत विद्येचें माहेरघर आहे. अशा विद्याक्षेत्रीं व धर्मक्षेत्रीं आधुनिक शास्त्रांचें सर्वांगीण व अद्ययावत् शिक्षण देणारें "हिंदु विश्वविद्यालय" स्थापून प. मालवीय-जींनी हिंदुसमाजावर अनंत उपकार केले आहेत. जगांतील मोठ्यांत मोठ्या

विश्वविद्यालयांपैकी तें आहे. हें विश्वविद्यालय पं. मालवीयजींनी सार्वजनिक निधींतून निर्माण केलें आहे. हा प्रचंड निधि जमविण्यासाठी त्यांना तीन वर्षेपर्यंत अखिल भारतांत प्रवास करावा लागला. त्यांच्या मधुर संभाषणाने व हेतूच्या उदात्ततेने त्यांनी अनेक दानशूर श्रीमंतांचीं मनें आकृष्ट केलीं. भिक्षेला त्यांनी कलेचें रमणीय स्वरूप दिलें. पं. मालवीयजींनी दानासाठी पदर पसरला व कोणीं त्यांना नकार दिला असें झालें नाही. ते भाग्यशाली भिकारी होते. तीन कोटींचा प्रचंड निधि उभारून त्यांनी हा स्थायी कीर्तिस्तंभ उभारला.

**कायाकल्प**

पं. मालवीयांची आयुर्वेदिक औषधांवर हिंदु संस्कृतीचा एक अविभाज्य घटक म्हणून अनन्यनिष्ठा होती. म्हणून १९३८ सालीं एक हिमालयवासी योगीराज बनारसला आले असतां मालवीयजींनी कायाकल्पाच्या दिव्यांतून जाण्याची आपली सिद्धता केली. मालवीयजींची इच्छा ! ती पुरी झालीच म्हणून समजा. साधनें पं. मालवीयांच्यापुढे हात जोडून उभीं असत. ते चाळीस दिवसांच्या कायाकल्पाच्या भयंकर दिव्यांतून सतेज बाहेर पडले, पण कायाकल्पाचा तथाकथित अगर अपेक्षित फायदा झाला नाही. अल्पावधींतच त्याची प्रतिक्रिया झाली. त्यांची प्रकृति क्षीण होऊं लागली व त्यांनी राजकारण-संन्यास घेतला. तें वर्ष १९३८ होतें.

**स्वर्गारोहण**

बनारस विद्यापीठाच्या कुलगुरूच्या भवनांत पं. मालवीय दिवसेंदिवस अस्थिपंजर होत होते, पण भारतीय स्वातंत्र्याची व त्याच्या अखंडपणाची चिंता त्यांना सोडीना. चिता नव्हे तीं चिंताच त्यांना जाळणार, भस्म करणार ! इतक्यांत पं. जवाहरलाल नेहरूंनी मध्यवर्ती सरकार बनविल्याची आनंददायक बातमी त्यांच्या कानीं आली. त्यांनी समाधानाचे उसासे सोडले. बाजी प्रभु देशपांड्यांच्या कानीं शिवाजी सुरक्षित पोहोचल्याची वर्दी देणारे तोफांचे आवाज पडले, पण बाजी देशपांड्यांचें भाग्य पं. मालवीयांच्या नशिबीं नव्हतें. त्यांचा मृत्यु दुःखद व्हावयाचा होता. १९४६ च्या नोव्हेंबर महिन्यांत बंगालमधील नौखाली व चितगांव जिल्ह्यांत बहुसंख्य

मुसलमानांनी अल्पसंख्य हिंदूंवर अनन्वित अत्याचार केले. ही वार्ता वज्राघाताप्रमाणे पं. मालवीयांच्या जर्जर व कोमल हृदयावर आदळली व ते बेशुद्ध झाले. उपायांची शर्थ झाली. पं. मालवीय शुद्धावस्थेंत आले, पण नाडी मंदावत चालली. कालभैरव आपले कराल पाश टाकीपर्यंत ते शुद्धावस्थेंत होते. अत्यंत सम्यगवस्थेंत काशीविश्वेश्वराचें चिंतन करीत या शुद्धात्म्याने स्वर्गारोहण केलें. ती पवित्र तारीख १२ नोव्हेंबर १९४६ होती. दीर्घ आयुष्यांत प्रदीर्घ व प्रचंड राष्ट्रकार्य करून त्यांनी भारतीयांना उपकृत केलें.

• • •

मराठी
अनुक्रमांक 20024
ग्रंथांक 075 दि. 11/10/58

पंजाब-केसरी

# लाला लजपतराय

(१८६५-१९२८)

" मानोहि महतां धनम् । "

"लालाजी एक चालतीबोलती संस्था होती. तारुण्यापासूनच देशभक्तीला धर्म लेखून तिचें त्यांनी आमरण व्रत आचरिलें. त्यांची राष्ट्रीयता आंतरराष्ट्रीयतेने थबथबलेली होती. ते उत्साही समाजसुधारक आणि सच्चे धर्मसेवक होते. असें एकहि सार्वजनिक आंदोलन सापडणें शक्य नाही, कीं ज्यांत लालाजींनी कांहीच भाग घेतला नव्हता. त्यांची लोकसेवेची तृषा सदा अतृप्त राही. त्यांनी अनेक शिक्षण-संस्था स्थापिल्या. ते संकटांत दुःखितांचे मित्र होते." वरील सुवर्णमय उताऱ्यांत म. गांधींनी पंजाबकेसरी लाला लजपतरायांच्या जीवनकार्याचें यथार्थ मूल्यमापन केलें आहे. खरोखरच लालाजींचें जीवन विविध–घटनापूर्ण आहे. ते शिक्षण-तज्ज्ञ, समाजसुधारक, राजनीतिज्ञ, अस्पृश्योद्धारक, लोकसेवक, उच्च कोटीचे लेखक व महान् वक्ते होते, नव्हे वरील गुणांचे ते तेजस्वी पुंजच होते. अशा थोर पुरुषाचें चरित्र उद्बोधक झाल्याशिवाय राहील का ?



## जन्म व शिक्षण

लालाजींचे वडील लाला राधाकृष्ण हे लुधियाना जिल्ह्यांत डेप्युटी इन्स्पेक्टर होते. ते प्रायः फिरतीवरच असत. ते दौऱ्यावर असतांनाच लालाजींचा जन्म 'ढोंडीग्राम' या खेडेगावीं जानेवारी २८ ला १८६५ मध्ये झाला. प्राथमिक शिक्षण खेडयांतील शाळांमधूनच झालें. बाळ लालाजींच्या बिंबग्राही मनावर ग्रामीण संस्कृतीचें चिरकाल टिकणारे संस्कार झाले. खऱ्या हिंदी जीवनांत ते जन्मले व वाढले. माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी ते पंजाबची राजधानी लाहोर येथे गेले. कॉलेजमध्ये असतांनाच त्यांचा लाला हंसराज व पं. गुरुदत्त आदि आर्यसमाजी कार्यकर्त्यांशीं गाढ परिचय झाला. कॉलेजच्या फुलपांखरी जीवनांत ते रंगले व भुलले नाहीत. कांही तरी समाजसेवा करावी, जीवन सत्कारणीं लावावें हीच त्यांची तळमळ. याच तळमळीने त्यांची वरील आर्यसमाजी पंडितांशीं मैत्री घडवून आणली. कॉलेज-जीवनांत ते एक होतकरू लेखक व वक्ते म्हणून चमकले. परंतु तें ताऱ्याचें चमकणें होतें हाच तारा पुढे तमोध्वंसक चंद्र कसा होतो हेंच आपणांस पाहावयाचें आहे.

## वकील लालाजी

लाला लजपतराय बी. ए., एल्एल्. बी. झाले. "आधी प्रपंच करावा नेटका । मग परमार्थां घ्यावें विवेका" या व्यवहारसूत्राप्रमाणे लालाजींनी चरितार्थाचें स्वतंत्र साधन म्हणून वकिली सुरू केली. ती हिसार या जिल्ह्याच्या ठिकाणीं. अल्पावधींतच यशस्वी वकील म्हणून ते ख्यातनाम झाले. लक्ष्मी त्यांना सुप्रसन्न झाली. परंतु 'Eat drink and be merry' खा, प्या आणि मजा करा या भोगवादी पंथाचा त्यांना तिरस्कार वाटत असे. जीवन म्हणजे कर्तव्य हेंच त्यांचें ब्रीद.

## समाजसेवेचा ओनामा

कांही तरी जनसेवा करावी म्हणून ते स्थानिक म्युनिसिपालिटीचे सभासद झाले. नव्हे कांही महिने अवैतनिक सेक्रेटरी झाले. त्यांच्या निस्पृहतेचा बोलबाला झाला. एकदा पंजाबचे लेफ्टनंट गव्हर्नर हिसारला भेट देणार होते. लोकपरिपाठीला अनुसरून म्यु. कमिटीने त्यांना मानपत्र देण्याचें

निश्चित केलें. पण वादळ माजलें तें भाषेसंबंधी. राजनिष्ठ सभासद म्हणाले इंग्रजींतून द्या. उलट लालाजी म्हणाले, उर्दूतून द्या. लालाजींना स्वभाषेचा किंवा देशी भाषांचा मोठा जळजळीत अभिमान. भवति न भवति होऊन लालाजींच्या मनाप्रमाणे ठरलें. स्वतः लालाजींनी आपल्या खड्या व निर्भय वाणीने तें उर्दू मानपत्र ले. गव्हर्नरला वाचून अर्पण केलें. प्रकार फारच क्षुल्लक, पण त्यांतच लालाजींच्या भावी महत्तेचीं बीजें होतीं, तीं पाहण्यास डोळे मात्र हवेत.

## स्वामी दयानंदांची भेट

हिसारचें क्षेत्र त्यांना अपुरें पडूं लागलें. त्यांच्या तरल वकिली बुद्धीला हायकोर्टांत चमकण्याची ओढ लागली. गतिमानता हीच प्रगति. लालाजींनी लाहोरला वकिली थाटली. आता स्वार्थी वकिलीपेक्षा त्यांचें लक्ष समाजसेवेकडेच जास्त लागलें. आर्यसमाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती यांची व त्यांची गाठ पडली. मनाला मन जडलें. जिवाशिवाची भेट झाली. लालाजींनी आर्य-समाजाची दीक्षा घेतली.

## प्राध्यापक व शैक्षणिक कार्य

प्रत्यक्ष कार्य म्हणून ते लाहोरच्या अँग्लो वैदिक कॉलेजांत अवैतानिक प्राध्यापक म्हणून कार्य करूं लागले. परंतु त्यांच्या अचाट कार्यशक्तीला हें क्षेत्र अपुरें पडलें. पंजाबांत शिक्षणाचा प्रसार मंद गतीने होत होता. लढवय्यांचा व वैश्यांचा तो प्रांत. शैक्षणिक मागसलेपणामुळे राजकीय जागृति मूळ धरूं शकत नव्हती. लालाजींनी अचूक निदान केलें व त्यावर रामबाण औषधीची योजना केली. महाराष्ट्रांत लो. टिळकांनी स्वतंत्र खाजगी संस्था स्थापून जसे नवोदित पिढीवर स्वसंस्कृतीचे, स्वभाषेचे व स्वदेशप्रेमाचे संस्कार केले, तद्वत् १९०१ मध्ये तरुण लालाजींनी ‘ पंजाब शिक्षण मंडळ ’ स्थापून अनेक माध्यमिक विद्यालयें व महाविद्यालयें स्थापिलीं. खुद्द हिसारला ‘ राधाकृष्ण हायस्कूल ’ प्रस्थापून पितृऋण फेडलें. केवढी विधायक देशसेवा ! ‘ Hero is a hero at all points ’ ही कार्लाइलची उक्ति सत्य आहे. लालाजींची समाजसेवा चहुमुखी होती. दुष्काळ व भूकंपाच्या आपत्कालीं ते पीडितांच्या मदतीसाठी धावून जात असत.

या बाबतींत लो. टिळक व लालाजी यांच्यांत बरेंच साम्य आहे व तें असणारच, कारण दोघांचा पिंड एकच होता. १८९६, १८९९, १९०५ व १९०८ च्या दुष्काळांत व भूकंपांत त्यांनी जीव तोडून कार्य केलें. त्यांच्या कार्याची सर्वांनी तोंडभर स्तुति केली. इतकेंच नव्हे तर सरकारी दप्तरांत त्याची नोंद होऊन, पंजाबसरकारतर्फे दुष्काळ-कमिशनपुढे साक्ष देण्यास त्यांना निमंत्रित केलें होतें. एवम्, त्यांची विधायक समाज-सेवा लोकमान्य व सरकारमान्य झाली.

## वक्तृत्वाचा प्रभाव

राजकीय स्वातंत्र्याशिवाय सांस्कृतिक अथवा सामाजिक सुधारणा होऊं शकणार नाहीत असें त्यांना वाटूं लागलें. राजकीय कार्याची हुरहूर त्यांना लागली. इतक्यांत एक मोठी मजेदार गोष्ट घडली. लालाजींच्या पित्याची—लाला राधाकृष्णांची—अलीगड मुस्लीम विद्यापीठाचे संस्थापक, पैगंबरवासी सर सैय्यद अहमदांवर अढळ निष्ठा. परंतु सर सैय्यदने जेव्हा मुसलमान समाजाला कॉँग्रेसपासून दूर राहण्याचा जातीय सल्ला दिला, तेव्हा लाला राधाकृष्णांची श्रद्धा ढळली. सरकारी पेन्शनर असल्यामुळे ते उघड रीतीने विरोध करूं शकले नाहीत, म्हणून त्यांनी लाला लजपतरायांच्या नांवाने वर्तमानपत्रांतून सैय्यद अहमदला एक अनावृत पत्र लिहिलें व त्यांत कॉँग्रेसच्या विशुद्ध राष्ट्रीयतेची तरफदारी केली. पत्राचे प्रकट लेखक लाला लजपतराय कॉँग्रेसचे पुरस्कर्ते झाले ते झालेच. ते पहिल्यांदा १८८८ मध्ये अलाहाबादला भरलेल्या कॉँग्रेसच्या चौथ्या अधिवेशनाला गेले. त्यांत त्यांनी कौन्सिल-प्रवेशाच्या ठरावावर ‘ उर्दू ’ भाषेमधून भाषण केलें. त्यांच्या प्रभावी व प्रवाही वाणीने सर्वांना मंत्रमुग्ध केलें तेव्हाच भविष्य वर्तविण्यांत आलें कीं, लालाजी कॉँग्रेसचे होतकरू पुढारी होत. लोकांच्या डोळ्यांत भरण्यास वक्तृत्वासारखा दुसरा गुण नाही. एकसमयावच्छेदेंकरून हजारो श्रोतृवृंदांच्या भावनांचें उद्दीपन वक्ताच काय तें करूं शकतो. वक्तृत्व म्हणजे नाट्य. तेव्हा कांही कालपर्यंत तरी वक्ता कांहींच्या हृदयावर अधिष्ठित असतो, म्हणून तो आदरास व नेतृत्वास प्राप्त होतो. पुन्याशा कर्तृत्वाचें पाठबळ नसलें तरी चालतें. अल्पावधींतच लालाजी पंजाबचे

एकमेव पुढारी झाले. १९०६ सालीं कै. गो. कृ. गोखल्यांचे सहकारी म्हणून ते कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाबरोबर विलायतेला गेले. तेथे त्यांच्या मुलूख-मैदानी वक्तृत्वाला खूप वाव मिळाला. एक अद्वितीय वक्ता म्हणून ते ख्यातनाम झाले अशी सुकीर्ति संपादून ते मायभूमीला परतले. पंजाबने तर त्यांना डोक्यावर घेतलें. परंतु जनतेच्या आदरास पात्र होणें म्हणजे सरकारी अवकृपेचें भाजन होणें हें त्या काळचें समीकरण.

## पंजाब-केसरी हद्दपार होतात

वंगभंगाची चळवळ सुरू झाली. लाला लजपतरायांनी पंजाबांत तुफानी प्रचार केला. उत्तर प्रदेशांत जीवन-स्फूर्ति प्रदान करणाऱ्या त्यांच्या भाषणास अलोट गर्दी होई. त्यांचा तो सिंहसदृश गोल मुखवटा, आवाजाचा खणखणाट, स्पष्टता व भेदकता सर्वांना हलवून सोडी. जनतेने त्यांची निर्भयता पाहून त्यांना "पंजाबकेसरी" म्हणून गौरविलें परंतु या केसरीच्या गळ्यांत हद्दपारीचा फासा सरकारने टाकला व त्यांना मंडालेला नेलें. दीड वर्षाच्या हद्दपारीनंतर त्यांची मुक्तता झाली. अग्निदिव्यांतून सोनें शुद्धतर झालें, सूर्य ग्रहणमुक्त झाला! त्यांची लोकप्रियता शतगुणित झाली.

## लाल, बाल व पाल

कॉंग्रेसमध्ये जहाल व मवाळ असे पक्षभेद फोफावले. जहालांचे ब्रह्मा, विष्णु व महेश म्हणजे 'लाल, बाल व पाल.' लाल म्हणजे लालाजी, बाल म्हणजे बाळ गंगाधर टिळक, पाल म्हणजे बंगालचे पुढारी बिपिनचंद्र पाल. या जहाल–मवाळांच्या युद्धाचें रणक्षेत्र म्हणजे सुरत. जहालाग्रणी लो. टिळकांनी लालाजींचें नांव अध्यक्षपदाकरिता सुचविलें. परंतु खुद्द लालाजी टिळकांइतके कडवे पक्षनिष्ठ नव्हते. त्यांनी तें पद सविनय नाकारलें. कॉंग्रेस मोडली. लो. टिळक काळ्यापाण्यावर गेले. लालाजी मात्र कॉंग्रेसला चिकटून राहिले. १९१२–१३ मध्ये गोखल्यांच्या सूचनेवरून त्यांनी महात्मा गांधींना दक्षिण आफ्रिकेंत सत्याग्रह चालविण्यासाठी ४० हजार रुपये पाठविले.

## परदेशांत प्रचार

१९१४ सालीं युरोपांत युद्धाची ज्वाला भडकली. विलायत-सरकार

त्यांत गुरफटलें व हिंदुस्थान त्यांत अनिच्छेने ओढलें गेलें. याच वेळीं पंजाब-केसरी विलायतेंत होते. त्यांनी आपल्या व्याख्यानांद्वारें भारतीयांच्या राजकीय आकांक्षांकडे तेथील जनतेचें लक्ष वेधलें, म्हणून त्यांना भारतांत परत येऊं देणें ब्रिटिश सरकारला धोक्याचें वाटलें. असें त्यांचें स्फोटक व्यक्तिमत्त्व होतें. या वेळीं लालाजींनी अमेरिकेंत वास्तव्य केलें, पण त्यांचें मन भारतांत होतें ते भारताची शक्य ती सेवा अमेरिकेंत करीत. त्यांनी तेथे 'इंडियन होमरूल लीग' स्थापन केली व 'यंग इंडिया' नांवाचें साप्ताहिक संपादिलें. शेकडो व्याख्यानें दिलीं. उद्देश एकच. हिंदी स्वातंत्र्याबद्दल अमेरिकनांची सहानुभूति प्राप्त करणें. जेथे जशी मातृभूमीची सेवा करतां येईल तशी करावी हेंच त्यांचें असिधाराव्रत. स्वामी विवेकानंदांच्या पश्चात् भारताचें श्रेष्ठत्व अमेरिकेंत प्रभावीपणें प्रस्थापित करणारे पंजाबसिंह लालाजीच. त्यांच्या चौकस बुद्धीने अनेक पुरोगामी व अद्ययावत् शास्त्रांचें तेथे आलोडन केलें. समाजसत्तावादाचाहि त्यांना सखोल अभ्यास केला. त्यांतील आर्थिक समता त्यांना पटली, पण आर्यसमाजी मनःपिंड असलेल्यांना त्यांतील भौतिकवाद कसा मानवेल ?

## कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर

महायुद्ध संपल्यानंतर १९२० मध्ये लालाजींचे पाय मातृभूमीस लागले. पाडसास गाय मिळाली, हंबरणाऱ्या गाईला पाडस मिळालें. त्यांनी परदेशांत केलेल्या सेवेचा गौरव म्हणून त्यांना १९२० मध्ये कलकत्त्याला भरलेल्या कॉंग्रेसच्या खास अधिवेशनाचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. ह्या खास अधिवेशनांत महात्मा गांधींचा असहकारितेचा कार्यक्रम कॉंग्रेसने स्वीकारला. खुद्द लालाजींना हा कार्यक्रम सर्वतोपरी मान्य नव्हता. लाला लजपतराय म्हणजे लो. टिळक व गोखले यांच्या राजकीय तत्त्वप्रणालीचें मधुर मिश्रण; बुद्धि व धडाडी यांचा संयोग. त्यांना गांधींचा असहयोगाचा कार्यक्रम कसा रुचणार ? पण लोकमताच्या झंझावातापुढे मी मी म्हणणाऱ्यांनादेखील मान वाकवावी लागते, आपल्या अस्तित्वासाठी प्रवाहपतित व्हावें लागतें, ही जनरीत आहे. तिला अनुसरून लजपतराय असहकारितेच्या आंदोलनांत सामील झाले. त्यांनी लाहोरला एक राष्ट्रीय कॉलेज स्थापिलें. आपल्या

ओजस्वी वाणीने सारा देश हादरून सोडला. त्यांच्या वाग्वल्लरीला या वेळीं खरा वहर आला. त्यांच्या भाषणाचा आवेश व डौल कांहीं औरच होता. नोकरशाहीला हें कसें मानवेल बरें ? लालाजींना राजद्रोहाच्या आरोपाखालीं दीड वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली. त्यांनी वीरोचित मुद्रेने तिचें स्वागत केलें.

## कारागृहांतील ग्रंथरचना

ही तुरुंगांतील विश्रांति त्यांनी लेखनांत घालविली. याच वेळीं नव-पिढीला उद्बोधक म्हणून त्यांनी लो. टिळक, जोसेफ मॅझिनी, शिवाजी, राणा प्रताप, गॅरिबाल्डी आदींची ओजस्वी व रसभरित चरित्रें लिहिलीं. ही त्यांची थोर साहित्यसेवा आहे. ‘वीर मर्दांचे पोवाडे वीराने गावे’ तद्वत् एका महान् देशभक्ताने इतर महत्तर व महत्तम देशभक्तांचीं चरित्रें देशभक्तीने ओथंबलेल्या कुंचलीने रंगविलीं. कोण हा वसंतकोकिलेचा योग ! कांचनमण्यांचा सयोग ! ! लालाजींची साहित्यसेवा उल्लेखनीय आहे. साहित्याला त्यांनी देशसेवेचें साधन बनविलें.

‘मेरी जायदाद मेरी कलम है’ असें ते ठासून बोलत. जसे ते कसलेले वक्ते तसेच खंदे लेखकहि होते. त्यांनी लिहिलेलीं ‘राष्ट्रीय शिक्षण’ व ‘भारताचें राजकीय भविष्य’ हीं पुस्तकें वाचनीय आहेत. मृत्यूपूर्वी दोनच महिने त्यांनी मिस् मेयोच्या बदनामकारक ‘मदर इंडिया’ला ‘फादर इंडिया’ ग्रंथाद्वारें खरमरीत उत्तर दिलें. या त्यांच्या शेवटच्या ग्रंथांत त्यांना भारताबद्दल व भारतीय म्हणून जें जें कांहीं आहे त्याबद्दल किती अभिमान वाटे याची साक्ष पदोपदीं पटते. ते ‘वन्दे मातरम्’ उर्दूतून व ‘दी पीपल’ इंग्रजींतून संपादीत. एक प्रथितयश संपादक म्हणून त्यांची ख्याति होती.

## कार्याचा व्याप

लालाजी १९२३ मध्ये ‘स्वराज्यपक्षा’तर्फे व १९२७ मध्ये ‘राष्ट्रीय पक्षा’तर्फे मध्यवर्ती विधिमंडळाचे प्रतिनिधि म्हणून प्रचंड बहुमताने निवडले गेले. विधिमंडळांत त्यांनी कांहीं अविस्मरणीय भाषणें करून सरकारी ठरावांना हाणून पाडलें. त्यांचें विधिमंडळांतील अस्तित्व गोखल्यांची स्मृति जागृत करी.

त्यांना हिंदुसंस्कृति व हिंदुधर्मासंबंधी आत्यंतिक आस्था वाटे. जात्यंध मुसलमान पुढाऱ्यांच्या कारस्थानांची प्रतिक्रिया म्हणून त्यांनी हिंदुसभेचा पुरस्कार केला; नव्हे ते स्वतः एक वेळ हिंदुसभेचे अध्यक्षहि झाले. पण हिंदूंचे राजकीय हक्क व हित संरक्षून ते न्यायतः मुसलमानांचेहि हक्क व हित सांभाळावयास सिद्ध असत, म्हणून ते जात्यंध होऊं शकले नाहीत. त्यांचें लोककार्य चहुमुखी होतें. गोपाळ कृष्ण गोखल्यांचे अनुकरण "लोकसेवा मडळ" "The Peoples' Society" स्थापण्यांत त्यांनी केलें. या मंडळाचें प्रमुख कार्य दलितोद्धार आणि मागसलेल्या वन्य जातींची उन्नति करणें हें होय. देशांतील पदवीधर तरुणांना राजकारण व अर्थशास्त्र यांचें शास्त्रीय शिक्षण देण्यासाठी त्यांनी 'तिलक स्कूल ऑफ पॉलिटिक्स' ही संस्था स्थापिली व या मंडळातर्फे एक मोठा दवाखाना चालविला. स्वतःची संपदा त्यांनी त्यांतच ओतली. इतके ते देशहिताशीं तन्मय झाले होते.

## सिंहमृत्यु

लालाजींचा स्वभाव फार मानी होता, नव्हे मान हेंच त्यांचें धन होतें. स्वाभिमान हाच देशाभिमानाचा अढळ पाया आहे. लालाजींनी नाही नाही ते कष्ट सोसले, पण अपमान क्षणभरदेखील सहन केला नाही. सुविख्यात विश्वनाटककार शेक्स्पीयरने आपल्या 'ज्युलिअस सीझर' शोकान्तिकेंत त्या मानी राज्यकर्त्याच्या मुखांतून असें सुभाषित वदविलें आहे कीं, 'A coward dies many times before his death but a brave man dies once and once only.' 'भीरु हा मृत्यूपूर्वी मानभंग सहन करून अनेक वेळां मरत असतो, उलट शूर पुरुष आयुष्यांत एकच मानाचें मरण मरतो.' लालाजींचें कुळ म्हणजे सीझरचें कुळ. फक्त कालाची व परिस्थितीची प्रतिकूलता. याच मानी स्वभावाने लालाजींचा अंत झाला. ती मोठी रोमहर्षक हकीकत आहे. १९२० मध्ये भारताला दिलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीचें निरीक्षण करावयास आलेल्या 'सायमन-कमिशन'-मध्ये एकाहि हिंदी सभासदास समाविष्ट करण्यांत आलें नव्हतें म्हणून काँग्रेसने त्यावर बहिष्कार टाकला. सायमन-कमिशन जेथे जेथे गेलें तेथे तेथे त्याचें काळ्या झेंड्यांनी व 'सायमन परत जा' या बहिष्कारात्मक

आरोळ्यांनी स्वागत झालें म्हणा किंवा धिक्कार झाला म्हणा. होतां होतां ३० ऑक्टोबर १९२८ ला हें मंडळ लाहोरला गेलें. स्टेशनच्या आजू-बाजूला सशस्त्र पोलिसांचा कडक बंदोबस्त होता. अशा वेळीं उतरत्या वयाची आणि भावी संकटाची पर्वा न करतां सायमन-बहिष्काराची प्रचंड मिरवणूक स्वतःच्या नेतृत्वाखाली लालाजींनी काढली. जातिवंत लढवय्या-प्रमाणे ते आघाडीला होते. मिरवणूक स्टेशनजवळ येतांच पोलीस अधिकाऱ्यांनी चिडून तीवर लाठीहल्ला केला. कांहींचीं डोकीं फुटलीं, कांहींना मुका मार बसला. होतां होतां 'मुखरस्तत्र हन्यते' या न्यायाने लालाजींनाहि लाठीचा प्रसाद मिळाला. प्रक्षुब्ध सागरामध्ये पर्वतप्राय लाटा उफाळून खडकावर आदळाव्यात व तो अभेद्य प्रस्तर अचल असावा, तद्वत् धैर्यमेरु लालजींनी स्वतःची आघाडीची जागा न सोडतां तो मार सहन केला. परंतु मन तें मनच आणि त्यांतहि लालाजींसारख्या मानधन पुरुषसिंहाचें तें मन. या अपमानाचा त्यांच्या वीरमनावर असा कांही परिणाम झाला कीं, ते घरीं जाऊन अंथरुणावर जे पडले ते पडलेच. अखिल भारतवर्षांने त्या अमानुष हल्ल्याचा धिक्कार केला व लालाजींना दीर्घायुष्य लाभावें म्हणून प्रार्थना केल्या. पण मानभंग सहन न करणारे मानघन लालाजी दिवसें-दिवस मृत्यूकडे चालले होते. पारतंत्र्यांतील अपमानाचें जिणें त्यांना नकोसें झालें होतें. मृत्यूची निश्चितता जाणून लालजींनी अत्यंत गंभीरपणें पुढील उद्गार काढले : "माझ्या जर्जर शरिरावर बसलेला एक एक काठीचा वार ब्रिटिश साम्राज्याच्या नाशाला कारणीभूत होईल." आसन्नमरण पंजाब-केसरीची ही शेवटची आरोळी होती, कोसळणाऱ्या दुर्गाची ही कडाडी होती. ता. १७ नोव्हेंबर १९२८ चा दुर्दिन उजाडला. लाहोरला अलोट जनसंमर्द लालाजींच्या भुवनापुढे लोटला. लालाजी क्षणोक्षणीं विव्हळ होत होते. विव्हळणारा सिंह पंजा आपटीत होता. जनसंमर्दाच्या भावनाहि विव्हल होत होत्या. अस्तमान होणाऱ्या सूर्याला अर्घ्यदान देण्यास जनता चिंताकुल होती. इकडे सूर्यास्त झाला, तिकडे पंजाबसिंहाचें वीरोचित प्राणोत्क्रमण झालें. हिंदभूमीच्या कंठहारांतील एक तेजस्वी रत्न गळालें !

● ● ●

वि श्व वं द्य

# महात्मा मोहनदास करमचंद गांधी

( १८६९-१९४८ )

जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।

—संत तुकाराम

## भारतीय संस्कृतीचें अमृतफळ

विश्ववंद्य महात्मा गांधी अखिल जगांत मन्वंतर घडविणारी महान् विभूति होती. म. गांधींचें जीवन विश्व-इतिहासामधील एक अनुपेक्षणीय भाग आहे. ते सत्याच्या प्रयोगाने व अहिंसेच्या अनुष्ठानाने भारतीय राष्ट्राच्या उद्धाराबरोबरच अखिल मानवजातीसाठी नवें सत्ययुग निर्माण करीत होते. ते भारताचेंच नव्हे तर अखिल विश्वाचें आशाकेंद्र होते. स्वतःच्या पवित्र, निष्कलंक आणि थोर चारित्र्याच्या नैतिक बळाने कोट्यवधि लोकांवर निर्हेतुक व सात्त्विक सत्ता गाजविणारी म. गांधींसारखी अन्य विभूति जगाच्या इतिहासांत



आढळत नाही. ना. गोखल्यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, "म. गांधी ऋषिप्रणीत भारतीय संस्कृतीचें अमृतफळ होतें." म. गांधींचें जीवन जीवात्म्याचा महात्मा होण्याचा उदात्त व सात्त्विक संग्राम आहे. सामान्य जनांना म. गांधींचें चरित्र स्फूर्तीचा झरा व आशेचा तारा आहे. या जीवनदायी विशुद्ध झऱ्याचे जल स्वोद्धारार्थ प्राशन करूं या. या पावनकारी ताऱ्याचें जन्मसार्थक्यास्तव दर्शन घेऊं या.

## पावन तें कुळ पावन तें धाम

महात्मा गांधींचा जन्म सुंदर सौराष्ट्रांत, पुराणप्रसिद्ध सुदामपुरीला ( पोरबंदरला ) १८६९ च्या ऑक्टोबरच्या २ तारखेस झाला. धन्य तें स्थळ, धन्य तो दिन व धन्य तें राष्ट्र! ज्या सुदामपुरीला भक्त सुदाम्यानें आपल्या निष्काम भक्तीने पावन केलें; ज्या सुदामपुरीला भगवान श्रीकृष्णांच्या चरणरजांचा स्पर्श झाला; त्याच सुदामपुरींत म. गांधी जन्म घेतात, आधुनिक दरिद्रीनारायण अवतार घेतो, हा योगायोग अपूर्व नव्हे का? म. गांधींचे वडील करमचंद गांधी हे अत्यंत पापभीरु व सत्यनिष्ठ गृहस्थ होते. स्वाभिमानाची ते केवळ मूर्तीच होते. ते वैष्णवपंथी होते. वडील असे स्वाभिमानी भक्त होते, तर आई केवळ धर्ममूर्ति होती. त्यांच्या मातोश्रींचें शुभनांव पुतळीबाई होतें. खरोखरच ती पुण्याची व पावित्र्याची पुतळी होती. ती मोठी व्रतस्थ बाई होती. अशा सत्यनिष्ठ, पवित्र व व्रती आईबापांच्या पोटीं महात्माजी आले. अमृतवेलीला अमृतफळ लागलें, शिवपार्वतीच्या पोटीं संकट-विमोचक गणराय जन्मले.

## सत्यनिष्ठ विद्यार्थी

बाल मोहनदास वयाच्या सातव्या वर्षी राजकोट येथील प्राथमिक शाळेंत दाखल झाले. विद्यार्थिदशेंत प्रतिभासंपन्न विद्यार्थी म्हणून ते इतरांच्या डोळ्यांत भरले नाहीत. ते फार लाजाळू विद्यार्थी होते. हायस्कूल-मध्ये असतांनादेखील ते फारसे इतरांत मिसळत नसत. अभ्यास बरा कीं आपण बरे. घंटी वाजतांच शाळेला जात व शाळा सुटतांच बाणासारखे सरळ घरीं येत. अशाहि स्थितींत त्यांचे सद्‌गुण निदर्शनास आले. एकदा साहेबांनी शुद्धलेखन सांगितलें. पोटार्थी शिक्षकाला वाटलें कीं,

जास्त विद्यार्थी चुकले तर त्याची बढती खुंटेल, म्हणून त्याने विद्यार्थी मोहनदास गांधीला नक्कल करण्यास खुणाविलें. वर्गातील इतर मुलें बरोबर होतीं. परंतु मोहनदास पडला सत्यनिष्ठ. तो नक्कल कांही करीना. तोच चुकला व अध्यापकाच्या अकारण रोषाला बळी पडला. मुलाचे पाय पाळण्यांत दिसले. मोहनदास बुद्धिमान् नव्हते, पण व्यवस्थित व अभ्यासी होते. जात्याच स्वाभिमानी असल्यामुळे अध्यापकाचीं बोलणीं खसूं नयेत म्हणून ते फार जपत. अशाहि स्थितींत त्यांना दोन वेळां शिक्षा भोगावी लागली. शिक्षा मिळाल्याबद्दल त्यांना वाईट वाटलें नाही, पण शिक्षेला पात्र झाल्यावद्दल त्यांना रडूं कोसळलें. त्यांनी स्वोद्धार करण्याची भीष्मप्रतिज्ञा केली, निर्दोष होण्याचा विडा उचलला.

## ग्रंथासारखा गुरु नाहीं

विद्यार्थी मोहनदासाने जीवनशुद्धि करण्याचा दृढ निश्चय केला. पण गुरु कोण, मार्गदर्शक कोण? तो गुरु सदान् कदा मार्गदर्शन करील का? सत्याच्या शोधांत निघालेल्या मोहनदासापुढे हा प्रश्न दत्त म्हणून उभा राहिला. झालें, मोहनदासाने ठरविलें कीं, ग्रंथासारखा गुरु नाहीं व मित्र नाहीं. मित्र आपल्यावर रुसतो, फुगतो, आपली निरर्थक स्तुति करतो, चुकून निंदा करतो. मित्राला मन आहे व त्याचें चांचल्य न आवरणारें आहे. शिवाय मित्रसहवासाची शाश्वती किती व काय? ग्रंथाच्या बाबतींत ह्या अडचणीच उद्भवत नाहीत म्हणून रामायणांतील 'श्रावणचरित्र' व महाभारतांतील 'हरिश्चंद्रचरित्र' मोहनदासांनी आपले मार्गदर्शक गुरु निश्चित केले. श्रावण व हरिश्चन्द्राच्या जीवनखंडावर आधारलेलीं दोन नाटकें त्यांना मिळालीं. मोहनदास त्या नाटकांचें पुन: पुन: वाचन करी. नाटक हें दृश्य काव्य आहे. भावनांचें दृढीकरण व शुद्धीकरण नाट्याद्वारें त्वरित होतें. मोहनदासाच्या संस्कारसुलभ युवक मनावर त्याचा इष्ट तोच परिणाम झाला. श्रावणाच्या आईबापांचा आक्रोश ते कधीहि विसरले नाहीत. 'तूं श्रावणाप्रमाणे हो' असें त्यांचें मन त्यांना सांगे. मनांत तळमळ निर्माण झाली. तीच गोष्ट हरिश्चंद्र नाटकाची. हरिश्चंद्राप्रमाणे सर्वांनी सत्यनिष्ठ कां बरें

होऊं नये, असें त्यांच्या मनांत वारंवार येई. हरिश्चंद्राला सत्यासाठी किती आपत्ति सोसाव्या लागल्या ! तें नाटक वाचतांना मोहनदास टप टप अश्रु गाळीत. आणि तो भक्त प्रह्लाद, लहान पोर पण परमेश्वराचा व सत्याचा केवढा भक्त ! त्याला उकळत्या तेलांत टाकलें, कडेलोट केला पण भक्ति व सत्य सोडीना. प्रह्लादानेहि मोहनदासाच्या मानसिक विकासाला अपार मदत केली. हे होते महात्माजींचे आदर्श. त्यांचा मनःपिंड या आदर्शांवर पोसला गेला. मोहनदासाचा महात्मा का उगाच होतो ? महात्माजींचें जीवन म्हणजे पराकाष्ठेचा प्रयत्न. प्रयत्नाने मनुष्य किती उंच जाऊं शकतो याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे महात्माजी.

## आत्महत्येचा अयशस्वी प्रयत्न

'युवाः स्खलनशीलाः ।' 'तरुणांच्या हातून चुका स्वाभाविकपणेंच होतात.' या न्यायाने तरुण मोहनदास चुके, पथभ्रष्ट होई, कुसंगतीच्या मोहजालांत अडके. हायस्कूलमध्ये असतांनाच मोहनदास बिडी पिणें, मांसाहार करणें, लहानसहान चोरी करणें इत्यादि सर्वसामान्य दुर्गुणांना कुसंगतीच्या भोवऱ्यांत गुरफटून बळी पडे. एकदा तर व्यसनापायीं त्यांना कर्ज झालें. तें कर्ज फेडण्यासाठी त्यांना हातांतील सोन्याचें कडें तोडावें लागलें. पण ते लवकरच पश्चात्तापदग्ध झाले. आत्महत्या करण्याच्या विचाराने ते धोत्र्याच्या बिया घेऊन मंदिरांत गेले खरे, पण त्या दयासिंधु जगच्चालकाला हें पाहवलें नाही. त्या विश्वंभराला मोहनदासाच्या हातून महान् कार्य घडवून आणावयाचें होतें. जगताला दिव्य संदेश द्यावयाचा होता. प्रभूची लीला अगाध आहे ! बिया न खातां प्रभुदर्शन घेऊन मोहनदास तडक घरीं गेले. जणूं पश्चात्तापाग्नींतून सुवर्ण सतेज होऊन बाहेर पडलें.

## जीवनक्रांति

झालेला प्रकार वडिलांना समक्ष सांगण्याचें धैर्य त्यांना होईना म्हणून त्यांनी त्यांना अशी चिठ्ठी लिहिली : 'मी असें पाप न करण्याची प्रतिज्ञा करतों, पण झालें त्याबद्दल मला शिक्षा करा.' कापऱ्या हाताने त्यांनी ती चिठ्ठी वडिलांना दिली. पितृहृदय तें पितृहृदय ! वडिलांच्या डोळ्यांतून अश्रूंची धार वाहूं लागली. मोहनदासाच्या हृदयांत परिवर्तन घडलें.

प्रेमाचा व अहिंसेचा संदेश मिळाला. इतरांचा हृदयपालट प्रेमाने करतां येईल, जगाचा उद्धार प्रेमानेच होईल असें आता त्यांना वाटूं लागलें. आपलें प्रेम जर विश्वव्यापी झालें तर त्याचा इष्ट तो परिणामहि विश्वव्यापी होईल अशी त्यांची खात्री झाली. वरील अत्यंत सामान्य प्रसंगाने त्यांच्या जीवनांत क्रांति होऊन सत्य-अहिंसेचें बीजारोपण झालें. रामपादस्पर्शाने शिळेंतून अहिल्येचा उद्धार व्हावा, तद्वत् पितृप्रेमाच्या त्या क्षमामय गंगोत्रींतून मोहनदासांच्या जीवनांत अहिंसामय प्रेमगंगेचा उगम झाला. पुढे तिचा प्रवाह कसा वाढला व त्याने त्यांचें जीवन कसें पावनतम झालें हेंच आपणांस अभ्यासावयाचें आहे.

### विलायतेंत विद्यार्जन

मोहनदास सोळा वर्षांचे होतांच विवाहबद्ध झाले. त्यांच्या सहधर्मचारिणीचें शुभनांव कस्तुरबा. त्या करारी व निर्भय होत्या. खुद्द तरुणासारखे तरुण मोहनदास अंधाराला भीत, पण कस्तुरबा पतीला आपल्या निर्भयतेने लाजवीत. अंधकारभीरु मोहनदासाला दिव्य ज्योति करण्यांत त्यांचा भाग आहे. निःसंशय भाग आहे. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होतांच मोहनदासाने विलायतेला बॅरिस्टर होण्यास जावें अशी इच्छा त्यांच्या एका नातलगाने प्रदर्शित केली. कस्तुरबाला ती आवडली. तिने पतीला उत्तेजन दिलें—नवविवाहित युवतीने उत्तेजन दिलें. प्रेमळ मातेला—पुतळीबाईला—हें आवडलें नाही. माझा मुलगा धर्मभ्रष्ट होईल अशी तिची साधार समजूत होती. भवति न भवति होऊन, " मद्य, मांस व परस्त्री यांना मी स्पर्श करणार नाही " अशी मोहनदासाने देवाभावाने प्रतिज्ञा केली व पुतळीमाता निश्चित झाली. उच्चाराइतका आचार सुलभ असता तर काय चमत्कार झाला असता ! अथवा चमत्कारच नष्ट झाला असता ! सामान्य व असामान्य यांतील भेद गेला असता. सर्वच महात्मे झाले असते. युवक मोहनदासाने या प्रतिज्ञेचें शक्य तोंवर पालन केलें. ते क्षणिक बळी पडले ते बाह्याचारांना, वेषभूषेला व केशभूषेला. इंग्रजांच्या तथाकथित सभ्यतेला. विलायतेच्या रंगेल व भोगवादी वातावरणांत त्यांना सर एड्विन आर्नोल्डच्या भगवद्गीतेच्या इंग्रजी अनुवादाने व येशू ख्रिस्ताच्या ' बायबलाने ' सावरून धरलें असें त्यांनी नमूद करून ठेवलें आहे.

## विरक्त बॅरिस्टर

बॅरिस्टर होऊन १८९१ मध्ये मोहनदास भारताला परतले. मुंबईलाच वकिली थाटली, पण प्राप्ति यथातथाच होई. कमाईपेक्षा गमाईच जास्त असे. किती दिवस हें निभणार ? अखेर मुंबईला रामराम ठोकून ते राजकोटला गेले. तेथे त्यांचा धंदा कसाबसा चालला. परमेश्वरी इच्छा वेगळी होती. स्वार्थ साधण्यांत, असत्याची तरफदारी करण्यांत व अन्यायाचें समर्थन करण्यामध्ये ही महान् व्यक्ति रममाण व्हावी असें त्या परमपित्याला कसें बरें वाटेल? खरें पाहिलें तर हा धंदा सत्यनिष्ठ व सत्यवादी गांधींच्या मनःपिंडाच्या विरुद्ध होता. त्यांचें मन धंद्यांत रमेना. त्यांना कशाची तरी हुरहूर लागली, तगमग लागली.

## आफ्रिकेंतील अहिंसक सेनापति

पोरबंदरला ' दादा अब्दुल्ला आणि कंपनी ' होती. तिची एक शाखा आफ्रिकेंत दर्बानला होती. या कंपनीचे वकील म्हणून बॅ. मोहनदास गांधी आफ्रिकेला गेले, केवळ स्वार्थ साधण्यासाठी गेले. ' पण देवाची करणी आणि नारळांत पाणी ', स्वार्थातून परमार्थ उदय पावला. स्वाभिमानी बॅ. मोहनदास गांधी काठेवाडी पगडी बांधून दर्बानच्या कोर्टांत गेले. मॅजिस्ट्रेटने पगडी काढण्याची आज्ञा केली. गांधींनी ती नाकारली व कोर्टातून ते बाहेर पडले. हा बॅ मोहनदासांचा अपमान नसून हिंदी लोकांचा अपमान होता. हिंदराष्ट्राची अवहेलना होती. गांधीजींच्या अपमानाच्या जखमेवर अनेक वेळा मीठ चोळण्यांत आलें. त्यांच्यावर प्राणांतिक हल्ले झाले. हें सर्व गोऱ्या कातडीच्या मस्तवाल लोकांकडून झालें. हिंदी लोकांना आगगाडीच्या पहिल्या, दुसऱ्या वर्गाने प्रवास करणें, इंग्रजांबरोबर टांग्यांत बसणें, हवेशीर घरें बांधणें,—सर्वच कायद्यानुसार बंद होतें. इतकेंच नव्हे तर साधे माणुसकीचे हक्कहि हिरावून घेतले गेले होते. ट्रान्सवालमध्ये हिंदी इसमाला प्रवेश-फी म्हणून तीन पौंड द्यावे लागत व नाताळच्या सरकारने नवीन कायदा पास करून हिंदी प्रजाजनांना तेथे राहणें दुरापास्त केलें. या अन्यायाचें पारिपत्य कोण करणार ? निःशस्त्र हिंदी प्रजाजनांना माणुसकीचे हक्क कोण मिळवून देणार ? सर्वांचें आशाकेंद्र स्वाभिमानी बॅ. गांधी बनले. सर्वांनी

त्यांच्या नेतृत्वाची अपेक्षा केली. " पांचांमुखीं परमेश्वर " ही म्हण सत्य ठरली. जनताजनार्दनाच्या आर्त हांकेला बॅ. गांधींनी सविनय होकार दिला व त्यांनी १८९४ च्या मे महिन्यांत 'नाताळ इंडियन कॉंग्रेस' स्थापन केली. हेतु हा कीं, तिच्यातर्फे संघटित, सनदशीर कार्य करतां येईल. या वेळीं बॅ. गांधी केवळ पंचवीस वर्षांचे अननुभवी तरुण होते. पण ' केल्याने होत आहे रे आधी केलेंचि पाहिजे ' ही म्हण त्यांना उमजली होती. तेव्हा-पासून आफ्रिकेंतील प्रतिकार सुरू झाला. या प्रतिकाराचें निःशस्त्र लढ्यांत रूपान्तर झालें. मोहनदास गांधींनी आयुष्याचीं एकवीस वर्षें त्यांत वेचलीं. याच दीर्घ काळांत सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान विकसित झालें. सत्याग्रहाचे मंत्र व तंत्र आकारास आलें. गांधीजींनी सहकाऱ्यांस व अनुयायांस संयम उपदेशिला व सत्याची कास धरावयास लावली. अहिंसेच्या नैष्ठिक पालनास आद्य स्थान देण्यांत आलें. आपले दोष व चुका उघडपणें स्वीकारावयाच्या व युरोपियनांना स्वाभिमान न सोडतां सहकार्य द्यावयाचें. आपल्या त्यागाने व तपश्चर्येने विरोधकाचें हृदय-परिवर्तन घडवून आणावयाचें, असा त्यांचा कटाक्ष होता. जगानें सिकंदर, नेपोलियन, हिटलरसारखे हिंसाश्रयी सेनानी पाहिले, पण हा अहिंसेचा अभिनव सेनापति पाहण्याचेंहि त्याच्या नशिबीं आलें. " Truth is stranger than Fiction. " " वस्तुस्थिति कल्पितापेक्षाहि जास्त चमत्कृतिजन्य आहे " हें प्रत्ययास आलें. अल्पावधींतच बॅ. गांधींनी लोकजागृतीचें हमखास साधन म्हणून ' ब्रिटिश इंडियन ओपिनियन ' नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें व ' ट्रान्सवाल इंडियन असोसिएशन ' स्थापन केली. वरील वर्तमानपत्रांतून ते हिंदी प्रजाजनांच्या हक्कांची मागणी व बिनतोड तरफदारी करीत. वरील तिन्ही संस्थांतर्फे त्यांनी अर्ज, विनंत्या व शिष्टमंडळें आदि सनदशीर चळवळीचे मार्ग चोखाळले. शिष्टमंडळाचे प्रमुख म्हणून त्यांनी दोन वेळां लंडनच्या वाऱ्या केल्या पण दगडाला पाझर फुटेना.

### तीनदा कारागृहवास

अर्ज-विनंत्यांचा मार्ग सफल होत नाहीं हें अनुभवून त्यांनी १९०७ व १९१३ मध्ये सत्याग्रहाचा मार्ग उपदेशिला. वरील दोन्ही प्रसंगीं त्यांना

तीनदा कारागृहवास घडला. त्यांनी योगयुक्त चित्ताने तो भोगला. आफ्रिकन सरकारला गांधींच्या अहिंसेच्या बळाची अटकळ होईना. त्याला वाटे, सेनापति पडला कीं लढाई जिंकली. पण ही आहे हिंसात्मक युद्धाची दुर्बळता. सत्याग्रहांत ना सेनापति ना सैनिक. सारेच स्वयंसेवक. मग मोहनदासांच्या अटकेने तो कसा अडणार ? पर्वतराजीवरून पडणारा झरा धो धो करीत पुढे जातो त्याप्रमाणे मोहनदासांच्या पाठीमागे जवळ जवळ ३००० हिंदी स्त्री-पुरुषांनी सत्याग्रहांत भाग घेतला. सरकारच्या तोंडचें पाणी पळालें व १९०८ मध्ये एक सन्माननीय समेट झाला. सत्याग्रह यशस्वी झाला. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी रहिवाशांना बरेचसे हक्क मिळाले.

## गुणी गुणं वेत्ति

भारतसरकारचे प्रतिनिधि म्हणून नामदार गोपाळ कृष्ण गोखले १९०८ मध्ये दक्षिण आफ्रिकेंत गेले होते. त्यांनी गांधीप्रणीत सत्याग्रहाचें व एकंदर परिस्थितीचें सम्यक् अवलोकन केलें. ना. गोखले पडले रत्न-पारखी. त्यांनी मोहनदास गांधीरूपी रत्नाची तात्काळ परीक्षा केली. " गुणी गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुण: " हें खरें. परस्परांचीं मनें जुळलीं, अंत:करणें मिळालीं. दोघेहि एकाच मन:प्रवृत्तीचे. परिचयाचें पर्यवसान गाढ मैत्रींत झालें. सज्जनाबरोबर सात पावलें चाललें असतां सुमैत्री संपादतां येते हें कांही खोटें नाही. नामदार गोखल्यांनी मोहनदासांना भारतास परत जाऊन सार्वजनिक कार्यांत त्यांचा सहकारी होण्याची विनंती केली. बॅ. गांधींनीहि होकार दिला.

## आफ्रिकेच्या आर्त हांकेला पुन्हा ओ

आफ्रिकेंतील संसार गुंडाळून ते मुंबईला येऊन राहिले न राहिले तोंच तार येऊन धडकली कीं, पुन्हा आफ्रिकेंत या. आफ्रिकेच्या सरकारने वचनभंग केला व करार मोडला. बॅ. मोहनदासांना आफ्रिकेच्या हिंदी लोकांना दिलेलें वचन मोडवेना. 'रघुकुलरीत यही चली आयी, प्राण जाय परि वचन न जाई' एकवचनी मोहनदास तडक आफ्रिकेला जावयास निघाले भगवान् विष्णु नक्रग्रस्त गजेंद्राच्या मुक्ततेसाठी धावून गेले.

## आदर्श कैदी

पुन्हा सत्याग्रह, पुन्हा तुरुंगवास, सक्तमजुरीचा कारागृहवास. ते आदर्श कैदी होते. आपल्या तपस्येने, हालअपेष्टांनी विरोधकांच्या मनामध्ये ते परिवर्तन घडवून आणीत. ते खडी फोडीत. हातांतून रक्त वाही, पण काम सोडीतना. कारागृहांत त्यांनी नीचतम लेखलेलें भंगी-कामहि स्वेच्छेने केलें. अशी सात्त्विक तपस्या हा थोर सत्याग्रही करीत होता.

## सत्याग्रह यशस्वी होतो

हजारांनी स्वयंसेवक व कामगार तुरुंगांत गेले, गोळीबार झाले, लाठीहल्ले सहन केले, पण अखेर विजय सत्याचा झाला. चौकशीमंडळ नेमलें गेलें व हिंदी लोकांना हक्क प्राप्त झाले. हिंडण्या–फिरण्याचें, व्यापारा-उदीमाचें, लग्नविधीचें स्वातंत्र्य त्यांना मिळालें. सत्याग्रहाचा–निःशस्त्र-प्रतिकाराचा–तो अपूर्व विजय होता. विश्वाच्या ज्ञात इतिहासांत एक नवीन पान सुवर्णाक्षरांनी लिहिलें गेलें. गांधीजींच्या पवित्र व प्रभावी व्यक्तित्वाची साक्ष जगाला पटली. अहिंसेचा प्रणेता उदयाचलावर आला.

## मायभूमीस आगमन

आफ्रिकेंतील अवतारकृत्य संपवून, विजयी सत्याग्रही-सेनापति बॅ. मोहनदास गांधी मातृभूमीला परतले. परदेशांत पराक्रम करून भारतमातेचा सुपुत्र स्वगृहीं आला. भारतमातेचा आनंद गगनांत मावेना.

मृत्युशय्येवर पडलेल्या ना. गोखल्यांनी गांधींच्या भेटीची इच्छा दर्शवितांच ते धावून पुण्याला गेले. गोखले कळवळून म्हणाले, ‘ तुम्हीं भारतसेवक समाजास येऊन मिळावें, असें मला मनापासून वाटतें. परंतु तुम्ही देशपरिस्थितीचें निरीक्षण करा, मतें बनवा न मग योग्य वाटेल तें करा. ’ गांधींना ही सल्ला पटली. ते देशभ्रमणास निघाले.

## गुरुदेव व गांधीजी

गांधीजी शांति-निकेतनचें निरीक्षण करावयास गेले. त्यांना कांही दिवस गुरुदेव रवींद्रनाथ ठाकुरांचा सहवास लाभला. दोघेहि अध्यात्मवादी पण त्यांच्या साधनांत कोण भेद ! रवींद्रांना सौंदर्यांत सत्यदर्शन होई, कलेच्या आविष्कारांत परमेश्वर आढळे. उलट गांधींना रंजलेल्यांची सेवा

हीच ईशभक्ति वाटे, सत्यांत सौंदर्य-दर्शन घडे. रवीन्द्र सौंदर्यांत, कलेंत सत्य व जीवन ओतीत, तर गांधीजी जीवनांत सौंदर्य व सत्य भरीत. रवीन्द्र गूढ कलावादी, तर गांधीजी जीवनकलाकार. दोघांचा समागम म्हणजे सत्यसौंदर्यांचें मीलन. अशा रीतीने शांतिनिकेतनमध्ये त्यांचा कांही काळ चिंतनांत गेला. तोंच ना. गोखल्यांच्या अकल्पित व दुःखद निधनाची तार त्यांना आली. ते तात्काळ पुण्याला गेले. गोखल्यांच्या नेतृत्वाखाली देशसेवा करण्याची त्यांची इच्छा अतृप्तच राहिली. अल्पावधींतच ते गुरुकुल कांगडीला गेले. तेथील सूत्रधार म्हणजे स्वामी श्रद्धानंद. दोन संन्यासी एकत्र आले. दोघांनीहि गृहस्थाश्रमांत राहून ब्रह्मचर्यपालनाचें व्रत घेतलें होतें. दोघेहि कर्मफलसंन्यासीच होते. गुरुकुल कांगडीच्या शुद्ध भारतीय व साध्या वातावरणांत गांधीजी तन्मय झाले. कस्तुरबा, जिने गांधीजींच्या जीवनांत कस्तुरीचा सुगंध दरवळला. ती वहिणीप्रमाणे त्यांच्याशीं व्यवहार करी. विद्यार्थ्यांना त्यांच्याविषयीं आदर वाटला. स्वयंप्रकाशी गांधी तेथे चिरवास करणें शक्य नव्हतें.

## साबरमती आश्रमाची स्थापना

आता त्यांना कोठे तरी आश्रम स्थापून स्वकार्यरत होण्याची मनीषा झाली. इच्छेची पूर्ति धावत आली. दधीचि ऋषीच्या आत्मबलिदानाने पुनीत झालेली साबरमतीच्या तीरावरील एक जागा आश्रमासाठी निवडली. ती जागा तुरुंग व स्मशान यांच्या मधोमध आहे. सत्यासाठी तुरुंगवास व जनतेच्या सेवेसाठीं आत्मार्पण करावें लागेल असा मूक संदेश त्या स्थळीं मिळे. आश्रमांत शरीरश्रमाला प्राधान्य असे. उच्चनीच भेद नसे. सर्व मिळून सर्व कामें करीत. साधी राहाणी व उच्च विचारसरणी असे. अनेकांना आश्चर्य वाटलें कीं, बॅरिस्टर गांधी किती साधे व परिश्रमी आहेत. लोकसेवा हा गांधींचा धर्म होता.

## 'महात्मा' होतात

१९१५ मध्ये हरिद्वार येथे कुंभमेळा भरला. लाखांनी यात्रेकरू जमले. त्यांची सेवा करण्यास बॅरिस्टर मोहनदास गांधी गेले. ते एका स्वयंसेवकपथकाचे प्रमुख होते. त्यांनी आजाऱ्यांची शुश्रूषा केली, रस्ते

झाडले व मळ साफ केला. त्यांची सेवावृत्ति पाहून सर्व थक्क झाले. त्यांतहि त्यांची आत्मविस्मृति लक्षून सर्वांना आश्चर्य वाटे. हरिद्वारजवळ असलेल्या पूर्वपरिचित गुरुकुल कांगडीमधील अध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी गांधींचें शानदार हार्दिक स्वागत केले व त्यांना मानपत्र अर्पण केलें. या मानपत्रांत त्यांना " महात्मा मोहनदास गांधी " म्हणून गौरविलें होतें. योगायोग असा कीं, याच सुमारास गुरुदेव रवीन्द्रनाथ ठाकुरांकडून गांधींना एक अभिनंदनपर पत्र आलें. त्यांतहि " महात्मा " या विशेषणाचा प्रयोग करण्यांत आला होता. एवम्, अनभिज्ञ बाळांनी स्वयंस्फूर्तीने दिलेलें विशेषण रवीन्द्रनाथांचें ठरावें ही अपूर्वता होय अर्थात् गांधीजींची महात्मता आबालवृद्धांना संमत होती हें सिद्ध झालें. गांधीजी " महात्मा गांधी" झाले. त्यांचें हेंच नांव भारतांतील आबालवृद्धांच्या ओठांवर नाचतें. याच नांवाने ते अजरामर ठरले.

## चंपारण्यांतील चमत्कार

म गांधी १९१६ मध्ये लखनौ काँग्रेसला गेले. तेथे त्यांना बिहारच्या प्रतिनिधींनी चंपारण्यांत युरोपियन जमीनदारांकडून हिंदी शेतकऱ्यांवर कसे अनन्वित जुलूम होतात हें डोळ्यांत पाणी आणून सांगितलें. म. गांधी विरघळले व त्यांनी शेतकऱ्यांची बाजू जातीने घेण्याचें आश्वासन दिलें. म. गांधींचें आश्वासन म्हणजे साक्षात् मनमोहन श्रीकृष्णाचें गोपाळांना आश्वासन. म. गांधी तडक बिहारमध्ये गेले. चपारण्यांत खेडोपाडीं हिंडले. पायीं प्रचार केला. सरकारने त्यांच्यावर भाषणबंदीचा व स्थानबद्धतेचा हुकूम बजावला. पण म. गांधींच्या दैवी प्रभावामुळे चंपारण्यांतील अडाणी व पददलित शेतकऱ्यांत असें चैतन्य भरलें कीं, सरकारला तो हुकूम मागे घ्यावा लागला व शेतकऱ्यांवरील ज्यूट पिकविण्याबद्दलचा जमीनदारांचा जुलूम नाहीसा झाला. म. गांधींचा हा भारतांतील पहिला विजय होय. बिहार हा गांधींचा प्रांत झाला. म. गांधींचें नांव अखिल भारतांत गाजलें.

## मजुरांसाठी आमरण उपोषण

दरिद्रीनारायण गांधीजी आता अहमदाबादच्या मिलमजुरांच्या मदतीला धावून गेले. मिलमालक व मिलमजूर यांच्यांत वेतनाच्या मानासंबंधी बखेडा

झाला. मिलमजूर संपावर गेले. म. गांधींना पूर्णतया नाही तरी बऱ्याच अंशीं मजुरांची बाजू न्याय्य वाटली व त्यांनी मिलमालकांचें हृदयपरिवर्तन घडवून आणावें म्हणून आमरण उपोषण आरंभिलें. मिलमालक नमले व यशस्वी तडजोड झाली. म. गांधींना भांडवलदारांचे हस्तक म्हणणाऱ्यांनी ही गोष्ट लक्षांत घ्यावी कीं, त्यांचें पहिलें उपोषण मजुरांच्या भाकरीसाठी होतें. म. गांधींचें यश व लोकप्रियता वर्षानुवर्षें वाढतच होती. चंद्राला वृद्धिक्षय आहे, पण म. गांधींच्या यशाला नाही.

## सरकारला खेडा जिल्ह्यांत खडे चारले

गुजराथ प्रांतांतील खेडा जिल्ह्यांत अवर्षण झालें. नापिकीमुळे शेतकरी व जनता हवालदिल झाली. सरकारी यंत्राची गति फार मंद. चुकीची आणेवारी दिल्यामुळे सरकार सारामाफी जाहीर करीना. तेथील शेतकरी म. गांधींपाशीं मदतीची याचना करावयास आले. भक्तांच्या हाकेला देव धावून जाणार नाही का? म. गांधींनी सरकारला विनंती केली कीं, सारावसुली तहकूब करा. सरकार पडलें अडेलतट्टू. तेव्हा गांधींनी करबंदीचें महान् अस्त्र परजलें. सरकार नमलें. गुजराथच्या शेतकऱ्यांत प्रतिकाराचें सामर्थ्य निर्माण झालें. म. गांधींच्या शक्तीचा भारतवासीयांना पुन्हा प्रत्यय आला. म. गांधी सामान्य जनतेचे 'तारणहार' पाठीराखे झाले.

## सरकारशीं सहकार्य

म. गांधींचा इंग्रज सरकारच्या न्यायबुद्धीवर १९२० पर्यंत विश्वास होता. या बाबतींत त्यांचें मवाळांशीं साम्य होतें. जेव्हा जेव्हा ब्रिटिश सरकार महायुद्धाच्या अडचणींत वा संकटांत सांपडे तेव्हा तेव्हा म. गांधी त्याच्या मदतीसाठी बिनशर्त धावून जात. आफ्रिकेंत असतांना १८९८-९९ च्या दोन्ही बोअर-युद्धांत म. गांधींनी शुश्रूषापथकाचे प्रमुख म्हणून उल्लेखनीय काम केलें. तसेंच १९१५ सालीं पहिल्या महायुद्धाच्या वेळीं ते गुजरातमध्ये गावोगावीं हिंडले व जनतेला इंग्रज सरकारच्या सैन्यांत दाखल होण्याचा संदेश दिला. म. गांधी हे यशस्वी Recruiting Officer ठरले. त्यांना त्याबद्दल कैसर-ई-हिंद हें सुवर्णपदक सरकारने बहाल केलें. म. गांधींच्या कार्याचीं स्वरूपें अनंत आहेत, विविध आहेत. जेव्हा, जशी, जेथे समाज-

सेवा करतां येईल ती करायची, निर्भयपणें करायची हें त्यांचें ब्रीद. निंदा व स्तुति त्यांना सारखीच होती. अशा स्थितप्रज्ञाला जनतेने डोक्यावर घेतलें तर त्यांत चुकलें कोठे ?

**काँग्रेसचे कर्णधार**

म. गांधी पहिल्या प्रथम १९११ च्या कलकत्ता काँग्रेसला प्रेक्षक म्हणून हजर राहिले. त्या वेळीं त्यांनी साफसफाईचें काम स्वेच्छेने केलें. ह्या बॅरिस्टर स्वयंसेवकाला पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. पण हा सर्वसामान्य स्वयंसेवक बरोबर ९ वर्षांनंतर याच अखिल भारतीय राष्ट्रसभेचा कर्तुम-कर्तुमन्यथाकर्तुम् युगनिर्माता नेता होईल असें कोणाच्याहि स्वप्नांत आलें नाही; पण ईश्वरी लीला अगाध आहे. खुद्द म. गांधींनादेखील त्यांच्या भावी मोठेपणाची किंचित्देखील कल्पना नसेल. नंतर १९१६ च्या लखनौ काँग्रेसला ते गुजराथचे एक सामान्य प्रतिनिधि म्हणून उपस्थित राहिले. १९१९ मध्ये त्यांनी जालियनवालाबागेमध्ये झालेल्या अमानुष अत्याचाराविरुद्ध सत्याग्रहाचें शिंग फुकलें. सारा देश हादरला व म. गांधींच्या अहिंसक नेतृत्वाचा उदय झाला. परंतु १९१९ मध्ये अमृतसर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत गांधींच्या मॉंटफोर्ड सुधारणांसंबंधीच्या धोरणास बहुमताचें पाठबळ मिळालें नाही. परंतु पुढील चार महिन्यांतच म. गांधींच्या इंग्रजांसंबंधीच्या धोरणांत क्रांति झाली. त्यांचा इंग्रजांच्या न्यायबुद्धीवरील विश्वास उडाला. इंग्रजी सत्ता सैतानी ठरली. मुसलमान बंधूंच्या मनांत खिलाफतीच्या चळवळीमुळे इंग्रजांविषयी आत्यंतिक असंतोष निर्माण झाला होता. म. गांधींना तो न्याय्य वाटला. त्यांनी मुसलमानांना साहाय्य देण्याचें ठरविलें. इतक्यांत लो. टिळक स्वर्गवासी झाले. थोड्याच दिवसांपूर्वी लो. टिळकांनी म. गांधींच्या सत्याग्रहाची मुक्त कंठाने स्तुति केली होती. देशाला धडाडीच्या पुढाऱ्याची आवश्यकता होती. म. गांधींनी लो. टिळकांची जागा उत्कृष्टपणें भरून काढली. एवम्, म. गांधींना अखिल भारताचें नेतृत्व प्राप्त झालें.

**गांधीयुग**

१९२० च्या ऑगस्टपासून गांधीयुगाचा प्रारंभ झाला. या गांधीयुगांतूनच स्वातंत्र्ययुग निर्माण झालें. ती हकीकत मोठी रोमांचकारी आहे.

कलकत्याला भरलेल्या कॉंग्रेसच्या खास अधिवेशनांत म. गांधीप्रणीत असहयोगाचा कार्यक्रम प्रचंड बहुमताने पसार झाला म. गांधींच्या व्यक्तित्वाच्या प्रभावाने सर्व जुने पुढारी विरोध करण्यांत अपयशी ठरले. अपयशीच ठरले नाहीत, तर त्यांनी म. गांधींचें शिष्यत्व स्वीकारलें. सूर्योदय होतांच मी मी म्हणणारे मंगळ, शुक्र आदि तारे निष्प्रभ होतात कीं नाही, अगदी तसें झालें. असहयोग म्हणजे इंग्रज सरकारशीं कोणत्याहि प्रकारें सहकार्य न करणें, ( १ ) सरकारी शाळांवर बहिष्कार, ( २ ) पदव्यांचा त्याग, ( ३ ) वकिली सोडणें, ( ४ ) सरकारी नोकरी त्यागणें, ( ५ ) कौन्सिल-प्रवेश न करणें, ( ६ ) विलायती मालावर कडकडीत बहिष्कार टाकणें हे त्यांतील प्रमुख कार्यक्रम होते. १९२१ सालीं भारतवर्ष गदगद हालला. म. गांधींच्या आदेशाने सर्व देश कटिबद्ध झाला. लोक हजारांनी तुरुंगांत गेले. सरकार चिडलें व म. गांधींना १९२२ च्या डिसेंबरमध्ये बंदिस्त करण्यांत आलें.

**कठोर कारागृहवास**

इतिहासाची पुनरावृत्ति होते असें म्हणतात. १९०८ च्या लो. टिळकांच्या ऐतिहासिक खटल्याचें स्मरण करा व महात्माजींची कृश परंतु वज्रासमान दृढ मूर्ति मनश्चक्षूंसमोर आणा. त्यांची समुद्रसम प्रशान्त मुद्रा सर्वांना आश्चर्यचकित करून सोडी. म. गांधींनी राजद्रोहाचा गुन्हा कबूल केला व जास्तींत जास्त शिक्षेची मागणी केली. ते न्यायाधिशांना विनयपूर्वक म्हणाले कीं, " तुम्हांला जर माझा मार्ग सत्याचा वाटत असेल तर आपल्या जागेचा राजीनामा द्या. " इतिहासांत आरोपीने असे उद्‌गार काढल्याचें नमूद नाही. थोरांचें सर्वच थोर. न्यायाधिशाने न्याय दिला, " लो. टिळकांच्याप्रमाणे मी तुम्हांला सहा वर्षांची शिक्षा देतों. " महात्माजी म्हणाले. " लोकमान्यांच्या नांवाशीं माझा संबंध जोडला, हें माझें मोठें भाग्य ! " त्यांनी निर्विकारपणें एवढ्या दीर्घ शिक्षेचें स्वागत केलें. " दुःखेषु अनुद्विग्न मनः सुखेषु विगतः स्पृहः । " अशी त्यांची स्थितप्रज्ञावस्था होती. १९२३ मध्ये येरवड्याच्या तुरुंगांत अॅपेंडिसाइटिसच्या रोगाने त्यांना घायाळ केलें. ससून हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया झाली. त्यांचें जीवित धोक्यांत असल्यामुळे सरकारने त्यांची बिनशर्त मुक्तता केली. देशांत जिकडे तिकडे आनंद झाला.

## काँग्रेसचे अध्यक्ष

सर्वांचें लक्ष म. गांधींच्या नेतृत्वाकडे लागलें. त्या वेळीं देशांत दोन मत-प्रवाह होते. एक देशबंधु दास व मोतीलाल नेहरू यांचा कौन्सिल-प्रवेशवादी स्वराज्यपक्ष व दुसरा सरदार पटेल व राजगोपालाचारिअर यांचा कौन्सिल-प्रवेशविरोधी. म. गांधींनी सुवर्णमध्य साधला. काँग्रेसमधील दुही नाहीशी केली. त्यांनी दोन्ही कार्यक्रमांना परस्परपूरक केलें. स्वराज्यपक्षाला आशीर्वाद दिला, पण स्वतःला विधायक सेवेला वाहून घेतलें. १९२४ मध्ये बेळगांव येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचें अधिवेशन भरलें. म. गांधींनी फेरवादी व नाफेरवादी ह्या दोन्ही विचारप्रवाहांचें यथातथ्य विवेचन केलें. काँग्रेसने दोन्ही कार्यक्रम स्वीकारले. म. गांधींनी राष्ट्राने विधायक कार्यक्रमाद्वारें स्वावलंबनाचा मार्ग चोखाळावा असें कळकळीने उपदेशिलें. खेळीमेळीच्या वातावरणांत काँग्रेस संपली. या अधिवेशनाचें वैशिष्ट्य म्हणजे ठरलेल्या वेळीं कार्यक्रम पार पाडणें. Punctuality thy name is Gandhi.

## सर्वोदयसाधना

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याबरोबरच म. गांधी राष्ट्रउभारणीचें व त्यायोगें सर्वोदय-समाज स्थापन करण्याचें महनीय कार्य करीत होते. गांधीयुगापर्यंत सर्वांना वाटे कीं, स्वातंत्र्यप्राप्तीचें कार्य प्रामुख्याने विध्वंसक आहे, पण गांधींनी विनाशकतेला आळा घालून विधायकतेला अग्रस्थान दिलें. " स्वराज्य हें साधन. सर्वोदय समाजाची रचना हें साध्य. " असें त्यांनी अनेकदा जाहीर केलें. इंग्रज सरकाराबद्दल वाटणाऱ्या असंतोषाला त्यांनी विद्युत्-शक्तीप्रमाणे राबविलें. विध्वंसकता आसुरी असून विधायकता दैवी आहे, असें ते वारंवार म्हणत. त्यांना जगतीतलावर मानवाची सर्वांगीण उन्नति करावयाची होती. सर्व प्रकारचें शोषण, मग तें आर्थिक असो, बौद्धिक असो, धार्मिक असो अथवा राजकीय असो त्यांना नाहीसें करावयाचें होतें. त्यांच्या या साध्यसाधनेंत इंग्रजी सत्ता एक मोठी अडगळ होती, म्हणून त्यांनी तिच्या विरुद्ध लढा दिला. एका उदात्त हेतूने लढा दिला. याच सर्वोदय-समाजाच्या निर्मितीसाठी त्यांनी विधायक कार्यक्रम आखला.

## साध्य-साधनशुचिता

जसें साध्य तसें साधन; नव्हे साधनाचें दुसरें टोंक म्हणजे साध्य, अशी महात्मा गांधींची धारणा होती. साध्यसाधनांची अभेद्यता, शुचिता, मंगलता म्हणजे गांधीदर्शन. End justifies the means. ध्येयाच्या उदात्ततेने साधनाची मलिनता, अमंगलता व हिणकसता उजळा पावते, धकूं शकते, चालूं शकते असा आतापर्यंत सर्वांचा गैरसमज होता. नव्हे याच गैरसमजाला, अपसिद्धान्ताला तत्त्वाचा शेंदूर फासून देवत्व प्राप्त झालें होतें. म. गांधी या बाबतींत मूर्तिभंजक ठरले. ही जागतिक तात्त्विक विचारक्रांति व आचारक्रांति म. गांधींनी पुरस्कृत केली. म. गांधींचें हें जीवनसर्वस्व आहे; यांत गांधींचें खरें दर्शन आहे. वाईट कामांचा परिणाम चांगला होऊं शकेल का ? कडूलिंबाच्या झाडाला अमृतफळें लागतील का ? तांदुळांत मीठ टाकून साखर-भात खातां येईल का ? काल्यांच्या वेलीला पाणी देऊन द्राक्षांचे घोस मिळतील का ? असत्य बोलून सत्य स्थापन होईल का ? घाणीने स्वच्छता वाढेल का ? नाही, कदापि नाही. हेंच ना उत्तर ? म. गांधींनी हा सर्वसामान्य पण दिव्य संदेश जगताला दिला व याचसाठीं सर्वोदयसमाजाचें ध्येय आपणासमोर ठेवलें. तेव्हा या ध्येयाचें ओझरतें दर्शन घेऊं या.

## सर्वोदयाचें सिद्धान्तत्रय

सर्वोदयाचे तीन महान् सिद्धान्त आहेत : ( १ ) सर्वांच्या हितांतच आपलें हित आहे. ( २ ) सर्व सेवाकर्में सारखीं आहेत. वकील व शेतकरी यांचा दर्जा समान. सर्वांना आपआपल्या सेवाकर्माने उपजीविका करण्याचा हक्क आहे. ( ३ ) शेतकरी व हस्तश्रमाने जगणारा कामगार यांचें जीवन यथार्थ व नैसर्गिक आहे. या साध्याच्या साधनेसाठीं त्यांनी पुढील संस्था व चळवळी निर्माण केल्या : ( १ ) अखिल भारत चरखासंघ, ( २ ) ग्रामोद्योगसंघ, ( ३ ) हरिजन-सेवा-संघ. वरील सर्व कार्यक्रमांत श्रमाला प्राधान्य असून यंत्रप्रधान समाज-व्यवस्थेंत होणाऱ्या अर्थशोषणाला मुळांतच नाहींसें करण्याची व्यवस्था आहे. हरिजनसेवेंत व उद्धारांत सामाजिक व धार्मिक समानतेची प्रतिष्ठापना आहे. अशा चहुमुखी विधायक कार्यक्रमावर महात्मा

गांधींनी सक्रिय जोर दिला. १९२७ सालीं त्यांनी खादीप्रचारार्थ अखिल भारतांत दौरा काढला. एक वर्षभर ते अहोरात्र फिरत होते. गावोगावीं या महात्म्याच्या केवळ दर्शनार्थ अलोट जनसंमर्द लोटे. होतां होतां देशांत अपूर्व जागृति झाली.

## १९३० चा यशस्वी लढा

लाहोर कॉंग्रेसने स्वराज्यासाठी प्रत्यक्ष लढा पुकारला. या अहिंसात्मक लढ्याचें सेनापतिपद म. गांधींकडे आलें. म. गांधींनी सन्माननीय तडजोडीचे प्रयत्न केले पण व्यर्थ. शेवटीं मिठाचा कायदेभंग करावयास त्यांनी शंभर अनुयायांसह दांडीला कूच केलें. देश खडबडून जागा झाला. कायदे-भंगाच्या चळवळींत जवळ जवळ दीड लक्ष भारतीयांना तुरुंगवास घडला. दडपशाहीमुळे देशभक्तीची ज्वाला अधिकच भडके. शेवटीं १९३१ च्या मार्चमध्ये इंग्रज सरकारने हात टेकले व गांधी-इर्विन तात्पुरता तह झाला.

## कॉंग्रेसचे एकमेव प्रतिनिधि

कराची कॉंग्रेसने म. गांधींना लंडन येथे भरणाऱ्या वर्तुळ–परिषदेसाठी एकमेव प्रतिनिधि नियुक्त केलें. कॉंग्रेसचा एकमेव प्रतिनिधि होण्याचा मान महात्मा गांधींशिवाय अन्य कोणाला अद्यापपर्यंत मिळाला नाही. म. गांधी लंडनला गेले, त्याच पोषाखांत गेले, त्याच ध्येयाने गेले. त्यांच्या दर्शनाला तेथे कोण भीड होई ! हा भारताचा महात्मा अर्धनग्नावस्थेंत सम्राट् पांचवे जॉर्ज यांना त्यांच्या इच्छेनुसार भेटला. पांचवे जॉर्जला धन्यता वांटली. कां वरें वाटूं नये ? म. गांधी जगाचे नैतिक सम्राट् होते. लंडन येथील वर्तुळ-परिषदेंत त्यांनी भारताची बाजू सडेतोडपणें मांडली, पण व्यर्थ. निराश होऊन ते तडक मायभूमीला परतले. अमेरिकेच्या आमंत्रणाला त्यांनी अव्हेरिलें. कोण ही देशकार्याची तळमळ !

## हरिजनांसाठी आमरण उपोषण

मुंबईला उतरतांच ते कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळाच्या सभेला धावून गेले. सरकारने सूडबुद्धीने करारभंग केला, गांधी-इर्विन तह हेतुपुरस्सर मोडला. कॉंग्रेसवर लढा लादला गेला. म. गांधींना पुन्हा येरवड्यांत

डांबण्यांत आलें. नऊ महिने निघून गेले. “ जातीय निवाडा ” जाहीर झाला. हरिजनांना हिंदूंमधून विभक्त करण्यांत आलें. गांधीजींचें हृदय भंगलें. त्यांनी वचनपूर्तीसाठी आमरण उपोषण प्रारंभिलें. गुरुदेव ठाकूर धावून आले. तुरुंगाला मंदिराचें स्वरूप प्राप्त झालें. सवर्ण हिंदु व हरिजन यांच्यांत तह झाला. उपवासाची इच्छित सांगता झाली. म. गांधी १९३४ पर्यंत तुरुंगांत होते. त्यांनी तेथूनच ‘ हरिजन ’ पत्र संपादण्यास सुरुवात केली. तुरुंगांत डांबलेला एक राजबंदी तेथूनच पत्र संपादितो, हें असामान्यच नव्हे का ? पण असामान्य महात्माजींचें सर्वच असामान्य होतें.

### देव तारी त्याला कोण मारी

मुक्तता होतांच म. गांधींनी हरिजन–उद्धारार्थ अखिल भारतीय दौरा काढला. या दौऱ्यांत असतांना कांही गावीं त्यांच्यावर प्राणांतिक संकटेंहि आलीं. पण ‘ देव तारी त्याला कोण मारी. ’ चंदन जितकें घासावें तितका जास्त सुगंध दरवळतो. महात्माजींची लोकप्रियता एकसारखी वर्धिष्णु होत होती. सूर्याला केतु ग्रासतो, पण म. गांधींच्या नेतृत्वाला ओहटी माहीतच नव्हती.

### हिंदी साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष होतात

म. गांधींचें कार्य सर्वगामी आहे. देशोद्धाराची अशी एकहि बाब नाही कीं, जिच्यासंबंधी त्यांनी भरीव कांही केलें नाही. राष्ट्रीय जागृतीचें एक प्रभावी साधन म्हणून त्यांनी १९११ पासून हिंदीचा प्रचार सुरू केला. कॉंग्रेसमध्ये हिंदी भाषेंतून भाषण करणारे पहिले वक्ते म. गांधी होते. दक्षिण भारतांत ‘ हिंदी सभा ’ स्थापून त्यांनी हिंदीला चालना दिली. म. गांधींच्या या कार्याचा गौरव म्हणून १९३४ सालीं भरलेल्या हिंदी साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद त्यांच्या चरणावर ठेवण्यांत आलें. तें त्यांनी विनयपूर्वक स्वीकारलें.

### गोसेवक गांधी

गोमातेच्या ठिकाणीं म. गांधींची दृढ श्रद्धा होती. कृषिप्रधान भारतवर्षांत गाईचें पालन शास्त्रोक्त रीतीने कसें करावें याचें प्रात्यक्षिक शेतकऱ्यांपुढे ठेवण्यासाठी त्यांनी अखिल भारतीय गोसेवा–संघ स्थापिला.

म. गांधींचे मानसपुत्र, वर्ध्यांचे कर्ण, कै. जमनालालजी बजाज यांनी आपलें जीवितसर्वस्व यांत ओतलें व गाईची सेवा करतांनाच स्वर्गारोहण केलें. म. गांधी फार मोठे क्रियाशील गोभक्त होते.

### प्रतिसृष्टि-निर्माता

म. गांधींनी शिक्षण-क्षेत्रांतहि क्रांति केली. उद्योगाद्वारें शिक्षण देण्याची अभिनव पद्धति त्यांनी पुरस्कारली. जीवनाचा व शिक्षणाचा त्यांनी समन्वय केला. अशा रीतीने देशोद्धाराच्या चहुमुखी योजना म. गांधींनी कार्यान्वित करून प्रतिसृष्टि निर्माण केली. आम्ही पुराणान्तरीं विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीविषयी ऐकतों, पण गांधीसृष्टि मात्र आम्ही चर्मचक्षूंनी पाहतों, अनुभवतों.

### १९४२ चा स्वातंत्र्य-संग्राम

होतां होतां १९४० साल उजाडलें. युरोपांत दुसऱ्या जागतिक युद्धाचा डोंब उसळला. ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानला युद्धांत खेचलें. म. गांधींनी विरोध केला. युद्धविरोधी व हिंसाविरोधी म. गांधींना हें कसें सहन होईल ! त्यांनी भारताला स्वातंत्र्य द्या, अशी इंग्रज सरकारला त्रिवार विनंती केली. ब्रिटिश सरकारने बेदरकारपणें ती झिडकारली. म. गांधींनी हिंदी जनतेला काँग्रेसद्वारा " Do or Die " " करा अथवा मरा " असा निर्वाणीचा संदेश दिला. तो संदेश विद्युद्वेगाने भारतांत पसरला. सारा देश उफाळला. क्रांतीच्या ज्वाला धगधगूं लागल्या. ब्रिटिश सत्ता भस्मसात् होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. म. गांधींच्या अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पुन्हा एकवार प्रत्ययास आला.

### राजवाड्याचा तुरुंग होतो

म. गांधींना राजबंदी म्हणून हिज हायनेस आगाखानच्या राजवाड्यांत डांबण्यांत आलें. राजवाड्याचा तुरुंग झाला. मागे तुरुंगाचें मंदिर झालें होतें. म. गांधींचें भाग्यच कांही निराळें होतें. म. गांधींना या वेळीं दोन वर्षें तुरुंगांत राहावें लागलें. पण हीं दोन वर्षें किती भयानक, किती आणी-बाणीचीं व किती परीक्षेचीं होतीं ! एक आठवडा उलटला नाही तोंच पुत्रासमान मानलेले, केवळ पोटचा गोळा, महादेवभाई देसाई त्यांना

सोडून गेले. इहलोक सोडून गेले. रामदासांचा कल्याण गेला. म. गांधींनी हें दुःख कसेंबसें गिळलें, तोंच त्यांची प्रिय सहधर्मचारिणी, कस्तुरबा मृत्यूला अकस्मात् बळी पडली. म. गांधी झाले तरी रक्तामांसाचे पुतळे सीतावियोगाने प्रभु रामचंद्र धाय मोकलून रडले, सामान्य जनासारखे रडले. म. गांधींच्याहि डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या, पण त्या तात्कालिक होत्या. थोरांचें हृदय वज्रापेक्षा जास्त कठीण व फुलापेक्षा जास्त कोमल असतें असें म्हणतात तें खोटें नाही. तात्काळ त्यांनी वज्रासारखें हृदय केलें व आमरण उपोषण आरंभिलें. हेतु हा कीं, हिंदुस्थानांत होणाऱ्या अन्यायाचा सात्त्विक पण आत्यंतिक प्रतिकार करावा. सरकार घाबरलें. म. गांधींचें ७० वर्षांचें वय लक्षांत घेतां त्यांना तुरुंगांत ठेवणें धोक्याचें झालें. त्यांची तात्काळ मुक्तता करण्यांत आली.

## कस्तुरबा-निधि

भारतीय जनतेनें म. गांधींचा अपूर्व गौरव करण्याचें ठरविलें. आता म. गांधींना एकाहत्तरावें वर्ष लागणार होतें. त्या सुदिनीं " कस्तुरबा-निधी " साठीं एक कोटी सतरा लक्ष रुपयांची रक्कम त्यांना अर्पण करण्यांत आली. म. गांधींनी ती भारतीय ग्रामीण स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारार्थ अर्पण केली. लक्ष्मीचा संपर्क या महात्म्याला सहन होईना. अशी विलक्षण त्यांची निःस्पृहता होती. " न मागे तयाची रमा होय दासी " हेंच खरें.

## " सत्याचे प्रयोग " व " अभिनंदन-ग्रंथ "

जेव्हा म गांधी पंचाहत्तर वर्षांचे झाले तेव्हा विश्वमान्य तत्त्वज्ञ सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी संकलित केलेला " अभिनंदन-ग्रंथ " त्यांना अत्यादरपूर्वक समर्पण करण्यांत आला. या ग्रंथांत जगांतील नामांकित राजकारणी, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ व कलावन्तांनी म. गांधींना वाहिलेलीं शब्दसुमनें गुंफलेलीं आहेत. ही या ग्रंथाची अपूर्वता. तरी पण " सत्याचे प्रयोग " हा महात्माजींचा आत्मचरित्रात्मक ग्रंथ यापेक्षा सरस आहे. कारण महात्माजींची भाषाशैली गंगौघाप्रमाणे निर्मळ व संथ आहे. ते बायबली शैलीमध्ये ( Biblical Style ) लिहीत.

## राष्ट्रपिता म. गांधी

ज्या स्वराज्याच्या साधनेसाठी म. गांधींनी चाळीस वर्षें अविश्रान्त श्रम केले, जिवाचें रान केलें, नाही नाही ते कष्ट सहन केले, प्रिय कस्तुरबाचें बलिदान दिलें, त्या स्वराज्यप्राप्तीचा सुदिन १५ ऑगस्ट १९४७ उजाडला. इंग्रज सरकारने हिंदी स्वराज्याचें उदक काँग्रेसच्या हातावर सोडलें. महात्मा गांधींचा राष्ट्रपिता म्हणून आसेतुहिमाचल जयजयकार झाला. जयजयकार झाला खरा, पण म. गांधी कोठे होते ? काय करीत होते ? ते दिल्लीच्या मयूरासनावर अधिष्ठित होते का ? प्रधानमंत्रिपदाची शपथ घेत होते का ? नाही, नाही. ते महात्मा गांधीच राहिले. नामदार गांधी झाले नाहीत. नौखालीच्या आणि कलकत्त्याच्या भागाला हिंदु-मुसलमानांत सख्य प्रस्थापित करण्यासाठी ते गावोगाव प्राण संकटांत घालून पार्यी हिंडत होते. मुस्लिम लीगच्या दुर्योधनी हट्टामुळे देशाचें विभाजन झालें. जात्यंधता बोकाळली. म. गांधींनी शंकराप्रमाणे जातीय वैमनस्याचें हलाहल विष प्राशन करून पचविण्याची तयारी केली. शंकर नीलकंठ झाले, महात्माजी मुक्तात्मा झाले !

## ‘ हे राम ! हे राम ! ’

हिंदु-मुसलमानांमधील वैराग्नि भडकला. त्याच्या होमकुंडांत लाखो आहुति पडल्या. म. गांधी धर्म-सहिष्णुतेचा सात्त्विक उपदेश करीत. “ अल्ला ईश्वर तेरे नाम, सबको सन्मति दे भगवान ” असा जयघोष करून भगवद्-भजन करीत. असहिष्णु व हिंसक लोकांना हें पाहवेना. जानेवारीच्या २० तारखेला सायंप्रार्थनेच्या वेळीं महात्माजींच्या अंगावर एक बॉंब फेकण्यांत आला. काळ आला होता, पण वेळ आली नव्हती. महात्माजी भयंकर दिव्यांतून पार पडले. पण यमराजाचें दुष्ट चक्र त्यांच्या शोधांतच होतें. १९४८ च्या जानेवारीची अशुभ ३० तारीख होती. म. गांधी नित्याप्रमाणे सायंप्रार्थनेला लगबग निघाले. सूर्यनारायण द्रुत गतीने अस्ताचलाकडे चालला होता. चराचर सृष्टीवर अंधकार पसरूं लागला. अननुभूत शोकाची छाया सर्वत्र पसरली. महात्माजींच्या ध्यानींमनीं परमेश्वर होता. इतक्यांत तामसी वृत्तीच्या एका माथेफिरू युवकाने त्यांना अकस्मात् अडविलें. त्यांच्या चरणांना वंदन केलें व खिशांतील पिस्तुल बाहेर

काढून त्यांच्यावर तीनदा झाडलें. पुण्याचल कोसळला ! भागीरथी भंगली !! भारताचा भाग्यरवि अस्तास गेला !!! मरतां मरतां, 'हे राम ! हे राम !' हे पवित्र शब्द महात्माजींच्या मुखगंगेतून प्रवाहित झाले. महात्माजी मुक्तात्मा झाले. राममय झाले !

**पुण्यस्मरण**

म. गांधींच्या वधाची वार्ता ऐकतांच जगांतील यच्चयावत् थोर पुरुष हळहळले. संयुक्तराष्ट्र संस्थेने म गांधींच्या सन्मानार्थ आपलें निशाण अर्धे खालीं केलें. सर्व देशांनी आपलीं निशाणें खाली केलीं. कोण ही सन्मानाची अपूर्वता ! म. गांधींच्या थोरपणाइतकीच भव्य व विशाल त्यांची स्मशान-यात्रा निघाली. त्यांच्या अस्थिविसर्जनाच्या समारंभाला ज्ञात विश्वेतिहासांत जोड नाही. भारतांतील सर्व प्रमुख व पवित्र नद्यांत त्यांच्या अस्थींचें समारंभ-पूर्वक विसर्जन करण्यांत आलें. हेतु हा कीं, भारताच्या रक्तवाहिन्यांत त्यांचें चैतन्य भिनावें. अपूर्व जीवनाचा अपूर्व अंत झाला ! परदास्यभयभजना, भारतभाग्यविधात्या, विश्ववंद्य महात्म्या ! तुझे चरणारविंदीं आमचे सहस्रशः प्रणाम असोत !

# पंडित मोतीलाल नेहरू

## ( १८६१—१९३१ )

" To find a great father passing on his qualities to his greater son is more unusual. "

—*John Gunthur*

विश्ववंद्य महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्वाने अखिल भारताचा १९२० सालीं जो कायापालट केला, त्याचें पं. मोतीलाल नेहरू एक उत्कृष्ट उदाहरण होय. आमोदप्रमोद व राजसी विलासांत आयुष्याचा बहुतेक काल घालविल्यानंतर त्याच्या अस्तकालीं ज्यांना देशस्वातंत्र्यासाठी तुरुंगांत जाऊन मृत्यूला जवळ ओढावें लागलें, अशा थोर, बुद्धिमान् व स्वार्थ-त्यागी राष्ट्रपुरुषांत पं. मोतीलाल नेहरूंची गणना होते.



### बुद्धिमान् विद्यार्थी व नामांकित वकील

पं. मोतीलाल नेहरूंचा जन्म दिल्ली येथे १८६१ मध्ये एका राजनिष्ठ काश्मिरी ब्राह्मणकुळांत झाला. त्यांचे वडील गंगाधरजी नेहरू हे दिल्लीचे कोतवाल होते. त्यांचा सरकारदरबारीं चांगला वचक असे. एक अत्यंत कर्तबगार कोतवाल म्हणून ते सर्वांच्या आदरास पात्र झाले होते. अशा कर्तबगार पित्याचा पुत्र

सवाई कर्तबगार निघणें अशक्य नाही. पण दुर्दैव असें की, पित्याच्या मृत्यूनंतर दोन महिन्यांनी ते जन्मास आले. असें मूल दुर्दैवी असतें असा लोकांमध्ये प्रवाद अगर समज प्रसृत झालेला आहे. परंतु दुर्दैवाला नमविण्यांतच माणसाचें खरें श्रेष्ठत्व प्रत्ययास येतें. पं. मोतीलालजींच्या बाबतींत हें सिद्ध झालें. घरची सांपत्तिक स्थिति अनुकूल असल्यामुळे वडील बंधु नंदलाल नेहरू यांनी त्यांच्या पालनपोषणाची व शिक्षणाची सुव्यवस्था लावून दिली. पं. मोतीलाल नेहरूंच्या अध्ययनाचा श्रीगणेशा उर्दू भाषेमध्ये झाला. फार्शी व अरबी भाषांचेंहि त्यांनी कामचलाऊ ज्ञान प्राप्त करून घेतलें. नंतर त्यांनी आपला मोर्चा इंग्रजी शिक्षणाकडे वळविला. बुद्धि अत्यंत शीघ्रग्राही असल्यामुळे केवळ चार वर्षांच्या अल्पावधींत ते मॅट्रिकची परीक्षा प्रावीण्य संपादून उत्तीर्ण झाले. १८८२ मध्ये वकिलीच्या परीक्षेंत ते सर्वप्रथम आले, एक प्रतिभासंपन्न विद्यार्थी म्हणून ते सर्वांच्या आदरास पात्र झाले. अलाहाबाद येथे त्यांनी वकिली थाटली. अभिजात हुशारी, उत्तम वाक्चातुर्य व पक्षकाराविषयी असलेली आत्मीयता वगैरे गुणांच्या योगाने ते या धंद्यांत अल्पावधींतच अपेक्षेच्यापलीकडे यशस्वी झाले.

## हायकोर्टाचें न्यायाधीशपद अव्हेरिलें

आता लक्ष्मीची त्यांच्यावर अपार कृपा झाली वैभवाचा व सद्भाग्याचा पूर त्यांच्यावर लोटला. १८८९ च्या सुमारास त्यांची हायकोर्टातील सरकारी वकील ( Advocate General ) म्हणून नियुक्ति झाली. याच वर्षीं त्यांना पुत्ररत्न प्राप्त झालें. सोन्याला सुगंध प्राप्त झाला. मोत्याने जवाहराची निर्मिति केली. स्वरूपाराणीने मदनासारखा सुंदर पुत्र "जवाहर" प्रसविला. मोतीलालजींच्या संसारसुखाला भरती आली. पं. मोतीलालजींनी प्रासादसम आनंदभवनाची उभारणी केली. स्वर्गसुखाला क्षणभर लाजविणारें आनंदभवनांतील विलासपूर्ण सौख्य होतें. मोंगल सम्राटांना हेवा वाटावा असा आनंदभवनांतील थाट होता. इतक्यांत अनपेक्षितपणें अलाहाबाद हायकोर्टाचे न्यायाधीश होण्यासंबंधी सरकारने पं. मोतीलालजींना एक प्रकारें अर्जविलें. यशोगिरीवर आरोहण केलेल्या मोतीलालांनी क्षणार्धांत तें पद अव्हेरिलें. हायकोर्टाचें न्यायाधीशपद अव्हेरिलें, कोण ही निःस्पृहता

च बाणेदार वृत्ति ! ते सधन संयुक्त प्रांतांतील पहिल्या प्रतीचे वकील असल्यामुळे सतत पंचवीस वर्षें अलाहाबाद बार असोसिएशनचे अध्यक्ष होते.

## कॉंग्रेसचे कर्णधार होतात

त्यांनी १८८८ मध्ये अलाहाबाद येथे भरलेल्या कॉंग्रेसच्या चौथ्या अधिवेशनापासून कॉंग्रेससेवेचा श्रीगणेशा केला. १९३१ मध्ये त्यांच्या मृत्यूनेच ह्या प्रदीर्घ सेवेची इतिश्री केली. ही बेचाळीस वर्षांची खडतर सेवा जनतेला कां बरें पटूं नये ? मवाळांचे अनुयायी होऊन ते कॉंग्रेसमध्ये शिरले व इंग्रजराज्यसत्तेशीं लढतां लढतां ते कालवश झाले. अशी त्यांच्या राष्ट्रसेवेची चढती कमान होती. १९०८ मध्ये ते समाज-सुधारणा-परिषदेचे अध्यक्ष होते. सतत सात वर्षें संयुक्त प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे ते अध्यक्ष होते. १९०९ मध्ये अलाहाबादचे सुविख्यात 'लीडर' पत्र त्यांनी सुरू केलें. याच वर्षी ते संयुक्त प्रांताच्या कौन्सिलचे सभासद निवडले गेले. त्यांनी ॲनी बेझांटबाईच्या होमरूल चळवळीला सक्रिय पाठिंबा दिला. त्यांची वृत्ति दिवसेंदिवस जहाल होऊं लागली. परकीय सत्तेला विरोध करण्यास ते प्रवृत्त होऊं लागले. १९१९ मध्ये अमृतसर येथे भरलेल्या कॉंग्रेसचे ते एकमताने अध्यक्ष नियुक्त झाले. मॉंट-फोर्ड सुधारणांचें त्यांनी विदारक शवविश्लेषण केलें.

## जीवनक्रांति

१९१९ च्या पंजाबमधील हत्याकांडाने सर्व देशाच्या मनोवृत्तींत क्रांतिकारक फरक घडवून आणला. तेव्हा मानधन मोतीलालांच्या जीवनामध्ये विचारांची क्रांति होणें क्रमप्राप्त होतें. या जीवनक्रांतीचें मार्मिक शब्दचित्र पं. जवाहरलालांनी आत्मचरित्रांत रेखाटलें आहे, तें असें : " पं. मोतीलालजींची विचारशक्ति, त्यांचा स्वाभिमान, त्यांच्या अंगचा पीळ वगैरेंचा परिणाम होऊन हलके हलके प्रगति करीत ते जहाल बनून असहकारितेमध्ये सामील झाले. अनेक प्रसंगांनी साचत गेलेला व पंजाब हत्याकांडामुळे शिगेस पोंचलेला त्यांचा राग, इंग्रज सरकारच्या असमर्थनीय वर्तनासंबंधी होऊन चुकलेली खात्री आणि राष्ट्राचा अपमान झाल्यामुळे मनांत उत्पन्न झालेली चीड व्यक्त होणें जरूर होतें. वकिलीच्या धंद्यांत मुरलेल्या त्यांच्या मनाचा

पूर्ण विवेकाअंतीं निश्चय झाला व ते म. गांधींचे अनुयायी झाले." त्यांनी वकिली सोडली. खादीचीं जाडीभरडीं वस्त्रें परिधान केलीं. त्यांचे कपडे लंडनला शिवलेले व पॅरिसला धुतलेले असत. घरामध्ये फ्रान्सच्या उत्तमोत्तम मद्याच्या आकर्षक बाटल्या भरलेल्या असत. एखाद्या राजाने हेवा करावा इतकें विलासी जीवन ते घालवीत असत. त्यांची वकिलीची प्राप्ति लाखांची असे. वयाच्या साठाव्या वर्षी हा बदल आश्चर्यकारक नव्हे काय? मोतीलालांनी भोगाला अव्हेरून त्यागाला आलिंगिलें. कोण हें परिवर्तन!

## पहिला कारागृहवास

असहयोगाचा ओनामा म्हणून युवराजांच्या स्वागतावर त्यांनी बहिष्कार पुकारला. सरकारी अवकृपेच्या रोषाला ते तात्काळ बळी पडले. १९२१ च्या डिसेंबर महिन्यांत त्यांना सहा महिन्यांची सश्रम कारागृहवासाची शिक्षा ठोठावण्यांत आली. ते भग्न देहाने तुरुंगांतून बाहेर पडले. चौराचौरी प्रकरणामुळे म. गांधींनी सत्याग्रह बंद केला.

## स्वराज्य-पक्षाची स्थापना

१९२२ मध्ये पं. मोतीलालांनी देशभर दौरा केला व परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन केलें. देश अहिंसक प्रतिकाराला पात्र नाही असें त्यांना आढळलें. निष्क्रियतेची व निराशेची लाट सर्वत्र पसरूं लागली. ते चिंतामग्न झाले. देशबंधु चित्तरंजन दास यांच्याशीं त्यांनी खूप विचारविनिमय केला. दोघेहि पडले खंदे कायदेपंडित. इतर देशांच्या राजकीय चळवळींचें दोघांनीहि तौलनिक आलोडन केलेलें होतें. निष्क्रियतेला हाणून पाडण्या-साठी त्यांनी सनदशीर प्रतिकाराचा मार्ग निश्चित केला. दोघांनी पुढाकार घेऊन कॉंग्रेसमध्ये स्वराज्यपक्ष स्थापला. या स्वराज्यपक्षाचे पहिले सरचिटणीस पं. मोतीलाल होते. देशबंधु दास अध्यक्ष व पं. मोतीलाल मंत्री, मग स्वराज्यपक्ष कां म्हणून फोफावूं नये? या पक्षातर्फे पं. मोतीलाल १९२३ ते १९३० पर्यंत मध्यवर्ती कायदे-मंडळाचे सभासद होते. ते अविरोध निवडले जात. कोण ही त्यांची लोकप्रियता! स्वराज्य–पक्षाने ज्या संघटनपूर्वक कार्यक्षमतेचा असेंब्लींत परिचय दिला, त्याचें बरेंचसें श्रेय मोतीलालजींना आहे. दासांच्या अकाली निधनानंतर ते स्वराज्य-पक्षाचे

अध्यक्ष झाले. ते पहिल्या प्रतीचे राजकारणी पुरुष म्हणून सर्वांच्या आदरास पात्र झाले. १९२७ सालीं ते लंडनला प्रिव्ही कौन्सिलांत वकील म्हणून उभे राहिले. रशियाच्या सरकारच्या खास आमंत्रणावरून ते रशियाच्या दशवार्षिक समारंभास सहकुटुंब उपस्थित राहिले.

## नेहरू-योजना

पं. मोतीलालजींचें अत्यंत मोठें भरीव कार्य म्हणजे त्यांनी तयार केलेली नेहरू-योजना. १९२७ सालीं मद्रास येथे भरलेल्या कॉंग्रेसने सर्वसंमत होणारी हिंदी राज्यघटना तयार करण्यासाठी एक मंडळ नेमलें. ह्या मंडळाचे अध्यक्ष पं. मोतीलाल होते. ह्या मंडळाने देशांतील पक्षोपपक्षांचें म्हणणें ऐकून एक सर्वसंमत होणारी योजना तयार केली. ही योजना म्हणजे पं. मोतीलालजींच्या सखोल राजकारणशास्त्राचें व प्रखर बुद्धिमत्तेचें मूर्तिमंत द्योतक होतें. या महान् कार्याबद्दल त्यांना कलकत्ता कॉंग्रेसचे एकमताने अध्यक्ष निवडण्यांत आलें.

## इंद्राला लाजविणारें वैभवशाली स्वागत

मोतीलालजींची रौप्यरथांतून प्रचंड मिरवणूक निघाली. या दैदीप्यमान रौप्यरथाला बारा श्वेत अश्व जोडले होते. नेताजी सुभाषचंद्र बोस कॉंग्रेस स्वयं-सेवक दलाचे अश्वारूढ लष्करी वेषधारी सरसेनापति होते. ह्या मिरवणुकीचा थाट असा कांही होता कीं, देवेन्द्रालाहि हेवा वाटावा. कॉंग्रेसने नेहरू-योजना एका वर्षासाठी स्वीकारली. या योजनेप्रमाणे ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानला एका वर्षाच्या आंत साम्राज्यान्तर्गत स्वराज्य द्यावें असें होतें. पण सरकार पडलें अडेलतट्टू !

## दशरथापेक्षा जास्त सुदैवी

राजा दशरथाला रामाचा राज्याभिषेक पाहण्याचें भाग्य मिळालें नाही, पण पं. मोतीलालांना त्यांच्या मागून एकुलता एक सुयोग्य पुत्र पं. जवाहरलाल, कॉंग्रेसचा अध्यक्ष, भारताचा लोकसम्राट् पाहण्याचें अद्वितीय सद्भाग्य लाभलें. जगाच्या इतिहासांत असल्या प्रकारची कर्तबगार पितापुत्रांची जोडी सापडणें कठिण. पं. मोतीलालांनी पं. जवाहरलालांच्या

मस्तकावर दुसऱ्या वर्षी लाहोर येथे कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा कांटेरी किरीट ठेवला.

### राष्ट्रयज्ञांत आहुति

कॉंग्रेसने १९३० मध्ये कायदेभंगाचें रणशिंग फुंकलें. पं. जवाहरलाल होते पहिले सर्वाधिकारी. ते पडले सरकारी रोषाला बळी. त्यांनी आपल्या सत्तर वर्षांच्या शेलारमामासदृश पित्याला द्वितीय सर्वाधिकारी नेमलें. पुत्राने पित्याला नेमलें व पित्याने तें सहर्ष स्वीकारलें. कोण हा चमत्कार ! याच प्रसंगीं पं. मोतीलालांनी आपलें प्रासादतुल्य 'आनंदभवन' कॉंग्रेसला अर्पण केलें. त्याचें नामान्तर 'स्वराज्यभवन' झालें. लवकरच पं. मोतीलालजींना तुरुंगांत डांबण्यांत आलें. कायदेभंगाची लाट देशभर पसरली. न भूतो अशी कायदेभंगाची चळवळ झाली. पं. मोतीलालजींना तुरुंगांत क्षयाची भावना झाली. रोग दिवसेंदिवस प्रबल होत होता. रोगाची असाध्यता बघून सरकारने त्यांची मुक्तता केली. जवळ जवळ सहा महिने ते क्षयाने ग्रस्त होते. देशांतील नामांकित वैद्यांनी त्यांना वांचविण्याची शर्थ केली. त्यांचा हा मृत्यूशीं सुदीर्घ व भीषण असा झगडा चालू असतांना त्यांचें सर्व कुटुंब कारागृहवासांत अडकलें होतें. पण त्यांनी हृदयाची दुर्बलता दिसूं दिली नाही व आपल्या पुत्राला अथवा सुनेला राष्ट्रसेवेपासून किंचितदेखील परावृत्त केलें नाही. पं. मोतीलालजींची अशी उत्कट इच्छा होती कीं, त्यांना स्वराज्य-भवनांत स्वतंत्र हिंदुस्थानच्या पार्लमेंटची बैठक पाहावयास मिळावी. वाचा बंद पडण्यापूर्वी ते कळवळून म्हणाले कीं, "Decide India's fate in Swaraj Bhavan in my presence. Let me die in the lap of free India." "भारताच्या भाग्याचा निर्णय स्वराज्य-भवनांत माझ्या डोळ्यांदेखत करा. मला स्वतंत्र भारतांत मरूं द्या." कोण ही देशस्वातंत्र्याची उत्कटता ! पण ईश्वरी योजना निराळी होती. पं. मोतीलालांच्या भाग्यचंद्राला कलंक होताना ? १९३१ च्या फेब्रुवारी महिन्याची अभागी सहावी तारीख उजाडली व राष्ट्रस्वातंत्र्याच्या धगधग-णाऱ्या हवनकुंडांत पं. मोतीलालांची आहुति पडली.

● ● ●

दे श बं धु

# चित्तरंजन दास

( १८७०—१९२५ )

" With me, work for my Country is a part of my religion. It is the part and parcel of the idealism of my life."

[ माझी देशसेवा माझ्या धर्माचरणाचें एक अंग आहे. माझी देशसेवा माझ्या जीवनाच्या आदर्शाचें सारसर्वस्व आहे. ]

गंगा-ब्रह्मपुत्रादि पवित्र नद्यांनी जी भूमि सुपीक बनविली, वंदे मातरम् हें राष्ट्रगीत जेथे स्फुरलें, ज्या भूमीने रवीन्द्रनाथांसारखा विश्वकवि दिला, ऋषि अरविंदांसारखे योगी वाढविले, जिला "सुजलां सुफलां" हीं विशेषणें भूषवितात, त्या फुलांफळांनी विनटलेल्या काव्यभूमींत सर्वांचें चित्तहरण करणारे चित्तरंजन दास १८७० मध्ये जन्म पावले. जगद्‌बन्धु दास हे चित्तरंजनांचे पितामह होते. ते खरोखरच स्वनामधन्य होते. ते सर्वांचे बंधु होते. त्यांनी वकिलीच्या धंद्यांत अपार धन संपादिलें होतें. त्यांचें औदार्यहि अमर्याद होतें. त्यांचा विशेष हा कीं, ते सरस कवि होते. त्यांनी रचलेली



सत्यनारायणाची रसाळ कथा बंगालमध्ये घरोघरीं वाचली जाते. त्यांच्या सत्पुत्राचें नांव भुवन-मोहन भुवन-मोहन दासांनी ॲटर्नी होऊनच सुकीर्ति संपादन केली. औदार्याच्या बाबतींत त्यांचें पाऊल पुढेच होतें. ब्रह्मसमाजाचीं तात्त्विक मतें त्यांनी स्वीकारलीं होतीं. त्यांची प्रेमळ पत्नी वैष्णवपंथानुयायी होती. भक्ति-प्रेमाचीं गाणीं ती नेहमी गात असे. तिचें हृदय परदु:खानें विरघळणारें होतें. अशा पावनतम कुळांत, जेथे औदार्य, दया, क्षमा, भक्ति, रसिकता इत्यादि गुणांचें पिढ्यानपिढ्या संचित झालें होतें, तेथे चित्तरंजन दास जन्म पावले. मुनीजनांच्या तपानें विशुद्ध झालेल्या हिमनगांतूनच पावनतम गंगा उगम पावते.

## देशभक्तींत पास, पण आय्. सी. एस्. मध्यें नापास

बाल चित्तरंजन दास विद्यार्थ्यांच्या आनंदाचें निधान होता. त्याचा स्वभाव खेळकर व आनंदी होता. माध्यमिक शाळेंत व हायस्कूलमध्ये त्याची नैसर्गिक वक्तृत्वकला चमकूं लागली. वाचनांत, वादांत व चर्चेत तो नेहमी दंग असावयाचा. त्याचे अध्यापक म्हणत, "हा पुढे मोठा वक्ता होईल." १८८६ मध्ये मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांनी प्रेसिडेन्सी कॉलेजांत प्रवेश केला. कॉलेजच्या रंगेल जीवनांत त्यांनी काव्यास्वादाचा मनमुराद आस्वाद घेतला. एक रसिक विद्यार्थी व वक्ता म्हणून ते सर्वांच्या आदरास पात्र झाले. १८९० मध्ये ते बी. ए. झाले. हुशार व होतकरू विद्यार्थी, चित्तरंजन दास आय्. सी. एस्. होण्यासाठी लंडनला गेले. घरीं भुवनबाबूंच्या अमर्याद औदार्यामुळे दारिद्र्य येत होतें, परंतु हुशार चित्तरंजन पित्याचा आशातंतु होता. मुलगा उच्चाधिकारी होतांच कर्ज फिटेल अशी त्यांची भाबडी आशा होती. आशा ही निराशेची वडील बहीण, एकाच नाण्याचीं दोन अंगें. चित्तरंजन आय्. सी. एस्. होण्यासाठी गेले, त्यांनी अभ्यासांत प्रावीण्य संपादिलें, ते परीक्षा उतरले, पण त्यांचें देशप्रेम नडलें. याच वेळीं राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजी पार्लमेंटांत प्रतिनिधि म्हणून जाऊं इच्छीत होते. तारुण्याच्या अदम्य उत्साहाच्या भरांत चित्तरंजनानें त्यांच्या निवडणुकीच्या मोहिमेंत जहाल भाषणें केलीं. ब्रिटिश सरकारच्या डोळ्यांत हें सललें. चित्तरंजन देशभक्तींत पास झाले, आय्. सी. एस्. मध्ये नापास होणाऱ्यांत पहिले

आले. भारतमातेचें भाग्य थोर कीं, चित्तरंजनाची सेवा परकीय सरकारला न मिळतां तिला मिळाली. बालवीर चित्तरंजन डगमगणारा नव्हता. शेवटीं बॅरिस्टर होऊन ते मातृभूमीला परतले. "वानरम् प्रकुर्वाणो रचयामास (?)वनायकम्" अशी त्यांची स्थिति झाली.

**वकिलीचा अभागी श्रीगणेशा**

१८९३ मध्ये कलकत्त्याला बॅरिस्टर चित्तरंजनाने वकिली थाटली. परंतु काल त्यांना अनुकूल नव्हता. प्रतिकूल कालांत हातीं धरलेल्या सोन्याची माती होते व अनुकूल कालांत मातीचें सोनें होतें. माणूस तोच, बुद्धिमत्ता तीच, कर्तृत्व तेंच पण प्रतिकूल ग्रहांचा हा दुष्ट खेळ. चित्तरंजनांजवळ ट्रामच्या तिकिटांचे पैसेदेखील नसत. ते कोर्टांत जायचेच असल्यास पायीं जात. सर्वत्र निराशा दिसूं लागली.

**कवि चित्तरंजन**

त्यांच्या हृदयांत खळबळ माजली. मनांत अपार भावलहरी उसळत, त्यांची अभिव्यक्ति काव्यांतच होणार. काव्यरचनेंतच त्यांना आनंद प्राप्त होऊं लागला, हृदय हलकें होऊं लागलें, मन प्रसन्नता पावूं लागलें. त्यांच्या भावगीतांचा पहिला संग्रह 'मालंच' हें गोड नांव धारण करून बाहेर पडला. या काव्यहारांत सुंदर भावनोत्कट गीतें गुंफलीं आहेत. श्रद्धा व अश्रद्धा याचें यथार्थ दर्शन यांत होतें. लवकरच त्यांचें सर्वांगसुंदर 'सागरसंगीत' काव्य प्रकाशित झालें. खवळलेल्या सागरास मधुर गावयास लावणारी त्यांची प्रतिभा होती. हृदयसागरांतील सर्व उत्कट भाव त्यांनी त्यांत ओतले. स्वतःच्या हृदयांतील सूर ते ऐकत व त्यांवर गीतांची रचना करीत. चित्तरंजनांच्या हृदयाला भूक होती, तळमळ होती, कशाची? समाजसेवेची, देशसेवेची, ईश्वरभक्तीची. ती भूक शमविण्यासाठीच हृदय 'सागरसंगीत' गात होतें. 'सागरसंगीता'नंतर "माला", "किशोर–किशोर" व "अंतर्यामी" हे काव्यसंग्रह बाहेर पडले. पण चित्तरंजनांची अक्षर काव्यकृति म्हणजे "सागरसंगीत". इतर केवळ पडछाया. १८९७ मध्ये त्यांचा वासंतीदेवींशीं विवाह झाला. आशा-निराशेचा झगडा चाललाच होता. परंतु वासंतीच्या प्रिय सहवासांत त्यांची वठलेली जीवनलतिका हळूहळू पल्लवूं लागली, बहर धारण करूं लागली.

## जहाल पक्षाचा पुरस्कार

वंगभंगाची स्फोटक चळवळ सुरू झाली. सारा बंगाल उफाळला. भावनाप्रधान बॅरिस्टर चित्तरंजन शांत कसा राहील? वसंतागमनीं कोकिल मूक कसा राहील? मेघगर्जना होत असतांना मयूर नृत्य कां बरें करणार नाही? चंद्रकान्तावर चंद्रकिरणें पडतांच तो कां बरें द्रवणार नाही? द्रवणार-पाझरणार! चित्तरंजनांनी राष्ट्रकार्यांत उडी घेतली. १९०६ मध्ये कलकत्त्याला कॉंग्रेस भरली. सभेंत लो. टिळकांचा जहाल कार्यक्रम पसार झाला. बंगालतर्फे बिपिनचंद्र पाल व युवक चित्तरंजनाने त्याचा पुरस्कार केला. कॉंग्रेसमध्ये चित्तरंजन अनुमोदक म्हणून चमकले.

## क्रांतिकारकांचे बॅरिस्टर

इतस्ततः बॉंब फेकले जात होते. पिस्तुलें झाडलीं जात होतीं. इंग्रज अधिकारी हेच त्यांचे शिकार होते. शेकडो होतकरू युवकांना केवळ संशयावरून सरकारने अटकेंत टाकलें. विचारपूस, चौकशी बिलकुल होत नसे. त्यांतच योगी अरविंद व त्यांचे बंधु बारीन्द्र होते. या निरपराधी तरुणांचा बचाव कोण करणार? यांच्या मदतीला कोण धावून जाणार? इंग्रजांची अवकृपा कोण ओढवून घेणार? ते बहुतेक दरिद्री असलेले तरुण पैसे खर्चून वकील कसे देणार? अलिपूर बॉंब खटला सुरू झाला. योगी अरविंद त्यांत एक आरोपी होते. त्यांना कोण वांचविणार? बॅ. चित्तरंजनांच्या चित्ताचा क्षोभ झाला. ते त्यांचा बचाव करण्यास सरसावले. त्यांत त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची शर्थ केली. त्यांच्या वकिली बुद्धीची सर्वांना खात्री पटली. अरविंद निर्दोषी सुटले. उत्कृष्ट बॅरिस्टर म्हणून त्यांची ख्याति झाली. त्यांचें अलौकिक वक्तृत्व, कायदेपटुत्व, उलटतपासणींतील चातुर्य, पक्षकाराविषयी वाटणारी आत्मीयतादि गुण सर्वांच्या डोळ्यांत भरले. मोठमोठे खटले त्यांच्याकडे येऊं लागले. प्रतिदिनीं दोन-तीन हजार रुपयांची त्यांना प्राप्ति होऊं लागली. लक्ष्मीचा सडा त्यांच्यावर होऊं लागला. परमार्थांतून शुद्ध स्वार्थ विकसित झाला. निष्काम कर्मांतून यशःसिद्धि निर्माण झाली. सुदाम्याला श्रीकृष्णकृपेने सुवर्णपुरी प्राप्त झाली. परंतु चित्तरंजन लक्ष्मीला भाळले नाहीत व स्वतःला भुलले नाहीत. त्यांनी अनेक देशवीर युवकांचे खटले विनामूल्य चालविले.

## पितृऋणाची लोकविलक्षण फेड

संपत्ति मिळतांच चित्तरंजनाने दिवाळखोर पित्याचें ४०,००० रुपयांचें मुदतीच्या बाहेर गेल्यामुळे बेकायदेशीर झालेलें कर्ज आपण होऊन फेडलें. कोण ही सत्यनिष्ठा ! कोण हा प्रामाणिकपणा ! असा हा हरिश्चंद्राचा अवतार लोकप्रिय कां बरें होऊं नये ? त्यांची वकिली भरभराटली. संसार-वेलीला चिररंजन नांवाचें टवटवीत पुष्प लागलें. वासंतीदेवीने त्यांचें सांसारिक जीवन सुखमय केलें. परंतु ते भौतिक सुखांत रममाण होणारे पुरुष नव्हते. आनुवंशिक सद्‌गुणांनी उचल घेतली व बॅ. चित्तरंजन दास कॉंग्रेसच्या कार्यांत विशेष भाग घेऊं लागले.

## श्रेष्ठ कॉंग्रेस पुढारी

१९१८ मध्ये मुंबईला भरलेल्या कॉंग्रेसच्या खास अधिवेशनांत प्रतिनिधि म्हणून ते उपस्थित होते. याच वेळीं लो. टिळकांच्या अध्यक्षतेखाली त्यांचें प्रभावशाली भाषण झालें. म. गांधींनी ' रौलेट ॲक्ट 'विरुद्ध लढा पुकारला. चित्तरंजन युद्धेच्छु वीराप्रमाणे पुढे सरसावले व कलकत्त्याला हरताळ व प्रचंड सभा त्यांनी यशस्वीपणें पार पाडली. अमृतसरच्या हत्याकांडाची निःपक्षपाती चौकशी करण्यासाठी कॉंग्रेसने एक मंडळ नेमलें. बॅ. चित्तरंजन दास त्याचे प्रमुख सभासद होते. १९१९ च्या डिसेंबरमध्ये अमृतसरला कॉंग्रेस भरली. मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांवर वादळ माजलें. बॅ. चित्तरंजनांनी टिळकांच्या मताचा पुरस्कार केला. लो. टिळकांनी आपला सुधारणासंबंधीचा ठराव बॅ. दासांकडून मांडून घेतला. त्यांचें अस्खलित परिणामकारक भाषण झालें. बॅ. चित्तरंजन अखिल भारतीय पुढारी झाले.

## असहयोगी कायापालट

लो. टिळकांच्या मृत्यूनंतर देशाचें नेतृत्व म. गांधींकडे गेलें. कलकत्त्याला कॉंग्रेसचें खास अधिवेशन भरलें. म. गांधींचा संपूर्ण बहिष्काराचा ठराव पास झाला. अध्यक्ष लालाजींप्रमाणे चित्तरंजन दास या ठरावाच्या

विरुद्ध होते व प्रकटपणें त्यांनी विरोधदेखील केला. इतकेंच नव्हे तर बरोबर शेकडो वंगप्रतिनिधि घेऊन एखाद्या प्रतिकारास निघालेल्या सेनापतीच्या आवेशांत ते नागपूरच्या काँग्रेसला गेले. पण कट्टर विरोधक भक्त व्हावा, अशी म. गांधींची पुण्याई. स्वतः दासांनीच खुल्या अधिवेशनांत असहयोगाचा ठराव अत्यंत प्रभावी भाषण करून मांडला. त्यांनी त्यांच्या किमती विलायती कपड्यांची तेथे होळी केली. खादीचीं जाडींभरडीं वस्त्रें परिधान केलीं. कोण ही जीवनक्रांति ! काय हा चमत्कार ! मोठ्यांचें सर्वच मोठें. बंगालमध्ये असहयोगाचा त्यांनी धूमधडाक्याने प्रचार केला. शेकडो तरुण त्यांच्या भाषणांनी देशसेवेस पुढे आले व प्रसिद्ध देशभक्त झाले. त्यांतील प्रमुख नेताजी बोस, बॅ. सेनगुप्ता, डॉ. घोष हे होत. प्रिय पत्नीने, वासंतीदेवीने पतीचें अनुकरण केलें.

## सहकुटुंब कारागृहवास

सरकार खवळलें व वासंतीदेवी तुरुंगांत डांबली गेली. आईनंतर प्रिय पुत्र चिररंजन दडपशाहीला बळी पडला. बहीण ऊर्मिलादेवीचीहि तीच गत झाली. १९२१ च्या डिसेंबरमध्ये अहमदाबादला भरणाऱ्या काँग्रेसचे चित्तरंजन दास अध्यक्ष निवडले गेले होते. ते अध्यक्षीय भाषण लिहिण्यांत मग्न होते. अखिल भारत त्यांच्या मार्गदर्शनाची चातकाप्रमाणे वाट पाहत होता. इतक्यांत त्यांच्यावर खटला भरण्यांत आला व त्यांना सहा महिन्यांची सश्रम कारागृहवासाची शिक्षा ठोठावण्यांत आली. ती त्यांनी हसत मुद्रेने स्वीकारली. भारताचा अनभिषिक्त राजा होण्याची घटका भरत आली होती, पण ती पुढील वर्षीं भरावयाची होती. राज्याभिषेकास निघालेल्या रामास वनाचा मार्ग धरावा लागला. अगदी तसेंच हें झालें.

## काँग्रेसचे अध्यक्ष व स्वराज्यपक्षाचे जनक

१९२२ मध्ये रोगग्रस्त देहाने ते तुरुंगाच्या बाहेर आले. ठरल्याप्रमाणे ते गया काँग्रेसचे एकमताने अध्यक्ष निवडले गेले. त्यांनी अध्यक्षपदावरून कौन्सिल-प्रवेशाचें समर्थन केलें व सनदशीर प्रतिकाराची योजना देशापुढे ठेवली. आयर्लंडांतील बॅ. पार्नेलचें धोरण येथे ते अनुसरूं इच्छीत होते. गुहेंत शिरून सिंहाशीं लढत घेण्याचें त्यांचें करारी व निर्भय धोरण

होतें. त्यांनी विरोधकांना नमवून काँग्रेसपुरस्कृत स्वराज्यपक्षाची स्थापना केली व मध्यवर्ती विधिमंडळांत प्रवेश केला. स्वराज्य-पक्षाचें समर्थन करणाऱ्या " The Forward " वर्तमानपत्राचें त्यांनी यशस्वी रीत्या संपादन केलें. चित्तरंजनांचे रसाळ लेख वाचक आस्वादीत. त्यांच्या काव्यमय लेखणीने रूक्ष राजकारणाला सुरस बनविलें. १९२३ पासून मृत्यूपर्यंत ते स्वराज्यपक्षाचे मुखंड होऊन विधिमंडळांत सरकारशीं सनदशीर लढा लढत होते. " I shall either mend or end the council." " मी एक तर कौन्सिल मोडीन अथवा सुधारीन " या भीष्मप्रतिज्ञेने त्यांना विधिमंडळांत प्रवेश केला. वेळोवेळीं सरकारी अन्यायी बिलांना त्यांनी कसून विरोध केला व सनदशीर प्रतिकाराचा लढा मर्दपणें लढविला.

### त्यागाची पराकाष्ठा

बॅ. चित्तरंजनांनी आपली रुपयांची टांकसाळ असणारी वकिली १९२१ च्या असहकारितेंतच सोडली. त्या वेळीं त्यांची मासिक प्राप्ति पन्नास हजार रुपयांची होती असें म्हणतात. कामधेनूला त्यागणारा चित्तरंजन सामान्य नव्हे. ते पुन्हां कोर्टांत–इंग्रजांच्या कोर्टांत–वकील म्हणून उभे राहिले नाहीत. उक्ति तशी कृति. पुढे टाकलेलें पाऊल मागे घ्यावयाचें नाही हेंच थोरांचें वैशिष्ट्य पुढे, राहिलेलें प्रासादतुल्य घरहि त्यांनी देशास अर्पण केलें. तेथे आता गरिबांसाठी मोफत दवाखाना आहे. कोण हा स्वार्थत्याग ! त्यागाच्या जणू लाटाच त्यांच्या हृत्सागरांत उसळत. त्यांचा हा निस्सीम त्याग पाहून वर्तमानपत्रकारांनी स्वयंस्फूर्तीने त्यांना 'देशबंधु' म्हणून गौरवपूर्वक संबोधिलें. बॅ. चित्तरंजन 'देशबंधु दास' झाले. जिवाचें सोनें झालें. जिवाचा शिव झाला. आता 'पूर्णत्वाच्या पलीकडे नष्टत्वाचे उभे कडे !' विकसित झालेलें फूल पडणार व सुकणार.

### अकल्पित शोचनीय निधन

१९२५ सालच्या जून महिन्याची अपशकुनी सोळावी तारीख उजाडली. देशबंधु विधिमंडळाच्या कामकाजासाठीं सिमल्याला गेले होते. अलीकडे त्यांचें शरीर थकत चाललें होतें. देशस्वातंत्र्याच्या चिंतेने ते व्याकुळ झाले होते. अशा नाजूक परिस्थितींत हृद्रोगाने त्यांच्यावर

चोरटा हल्ला केला. विश्वासघात झाला, व देशबंधु त्याला बळी पडले. त्यांचा पवित्र मृत देह कलकत्त्याला नेण्यांत आला. लक्षावधि लोक दर्शनाला जमले. न भूतो अशी प्रचंड प्रेतयात्रा निघाली. म. गांधी धावून गेले. त्यांनी शवाला खांदा दिला. सारें राष्ट्र शोकसागरांत बुडालें. सर्वत्र शोक-सभा झाल्या. गुणवर्णनें झालीं. कविसम्राट् रवीन्द्रनाथ उद्गारले,

"देशबंधु मूर्तिमंत यज्ञ होते!"

● ● ●

क्र. 6970

भारत-कोकिला

# सरोजिनी नायडू

( १८७८-१९४९ )

" The function of a poet is not merely to be isolated in ivory towers of dreams set in a garden of roses, but his place is with the people in the dust of the highways. Therefore I, a weak woman have come out of my home. I, a dreamer of dreams have come into the market place and I say " Go forth, Comrades to Victory. "

—S. *Nayadu*



[ गुलाबांच्या उद्यानांत हस्तीदंती शिखरावर स्वप्नांमध्ये केवळ गढून जाणें कवीचें कार्य नाही. त्याचें खरें स्थान राजपथावर धुळींत उभें राहून सामान्य जनांना कर्तव्याभिमुख करणें हें आहे. म्हणून माझ्यासारखी स्वप्नाळू अबला घराबाहेर येऊन गजबजलेल्या बाजारांत उभी राहते व माझ्या देशबांधवांना उत्तेजन देते कीं, " बंधूंनो, पुढे जा व विजय प्राप्त करा. " ]

## हृद्गत

तुम्ही काव्य-संगीताची गंधर्वनगरी सोडून रूक्ष राजकारणांत कां पडला ? असा मार्मिक प्रश्न एका केवल कलावादी गृहस्थाने देवी सरोजिनी नायडूंना विचारला. त्यांचें उत्स्फूर्त व बिनतोड उत्तर वर उद्धृत केलें आहे. हें नुसतें उत्तरच नाही तर देवी सरोजिनी नायडूंच्या जीवनाचें सारसर्वस्व आहे. आत्मप्रकटीकरण आहे. कवीची सृष्टि अपरा आहे. त्याला परिस्थिति-विन्मुखता हवी. रखरखीत मानवी जीवनाशीं त्याचा काय संबंध ? काव्याचा, कलेचा, जीवनाशीं काय संबंध ? असें नवोदित केवल कलानंद-वादी बरळतात, भोगवादी बरळतात. अशांच्या नेत्रांत अभिजात कवयित्री, भारतकोकिला देवी सरोजिनी नायडू यांनी वरील उत्तराद्वारें चरचरीत अंजन घातलें. यक्षनगरींत वावरणारी ही स्वप्नाळू युवती भारतीय स्वातंत्र्य-संग्रामांत आघाडीवर लढत होती व लढतां लढतां आपल्या काव्यमय वाणीने वीरबंधूंना विजय प्राप्त करण्यास उत्तेजीत होती. केवढें उदात्तरम्य दृश्य ! केवढें उदात्तरम्य जीवन ! आपण त्याचें सौंदर्य-दर्शन घेऊं या.

## शास्त्रज्ञ पित्याची कवयित्री कन्या

अभिजात कवयित्री सरोजिनींचा जन्म हैद्राबाद येथे १८७८ सालीं फेब्रुवारीच्या तेरा तारखेस झाला. काय चमत्कार पाहा ! शास्त्रज्ञ-विज्ञान-शास्त्रज्ञ-पित्याला कवयित्री पुत्री प्राप्त झाली. डॉ. अघोरनाथ चट्टोपाध्याय पडले विज्ञानशास्त्राचे ( Physics ) डी. एस्सी. ते पहिले हिंदी विद्यार्थी कीं, ज्यांनी आपल्या बुद्धिबळाने विलायतेंत विज्ञानशास्त्रांत डॉक्टरेट संपादिली. ते दांडगे विद्याव्यासंगी व शिक्षणप्रेमी होते. पण विद्येमुळे त्यांच्या बुद्धीला जडत्व किंवा स्वभावामध्ये विकृति वा रूक्षता आली नव्हती. त्यांचा स्वभाव अत्यंत गोड व कोमल होता मधुर स्वभावामुळे ते यशस्वी शिक्षण-शास्त्रज्ञ झाले. त्यांनी हैद्राबादला निजाम कॉलेजची स्थापना केली व आपलें सर्व जीवन शिक्षणाच्या पवित्र कार्याला अर्पण केलें. आपल्या चारित्रनायिकेवर त्यांचें गाढ प्रेम होतें. तिचे कमलनेत्र बघून त्यांनी तिला सरोजनयनी म्हणून लडिवाळपणें संबोधिलें. त्याचेंच संक्षिप्त व सुटसुटीत रूप सरोजिनी हें आहे. पित्याच्या खास नजरेखालीं सरोजिनीचें शिक्षण सुरू झालें. त्यांच्या

शिक्षणाचा श्रीगणेशा व इतिश्री इंग्रजी भाषेमधून झाली. याचा दुष्परिणाम असा झाला कीं, सरोजिनी मातृभाषेला व देशी भाषांना पारखी झाली. केवळ बाराव्या वर्षीं त्या मद्रास विश्वविद्यालयाची मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्या.

**बाला कवयित्री**

शेत खोदतां खोदतां अकस्मात् हिरा सांपडावा, तद्वत् बाला सरोजिनीला एके दिवशीं आपल्या ठुत दैवी काव्यप्रतिभेची जाणीव झाली. ती एक कठीण उदाहरण सोडविण्यांत गर्क झाली. उदाहरण सुटेना. मति कुंठित झाली. पावसाळ्यांत झऱ्यामधून पाणी बुडबुडावें तशा सहजपणाने त्यांच्या मुखांतून काव्यपंक्ति बाहेर पडल्या. त्यांना अननुभूत आनंद झाला. आत्मतत्त्वाची जाणीव झाली. ‘Poets are born and not made.’ ‘कवि जन्मावा लागतो, घडून होत नाही’, हें खरें. इतरांना आनंद झाला पण विज्ञानशास्त्रज्ञ वडील हिरमुसले झाले. त्यांच्या तिच्यासंबंधीच्या आशा मावळल्या. तिने आंतरराष्ट्रीय कीर्ति त्यांच्या विषयांत संपादावी अशी त्यांची इच्छा होती. काल्पनिक काव्यसृष्टि व कठोर सत्याची जाणीव करणारें विज्ञानशास्त्र यांच्यांत साम्य तें कसलें? त्यांनी आपली निराशा व्यक्त केली नाही. इकडे सरोजिनीने वयाच्या केवळ तेराव्या वर्षीं ‘ तडागराणी ’ नांवाचें खंडकाव्य रचलें. त्यांत त्यांच्या प्रतिभेची विलोल भरारी व भावोत्कटता निदर्शनास आल्या काव्यरचनेचा विकास नाट्यरचनेंत, दृश्यकाव्यांत झाला. बाला कवयित्रीचें नांव सर्वांच्या जिभेवर नाचूं लागलें. वडिलांनी त्यांना पुढील शिक्षणासाठी विलायतेला पाठविलें.

**विलायतेंत अध्ययन**

१८९५ मध्ये नवोदित कवयित्री सरोजिनी लंडनच्या सुविख्यात किंग्ज कॉलेजमध्ये दाखल झाली. तेथे वर्षभर राहिल्यानंतर त्यांची दृष्टि विख्यात केंब्रिज विश्वविद्यालयाकडे वळली व त्या केंब्रिज येथील गर्टन कॉलेजच्या विद्यार्थिनी झाल्या. त्यांचें तेथे दोन वर्षें वास्तव्य होतें. या दोन वर्षांत त्यांनी आंग्लकाव्याचा मनमुराद आस्वाद घेतला व आपल्या काव्य-बीजांकुराचें संवर्धन केलें. विलायतेची हवा त्यांना मानवली नाहीं, म्हणून इटलीच्या भूमध्यसामुद्रिक हवामानांत कांही महिने वास करण्याचा त्यांना डॉक्टरनी सल्ला दिला. प्रेमळ पित्याची संमति मिळतांच त्या इटलीला गेल्या.

## इटलीमधील वास्तव्य

इटलीचें नैसर्गिक सौंदर्य पाहून त्यांचें कविमन उल्हसित झालें. महाकवि व कलावंत डांटे, व्हर्जिल, राफेल आणि माइकेल एंजिलो यांच्या काव्यगंगा ज्या इटलींत प्रवाहित झाल्या, त्या इटलीच्या आल्हाददायी वातावरणांत त्या रमल्या. द्राक्षांच्या व इतर फळांच्या यथेच्छ सेवनाने त्यांचें पूर्वारोग्य त्यांना अल्पावधींतच प्राप्त झालें व महाकवींच्या काव्यास्वादाने त्यांची काव्यलतिका पल्लवित होऊं लागली. एवम्, मनाने व देहाने परिपुष्ट होऊन त्या मायभूमीस कोणतीहि पदवी न संपादितां परतल्या. पदवी नव्हती, पण पात्रता तर होती ना ?

## सामाजिक कार्याचा श्रीगणेशा

आता यौवनसंपन्न सरोजिनीला मातृपदाची हुरहूर लागली. वेलीचें सार्थक फुलें-फळें धारण करण्यांत आहे स्त्रियांचें जन्मसाफल्य मातृपदावर विराजमान होण्यांत आहे. आंग्लविद्याविभूषित सरोजिनीने पतीची निवड स्वतः केली. ती पडली बंगाली युवती व तिचे प्रियकर पडले मद्रासी मेजर डॉ. एम्. जी. नायडू. अर्ध शतकापूर्वीचा तो काळ होता. तेव्हा आपण कल्पना करूं शकतों कीं, हा आन्तरजातीय व आंतरप्रांतीय विवाह केवढा गाजला असेल व त्याने केवढी खळबळ उडविली असेल. अंधरूढीचीं बंधनें तोडून समाजसुधारणा करण्याचा त्यांनी निर्धार केला व हें स्वयंवर घडून आलें. सरोजिनी नायडूंनी पाश्चिमात्य सुधारणेचा ग्राह्यांशच घेतला. त्यांनी भारतीय संस्कृतीमधील मातृपदाच्या श्रेष्ठत्वाची कधीहि अवहेलना केली नाही. कुटुंबसंस्थेच्या पावित्र्याला धक्का लावला नाही. त्यांच्या डोळ्यासमोर सीता, सावित्री यांचे आदर्श होते. त्या हेच आदर्श आपल्या अमृतमधुर व प्रभावी वाणीने महिलासमाजापुढे ठेवीत. त्यांच्या मनाचा गाभा शुद्ध भारतीय होता. एकदा बंगालच्या गव्हर्नराने भारतीय स्त्रियांसंबंधी अनुदार उद्गार काढले. सरोजिनी नागिणीप्रमाणे त्यांच्यावर चवताळल्या व गव्हर्नर महाशयांना क्षमा प्रार्थावी लागली. कोण हा स्वाभिमान ! हा स्वाभिमान त्यांच्या देशाभिमानाचा पाया होता.

### राजकीय जीवन

भारतमातेच्या भिन्नधर्मीय पुत्रांनी एकोप्याने राहावें, सलोख्यांत नांदावें, भाऊ भाऊ म्हणून वाढावें अशी त्यांची धारणा. हिंदु-मुस्लिम-ऐक्य हें त्यांचें ध्येय. त्याच्याकरिता त्यांनी १९१३ मध्ये लखनौच्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनांत हृदय हालवून सोडणारें भाषण केलें. १९१६ सालीं लखनौच्या काँग्रेसमध्ये घडून आलेला समेट पाहून त्यांचें मन आनंदाने फुलूं लागलें. ॲनी बेझंटबाईंनी सुरू केलेल्या होमरूल लीगच्या चळवळींत त्यांनी बेधडक उडी घेतली व आपल्या अस्खलित वक्तृत्वाने भारतांतल्या विशेषतः मद्रासच्या बाजूला जनतेंत अभूतपूर्व जाग्रति निर्माण केली. त्यांचें व्यक्तित्व जनतेच्या डोळ्यांत भरलें व त्यांना होमरूल लीगच्या शिष्टमंडळांत हिंदी स्त्रियांचे प्रतिनिधि म्हणून घेण्यांत आलें. त्यांच्या कार्याचा उचित गौरव झाला.

### कवयित्रीचा विलायतेंत सन्मान

१९१९ च्या प्रारंभीं त्या विलायतेंत गेल्या. हिंदी स्त्रियांना मताधिकार मिळावेत म्हणून त्यांनी पार्लमेंट कमिटीपुढे साक्ष दिली व आपल्या काव्य-मय वक्तृत्वाच्या प्रभावाने आंग्ल जनतेंत मानसन्मान प्राप्त केला. त्यांच्या इंग्रजी भाषेंत रचलेल्या वीणाकाव्यांनी ( Lyric Songs ) विद्वज्जनांत त्यांचा बहुमान झाला. या वेळीं त्या कवितेंत बोलत, कवितेंत लिहीत व काव्यसृष्टींतच वावरत. त्यांचें जीवन काव्यमयच झालें होतें. सौंदर्य-संवर्धनाची पिपासा व विलास-प्रियता यौवनसुलभ असते. सरोजिनी नायडूंनी लंडनला परत येतांना पॅरिसला उत्तमोत्तम उंची साड्या खरेदी केल्या. पण हें सर्व बाह्यांग. त्यांचें हृदय देशप्रेमाने थबथबलेलें होतें. याच सुमारास त्यांच्या भावगीतांचा संग्रह " The Golden Threshold " " सोनेरी देहली " प्रकाशित झाला. त्यांतील नितान्तमधुर गेय गीतांनी इंग्रजी काव्यामध्ये बहुमोल भर टाकली. कालान्तराने "The Bird of Time" " कालविहंगम " व " Broken Wings " " भग्नपंख " हीं आकर्षक नांवें धारण करून त्यांचीं काव्यें ग्रंथरूपाने प्रकाशित झालीं. या दोन्ही काव्यग्रंथांत भारतीयांच्या आशा-निराशा व भावनोत्कटता यांचें

सुंदर चित्रण झालें आहे. परंतु "सोनेरी देहली "मध्ये गुंफलेलीं प्रेमकाव्यें काव्यगुणांनी जास्त समृद्ध आहेत. विश्वकवि रवीन्द्रनाथ टागोर यांनी भारताच्या गूढ अध्यात्मवादाचें दर्शन आपल्या काव्यद्वारां करविलें, तर देवी सरोजिनींनी आपल्या विशुद्ध प्रेमगीतांनी भारतीयांच्या भावनांचें उदात्तरम्य दिग्दर्शन इंग्रजी जाणणाऱ्यांना करवून दिलें. दोघांच्याहि काव्यांमध्ये पुरुष व स्त्री एवढें अंतर आहे.

## उत्कट देशाभिमान

जालियनवाला बागेमधील अत्याचारांचें वृत्त ऐकून त्यांचें हृदय पिळवटून निघालें. त्या वेळीं त्या लंडनला होत्या. त्यांचा मनःक्षोभ अनावर झाला. त्यांनी तेथे एका जाहीर सभेंत या अत्याचारांचें असें हृदयभेदी वर्णन केलें. त्या म्हणाल्या, "My sisters were stripped naked, they were flogged, they were outraged." "जालियनवाला बागेंत माझ्या देश-भगिनींना नग्न करून फटके मारण्यांत आले व त्यांच्यावर अमानुष अत्याचार करण्यांत आले." असे इंग्रजी सत्तेचे सैतानी चाळे हिंदुस्थानांत चालू आहेत. तुम्हां सभ्य म्हणविणाऱ्या इंग्रजांना हें शोभतें का? असा खडा सवाल त्या जाहीर सभेंत टाकीत. त्यांच्या अंतःकरणामधील देशभक्तीच्या स्फुलिंगाने आता पेट घेतला. म. गांधींनी प्रतिकारार्थ सुरू केलेल्या सत्याग्रहाने त्यांचें मन ओढलें गेलें. त्यांच्या भावनिष्ठ कविमनाला म. गांधींचा कार्यक्रम पटला व त्यांनी म गांधींना आपला राजकीय गुरु मनोमन ठरविलें.

## मोहनाची मुरली

म. गांधीप्रणीत असहयोगांत त्यांनी तनमनधनाने उडी घेतली. त्या स्वतःला "मोहनाची बांसरी" म्हणवून घेण्यांत धन्यता मानीत. किती समर्पक ही उपमा! किती यथार्थ आत्मप्रकटीकरण! मोहनदासांच्या वेणुसुधेने सर्वांना मोहित केलें. वेळ पडल्यास ही बांसरी रणभेरीचें कार्य करी. नागपूरचा झेंडा-सत्याग्रह यशस्वी करण्यांत याच रणभेरीचा भाग होता. त्यांच्यावर सरकारी अवकृपेची करडी नजर होती, पण त्यांनी तिला भीक घातली नाही असहयोगाने आणि विशेषतः म. गांधींच्या सहवासाने ही

सौंदर्य-विलासी देवता अकस्मात् बैरागिणीच्या स्वरूपांत परिणत झाली. त्यांचा कायापालट झाला. १९२३ मध्ये म. गांधींवर ससून हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया झाली. सरोजिनींनें जिवाभावाने त्यांची शुश्रूषा केली.

## आफ्रिकेंतील कार्य

म. गांधींनी त्यांना दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी प्रजाजनांचे मदतीसाठी पाठविलें. मोहनची मुरली आफ्रिकेला गेली व मोहनच्याच कार्याची पूर्तता करूं लागली. त्यांनी सहा महिन्यांच्या दीर्घ भ्रमणांत हिंदी प्रजाजनांना धीर दिला. त्यांच्यामध्ये ऐक्याची जाणीव निर्माण केली, संघटना केली व तिच्यातर्फे आफ्रिकन सरकारकडे शिष्टमंडळ नेलें. त्यांचा तेथे उचित मान झाला. मोम्बासा येथे भरलेल्या दक्षिण आफ्रिका भारतवासीय काँग्रेसच्या त्या अध्यक्ष निवडल्या गेल्या. आपल्या अध्यक्षीय भाषणांत त्यांनी जनरल स्मटस्‌ला त्यांचें जुलमी धोरण त्वरित बदलण्याचा करडा इशारा दिला. १९२४ च्या जुलैंत त्या भारताला परतल्या. देशाने त्यांचें प्रचंड स्वागत केलें.

## काँग्रेसच्या अध्यक्षपदावर

भारतांत जातीय वैमनस्याच्या ज्वाला भडकल्या. हिंदुमुसलमान-देशबंधु आपसांत लढूं लागले. काँग्रेसचे अध्यक्ष कोणाला करावें हा मोठा प्रश्न देशाला पडला. सर्वांचें लक्ष्य देवी सरोजिनी नायडू झाल्या. त्या कानपूर-ला १९२५ मध्ये भरलेल्या काँग्रेसच्या अध्यक्ष एकमताने नियुक्त झाल्या. हिंदी स्त्रीने हा बहुमान पहिल्यांदाच पटकाविला. भारतीय स्त्रीत्वाचा हा अनन्य–सामान्य बहुमान झाला. त्यांच्या भावपूर्ण व काव्यमय भाषणाने सर्व लोक तल्लीन झाले होते. सर्व काँग्रेस चित्रासारखी स्तब्ध झाली होती. हिंदु-मुसलमान–ऐक्याची महती व आवश्यकता त्यांनी प्रतिपादिली व भारतीय जनतेला स्वातंत्र्यपथावर अग्रेसर होण्याचा संदेश दिला. त्यांच्या भाषणां-तील पुढील वाक्य प्रत्येकाच्या कानांत निनादलें व हृदयाला बाणासारखें जाऊन भिडलें. “ In the battle for liberty fear is the one unforgivable treachery, and despair the one unforgivable sin.” “ स्वातंत्र्याच्या समरांत भय अक्षम्य अपराध आहे व निराशा अक्षम्य पाप आहे. ” किती जिवंत सुभाषित आहे हें !

## अमेरिकेंत संचार

अमेरिकेच्या आग्रहाच्या निमंत्रणामुळे १९२९ सालीं त्या तिकडे गेल्या. त्यांच्या भाषणाला कोण गर्दी होई ! भाषणाचें शेवटचें तिकीट तीन रुपयांचें–एक डॉलरचें–असे, तरी व्यवस्थापकांना तिकीट-विक्री बंद ठेवावी लागे. अमेरिकन लोकांनी त्यांच्या मधुर व कलावन्त वाणीचें विलोल नर्तन पाहून त्यांचा जागोजागीं सन्मान केला. देवी सरोजिनीने भारताचा संदेश संयुक्त संस्थानांना दिला. तेथे तो निनादला. अशा रीतीने त्रिखंडकीर्ति संपादून त्या भारताला परतल्या.

## मुरलीची रणभेरी झाली

लाहोर कॉंग्रेसच्या आदेशानुसार म. गांधींनी कायदेभंगाचें रणशिंग फुंकलें मुरलीची रणभेरी झाली व तिने सर्वांना हादरून सोडलें. म. गांधींना दांडीला मिठाच्या कायदेभंगाबद्दल अटक करण्यांत आली. त्यांची जागा कोण भरून काढणार ? देवी सरोजिनी पुढे सरसावल्या. महात्माजींच्या, गुरूच्या पाऊलावर पाऊल त्यांनी निर्भयतेने टाकलें. शंभर सत्याग्रही सैनिक बरोबर घेऊन त्यांनी धारास्नाच्या मिठागरांत बेधडक प्रवेश केला. मित्र हो, हातांत उपसलेली नंगी तरवार घेऊन अश्वारूढ झालेल्या स्वातंत्र्यलक्ष्मीचें–झांशीच्या राणी लक्ष्मीबाईचें–चित्र आपल्या मनश्चक्षूपुढे आणा व सैतानी इंग्रज नोकरशाहीने चिडून, लाठीहल्ला करून, घोड्यांच्या टापांखाली जनतेला चिरडून, सेनानी सरोजिनीला आपल्या सत्याग्रही सैनिकांसह वेढलेलें दृश्य आपल्या डोळ्यांसमोर आणा. निःशस्त्र सरोजिनीला सुसज्ज व सशस्त्र पोलिसांचा गराडा पडला. ते दिवस पडले मे महिन्याचे. ना खायला, ना प्यायला. वरून दाहक सूर्याचा मारा. तब्बल तीस तासपर्यंत सरोजिनीची तुकडी वेढली गेली होती. सरोजिनी शांत व निर्भय सिंहिणी-प्रमाणे देशभक्तीचीं गाणीं गर्जत होती. मुखावर अहिंसात्मक शौर्याचें तेज विलसत होतें. हें आहे सरोजिनीचें–वीरांगनेचें–स्वरूप. शेवटीं नोकरशाहीने हात टेकले व रात्रीं दोन वाजतां देवी सरोजिनीला कांही सैनिकांसह अटक झाली. त्यांच्या शौर्याची सर्वत्र वाहवा झाली. कवयित्रीच्या क्रियाशीलत्वाचें अभिनंदन झालें. वेळ पडल्यास कवयित्री समरांगणांत उतरून देशवीरांना

लढण्यास प्रोत्साहित करूं शकते असा प्रत्यय आला. देवी सरोजिनींची लोकप्रियता दुणावली.

**कॉंग्रेस-कार्य**

म. गांधींच्याबरोबर भारतीय स्त्रियांच्या प्रतिनिधि म्हणून त्या लंडनला वर्तुळपरिषदेसाठी गेल्या. त्यांनी म. गांधींची पूर्णतया साथ केली. पुन्हा १९३२ सालच्या कायदेभंगांत त्यांना बेमुदत अटकेंत ठेवण्यांत आलें. म. गांधींच्या राजकीय धोरणाचा त्या निष्ठेने प्रचार करीत. होतां होतां १९४२ साल आलें. वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांबरोबर त्यांनाहि अटक करण्यांत आली व त्यांची रवानगी म. गांधींच्या सहवासांत आगाखानांच्या प्रासादांत करण्यांत आली. त्या दोन वर्षेंपर्यंत अटकेंत होत्या. महात्माजींच्या आमरण उपोषणांत त्यांनी त्यांची अहोरात्र शुश्रूषा केली. त्यांच्या खालावलेल्या प्रकृतीकडे बघून सरकारने त्यांची मुक्तता केली. ही मुक्त झालेली सिंहीण आसेतुहिमाचल संचार करून भेदरलेल्या जनतेला धीर देई.

**मयूरासनावरील शारदा**

१९४६ मध्ये कॉंग्रेसने मध्यवर्ति मंत्रिमंडळांत प्रवेश केला; पं. जवाहरलाल नेहरू परराष्ट्रमंत्री झाले. त्यांनी पुढाकार घेऊन आशियांतील राष्ट्रांमध्ये सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय प्रेमसंबंध वाढावे म्हणून एक परिषद् दिल्लीला भरविली. ही आशिया-परिषद् दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ल्यांतील दिवाणी-ई आम-दरबारांत भरली होती. अध्यक्ष भारत-कोकिला देवी सरोजिनी नायडू मयूरासनावर-ज्या उच्चासनावर शहाजहान बसत असे त्या प्रमत्त मयूरासनावर-विराजमान झालेली पाहून, प्रत्यक्ष शारदाच अवतीर्ण झाली कीं काय असा भास होत असे. विशेषतः जेव्हा देवी सरोजिनींच्या मुखांतून अमृतमय काव्यपंक्ति एकामागून एक बाहेर पडूं लागल्या, तेव्हा तर साक्षात् सरस्वतीच बोलते आहे कीं काय असा भास होई. ही परिषद् यशस्वी होण्यांत त्यांचा विशेष भाग होता.

**राज्यपाल सरोजिनी**

भारत स्वतंत्र झाला. इंग्रज गव्हर्नर्स गेले. त्यांच्या जागा सुयोग्य व्यक्तींनीच भरून काढावयाच्या होत्या. राष्ट्रीय सरकारने संयुक्तप्रांताचे

गव्हर्नर म्हणून देवी सरोजिनींची निवड केली. राष्ट्रीय सरकारची आज्ञा म्हणजे भरीव राष्ट्रसेवा करण्याची संधी अशी सरोजिनींची धारणा. राष्ट्रमातेची सेवा करण्यास त्या पुन्हा धावून गेल्या. जशा त्या धारास्नाच्या मिठागरावर धावून गेल्या तशाच उत्कटतेने लखनौला गव्हर्नरपद स्वीकारावयास गेल्या.

## मोहनामागून मुरली

१९४८ मध्ये म. गांधींनी इहलोक सोडला. मोहनाने मुरलीला सोडून मोक्षप्राप्ति केली. मोहनावांचून मुरली कशी वाजेल? जगाला कशी गुंगवील? मोहन-मुरलीचा वियोग म्हणजे जलापासून माशोळीची ताटातूट. ती तडफडणार व अल्पावधींतच इहलोक सोडून जाणार. अगदीं तसें झालें देवी सरोजिनींचें. महात्माजींच्या खुनानंतर त्यांच्या मनावर विषण्णता आली, जीवनांतील आनंद मावळला. जीवन शून्यवत् झालें. अखेर १८ फेब्रुवारी १९४९ ला तें जीवन शून्यांत—ब्रह्मांत—विलीन झालें. भारतकोकिला सरोजिनी गेली, पण तिच्या मधुर काव्यकूजनाचे पडसाद अद्यापिहि हिंदी रसिकजनांना आह्लादवीत व उत्तेजित करीत आहेत.

• • •

भारताचे लोहपुरुष

# सरदार वल्लभभाई पटेल

( १८७५—१९५० )

Fame is the fragrnce
Of heroic deeds,
The flowers of chivalry
And not of weeds.

—*Longfellow*.

[ पराक्रमी कृत्यांचा सुगंध म्हणजे कीर्ति. कीर्तिसुगंध शौर्याच्या सुमनांचा असतो. निष्कर्तृत्वाच्या लव्हाळी पुष्पांचा नसतो. ]

" सरदार वल्लभभाई पटेल यांचें नांव स्वातंत्र्याच्या लढ्यांतील झुंजार नेते व एकसंध भारताचे निर्माते म्हणून युगानुयुगें भारतीय



इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहिलें जाईल. त्यांचें वीरोचित जीवन-चरित्र वादळी समुद्रांतील दीपगृहाप्रमाणे मार्गदर्शन करीत राहील." असे गौरवोद्गार भारताचे प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांनी स्वर्गीय सरदार वल्लभ-भाईंच्या चरणीं श्रद्धाञ्जलि अर्पण करतांना भरलेल्या कंठांतून काढले. थोड्या वेळापूर्वी सुकलेल्या गुलाब-पुष्पाचा सुगंध जसा दरवळतो तद्वत् सरदारांच्या कीर्तीचा सुगंध अखिल भारतवर्षांत सांप्रत

दरवळत आहे. आबालवृद्धांच्या ओठांवर त्यांचें नांव नाचत आहे. हें सर्व कशाचें फळ? ही लोकोत्तरता त्यांनी कशी संपादिली? ह्याचा रम्योदात्त वृत्तान्त आपण पाहू या!

## वीर पित्याचा वीरपुत्र

सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म इ. स. १८७५ मध्ये गुजरात-मधील करमसद गावीं एका सामान्य पटेल घराण्यांत झाला. त्यांचे वडील झवेरभाई वीर, साहसी व निर्भय वृत्तीचे होते. याच पौरुषी गुणांना बुद्धिमत्ता व भक्ति यांची जोड होती. १८५७ सालच्या स्वातंत्र्य-युद्धांत, त्यांनी राणी लक्ष्मीबाईच्या हाताखालीं एक सैनिक होऊन जातीने भाग घेतला होता. अपयशी योद्धा म्हणजे कैदी. तेव्हा १८६० पर्यंत त्यांना कारागृहवासांत सडत पडावें लागलें. त्यांचें जीवन संयमशील असल्यामुळे त्यांना ९२ वर्षांचें दीर्घायुष्य लाभलें होतें. एवम्, देशभक्ति, पराक्रम व संयम ह्या दुर्मिळ सद्गुणांची संपदा सरदार वल्लभभाईंना वारसाहक्काने प्राप्त झाली. या वडिलोपार्जित अल्प भांडवलावरच, स्वकर्तृत्वाने सरदार वल्लभभाईंनी केवढा देशव्यापी प्रचंड व्यापार थाटला, हेंच आपणांस पाहावयाचें आहे. वल्लभभाईंचें बालपण खेड्यांतच गेलें. म्हणून ग्रामीण जीवनाशीं ते तात्काळ तद्रूप होत. त्यांचे वडील पडले शेतकरी. ते त्यांना सकाळींच शेतावर घेऊन जात व चालतां चालतांच पाढे व उजळणी शिकवीत. बाल वल्लभ पडला एकपाठी. त्याची स्मृति म्हणजे फत्तरा-वरची रेषा. एक-दीड वर्षांतच वडिलांजवळची ज्ञानाची शिदोरी त्यांनी फस्त केली व त्यांची ज्ञानाची तृषा जास्तच प्रदीप्त झाली. वडिलांनी हें ताडलें व त्यांना नडियादच्या माध्यमिक शाळेंत दाखल केलें.

## मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात

नेपोलियन बोनापार्ट, लॉर्ड क्लाइव्ह वगैरे राज्यसंस्थापकांप्रमाणे सरदार पटेल विद्यार्थिदशेंत फार खोडकर होते. त्यांच्या उनाडपणाला मर्यादा नव्हती. नडियादच्या हायस्कूलमधील सर्व अध्यापकांशीं त्यांचे केव्हा ना केव्हा तरी खटके उडाले. पण त्यांची तैलबुद्धिच नेहमी त्यांचें रक्षण करी. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात त्याप्रमाणे वल्लभभाईंचें भावी

नेतृत्व या वेळीं निदर्शनास आलें. हायस्कूलमधील एक शिक्षक पुस्तकांचा व्यापार करीत. त्यांच्याचजवळून विद्यार्थ्यांनी पुस्तकें घ्यावींत असें ते विद्यार्थ्यांना शिकवीत असतांना बजावीत. हा त्यांच्या अधिकाराचा दुरुपयोग विद्यार्थ्यांना किती दिवस मानवेल? पण विरोध करावयास कोणी धजेना. 'मांजराच्या गळ्यांत घाट कुणीं बांधावी?' हा होता प्रश्न. वीर वल्लभभाई पुढे सरसावले. त्यांनी विद्यार्थ्यांची सभा भरविली व त्यांत जाहीर केलें कीं, एकानेहि सदरहू शिक्षकापासून पुस्तक विकत घेऊं नये. विद्यार्थ्यांत जागृति निर्माण झाली. तिचा परिणाम असा झाला कीं, ५–६ दिवस त्यांनी कडकडीत हरताळ पाळला व विद्यालय बंद पाडलें. सरतेशेवटीं त्या अध्यापकाला नमतें घ्यावें लागलें. ही होती वल्लभभाईंची पहिलीवहिली यशस्वी चळवळ. त्यांच्या निर्भयता, संघटनक्षमता व नेतृत्व आदि गुणांचें केवळ दिग्दर्शन होतें. भावी नाटकाची ही केवळ नांदी होती.

### व्याजोक्त महापुरुष

एकदा गुजराथी शिकविणाऱ्या पण संस्कृतचा अतिरिक्त अभिमान असणाऱ्या छोटेलाल नांवाच्या अध्यापकाने उपहास करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी वल्लभभाईला म्हटलें, "हे महापुरुष संस्कृत सोडून गुजराथी शिकावयास आले." वर्गांत खसखस पिकली. पण स्वाभिमानी वल्लभभाईने तात्काळ प्रत्युत्तर दिलें, "आम्ही सर्वच जर संस्कृत शिकूं लागलों तर आपली काय वाट?" शिक्षक थिजले व विद्यार्थी हर्षले. पण छोटेलालभाईंचे व्याजोक्त महापुरुष खरोखरच महापुरुष झाले. अर्थात् हें पाहण्यास छोटेलालजी नव्हते. बडोदा हायस्कूलचे हेडमास्तर श्री. नरवणे यांनी तर वल्लभभाईंची कुशाग्र व तरल बुद्धिमत्ता पाहून असे उद्गार काढले कीं, "मीं असा असामान्य विद्यार्थी पाहिला नाहीं." ही नैसर्गिक असामान्यताच मनुष्याला थोर पदवीला नेते. वल्लभभाई बडोद्याच्या हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तम रीतीने उत्तीर्ण झाले.

### वकिलीचा श्रीगणेशा

वडिलांची आर्थिक परिस्थिति समाधानकारक नसल्यामुळे कॉलेजचें

शिक्षण त्यांनी न घेण्याचें ठरविलें. बॅरिस्टर होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती, पण प्रतिकूल परिस्थितीच्या भोवऱ्यांत ते सापडले. त्यांनी सर्व कांही हेरलें व खाजगी रीतीने ते मुंबई इलाख्यांत होणारी वकिलीची परीक्षा पास झाले. त्यांनी गोध्रा येथे वकिली थाटली. वकिलीचा प्रारंभ व दैवाची अनुकूलता एका समयासच प्राप्त झाली. लक्ष्मीची त्यांच्यावर अपार कृपा झाली. कुशाग्र बुद्धीचे, प्रामाणिक व मेहनती वकील म्हणून त्यांची ख्याति झाली. पैसा खोऱ्याने ओढण्याची पाळी. फौजदारी खटल्यांत त्यांचें हमखास यश असे. त्यांच्या सखोल कायद्याच्या ज्ञानाला व उलटतपासणी करण्याच्या चातुर्याला पाहून न्यायाधीश त्यांना वचकून असत. आपलें काम करण्यांत ते एखाद्या योग्याप्रमाणे गढून जात, इतर जग विसरत.

## संसारांत स्थितप्रज्ञता

एकदा वल्लभभाई कोर्टाच्या समोर उभे असतांना त्यांना एक तार देण्यांत आली. ती तार कशासंबंधी असेल हें त्यांनी ताडलें. पण दोन तासपर्यंत आपली बाजू प्रभावीपणाने मांडल्यानंतर, कोर्ट उठून गेल्यानंतर, त्यांनी ती तार हळूच फोडून वाचली. इतर वकील त्यांच्या निर्विकार मुद्रेकडे पाहतच होते. वाचून त्यांनी ती तार ठेवून दिली व पूर्ववत् कारकुनाला खटल्यासंबंधी कांही तरी करावयास सांगूं लागले. वकिलांत चुळबूळ सुरू झाली. एका भारदस्त वकिलाने जवळ जाऊन त्यांना तारेचा मजकूर विचारला. वल्लभभाईंनी शांत चित्ताने उत्तर दिलें कीं, "कुमारी मणीबेनची आई स्वर्गवासी झाली." सर्व वकील हें ऐकून थक्कच झाले. पण वल्लभभाई हे माणसांतील वकील नसून वकिलांतील माणूस होते. विपत्तीमध्ये धैर्य न खचूं देणें हेंच तर थोरांचें लक्षण.

## अनुजाचें औदार्य

स्वतः धन संपादन केल्यावर विलायतेला जाऊन बॅरिस्टर होण्याची त्यांची प्रबल मनीषा होती. संसाराचे पाशहि थोडे सैल झाले. पूर्ववयांत परिस्थितीने त्यांना नाडलें किंवा कांही काल परिस्थितीने त्यांच्यावर मात केली असें म्हणाना. पण असामान्य पुरुष नेहमीच परिस्थिति-पराजित नसतो. अल्पावधींतच तो परिस्थितीवर विजय प्राप्त करतो. परिस्थितीला वाकवितो.

एवम्, वल्लभभाईंनी आता काळाला नमविलें. पण एक भावुक अडचण या वेळीं निर्माण झाली. त्यांना विलायतेला जाण्यासाठी Pass-Port 'देशान्तराचा परवाना' मिळाला, पण मोठी गंमत झाली. पासपोर्टवर नांव होतें. V. J. Patel ज्या दिवशीं पासपोर्टचें पाकीट गोभ्र्याला आलें त्याच दिवशीं त्यांचे वडील बंधु विठ्ठलभाई पटेल तेथे आले. काय योगायोग ! त्यांनी तें वाचलें व विद्युत् संचारल्याप्रमाणे ते एकदम म्हणाले कीं, "हा V. J. Patel पहिल्यांदा विलायतेला जाणार, नंतर धाकटा V. J. Patel जाईल." आज्ञाधारक अनुजाने अग्रजाच्या इच्छेला मान दिला. कोण ही बंधुप्रीति व भक्ति ! तीहि विसाव्या शतकांत ! धन्य तें बंधुद्वय कीं, ज्यांनी मातृभूमीच्या सेवेला आत्मार्पण केलें; राम-लक्ष्मणाची पवित्र स्मृति जागृत केली.

## बॅरिस्टरींत अद्वितीय यश

विठ्ठलभाई बॅरिस्टर होऊन आल्यानंतर वल्लभभाई विलायतेला गेले. पुन्हा विद्यार्थिजीवनाचा योग आला. पण आता वल्लभभाईंमध्ये क्रांति झाली होती. त्यांची बाल्यांतील खोडकर वृत्ति पार नाहीशी झाली होती. ते आता एकान्तसेवी होऊन लंडनच्या वाचनालयांत चपराशी दार बंद करीपर्यंत वाचीत बसत, टिप्पणें घेत. बॅरिस्टरीच्या परीक्षेंत ते पहिल्या वर्गांत पहिले आले. हें अनन्यसामान्य यश संपादणारे वल्लभभाई पहिले हिंदी विद्यार्थी होत, हें विशेष. त्यांना ५० पौंडांची शिष्यवृत्ति देण्यांत आली. परीक्षकांपैकी एकाने तर भारताच्या चीफ जस्टिसकडे शिफारस केली कीं, वल्लभभाईला न्यायविभागांत एखादी उच्च जागा बहाल करण्यांत यावी. भारतमातेच्या दुर्दैवाने तसें झालें असतें तर वल्लभभाई सरदार न होतां सरन्यायाधीश झाले असते; पण आम्हांला त्यांचें चरित्र लिहिण्याचा योग मात्र आला नसता.

## कमाई वल्लभभाईंची व गमाई विठ्ठलभाईंची

अहमदाबाद येथे त्यांनी बॅरिस्टरी थाटली व अल्पावधींत यशस्वी बॅरिस्टर म्हणून हजारो रुपयांची मासिक प्राप्ति त्यांना होऊं लागली. याच वेळीं त्यांच्या वडील बंधूचें–विठ्ठलभाई पटेलांचें–नांव राष्ट्रीय कार्यकर्त्यांत

चमकूं लागले. त्यांनी मुंबईला स्थलान्तर केलें. बॅरिस्टरीपेक्षा सार्वजनिक कार्यांत ते जास्त यशस्वी झाले. विठ्ठलभाईंनी श्रमविभागणी केली व धाकट्या भावाने ती तात्काळ मान्य केली. आज्ञाधारकपणा वल्लभ-भाईंत भिनला होता. वांटणी अशी, विठ्ठलभाईंनी देशसेवा करावी व वल्लभभाईंनी धन संपादन करून अविभक्त कुटुंबाचा खर्च चालवावा. थोडक्यांत, कमाई वल्लभभाईंकडे व गमाई विठ्ठलभाईंकडे---दादांकडे. ही व्यवस्था १९२० सालापर्यंत टिकली. पुढे काय ? बडे भाई सो बडे भाई, छोटे भाई सो सुभानअल्ला ! दोघांनीहि बॅरिस्टरीवर पाणी सोडलें. जें एकदा मनाने घेतलें तें निष्ठापूर्वक पार पाडावयाचें हें वल्लभभाईंचें ब्रीद. त्यांनी १९२० पर्यंत सार्वजनिक कार्याकडे फारसें पाहिलें नाहीं. ते भले आणि त्यांची बॅरिस्टरी भली ! कर्तव्यैकाग्रता हीच यशाची गुरुकिल्ली.

## उपहासक उपासक होतो

१९१४ मध्ये म. गांधी आफ्रिकेंत यश संपादून भारतास परतले व अहमदाबाद येथे त्यांनी आश्रम स्थापिला. बॅरिस्टर वल्लभभाईंना म. गांधींचें बिलकुल आकर्षण वाटलें नाहीं. बॅ. वल्लभभाई पडले व्यवहारी पुरुष. भावना त्यांना आकर्षीत ना, ध्येय त्यांना हालवीना, रोकडा व्यवहार हीच त्यांची वृत्ति. भावुकतेचा त्यांना तिरस्कार वाटे. म्हणून एखादे वेळीं बाररूममध्ये ते म. गांधींचा उपहास करीत. पण म. गांधींचें विभूतिमत्त्व असें कीं, उपहासक उपासक बनले. वल्लभभाई म. गांधींचे उपासकश्रेष्ठ झाले. धीरे धीरे, म. गांधींकडे ते आकर्षित झाले. गुजराथमधील बेगारीचा जुलूम जनतेला असह्य झाला. म. गांधींनी तो बंद करण्यासाठी सरकार-विरुद्ध कंबर कसली. रणदुंदुभीचा आवाज कानीं पडतांच वीरांत चैतन्य सळसळतें, युद्धज्वर सणसणतो, त्याप्रमाणे बॅ. वल्लभभाईंची सुप्त वीरवृत्ति जागृत झाली व ते सच्च्या योद्धयाप्रमाणे म. गांधींच्याजवळ आज्ञेची मागणी करूं लागले. संत गांधीजींनी त्यांना आकर्षिलें नाही, तर युद्धेच्छु सेनापति गांधींनी त्यांना पट्टशिष्य बनविलें. सरकारकडे निर्वाणीचा खलिता गेला. एक तर बेगार बंद करा, नाही तर सत्याग्रहाला तोंड देण्यास तयार व्हा. वल्लभभाईंनीच हा खलिता, नव्हे युद्धाचें आव्हान सरकारला दिलें.

सरकार नमलें व बेगार बंद झाली. बंदुकीची पहिली गोळी झाडण्यापूर्वीच प्रतिपक्षी शरण आला. वल्लभभाईंना हर्ष झाला, वीरोचित आनंद झाला.

## सेनापति गांधींचा सैनिक शिष्य

खेडा जिल्ह्यांत दुष्काळाने कहर उडविला. सरकार शेतसारा तहकूब किंवा माफ करीना. शेतकरी त्रस्त झाले, हवालदिल झाले. म. गांधी त्यांच्या मदतीला धावून गेले. अहमदाबादच्या सुशिक्षितांना म. गांधींनी विचारलें, " माझ्याबरोबर सरकारशीं दोन हात करावयास कोण तयार आहे ? " " मी सहर्ष तयार आहें " वल्लभभाईंनी तात्काळ उत्तर दिलें. सेनापति गांधींचा वल्लभभाई सैनिक शिष्य आला. कृष्णाला अर्जुन मिळाला. मग काय—

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

हें व्यासवचन सिद्ध होणार. वल्लभभाईंनी खेडा जिल्ह्यांत रात्रंदिवस दौरा करून अपूर्व जागृति निर्माण केली. शेतकरीवर्ग समुद्रासारखा खवळला. सरकारने तात्काळ पड घेऊन शेतसारा तहकूब केला. वल्लभभाईंचा हा दुसरा यशस्वी पराक्रम. एकनिष्ठ व शूर सैनिक कालान्तराने उच्चाधिकारी होतो ना, अगदी तसें झालें वल्लभभाईंचें.

## पहिला कारागृहवास

पूज्य म. गांधींनी १९२१ मध्ये असहयोगाचें रणशिंग फुंकलें. वल्लभभाईंनी लढण्याची सिद्धता केली. कामधेनूसारख्या बॅरिस्टरीला लाथाडलें व फकिरी पत्करून देशाच्या सेवेला वाहून घेतलें. त्यांनी सर्व गुजराथ हलवून सोडला. म. गांधी भारताचे अनभिषिक्त राजे तर वल्लभभाई गुजराथचे ! सरकारी अवकृपा त्यांच्यावर झाली व त्यांना अटक करण्यांत आली. हा वीराग्रणी डगमगणारा नव्हता. तुरुंगांतून सतेज होऊन ते बाहेर पडले. गुजराथचे तारणहार झाले.

## नागपूरचा झेंडा-सत्याग्रह

यशस्वी वल्लभभाईंनी आपला मोर्चा नागपूरकडे वळविला. तेथे झेंडा-सत्याग्रहाचें रणकंदन सुरू होतें. त्यांनी धाकट्या भावाप्रमाणे मानलेल्या

जमनालालजी बजाजांना सरकारने तुरुंगांत डांबलें. शेकडोंनी सत्याग्रह केला. सरकार नमेना. शेरास सव्वा शेर हा जगताचा खासा न्याय. वल्लभभाई नागपूरला येतांच एक प्रकारचें नवचैतन्य खेळूं लागलें. सत्याग्रहाचें स्वरूप अखिल भारतीय झालें. वल्लभभाईंच्या संघटनाचातुर्याला एका पंधरवाड्यांत यश आलें व राष्ट्रीय निशाण मोठ्या डौलाने सिव्हिल लाईन्समधून फडफडत गेलें. वल्लभभाईंचा यशश्चंद्र दिवसेंदिवस वृद्धिंगत होत होता.

## सरदारांची बार्डोलींत सरशी

इतिहास जाणणाऱ्यांनो ! वॉटर्लूच्या लढाईने जसें सर आर्थर वेलस्लीला " ड्यूक ऑफ वेलिंग्टन " बनविलें, तसेंच बार्डोलीच्या सत्याग्रह-संग्रामाने वल्लभभाईंना " सरदार " बनविलें, भारताचे विजयी सरदार बनविलें. ही हकीकत मोठी रोमांचकारक आहे. १९२८ सालीं मुंबई सरकारने शेतकऱ्यांच्या विनंतीची पर्वा न करतां बार्डोली तालुक्यांत शेंकडा २५ टक्क्यांनी शेतसारा वाढविला. अर्ज-विनंत्यांचा सनदशीर मार्ग प्रथम चोखाळण्यांत आला. शेतकऱ्यांतर्फे शिष्टमंडळेंहि सरकारी उच्चाधिकाऱ्यांना भेटलीं. पण व्यर्थ. शेतकरी जनतेंत असंतोष भडकला. त्यांना योग्य नेत्याची आवश्यकता होती व वल्लभभाईंना सज्ज सैनिकांची आवश्यकता होती. जेव्हा शेतकरी विव्हळतात, तेव्हा वल्लभभाईंचें रक्त उसळूं लागतें इतके ते हिंदी शेतकऱ्यांशीं एकजीव झाले होते. संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या विमोचनासाठी वल्लभभाई धावून गेले. वल्लभभाईंनी शेतकऱ्यांत नवजीवन निर्माण केलें व साराबंदीचा सत्याग्रह जाहीर केला. वणव्याप्रमाणे सत्याग्रह भडकला. सरकारने नाही नाही ते जुलमी उपाय अंमलांत आणले. लाठीमार झाले; जमिनी जप्त झाल्या; घरादारांना सरकारी कुलुपें लागलीं, शेंकडों कुटुंबें उघडीं पडलीं; तीन हजार शेतकरी सत्याग्रही तुरुंगांत डांबले गेले. वल्लभभाईंना तर सर्वप्रथमच तुरुंगांत टाकण्यांत आलें. " केला जरी पोत बळेंचि खालीं । ज्वाळा तरी ती वरतीं उफाळी ।। " या न्यायाने शेतकऱ्यांचा उत्साह व धैर्य द्विगुणित झालें. सरकारी अधिकाऱ्यांना बार्डोली तालुक्यांत पिण्यास पाणी मिळेना व खाण्यास दाणा मिळेना. सरकारी अधिकार संपुष्टांत आला. तेव्हाच्या मुंबईच्या गव्हर्नरांनी—सर लॉईड

जॉर्जने अशी कबुली दिली कीं, " तीन महिनेपर्यंत बार्डोली तालुक्यांत इंग्रज सरकारचें राज्य नव्हतें, वल्लभभाईंचें होतें. " सरकारने पराजय स्वीकारला व वल्लभभाईंशीं तुरुंगांत समेट केला. विजयी सेनापतीच्या आविर्भावांत वल्लभभाई बाहेर पडले. वाढलेला सारा रद्द झाला व सर्वांची तात्काळ मुक्तता झाली. ११ ऑगस्टला बार्डोली तालुक्यांत विजयोत्सव साजरा करण्यांत आला. वल्लभभाईंना त्यांच्या अचाट संघटनकौशल्याबद्दल व नेतृत्वाबद्दल ' सरदार ' म्हणून गौरविण्यांत आलें.

## राष्ट्राध्यक्ष वल्लभभाई

" A hero climbs from success to success. " " विजयानंतर विजय संपादणें हें वीराचें कार्य, " असें कार्लाईल म्हणतो. सरदार वल्लभभाईंच्या बाबतींत हें अगदी सत्य आहे. १९३० चा कायदेभंग सुरू होतांच सरकारने सरदारांची तुरुंगांत उचलबांगडी केली. त्यांच्या कर्तृत्वाला अवकाशच दिला नाही. सरकार पूर्वानुभवाने शहाणें झालें होतें. दीर्घ कारागृहवासानंतर गांधी-इर्विन समेटानुसार त्यांची मुक्तता झाली. त्यांनी केलेल्या देशकार्याचा उचित गौरव म्हणून त्यांना १९३१ च्या कराची कॉंग्रेसचे एकमताने अध्यक्ष निवडण्यांत आलें. त्यांचें अध्यक्षीय भाषण सरळ, सडेतोड व संक्षिप्त असें झालें. सरदार गर्जणारे मेघ नसून वर्षा करणारे मेघ होते. ते वाग्वीर नव्हते, कृतिवीर होते. सहसा ते बोलत नसत, पण जेव्हा बोलत तेव्हा वणवा पेटवीत; पाण्याला आग लावीत. त्यांना युद्धाचीच भाषा बोलतां येत होती. नाही तर ते मौन स्वीकारीत.

## ज्येष्ठ बंधूंचें निधन

१९३२ च्या कायदेभंगांत कॉंग्रेसचे ते पहिले सर्वाधिकारी होते. त्यांना १८१८ च्या रेग्युलेशनखालीं अटक करण्यांत आली. तीन वर्षांच्या प्रदीर्घ कारागृहवासानंतर त्यांची मुक्तता झाली. मध्यंतरीं प्रिय बंधूंच्या—विठ्ठलभाई पटेलांच्या—निधनाचें हृदयविदारक दुःख त्यांना सहन करावें लागलें. हा वयाने व देशभक्तीने ज्येष्ठ बंधु व्हिएन्नाला स्वर्गवासी झाला. पण मुंबईच्या जनतेने आपल्या त्यागी देशभक्ताचें मृत शरीर मुंबईला आणविलें व त्याचें अंत्यदर्शन घेतलें. अंत्यविधीसाठी धाकटे बंधुराज,

सरदार पटेल बाहेर यावेत अशी सर्वांची इच्छा होती व तसें सरकारला विनाविलेंहि. पण सरकार पडलें सूड घेणारें, खुनशी. सरदारांची पॅरोलवर सुटका होईल असें सांगण्यांत आलें. सरदार पटेलांसारख्या नरकेसरीला हा अपमान दुःसह वाटला. अपमानित सशर्त मुक्तता त्यांनी अव्हेरिली. Hero is a hero at all points. थोर तो थोरच !

## मुत्सद्दी सरदार

१९३६ सालीं कॉंग्रेसने कौन्सिल-प्रवेशावर मान्यतेचा शिक्का—मोर्तब दिला. सरदार पटेल एकनिष्ठ कॉंग्रेसभक्त. त्यांनी त्या कार्यक्रमांत तनमन-धनाने भाग घेतला. त्यांचें संघटनकौशल्य बघून त्यांना पार्लमेंटरी बोर्डाचें अध्यक्षपद देण्यांत आलें. रणभूमीवर चमकणारे सरदार मुत्सद्द्यांचे डावपेच खेळूं लागले. त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे व मानवी स्वभावाच्या अफाट अनुभवामुळे ते हें कार्य यशस्वी रीतीने करूं शकले. निंदा—स्तुतीची त्यांना तिळमात्र पर्वा नव्हती. कर्तव्यनिष्ठुरता हाच त्यांचा बाणा होता. जें पटलें, सत्य वाटलें तें करून टाकावयाचें, मग-पूर्वेचा सूर्य पश्चिमेला निघाला तरी पर्वा नाही. पुढे टाकलेलें पाऊल सरदार मागे कधी घेत नसत. ह्याच करारी बाण्याने त्यांनी पार्लमेंटरी बोर्डाचें अत्यंत गुंतागुंतीचें व कटकटीचें कार्य यशस्वीपणें पार पाडलें. मुत्सद्दी सरदार म्हणून यश संपादिलें.

## म. गांधींचे शक्तिबुरूज

१९४० मध्ये कॉंग्रेसने युद्धविरोधी मोहीम सुरू केली. सरदारांना या वेळीं एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागली. ते तुरुंगांतून रोगग्रस्त होऊन बाहेर पडले. पण त्यांचें मन सतेज होतें. १९४२ मध्ये म. गांधींनी ब्रिटिश राजसत्तेशीं निर्वाणीचा अहिंसात्मक लढा देण्याचें जाहीर केलें. म. गांधींचे शक्तिबुरूज "Tower of strength" पडले सरदार वल्लभभाई पटेल. सरदारांनी अखिल भारतीय राष्ट्रीय सभेच्या मुंबई येथे भरलेल्या अधिवेशनांत आपल्या ज्वलन्त वक्तृत्वाची तोफ ब्रिटिश सत्तेवर डागली. सरदारांचें रौद्रतम स्वरूप व प्रलयकारी वाणी तेथे प्रकटली. "करा अथवा मरा"चा क्रांतिकारक संदेश त्यांनी दिला. ब्रिटिश सत्तेच्या हृदयाला त्यांचा एक एक शब्द बाणासारखा भिडला. सर्व मंडप

झादरून गेला, वीरांच्या अस्तन्या वर गेल्या. बंद तटातट तुटले. पृथ्वीला कंप सुटला. वर्षा करणारे मेघहि कधी कधी धरतीला थराऊन सोडतात, तसें होतें सरदारांचें भव्योदात्त स्वरूप. धन्य ते जन कीं ज्यांना तें पाहावयास मिळालें. पुढे काय? बंदिवास, कठोर बंदिवास. सरदारांची सिंहगर्जना संपते न संपते तोंच सरकारी दडपशाहीचा नांगर फिरूं लागला व त्यांची त्याच रात्रीं तीन वाजतां अहमदनगरच्या ऐतिहासिक किल्ल्यांत राजबंदी म्हणून रवानगी झाली. तीन वर्षानंतर त्यांची सुटका झाली. देह थकला होता, पण मन सतेज होतें. जिवांत जीव आहे तोंपर्यंत देशसेवा करण्याचें असिधाराव्रत त्यांनी आचरिलें. मृत्यूच काय तो त्यांना परावृत्त करूं शकला.

## सरदार गृहमंत्री होतात

१९४६ मध्ये लॉ. वेव्हेलनें मध्यवर्ती सरकार बनविलें. भारताच्या या पोलादी पुरुषाला गृहमंत्रिपद देण्यांत आलें. सरदार म्हणजे योद्धयाचें शौर्य व संन्याशाची विरक्तता यांचा सुंदर संगम. कॉंग्रेसची, देशाची आज्ञा पालन करण्यासाठी ते गृहमंत्री झाले, राज्यकर्ते झाले, नामदार झाले. नाही तर भारतीय शेतकऱ्यांची मूक सेवा करण्यांत ते गढून गेले असते.

## भारताचे प्रिन्स बिस्मार्क

स्वतंत्र भारताचे गृहमंत्री होतांच त्यांनी त्याला एकजिनसी, एकसंधी बनविण्याचें महान् कार्य हातीं घेतलें. अत्यंत सावधगिरीने व मुत्सद्दीपणाने त्यांनी साडेसहाशें देशी संस्थानांचें भारतामध्ये विलिनीकरण घडवून आणलें. शेकडो संस्थानांत विभागलेलें भारत राष्ट्र एकसंधी बनविलें. हा भारताचा राजकीय एकसंघपणा अभूतपूर्व आहे. प्रिन्स बिस्मार्कने जसें शतशः विदीर्ण झालेलें जर्मन राष्ट्र एकसंधी करून बलशाली केलें. तसेंच येथे करण्याची सरदारांची महत्त्वाकांक्षा होती. भारताचें एकसंधीकरण त्यांनी अत्यंत शांत रीतीने पार पाडलें, पण अपवादावांचून नियम सिद्ध होत नाही. हैद्राबाद संस्थान जात्यंध रझाकारांच्या हातांतील बाहुलें झालें. बऱ्या बोलाने तें कांही ऐकेना. त्यांच्याविरुद्ध मात्र सरदारांना चौदाव्या रत्नाचा "पोलीस

कारवाईचा " अंगीकार करावा लागला. केवळ अडीच दिवसांत हैद्राबाद शरण आलें. सरदारांचा जयजयकार झाला.

## म. गांधींचा शक्तिबुरूज ढासळला

सरदार पटेल दिवसेंदिवस क्षीण होत होते. देह विश्रांतीकडे धाव घेत होता, पण मन चैन पडूं देईना. स्वतंत्र भारत बलशाली व्हावा अशीच त्यांच्या प्रयत्नांची दिशा होती. कामाचे डोंगर त्यांच्यापुढे पसरलेले होते. पण देह थकला होता. त्या जर्जर झालेल्या कृश देहाला मन खेचीत होतें. मनाने तरी किती टिकाव धरावा. मन झालें तरी देहबद्धच. सरदारांना हृद्रोगाने ग्रासलें. उपायांची शर्थ झाली. हवापालट करण्यासाठी ते १२ डिसेंबर १९५० ला दिल्लीहून मुंबईला गेले. सर्व भारत राष्ट्र चिंताग्रस्त झालें. सर्वांचे डोळे मुंबईकडे लागले. अभागी तारीख १६ डिसेंबर उजाडली. याच दुर्दिनीं सकाळीं ९ वाजतां भारताचा लोहपुरुष वितळला. गांधींचा शक्तिबुरूज ढासळला. स्वतंत्र भारताचा झुंजार सरदार स्वर्गवासी झाला.

अजातशत्रु

# बाबू राजेन्द्रप्रसाद

( जन्म १८८४ )

**विद्या विनयेन शोभते ।**

महात्मा गांधींच्या शिष्यवरांत राष्ट्रपति राजेन्द्रप्रसाद यांचें स्थान श्रेष्ठतम आहे. ते बिहारमध्ये महाराजा जनक, भगवान् गौतमबुद्ध आणि सम्राट् अशोक यांनी संवर्धन केलेल्या विनयशीलतेचे, साधेपणाचे व सदाचरणाचे आदर्श वारसदार आहेत. गर्वाचा त्यांना चुकूनदेखील स्पर्श होत नाही. ते वाणीने, करणीने अथवा मनाने कोणालाहि दुखवीत नाहीत. त्यांच्याकडे पाहतांच अजातारि धर्मराजाची स्मृति जागृत होते. साखरेप्रमाणे अंतर्बाह्य गोड असणाऱ्या राजेन्द्रांचें चरित्र शाईने न लिहितां मधाने लिहावें असें वाटतें. अशा धर्मशील राष्ट्रपुरुषाचें जीवन-चरित्र सामान्य जनांना स्फूर्तिदायक होणें स्वाभाविक नाही काय ?



## शुद्ध बीजापोटीं

राजेन्द्रबाबूंचा जन्म बिहारमधील सारन जिल्ह्यांत जीरादेई या खेडे-गावीं ३ डिसेंबरला १८८४ मध्ये झाला. त्यांचे वडील मुनशी महादेव

सहाय मोठे जमीनदार होते. ते सात्त्विक वृत्तीचे उदार जमीनदार म्हणून सर्वांच्या आदरास पात्र झाले होते. ते दीनांचे कनवाळू व आशास्थान होते. त्यांची आई धर्मभोळी व उदार होती. ती आपल्या गावामध्ये सर्वांची आई झाली होती. दुधांत साखर पडावी त्याप्रमाणे त्यांच्या ज्येष्ठ बंधूंच्या–महेन्द्रप्रसादांच्या–शुद्धाचरणाचा इष्ट तो परिणाम राजेन्द्रांच्या बालमनावर झाला. आरसा जितका स्वच्छ असेल तितकें स्वच्छ प्रतिबिंब त्यांत पडतें. एवम्, राजेन्द्रांना सत्त्वगुणांचा वारसा प्राप्त झाला.

## शिष्यवृत्त्या व बक्षिसांचे मानकरी

त्यांचें प्राथमिक शिक्षण छपरा येथे झालें. असामान्य हुशार विद्यार्थी राजेन्द्र अध्यापकांच्या कौतुकास पात्र झाला. हिंदी चौथीच्या परीक्षेंत ते त्या गावांत पहिले आले. पहिलें स्थान पटकाविण्याचा हा केवळ श्रीगणेशा होता. त्यांचें विद्यार्थिजीवन अत्यंत यशस्वी होतें. ते परीक्षेंत हटकून पहिले येत. मॅट्रिकच्या परीक्षेंत ते पहिल्या श्रेणींत पहिले आले. तेव्हा बिहार प्रांत कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या कक्षेंत होता. प्रतिभाशाली विद्यार्थी म्हणून त्यांचें नांव वर्तमानपत्रांत झळकलें. त्यांना एक शिष्यवृत्ति मिळाली. ते कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांतून इंटर व बी. ए. च्या परीक्षांत प्रावीण्य संपादून सर्वप्रथम आले. इंग्रजी विषय घेऊन ते एम्. ए. झाले. त्यांची प्रतिभा सर्वगामी होती. चरितार्थाचें स्वतंत्र साधन म्हणून त्यांनी कायद्याचें अध्ययन केलें. अविषया बुद्धि असलेले राजेन्द्र एम्. एल्. च्या परीक्षेंतहि पहिले आले. इतकी उत्तरोत्तर यशस्वी विद्यार्थिदशा सहसा कोणाची आढळत नाही. कांही विद्यार्थी काजव्यासारखे कांही परीक्षेंत चमकतात, पण राजेंद्रांचा बुद्धिचंद्र कलाकलांनी वृद्धिंगत होत गेला. राजेन्द्र क्रमिक पुस्तकांतील किडा कधीच नव्हते. त्यांनी अनेक ग्रंथांचें वाचन केलें व मनाची आणि बुद्धीची योग्य जोपासना केली. विद्यार्थिजीवनांत विशेषतः कॉलेजच्या वादविवाद-मंडळांत ते भाग घेत व कोणत्याहि सार्वजनिक सेवेस तत्पर असत. याशिवाय त्यांचा गोड स्वभाव व अविरोधी वृत्ति त्यांच्या लोकप्रियतेस कारणीभूत होई.

## देशभक्तीचा बीजांकुर

राजेन्द्रप्रसाद कलकत्त्याच्या कॉलेजमध्ये विद्यार्थी असतांनाच वंगभंगाची चळवळ धडाक्याने सुरू झाली. प्रक्षोभ निर्माण झाला. विद्यार्थ्यांचीं अंतःकरणें देशभक्तीने पेटलीं. राजेन्द्रप्रसादांची निद्रा गेली व त्यांना देशभक्तीची ओढ लागली. त्यांनी विद्यार्थि-सुलभ देशकार्य प्रारंभिलें. उन्हाळ्याच्या प्रदीर्घ सुटींत त्यांनी बिहार प्रांतांत एक प्रचंड विद्यार्थिसंघटना निर्माण केली. अशाच एका विद्यार्थि-संमेलन-प्रसंगीं ना. गो. कृ. गोखले यांच्या वेचक दृष्टीला राजेन्द्रप्रसाद पडले. त्यांनी राजेन्द्रांना भारतसेवक-समाजामध्ये सामील होण्याची विनंति केली. राजेन्द्रहि गोखल्यांची विशुद्ध देशभक्ति, नम्रता व समाजसेवेची तळमळ पाहून त्यांच्याकडे ओढले गेले. मनाला मन जडलें. हृदयाने हृदय ताडलें. एम्. ए., एम्. एल्. झालेल्या राजेन्द्रांनी आपली सिद्धता तात्काळ दर्शविली व पुढील पत्र वडील बंधूंना लिहिलें :

“ प्रिय बंधु, मला एका उच्चतर व महत्त्वाच्या आवाहनाची अनुभूति होत आहे. तुझ्यासारख्या इतर प्रेमी जनांनी माझ्यासंबंधी ज्या आशा बाळगल्या त्या क्षणार्धात जमीनदोस्त होऊन जातील. जों जों आम्ही श्रीमंत होतों तों तों धनतृष्णा वाढतच जाते. सामान्य जनांची समजूत असते कीं, धनवान् आपल्या सुवर्णाच्या निधीमुळे सुखी असतो; परंतु खरे तत्त्वज्ञ हें जाणतात कीं, सुख हें बाह्य जगांतून प्राप्य नसून तें आत्मनिष्ठ आहे. माझी जर कांही महत्त्वाकांक्षा असेल तर ती हीच आहे कीं, माझ्या देशाची थोडी फार सेवा मी करावी. मातृभूमीच्या सेवेशिवाय मला दुसरी महत्त्वाकांक्षा नाही. आज कोण असा राजपुत्र आहे कीं, ज्याचा प्रभाव, स्थान व मान श्री. गो. कृ. गोखल्यांच्या बरोबरीचा आहे ? आणि श्री. गोखले काय धनहीन नाहीत ? ” ह्या पत्रांत त्यांनी आपल्या जीवनाचें सारसर्वस्व उघडें केलें आहे. देशसेवेची व समाजसेवेची कोण ही कळकळ ! सुधारकाग्रणी गो. ग. आगरकरांनी असेंच हलवून सोडणारें पत्र आपल्या आईला लिहिलें होतें. दोघांचाहि मन:पिंड एकच. ज्येष्ठ बंधूंनी नाही नाही त्या प्रकारें आग्रह केल्यामुळे जड अंतःकरणाने राजेन्द्रांना भारत-

सेवक-समाजाचे सभासद होणें सोडावें लागलें. पण समाजसेवेचा त्यांनी पुढील कार्यक्रम अंगीकारला.

**प्राध्यापक राजेन्द्र**

विद्यार्थि-वर्गांत सद्गुणांची व देशभक्तीची पेरणी करण्याच्या महान् उद्देशाने राजेन्द्र १९०९ ते ११ पर्यंत मुझफरपूरच्या कॉलेजांत व कलकत्त्याच्या सिटी कॉलेजांत प्राध्यापक होते. पण ही वृत्ति त्यांना मानवली नाही. नोकरीचें बंधन त्यांना असह्य झालें. नोकरी म्हणजे कान असून ऐकावयाचें नाही, डोळे असून पाहावयाचें नाही, वाणी असून बोलावयाचें नाही, मन असून मनावर घ्यावयाचें नाही आणि बुद्धि असून विचार करावयाचा नाही. ही जिवंतपणीं मृतावस्था राजेन्द्राला कशी मानवेल ?

**वकिली थाटली**

त्यांनी १९११ मध्ये कलकत्त्याला हायकोर्टामध्ये वकिली सुरू केली. त्यांनी घराला पाटी लावायचीच वाट जणू काय पक्षकार पाहत होते. अल्पावधींतच आपल्या सखोल कायद्याच्या ज्ञानाने, प्रामाणिकपणाने व सततोद्योगाने एक यशस्वी वकील म्हणून ते ख्यातीस पोहोचले. १९१६ मध्ये पाटणा येथे हायकोर्ट स्थापण्यांत आलें. राजेन्द्रांनी तेथे स्थलान्तर केलें, ते परिचित स्थानीं आले. आपल्या प्रांतांत आले. आता तर त्यांच्यावर रुपयांचा वर्षाव होऊं लागला. हायकोर्टाच्या न्यायाधीशांनादेखील त्यांच्याबद्दल आदर वाटूं लागला. राजेन्द्रांना अल्पावधींतच हायकोर्टाच्या न्यायाधिशाचें पद प्राप्त होणार अशी लोकवदंतादेखील होती. अग्नीशिवाय धूर नसतो व धुराशिवाय अग्नि नसतो. तेव्हा या लोकवदंतेला सत्याचा कांही ना कांही तरी आधार असेलच, पण राजनिष्ठ सरकारी नौकरी राजेन्द्रांना कशी झेपेल ? सिंहाला जंबुकाची सेवा आवडेल का ?

**सार्वजनिक सेवेचा श्रीगणेशा**

आता राजेन्द्रांचें मन सेवेकडे ओढ घेऊं लागलें. त्यांनी पाटणा युनिव्हर्सिटी बिलाला विरोध करून समाजसेवेंत पदार्पण केलें. सदरहू बिलान्वयें पाटणा विद्यापीठ सरकारची बटीक झालें असतें. राजनिष्ठांचा तो अड्डा झाला असता व लोकप्रतिनिधींना त्यांतून अर्धचन्द्र मिळाला

असता. जनतेच्या पैशाने उभारलेलें विद्यामंदिर जनताविमुख झालें असतें. राजेन्द्रबाबूंनी लेखणीद्वारां, भाषणाद्वारां व संघटनाद्वारां त्याला घोर विरोध केला. जनतेचें त्यांना पाठबळ मिळालें व सरकारने त्या बिलांत इष्ट सुधारणा कबूल केल्या. हा आहे राजेन्द्रांचा पहिलावहिला सौम्य विजय. " Success leads to success. " " विजयाने विजय वाढतो, उत्साह शतगुणित होतो." अगदी तसें झालें राजेन्द्रांचें.

## मातृभाषेच्या माध्यमाचे प्रवर्तक

युनिव्हर्सिटीच्या सिनेट व सिंडिकेटमध्ये लोकप्रतिनिधींना स्थान मिळालें. स्वतः राजेन्द्रप्रसाद १९२० पर्यंत सिनेटचे प्रमुख सभासद होते. मॅट्रिकची परीक्षा व माध्यमिक शिक्षण हिंदींतून—' मातृभाषेच्या माध्यमांतून '—व्हावें अशी त्यांनी खटपट केली. काल या वेळीं प्रतिकूल होता, पण त्यांचें तत्त्व व सिद्धान्त सर्वांना मान्य झाले. अंमलबजावणी मात्र पुढे ढकलली. एवम्, राजेंद्रप्रसाद मातृभाषेच्या माध्यमाचे प्रवर्तक होते. ही त्यांची शिक्षण-क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरी होय.

## हिंदी साहित्यसेवा

हिंदी साहित्यक्षेत्रांतील त्यांची सेवा अनुपेक्षणीय आहे. मातृभाषेच्या शुद्धतेसंबंधी ते फार जागरूक असत कॉलेजमध्ये असतांना त्यांनी एक हिंदीभाषी मण्डळ स्थापन केलें होतें. या मण्डळाच्या सभासदांना हिंदींतूनच सर्व व्यवहार करावा लागे. जो सभासद बोलतांना इंग्रजी शब्दांचा प्रयोग करून हिंदीची शुद्धता बिघडवी, त्यास प्रत्येक इंग्रजी शब्दागणिक एक आणा दंड होई. त्यांच्या हिंदीप्रेमामुळे त्यांना १९१२ सालीं कलकत्ता येथे भरलेल्या हिंदी साहित्य-संमेलनाचे उपाध्यक्ष निवडण्यांत आलें.

## संपादक होतात

पाटण्याला ' देश ' नामक हिंदी साप्ताहिकाचें त्यांनी संचालन व संपादन केलें. म. गांधींच्या विधायक कार्यक्रमांत हिंदीप्रचाराला स्थान मिळालें व दक्षिण भारत हिंदी साहित्य-संमेलनाचें पहिलें अधिवेशन ( १९२३ ) कोकोनाडा येथे राजेंद्रांच्या अध्यक्षतेखालीच पार पडलें. पुढे पुन्हा एकदा भारतीय साहित्य-संमेलनाच्या नागपूर येथील

अधिवेशनाचे ते एकमताने अध्यक्ष निवडले गेले होते. राजेंद्रांच्या संशोधनात्मक कार्याची सर्वांनी स्तुति केली. त्यांच्या हिंदीच्या प्रसादगुणाने सर्वांना सुखाविलें.

## महात्माजींचें शिष्यत्व

राजेन्द्रांचा स्वभाव शांत व वृत्ति समतोल आहे. त्यांच्या मनाची शांतता ढळलेली कोणीं पाहिलेली नाही. या बाबतींत ते धर्मराजाची प्रतिमा आहेत. जें कांही करावयाचें तें शांत चित्ताने, असा त्यांचा स्वाभाविक बाणा आहे. शांत विचारांतीं मनुष्य दुबळा बनतो असा प्रवाद आहे. भावना कार्यप्रवणकारी असतात, तर विचार कार्याला विघातक असतात, असा जगाचा अनुभव. पण विचारांतीं मनुष्य धडाडीने कार्य करून दाखवू शकतो; पराक्रम करूं शकतो हेंच राजेन्द्रांचें वैशिष्ट्य. विकारवश न होतां महान् कार्यें त्यांनी केलीं. १९१७ साल उजाडलें. म. गांधी देवाप्रमाणे चंपारण्यांतील शेतकऱ्यांच्या मदतीला धावून गेले. पाटण्याला पोहोचतांच म. गांधींनी तेथील सुशिक्षितांना त्यांच्याबरोबर चम्पारण्यांत जाऊन लोकजागृति करण्यास्तव आवाहन दिलें. बहुतेकांनी ऐकून न ऐकल्यासारखें केलें, पण राजेन्द्रांना चैन पडेना. चंद्रकिरणें पडल्यावर चंद्रकान्तमणि द्रवणार नाही असें कसें होईल? म. गांधींच्या पवित्रतम दर्शनाने राजेंद्रांच्या सुप्त सत्प्रवृत्ति जागृत झाल्या, त्यांचा कायापालट झाला. सात्विक मनःक्रांति झाली. ज्याच्या शोधांत मन होतें तें त्याला लाभलें. नरेन्द्राला जसे रामकृष्ण परमहंस, तसे राजेन्द्रांना महात्मा गांधी. राजेन्द्र म. गांधींचे अनन्यभक्त झाले व त्यांनी गुरूच्या पावलावर पाऊल टाकण्याचें आश्वासन दिलें. म. गांधींसह त्यांनी चंपारण्यांत अभूतपूर्व जागृति निर्माण केली व सरकारला अल्पावधींतच हार कबूल करावी लागली. हा राजेन्द्रांचा दुसरा विजय. म. गांधींच्या साधुवृत्तीचे, संयमशीलतेचे, साधेपणाचे, त्यांच्या भावुक मनावर चिरसंस्कार झाले. म. गांधींबरोबर राजेन्द्रांचा जयजयकार झाला. राजेन्द्र बिहारचे एकमेव नेते झाले. त्यांच्यांत चपलेची चमक नाही, मेघांचा गडगडाट नाही, समुद्राची खोली नाही. ते मदनाचे पुतळे नाहीत व भावोत्कट कवि, लेखक अथवा वक्तेहि नाहीत. ना रूप, ना रंग,

ना गंध असें हें पुष्प आहे. पण देव अशा भाविक पुष्पाला शिरोधार्य करतो ना ? तसेंच, अगदी तसेंच विनयालंकृत सेवेनेच राजेन्द्रांना राजेन्द्रपदीं अधिष्ठित केलें. हा सत्त्वगुणाचा विजय आहे, भरीव विजय आहे.

## विनयमूर्ति त्यागी राजेन्द्र

१९२१ च्या असहयोगाच्या त्यागनिष्ठ राष्ट्रीय चळवळीला प्रारंभ होतांच राजेन्द्रांनी आपली वकिली त्यागिली. त्यांनी पुन्हा कधी वकील म्हणून ब्रिटिशांच्या कोर्टांत पाय टाकला नाही. त्यांच्या ह्या उदात्त त्यागाबद्दल व धैर्याबद्दल बिहारी जनतेने त्यांचें प्रचंड स्वागत केलें. त्यांनी बिहारमध्ये अखंड दौरा काढून अभूतपूर्व जागृति निर्माण केली. भाषणांची सरबत्ती, वक्तृत्वाचे फवारे, भाषेचा विलास, प्रत्युत्तराची चमक त्यांच्यांत कांही नाही. जसा स्वभाव सरळ तसें भाषण सरळ. जसा वेष साधा तसें भाषण साधें व आबालसुलभ आहे. राजेन्द्रांची वाणी बोलत नसून हृदय बोलतें. त्यांचें भाषण म्हणजे मधुर हृदयसंवाद. भावाने भावाशीं हृदय मोकळें करून बोलावें तसें राजेन्द्रबाबूंचें भाषण. म. गांधींच्या शिष्यश्रेष्ठापासून आणखी कशाची अपेक्षा ?

१९२२ सालीं गया येथे भरलेल्या काँग्रेसचे ते स्वागताध्यक्ष होते. त्यांच्या सौजन्याने थबथबलेलें असें त्यांचें स्वागताध्यक्षीय भाषण झालें. 'विद्या विनयेन शोभते' असें म्हणतात. राजेन्द्रांच्या विनयाने त्यांच्या विद्वत्तेवर विजय प्राप्त केला आहे. विनय-विद्वत्तेचा हा अपूर्व संयोग आहे.

## बिहारगांधी राजेन्द्रप्रसाद

सत्त्वगुणप्रधान राजेंद्र विधायक प्रवृत्तीचे आहेत. विध्वंसक क्रांतिकारक पुढारी लोकांना आपल्या प्रखर तेजाने दिपवून टाकतात, क्षणभर स्तंभित करतात. जनता त्यांना डोक्यावर घेऊन नाचते. उलट विधायक राष्ट्रकार्यरत राजेन्द्रांसारखे सत्य-त्याग. सेवानिष्ठ नेते ध्रुवाच्या शांत व अचल ताऱ्याप्रमाणे अनेक हतभागी जनांना जीवनमार्गदर्शक होतात. विध्वंसक पुढाऱ्यांचें यश व आनंद परनिष्ठ तर विधायक पुढाऱ्यांचा आनंद आत्मनिष्ठ. पहिले वीर तर दुसरे संत. राजेन्द्रांनी आपला प्रकृतिधर्म ओळखला.

तपोनिधि व सेवाधर्मी म. गांधींचे ते पहले शिष्यश्रेष्ठ. म्हणून गांधीप्रणीत चरखासंघ, राष्ट्रीय शिक्षण, अस्पृश्योद्धार, आदि विधायक कार्याला त्यांनी स्वतःस वाहून घेतलें. कीर्तीची हाव नाही व प्रसिद्धीची भूक नाही. अशा विरक्त, विनम्र व विद्याविभूषित राजेन्द्रांना 'बिहारगांधी' म्हणून वर्तमानपत्रकारांनीं गौरविलें. किती यथार्थ पदवी ही !

## दीर्घ कारागृहवास

होतां होतां १९३०-३२ साल उजाडलें. कायदेभंगाच्या तुताऱ्या वाजूं लागल्या. म. गांधी-पुरस्कृत अहिंसात्मक युद्धापासून अहिंसेचा सैनिक राजेन्द्रबाबू अलिप्त कसा राहणार ? त्यांनी तनमनधनाने त्यांत उडी घेतली. ते दोनदा कॉंग्रेसचे सर्वाधिकारी म्हणून नियुक्त झाले होते. त्यांना अडीच वर्षांचा दीर्घ कारागृहवास भोगावा लागला. त्यांचा वडिलोपार्जित रोग—दमा तुरुंगांत उसळला व त्यांना रोगी राजबंदी म्हणूनच तुरुंगाच्या दवाखान्यांत दिवस कंठावे लागले. अशा रोगग्रस्त अवस्थेंत असतांनाच १९३४ मध्ये बिहारमध्ये प्रलयंकारी भूकंप झाला. लाखो लोक निराश्रित झाले, दुर्भिक्षाने कहर उडविला. जिकडे तिकडे हाहाःकार झाला. ही हाहाःकाराची ज्वाला कोण विझवणार ? गोरगरिबांचा वाली कोण होणार ? निराश्रितांना कोण आश्रय देणार ? सरकारला सुबुद्धि झाली. बिहार-गांधी राजेन्द्रांची मुक्तता झाली.

## धरणीकंपपीडितांचे उद्धारक

राजेन्द्रांनी स्वप्रकृतीची पर्वा न करतां भूकंपपीडित भागांची पाहणी केली. निराश्रितांना आश्वासन दिलें व पीडितांचे ते पाठीराखे झाले. "राजेन्द्रप्रसाद बिहार साहाय्यक-निधि" उभारण्यांत आला. अखिल भारताने राजेन्द्रांच्या हाकेला ओ दिली. तीस लाखांचा फंड गोळा झाला. याचा योग्य तो विनियोग राजेन्द्रांच्या मार्गदर्शनानुसार करण्यांत आला. सदरहू कार्याच्या तत्परतेची व चोखंदळपणाची तारीफ सरकारनेदेखील केली. जें कार्य सरकार करूं शकलें नाही, तें कार्य सत्यव्रत राजेन्द्र निरलस सेवेच्या सामर्थ्याने हां हां म्हणतां करूं शकले. ही आहे सात्त्विक गुणांची भरीव विधायकता.

### काँग्रेसचे अध्यक्ष

त्यांच्या निष्काम सेवेचा गौरव म्हणून राजेन्द्रांना मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष एकमताने निवडण्यांत आलें. 'मुंबईला त्यांचें जें भव्य व वैभवशाली स्वागत झालें त्याचा हेवा फक्त देवेन्द्रानेच करावा. आता ते भारताचे अनभिषिक्त राजे झाले. आज केवळ पंधरा वर्षांनंतर 'अन्' ह्या उपसर्गाचा उपसर्गहि नाहीसा झाला. काय भाग्यशाली योग ! त्यांचें सुटसुटीत, सरळ मर्मग्राही भाषण अत्यंत आकर्षक वाटलें. राजेन्द्रप्रसाद उत्सवमूर्ति नाहीत, कार्यमूर्ति आहेत. अधिवेशन संपतांच त्यांनी देशव्यापी दौरा काढून काँग्रेसची संघटना मजबूत व दृढतर केली. अशा रीतीने अखंड दौरा काढणारे ते काँग्रेसचे पहिले अध्यक्ष होते. प्रत्यक्ष कार्यांत ते कधीच मागे हटले नाहीत. त्यांच्याच अध्यक्षीय कालखंडांत काँग्रेसचा सुवर्ण-महोत्सव अखिल भारतवर्षांत धूमधडाक्याने साजरा झाला. राजेन्द्रांचें नांव सर्वतोमुखीं झालें.

### जय-विजयांची कर्तृत्वशक्ति

केवळ काँग्रेसची आज्ञा म्हणून ते अखिल भारतीय पार्लमेंटरी बोर्डाचे सेक्रेटरी झाले, नव्हे अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल यांनी याच गोड अटीवर पार्लमेंटरी बोर्डाचें अध्यक्षपद स्वीकारलें. सरदारांची इच्छा राजेन्द्र-प्रसादांना वडील बंधूंच्या आज्ञेप्रमाणे वाटे. कां बरें वाटूं नये ? एकाच गुरूचे हे जय-विजयांसारखे पट्टशिष्य. एका मार्मिक लेखकाने असें लिहिलें आहे कीं, "वल्लभभाई म्हणजे गांधीजींची शक्ति व राजेन्द्रप्रसाद म्हणजे गांधीजींची निरलस सेवा." सेवाविरहित शक्ति म्हणजे शाप, संहार आणि विध्वंस, म्हणून म. गांधींच्या शक्तीने सात्त्विक सेवेला आवाहन दिलें हें योग्यच नव्हे का ? पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून त्यांनी अहोरात्र श्रम घेतले व काँग्रेसची राज्य-शासनक्षमता वृद्धिंगत केली.

### अजातशत्रु राजेन्द्र

ज्या ज्या वेळीं काँग्रेसमध्ये मतभेदांचें वादळ निर्माण होऊन विद्यमान अध्यक्षांना राजीनामे देण्याचा दुःखद व अनिवार्य प्रसंग येई त्या त्या वेळीं काँग्रेसचें कर्णधारकत्व राजेन्द्रप्रसादांकडे येई. मतभेदांमुळे एकमेकांचीं

मनें दुखावलीं जात, वाग्बाणांच्या फैरी झडत, टीकास्त्रांचे घाव होत. अध्यक्षपद कोणाला द्यावें हा यक्षप्रश्न उभा राही. त्या वेळीं राजेन्द्रांची शांत, निर्विकार व अजातशत्रु मूर्ति सगळ्यांच्या आशांचें केन्द्र होई. असा पहिला प्रसंग नेताजी सुभाषचन्द्रांच्या राजीनाम्याने निर्माण केला व दुसरी पाळी आचार्य कृपलानी यांच्या राजीनाम्याने ओढून आणली. कोण ही त्यांची लोकोत्तर लोकप्रियता !

## स्थितप्रज्ञ राजेन्द्रप्रसाद

होतां होतां १९४२ सालचें स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें गेलें. राजेन्द्रबाबू दम्याच्या विकाराने विकल होऊन पाटण्याला स्वगृहीं अंथरुणाला खिळून पडले होते, पण संशयी व खुनशी सरकारने त्यांना अशाहि जर्जरावस्थेंत तुरुंगांत डांबलें. पण राजेन्द्रांच्या मनःसागरांत अशांततेच्या लहरीदेखील निर्माण झाल्या नाहीत. त्यांची स्थितप्रज्ञावस्था बघून अटक करावयास आलेल्या एका अधिकाऱ्याने त्यांच्या चरणांवर डोकें ठेवलें. हा आहे अहिंसेचा विजय, ही आहे शुद्धतेची पताका, ही आहे म. गांधींच्या शिष्यत्वाची यशस्विता. धन्य तो गुरु व धन्य तो शिष्य !

## ग्रंथकार राजेन्द्र

अहमदनगरच्या ऐतिहासिक किल्ल्यांत ते तीन वर्षेंपर्यंत राजबंदी होते. या अवधींत त्यांनी " India Divided " हा हजार पानांचा इंग्रजी ग्रंथ लिहिला. तो फार माहितीपूर्ण असून त्यांत भारताच्या अखंडपणावर साधार भर दिला आहे. यांत राजेन्द्रांची समतोल बुद्धि व सूक्ष्म विवेचकता अत्युत्कृष्टपणें दृग्गोचर होते. याच बंदिवासांत त्यांनी आत्मचरित्र लिहिलें. त्यांच्या स्वभावाचें प्रतिबिंब त्यांच्या भाषेच्या सुलभतेंत व आत्मकथनाच्या शांत प्रवाहांत पडलेलें दिसतें. येथे ज्ञान विनयाची सेवा करतें व सेवा विनयाने खुलून उठते. " Modesty thy name is Rajendra Prasad. " " विनया ! तुझें साकाररूप राजेन्द्रप्रसाद आहे." असे सहजोद्‌गार सुबुद्ध वाचकांच्या मुखांतून बाहेर पडतात.

## घटना-समितीचे अध्यक्ष

१९४६ मध्ये कॉंग्रेसने मध्यवर्ती सरकारांत प्रवेश केला. बाबूजी अन्न-

मंत्री झाले. अन्नखात्याचें काम अत्यंत दक्षतेने व परिश्रमपूर्वक त्यांनी केलें. अनेक परराष्ट्रांशीं अन्नसंधि करून भारतांत धान्याची रेलचेल केली. याशिवाय भारतीय घटना-परिषदेचे ते अजातारि अध्यक्ष झाले. त्यांच्या मूलगामी, सूक्ष्म व तरल कायदेशीर बुद्धीचा राष्ट्राला योग्य उपयोग झाला. घटना-परिषदेला समतोल बुद्धीचा अध्यक्ष लाभला. भारतीय घटनेचें तारूं मतभेदांच्या वादळांत सापडून फुटतें कीं काय, असे संदेहास्पद प्रसंग निर्माण होत; पण राजेन्द्रांच्या शांत व गंभीर नेतृत्वामुळे तें तारूं अखेर इष्ट स्थळीं पोचलें. त्याने पारतंत्र्याच्या महासागराला उल्लंघिलें. ज्या कॅप्टनने हें नाविककौशल्य दाखविलें त्याला राष्ट्र कसें विसरणार? तें कसें कृतघ्न ठरणार? कृतघ्नता भारतीय संस्कृतीला व जनतेला स्पर्श करूं शकत नाही. भारतीय जनता बिहार-गांधी राजेन्द्रांची तपश्चर्या विसरूं शकत नाही. अमृताला का कोणी अव्हेरितो?

## राष्ट्रपति राजेन्द्र

१९५० च्या जानेवारीची भाग्यदायिनी २६ तारीख उजाडली. भारत स्वतंत्र लोकसत्ताक राष्ट्र म्हणून जगजाहीर झालें. स्वतंत्र भारताचें पार्लमेंट राष्ट्रपतींची निवड करावयास उत्साहानें भरलें. राष्ट्रपति कोण होणार? प्रश्न तात्काळ सुटला. राजेन्द्रांचें नांव प्रत्येकाच्या जिव्हाग्रीं. जें जिव्हाग्रीं तें क्षणार्धांत करतलाग्रीं. राजेन्द्रप्रसाद एकमताने, एकमनाने, स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपति झाले. लोकनियुक्त 'राजेन्द्र' झाले. मित्रांनो! क्षणभर बघा, डोळे उघडून बघा ते हैद्राबाद, म्हैसूर, कोचीन, त्रावणकोर, इंदूर व ग्वालेरचे राजे महाराजे वाकून नम्रतेने राजेन्द्रप्रसादांना मुजरा करीत आहेत, कुर्निसात करीत आहेत. राजेन्द्र नांवाची अन्वर्थकता सिद्ध झाली.

## खरा धार्मिक व लोकप्रिय राष्ट्रपति

सन १९५२ मध्ये स्वतंत्र भारताची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. प्राय: सर्व राज्यांमध्ये कॉंग्रेस पक्षाचा विजय झाला व भारताच्या मध्यवर्ती लोकसभेंत कॉंग्रेस पक्षाचें हुकुमी बहुमत झालें. बाबू राजेन्द्रांचें नांव पुनः राष्ट्रपतिपदासाठी कॉंग्रेसपक्षातर्फे सुचविण्यांत आलें. अत्यंत अल्पमतांत असणाऱ्या

विरोधी पक्षांनी एक होऊन केवळ विरोधी पक्ष हें नांव सार्थ करण्यासाठी प्रतिस्पर्धी उमेदवार उभा केला. परंतु बाबू राजेन्द्रप्रसाद प्रचंड बहुमतानें दुसऱ्यांदा भारताचे राष्ट्रपति निवडून आले. खरोखरच त्यांची लोकप्रियता अनन्यसामान्य आहे. ते खरे धार्मिक पुरुष आहेत. हिंदूंच्या अतिप्राचीन व पवित्र सोरटी सोमनाथमंदिराचा जीर्णोद्धार केल्यानंतर त्यांत लिंगाची प्राणप्रतिष्ठा करतांना त्यांनी एखाद्या श्रद्धाळू व धर्मभोळ्या हिंदूंप्रमाणे सोवळें नेसून उपाध्याय सांगतील त्याबरहुकूम यथाविधि पूजन केलें. १९५२ मध्ये काशीला आगमन झालें असतांना त्यांनी एखाद्या सनातनी हिंदु राजाप्रमाणे तेथील २०० ब्राह्मणांचें पाद्यपूजन केलें व तीर्थाचें श्रद्धायुक्त अंतःकरणाने प्राशन केलें. प्रत्येक ब्राह्मणाला वीस रुपयांची दक्षिणा अर्पण करून त्यांचा शुभाशीर्वाद सहर्ष ग्रहण केला. तसेंच सन १९५३ मध्ये प्रयागच्या कुंभमेळ्याच्या वेळीं ते त्रिवेणी–संगमामध्ये सपत्नीक स्नान करावयास गेले व एखाद्या परंपरावादी हिंदु राजाप्रमाणे त्यांनी उपस्थित ब्राह्मणांना भरपूर दान दिलें. राजेन्द्रांची हिंदुधर्म व संस्कृतीवर अव्यभिचारिणी निष्ठा आहे. परंतु त्यांच्या निष्कपट हृदयांत इतर धर्मांबद्दल आदर वास करतो. ते जितक्या आत्मीयतेने हिंदूंच्या धार्मिक उत्सवांत भाग घेतात, तितक्याच प्रेमाने व सहिष्णुतेने मुसलमानांच्या, शीखांच्या, बौद्धांच्या, जैनांच्या व ख्रिस्तींच्या धार्मिक उत्सवांत भाग घेतात; म्हणून भारतांतील सर्वधर्मीय समाजामध्ये त्यांच्यासंबंधी प्रेमयुक्त आदराची भावना वास करते. या दृष्टीने ते खरे राष्ट्रपति आहेत. ते विश्वसंस्कृति-परिषदेचे निष्ठावन्त पुरस्कर्ते आहेत.

## सर्वोदयवादी राष्ट्रपति

म. गांधींनी सर्वोदयाचा दिव्य संदेश भारताला दिला. बाबूजी आहेत महात्माजींचे शिष्योत्तम. तेव्हा सर्वोदयाच्या स्थापनेसाठी त्यांना राष्ट्रपति-पदावरून जें कांही करतां येणें शक्य आहे तें ते करतात. सर्वोदयाचें कार्य राजकीय पक्षनिष्ठतेच्या पलीकडचें आहे. नव्हे, राजकारणाचें सर्वोदयाला वावडें आहे. वास्तविक पाहतां सर्वोदयाचें कार्य भूतदयावादी व शुद्ध मानवता-वादी आहे. तेव्हा राजकारणनिरपेक्ष अशा या कार्यांत राष्ट्रपति राजेन्द्रांना

भाग घेण्याला कांहीच हरकत नाही, म्हणून बाबूजी राष्ट्रसंत विनोबा भावे यांनी प्रवर्तित केलेल्या भूदान-यज्ञाच्या कार्याला वेळोवेळीं सक्रिय मदत करतात. त्यांनी आपल्या स्वतःच्या अत्यंत सुपीक शेतीचा $\frac{1}{6}$ हिस्सा भूदान-यज्ञांत हविर्भाग म्हणून दिला आहे. तसेंच १९५३ पासून ते सर्वोदय-संमेलनांत उपस्थित राहतात. त्यांच्याच हस्तें सर्वोदय-संमेलनाचें उद्घाटन होतें. ते एखाद्या प्रेमळ वडील भावाप्रमाणे भूदान आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना योग्य तो उपदेश करतात व त्यांचा उत्साह द्विगुणित करतात. राजेन्द्रांच्या उपस्थितीमुळे संमेलनाच्या सात्त्विक वातावरणांत अधिकच भर पडते. जणू काय गोक्षीरांत साखर पडते. सर्वोदयाच्या आर्थिक विषमता नष्ट करण्याच्या ध्येयानुसार अतिरिक्त संपत्तीचें स्वखुर्षीनें दान करणें व इतरांस करावयास लावणें प्रत्येक सर्वोदयनिष्ठाचें कर्तव्य आहे. बाबूजी कर्ते सर्वोदयवादी आहेत. असें ऐकण्यांत येतें कीं, ते आपल्या दहा हजार रुपयांच्या मासिक वेतनापैकी केवळ साडेतीन हजार स्वखर्चासाठी घेतात व बाकीच्या साडेसहा हजार रुपयांचें मासिक दान करतात. पण हें सर्व उजव्या हाताने केलेलें दान डाव्या हाताला कळूं नये इतक्या गुप्ततेने व निरहंकार वृत्तीने होत असतें. स्वतंत्र भारताला बाबू राजेन्द्रांसारखा सच्चरित्र, विद्वान् व मूक सेवक राष्ट्रपति लाभला, हें त्याचें आम्ही अहोभाग्य समजतों. अशा महान् राष्ट्रपुरुषाला दयानिधि उदंड आयुरारोग्य देवो हीच कोणत्याहि भारतवासीयाची त्याला भक्तियुक्त प्रार्थना असणार.

• • •

# मौलाना अबुल कलाम आझाद

(जन्म १८८८)

"मेरी जायदाद मेरी नेकी है। मुल्क की खिदमत मेरा महजब है। मेरी अदालत मेरा दिल है।"

[माझा प्रामाणिकपणा हेंच माझें धन, देशाची सेवा हाच माझा धर्म व माझें अंतःकरण हेंच माझें न्यायालय आहे.]

—मौ. आझाद

वरील तीन सरळ व सुलभ वाक्यांमध्ये आपल्या जीवनाचें सारसर्वस्व ग्रथित करणारे मौलाना आझाद आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ग्रंथकार, भाष्यकार



व वक्ते आहेत. ते केवळ सरस्वती-भक्तच नाहीत तर क्रियाशील राष्ट्रभक्तहि आहेत. सोन्याला सुगंधाची जोड मिळावी त्याप्रमाणे त्यांच्या सखोल विद्वत्तेला कर्तृत्वाची व मुत्सद्दीपणाची जोड मिळाली आहे. मूळ साहित्य-काराचा पिंड, पण देशाच्या विषम परिस्थितीने त्यांना राजकारणाच्या रणधुमाळींत खेचलें. त्यांचा जीवनवृत्तान्त फार संग्रामपूर्ण आहे. तेव्हा त्याचें आपण विहंगमावलोकन करूं या.

## उलेमांच्या खाणींतील कोहिनूर

हिंदी उलेमांच्या घराण्यांत मौ. आझादांचें घराणें अकबराच्या काळापासूनच विशेष मानाला प्राप्त झालें होतें. हिऱ्याच्या खाणींत एकामागून एक जास्त तेजस्वी हिरे सापडावेत, त्याप्रमाणे या घराण्यांत एकामागून एक जास्त विद्वान् व धर्मशील मौलाना निर्माण झाले. त्या खाणींतील मौलाना अबुल कलाम आझाद म्हणजे 'कोहिनूर हिरा!' दोन्ही अर्थांनी, आलंकारिक व शाब्दिक, हें सत्य आहे. कोहिनुराच्या प्राप्तीनंतर ती खाण उजाड झाल्याचें कळतें, तद्वत् मौलाना आझादांनंतर हें उलेमांचें घराणें संपलें. अबुल कलामांचे वडील मौलाना खैरुद्दीन हे सूफीपंथाचे पंडित होते. सूफीपंथ त्याच्या अद्वैताबद्दल सुप्रसिद्ध आहे. इस्लामचा तात्त्विक गाभा म्हणजे सूफीपंथ. सूफीपंथ हा प्रेममार्ग आहे. सहिष्णुतेचा पुरस्कर्ता आहे. अशा पंथाचे धर्मोपदेशक मौलाना खैरुद्दीन हे होते. त्यांनी अरबी व फार्शी भाषांमध्ये मूल्यवान् ग्रंथ लिहिले आहेत. कलकत्ता, दिल्ली, कराची व मुंबई येथे त्यांचे शेकडोंनी शिष्य होते. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत त्यांनी जातीने भाग घेतला होता. हें युद्ध अपयशी ठरतांच त्यांनी देशत्याग केला व ते तुर्कस्तानच्या खलिफाच्या आमंत्रणावरून तेथे तीन वर्षें राहिले. त्यांनी अनेक ग्रंथांची फार्शींत भर टाकली. पुढे त्यांचें वास्तव्य मक्केला झालें. मुसलमानांच्या या पवित्र धामीं आपल्या चरित्रनायकाचा जन्म १८८८ च्या डिसेंबर महिन्यांत झाला. जर गंगोत्रींतून उगम पावणारी नदी पवित्र गंगामाता झाली, जमनोत्रींतून निघणारी नदी जीवनदायी जमनामाता झाली, तर मक्केला जन्मणारें मूल, हजरत महंमदाने पुनीत केलेल्या स्थळीं जन्म घेणारी व्यक्ति आंतरराष्ट्रीय कीर्तीची कां होऊं नये? त्यांचें खरें व मूळ नांव अहमद होतें, पण वडील प्रेमळपणाने त्यांना फिरोजबख्त म्हणून हांक मारीत.

## प्रतिभाशाली विद्यार्थी

फिरोजबख्तने आईकडून 'अरबी' व पित्याकडून 'फार्शी' भाषांचें ज्ञान संपादन केलें. त्यांचें घर म्हणजे विद्वानांचा अड्डा असे. त्यामुळे विद्यार्जनाची पिपासा त्यांच्यांत उपजतच होती. बुद्धीची प्रगल्भता तर

असामान्य होती. ते एकपाठी तर होतेच, पण मूलगामी विचारकहि होते. पुढे मिश्र देशाच्या ‘ अल-अजहर ’ विद्यापीठांत त्यांनी तीन वर्षे अध्ययन केलें. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी अध्ययनाला जाणूनबुजून पूर्णविराम दिला. त्यांची अविषया बुद्धि आता पाश्चिमात्य शास्त्रीय ज्ञानाकडे वळली व अल्पावधींत त्यांनी इंग्रजी भाषेचें कामचलाऊ ज्ञान संपादून अर्वाचीन शास्त्रांचें व विद्येचें आलोडन केलें. नवविचारांच्या ग्रहणामुळे त्यांच्या बुद्धीला तेज व विवेचकता प्राप्त झाली. मूलगामितेला विवेचकतेची सांगड म्हणजे सुवर्णाला रत्नाची जोड ! मिश्रच्या विद्यापीठांतील प्राध्यापक व विद्यार्थी आझादला “ Prodigy ” ‘ बौद्धिक चमत्कारक ’ म्हणून लेखीत. असा हा बालज्ञानी इराण, तुर्कस्थान, ईजिप्त, अरेबिया वगैरे देशांचें परिभ्रमण करून वयाच्या सोळाव्या वर्षी भारताला परतला.

**अलौकिक सम्पादक**

“ आपणाशीं जें जें ठावें । तें तें इतराशीं शिकवावें । जाणते करूनि सोडावें । सकलजन ॥ ” अशी तळमळ त्यांना लागली. काय सांगावें व कसें सांगावें याचा त्यांच्यापाशी निधि होता. विद्याधन दिल्याने दुणावतें. त्यांनी लवकरच ‘ सची जुबान ’ नांवाचें मासिक संपादून प्रकाशित केलें. हें वर्ष १९०३ होतें. सुविख्यात उर्दू महाकवि हाली यांनी त्यांच्या मासिकाची मुक्तकंठाने स्तुति केली. एकदा त्यांची व हालीची अचानक भेट झाली. “ मी ‘ सची जुबान ’चा नम्र संपादक अबुल कलाम आझाद आहें ” असा त्यांनी परिचय करून दिला. महाकवि हालीचा विश्वास बसेना. हा सोळा वर्षांचा अल्लड तरुण आणि म्हणे एवढा यशस्वी संपादक ! शक्य नाहीं, कांही विश्वासघात आहे असें तो म्हणाला. जेव्हा इतरांनी त्याची खात्री पटवून दिली तेव्हा युवक आझादला त्याने पुत्रप्रेमाने आलिंगन दिलें; त्यांना कौतुकाने वर उचललें. त्यांच्या सखोल विद्वत्तेमुळे व असाधारण साहित्यिक शैलीमुळे तो त्यांचे “ उम्र में बच्चे, इल्म में बूढे ” “ वयाने बाल पण ज्ञानाने वृद्ध ” असें कौतुक करी. असें म्हणतात कीं, नव तुर्कस्तानचा विधाता केमालपाशा व इजिप्तचा झगलूलपाशा यांना त्यांच्या लेखणीने मोहित केलें होतें.

## करारी देशसेवक

पित्याच्या पैगंबरवासानंतर ते मुसलमानांचे धर्मगुरु, वारसाहक्काने होऊं शकत होते, नव्हे त्यांना शेकडो शिष्यांनी अत्याग्रहहि केला; पण त्यांनी तें स्थान नम्रतापूर्वक नाकारलें. त्यांच्या मनांत क्रांति झाली होती. क्रांतीच्या ज्वाला धगधगत होत्या. ते बेचैन झाले. त्यांचा निद्रानाश झाला. शेवटीं त्यांनी आपलें जीवित देशसेवेंत वेचण्याचा निर्धार केला. देशभक्तीचें असिधाराव्रत त्यांनी स्वीकारलें, विचारपूर्वक अंगीकारलें व त्याचें नैष्ठिक परिपालन आजपर्यंत केलें. सच्चा मुसलमान गुलाम असूं शकत नाही, गुलामगिरींत सुख मानूं शकत नाही अशी त्यांची धारणा. म्हणून स्वदेश स्वतंत्र करणें, परदास्याच्या शृंखला तटातट तोडणें, हें प्रत्येक हिन्दी इसमाचें पहिलें कर्तव्य आहे असें त्यांचें दृढ मत होतें. पण देशाची स्थिति निराशाजनक होती. राष्ट्रीय सभा—कॉंग्रेस—देश स्वतंत्र करण्यासाठी धडपडत होती. उलट मुस्लीम लीग मुसलमानांना राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संग्रामापासून जातीयतेच्या स्वार्थी प्रलोभनांना बळी पाडीत होती. राष्ट्रीय गाड्याला खीळ घालीत होती. अलीगडी विचारपंथाच्या सुशिक्षित, पदवी-धर मुसलमान पुढाऱ्यांच्या देशद्रोही कारवाया पाहून मौलाना आझादांचें हृदय पिळवटून निघालें. त्यांना ही परिस्थिति असह्य झाली व ते तिला विरोध करण्यास कटिबद्ध झाले.

## मुस्लीम लीगला करडा विरोध

मौलाना आझाद पडले सव्यसाची योद्धे. प्रभावी वाणी व भेदक लेखणी हीं त्यांचीं हमखास आयुधें. त्यांनी "अल हिलाल" वर्तमानपत्र संपादून प्रकाशित केलें. "अल हिलाल" मुसलमान समाजांत सामाजिक क्रांति घडवून आणण्याचें साधन होतें. मुस्लीम लीगच्या राजकीय धोरणावर ते सडकून टीका करीत. त्यांच्या टीकास्त्रांनी मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांचीं डोकीं भडकून गेलीं. त्यांच्या नेतृत्वाला सुरुंग लागले. कांही तरुण आझादांचे अनुयायी होऊन कॉंग्रेसमध्ये सामील झाले. 'शेषं कोपेन पूरयेत्' या न्यायाने मुस्लीम लीगच्या कांही जात्यंध कार्यकर्त्यांनी मौलाना आझादांना खुनाची धमकी दिली. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला. पण मौलाना

पडले खंबीर मनाचे. त्यांनी अशा धमक्यांना व सामाजिक बहिष्काराला भीक घातली नाही. मनुष्य परकीयांचा विरोध हसत मुखाने सहन करतो, कारण त्यांत एक प्रकारचा गौरव आहे. पण स्वजातिबांधवांचा विरोध म्हणजे छळ, प्रत्यक्ष जाच, मूर्तिमंत त्रास. त्यांत आत्मसमाधानाशिवाय कशाचीच प्राप्ति नाही. पण आझादांसारख्या तत्त्वनिष्ठांना आत्मसमाधान हाच काय तो आधारतंतु. या वर्तमानपत्रांत आझादांच्या सर्वोत्कृष्ट साहित्य-कलाकृति क्रमशः प्रसिद्ध झाल्या. त्यामुळे विकसित झालेल्या कमळावर जसे मधुकर तुटून पडावेत, तसेच वाचकवृंद "अल हिलाल"च्या वाचनासाठी धडपडत. कै. शिवरामपंत परांजप्यांच्या "काळा"ने जशी मराठी वाचक-मनाची पकड घेतली, तशीच आझादांच्या "अल हिलाल"ने उर्दू वाचकांच्या मनाची घेतली. त्यांत जळजळीत देशप्रेमाने थबथबणारे लेख असत, तसेच पुरोगामी दृष्टीने धर्मांचें व रूढींचें केलेलें विवेचनहि त्यांत येई. एक प्रथितयश संपादक म्हणून मौलाना आझाद ख्यातनाम झाले.

## सरकारची वक्रदृष्टि

'अल हिलाल'ने खळबळ माजवून दिली. इंग्रज नोकरशाहीला हें कसें मानवेल बरें ? सरकारने संपादकापाशी दहा हजारांचा जामीन मागितला. जामीन देऊन सरकारी बंधनांत वर्तमानपत्र संपादणें मानी आझादांना मानवेना. त्यांनी "अल हिलाल" सन्मानपूर्वक बंद पाडलें व मुत्सद्देगिरी म्हणून "अल बलाग" नांवाचें दुसरें वर्तमानपत्र तात्काळ सुरू केलें. नदीच्या वळशाने तिच्या पाण्यांत थोडाच फरक होतो ? पोळीच्या आकार-भेदाने पुरणाच्या गोडींत थोडेंच अंतर पडतें ? सरकार तर आझादांच्या मागे हात धुऊन लागलें. त्यांनी "अल बलागचें" वाचन गुन्हा ठरविला. पण वाचक "अल बलाग" अंधारांत वाचीत, गुप्तपणें वाचीत. ही इतिहासाची पुनरावृत्ति आहे. अगदी असेंच परतंत्र इटलींत मॅझिनीच्या वर्तमानपत्राचें होई. शेवटीं सरकारने मौलाना आझादांना बंगालच्या बाहेर खास हुकुमाद्वारें घालवून लावलें. आझाद डगमगणारे नव्हते. त्यांनी बिहारमध्ये रांचीला वास्तव्य केलें व आपलें अंगीकृत कार्य तेथून चालविलें. बेधडक-पणें चालविलें. सरकार चवताळलें व आझादांना नजरबंद राजबंदी करून

टाकलें. त्यांच्या घराला पोलिसांचा खडा पहारा असे. निरुपाय होऊन आझादांना " अल बलाग " बंद करावें लागलें. मौलाना आझाद म्हणजे एक अराजक तरुण, अशी सरकारची समजूत झाली. म्हणून महायुद्धाची यशस्वी समाप्ति होईपर्यंत व हिंदुस्थानांत इंग्रज सरकारच्या दृष्टीने शांतता व सुव्यवस्था होईपर्यंत या संभाव्य बंडखोराला–मौलाना आझादला–सरकारने रांचीला १९२० च्या जूनपर्यंत स्थानबद्ध करून ठेवलें. मौलाना आझादांनी हीं सर्व संकटें हसतमुखाने झेलली.

## कुराणाचे अभिनव भाष्यकार

मौलाना आझाद स्वभावतः तत्त्वचिंतक आहेत. स्थानबद्धतेचीं चार वर्षे त्यांनी धर्मतत्त्वचिंतनांत व विवेचनांत घालविलीं. कुराणाचा त्यांनी सखोल अभ्यास केला. त्यावर ते जों जों विचार करीत तों तों नवीन नवीन सिद्धान्तरत्नें त्यांना आढळत. त्यांनी या धर्मसिद्धान्तांचा संग्रह त्यांच्या कुराणावरील भाष्यपर ग्रंथांत केला. जेव्हा हा ग्रंथ प्रकाशित झाला तेव्हा त्याने मुस्लीम जगात एक वैचारिक खळबळ निर्माण केली. मौलाना आझादांना मुस्लीम जगांत श्रेष्ठ प्रतिष्ठा प्राप्त झाली.

## असहयोगी सैनिक

म. गांधी-प्रणीत असहकारितेच्या चळवळींत ते एखाद्या युयुत्सु योद्ध्याप्रमाणे पडले. युवराजांच्या स्वागतावर कलकत्त्याला कडक बहिष्कार पुकारण्यांत आला होता. तेव्हा देशबंधु दासांबरोबर मौलाना आझादांनाहि अटक करून एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली होती. देशासाठी प्राणार्पण करावयास निघालेल्या आझादांनी तिचें स्वागत केलें.

## काँग्रेसचे सर्वांत धाकटे अध्यक्ष

१९२२ सालीं आझाद मुक्त झाले. तेव्हा काँग्रेसमध्ये फेरवादी व नाफेरवादी असे दोन तट पडले होते. फेरवाद्यांच्या मतें कौन्सिल-प्रवेशाला काँग्रेसने संमति द्यावी असें होतें. नाफेरवादी असहकाराला ब्रह्म-लिखित मानीत. पहिल्या पक्षाचे अध्वर्यु देशबंधु दास व पं. मोतीलाल नेहरू होते, तर दुसऱ्या पक्षाचे अनन्य उपासक सरदार वल्लभभाई, राजाजी, सरोजिनी व राजेन्द्रप्रसाद हे होते. ह्या पक्षांचें रणक्षेत्र गया ठरलें. गया काँग्रेसमध्ये मत-

भेदाचें वादळ अध्यक्ष देशबंधु दास यांनीच निर्माण केलें पण ते त्याला शमवूं शकले नाहीत. सरतेशेवटीं त्यांनी राजीनामा देण्याची धमकी दिली. कॉंग्रेसचें तारूं मतभेदाच्या खडकावर आदळून फुटण्याची फार शक्यता होती. अशा आणीबाणीच्या वेळीं वयाने लहान, पण ज्ञानाने वृद्ध अशा अबुल कलाम आझादांनी आपल्या नौकानयनकुशलतेने तें वांचविलें. अश्रुभाला पुढे ढकलावें म्हणजे त्याच्या विनाशक शक्तीची धार बोथटते; ह्या व्यवहाराच्या न्यायाचें अनुकरण आझादांनी करविलें. त्यांनी ह्या वादग्रस्त प्रश्नासाठी कॉंग्रेसचें खास अधिवेशन भरवावें अशी सूचना आणली व ती तात्काळ सर्वसंमत झाली. तेव्हा कौन्सिल-प्रवेशाचा महत्त्वाचा प्रश्न निर्णयांत काढण्यासाठी १९२३ च्या मध्यांत कॉंग्रेसचें खास अधिवेशन भरविण्यांत आलें. अध्यक्ष आमचे ज्ञानवृद्ध मौलाना आझाद होते. मौलाना आझाद पडले समतोल विचार करणारे तत्त्वचिंतक. मूलगामिता हा त्यांच्या बुद्धीचा विशेष. त्यांनी आपल्या प्रभावी अध्यक्षीय भाषणांत दोन्ही विचारसरणींचें सम्यक् विवेचन केलें. त्यांचें परस्पर पूरकत्व सिद्ध केलें व विरोधाची मिथ्यता सिद्ध केली. परिवर्तन हा जगताचा सनातन धर्म आहे, तेव्हा फेरवाद्यांना—कौन्सिल-प्रवेशवाद्यांना कॉंग्रेसने तसें करावयास अनुमति द्यावी व नाफेरवाद्यांनी आपली सर्व शक्ति विधायक कार्यक्रमावर केंद्रित करावी असा समेटाचा सल्ला त्यांनी दिला. कॉंग्रेसने त्यांचें म्हणणें ऐकलें व समेटाच्या, सहकार्याच्या आनंदांत कॉंग्रेसचें अधिवेशन समाप्त झालें. त्या वेळीं मौलाना आझादांचें वय केवळ पस्तीस वर्षांचें होतें. एवढ्या अल्पवयांत कॉंग्रेसचे अध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांनीच सर्वप्रथम पटकावला व तोहि आणीबाणीच्या वेळीं. पण अभिजात विवेकशीलता व गंभीरता या दुर्मिळ गुणांमुळे ते त्यांत यशस्वी झाले.

## प्रभावी वक्तृत्व व व्यक्तिमत्त्व

त्यांच्या ओजस्वी वाणीची सर्वांनी स्तुति केली. त्यांच्या भारदस्त व आकर्षक व्यक्तित्वाकडे पाहतांच एखाद्या वैभवशाली मोगल सम्राटाची मूर्ति आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. त्यांचा किंमती व पायघोळ राजशाही कोट, रुपेरी केस, पिळदार मिशा, स्वाभिमानद्योतक उभी दाढी,

पाणीदार डोळे, विशाल भालप्रदेश व सुवर्ण कांति बघून कोणाला त्यांच्या-बद्दल आदर वाटणार नाही ? जसें बाह्यांग सुंदर तसेंच अंतरंग. वक्तृत्वाची ते केवळ मूर्तिच आहेत. त्यांचा खणखणीत मधुर आवाज, भाषेवरील असामान्य प्रभुत्व, ओज, उभे राहण्याची ऐट, अभिनय आणि प्रति-पादनाची शैली, सर्वच कांही आकर्षक आहे. भाषणांत भावना व बुद्धि यांचें मिश्रण असून एक एक शब्द मोत्यांच्या माळेंतील मोत्याप्रमाणे सुसंबद्ध वाटतो. ते उर्दूचे एक असामान्य वक्ते आहेत. त्यांच्या भाषणाच्या काव्यात्मकतेंत सर्वच गुंग होतात. त्यांच्या भाषणाचा कुणाला कंटाळा म्हणून येत नाही.

मौलाना आझादांना जातीयता कधी शिवली नाही. १९२३ ते २९ पर्यंतच्या काळांत हिंदुस्थानांत जातीय संस्थांना ऊत आला होता. कॉंग्रेस-मधील प्रतिष्ठित पुढारी हिंदुसभेंत अथवा मुस्लीम लीगमध्ये भाग घेत व कांहींनी तर कॉंग्रेसला राम राम ठोकला. आझाद मात्र कॉंग्रेसलाच चिकटून राहिले. त्यांनी थोडा फार भाग घेतला व मार्गदर्शन केलें, तें “ जमैयतुल उल्मा ए हिन्द ” या मुसलमानी उलेमांच्या संस्थेचें. ही संस्था प्रगतिपर विचारांची होती व कोणत्याहि प्रश्नाकडे धर्मसहिष्णुतेच्या दृष्टीने पाही. कॉंग्रेसच्या आज्ञेप्रमाणे मौलाना वागत.

## कायदेभंगाचे वीर

होतां होतां १९३० चा कायदेभंग धूमधडाक्याने सुरू झाला. कॉंग्रेसचें कार्यकारी मंडळ बेकायदेशीर म्हणून जाहीर झालें. मौलाना आझादांना दोन वेळां कॉंग्रेसचे सर्वाधिकारी म्हणून अटक करण्यांत आली. त्या वेळीं जवळ जवळ दोन वर्षें ते तुरुंगांत डांबले गेले होते.

## पार्लमेंटरी बोर्डाचे सभासद

१९३६ सालीं कॉंग्रेसने अधिकृतपणें कौन्सिलप्रवेशास मान्यता दिली व एक कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्ड स्थापन झालें. या बोर्डाचे मौलाना आझाद एक प्रमुख सभासद होते. त्यांच्या मुत्सद्देगिरीची साक्ष पूर्वीच पटली होती. म्हणून बंगाल, आसाम व वायव्य सरहद्दप्रांत ह्यांतील कॉंग्रेस मंत्रिमंडळांच्या राज्यकारभाराचे निरीक्षकश्रेष्ठ म्हणून त्यांना नियुक्त केलें होतें. त्यांनी

१९४० पर्यंत हें काम चोखपणें बजाविलें. असें दिसून आलें कीं, विद्वान् राज्यकारभाराच्या दगदगीच्या कामांत रममाण व यशस्वी होऊं शकतो.

### कॉंग्रेसचे सतत सहा वर्षें अध्यक्ष

त्यांच्या कणखर राष्ट्रीय बाण्यामुळे त्यांना पुन्हा एकदा १९४० मध्ये कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. अलीकडे कॉंग्रेसचीं अधिवेशनें लहान-सहान शहरांत होऊं लागलीं. हेतु हा कीं, सामान्य जनतेचा कॉंग्रेसशीं जास्त संबंध यावा. रायगड पडलें बिहारच्या मध्यभागीं. त्याच्या सभोंवतीं डोंगरी टेकड्यांचा गराडा आहे. अशा डोंगराळ स्थानीं कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें. कॉंग्रेस सुरू होण्याच्या दिवशीं सूर्योदयापासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली. अकाली पावसाला जोरहि फार असतो. त्यांत विजांचा कडकडाट व मेघांचा गडगडाट यांनी भयावह स्वरूप धारण केलें. कॉंग्रेसचें खुलें अधिवेशन पांच वाजतां भरणार होतें. जिकडे तिकडे जलमय झालें. त्यांत वादळाची भर. कॉंग्रेस अधिवेशन होतें किंवा नाही असा संशय निर्माण झाला. दिवस जानेवारीचे म्हणून थंडी मी म्हणत होती. परंतु दृढनिश्चयी व कर्तव्यनिष्ठुर मौलाना अबुल कलाम आझाद हातांत छत्री घेऊन गारा तुडवीत व पाणी तोडीत सभास्थानाकडे निघाले. त्यांना पाहतांच इतर पुढारी व शेकडो प्रेक्षक आपापल्या छत्र्या व घोंगड्या घेऊन सभास्थानीं जमले. अक्षरशः घोट्याइतक्या पाण्यांत उभें राहून दोन अडीच तासांत हें कॉंग्रेसचें अधिवेशन संपलें. पण ते दोन तास किती महत्त्वाचे व परीक्षेचे होते, याची वाचकांनीच कल्पना करावी. निसर्गाच्या प्रकोपावर मात करणाऱ्या आझादांनी भावी संग्रामाच्या भीषण स्वरूपाची जाणीव करून दिली. तो दिवस स्वातंत्र्याच्या लढ्याचा पहिला दिवस समजा, असें त्यांनी ठासून सांगितलें. जे निसर्गाला पराभूत करूं शकतात ते भारतीय स्वातंत्र्यवीर इंग्रज मानवांना केव्हाच पराभूत करतील असा आत्मविश्वास त्यांनी निर्माण केला. सम्राट् नेपोलियनाने दुर्गम आल्प्स पर्वत ओलांडून इटली देश पादाक्रान्त करण्यास निघालेल्या सैनिकांना उद्देशून जसें वीररसपूर्ण भाषण केलें, अगदी तसेंच या वेळचें मौलाना आझादांचें अध्यक्षीय भाषण होतें. ज्यांनी तें ऐकलें त्यांच्या कानांत तें

किती तरी दिवस निनादत होतें. ही मौलाना आझादांची कारकीर्द सहा वर्षांची दीर्घच नव्हे तर क्रांतिकारक व ऐतिहासिक ठरली. सतत सहा वर्षें कॉंग्रेसचा अध्यक्ष राहण्याचा बहुमान फक्त आझादांनाच मिळाला. या बाबतींत ते ' न भूतो न भविष्यति ' ठरले.

## प्रदीर्घ तुरुंगवास

पूज्य म. गांधींच्या मार्गदर्शनानुसार वैयक्तिक सविनय कायदेभंगाची मोहीम कॉंग्रेसने सुरू केली. या मोहिमेच्या प्रारंभींच मौ. आझादांना राजद्रोही व युद्धविरोधी भाषण करण्याच्या आरोपाखाली दीड वर्षांची सजा झाली. त्यांची १९४१ च्या जानेवारींत मुक्तता करण्यांत आली. कॉंग्रेसचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी सर स्टॅफोर्ड क्रिप्सशीं सतत दोन आठवडे बोलणें केलें. दोघांनीहि योजना व प्रतियोजना मांडल्या. मौ. आझादांची सूक्ष्म पण तरळ मुत्सद्देगिरी परीक्षेंत उतरली व सर क्रिप्स निराश होऊन विलायतेला परत गेले. क्रिप्सने गळ टाकला होता, पण आझादांनी तो टाळला. येथून आझादांच्या क्रांतिकारक उत्तर कारकीर्दीला सुरुवात झाली. १९४२ च्या ऑगस्टच्या ७ व ८ तारखांना मुंबई येथे ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचें ऐतिहासिक व क्रांतिकारक अधिवेशन भरलें. त्यांत इंग्रजांनी सत्तेचें हस्तान्तर करून भारत सोडून चालतें व्हावें, ( Quit India ) अशी मागणी कॉंग्रेसने केली. ही मागणी जर इंग्रज मान्य करणार नाहीत तर कॉंग्रेस स्वातंत्र्याचें युद्ध पुकारील असेंहि त्यांत ठरलें होतें. मौलाना आझादांचें भाषण म्हणजे युद्धारंभींची रणभेरी होती. सरकारने तात्काळ कॉंग्रेसला बेकायदेशीर संस्था म्हणून जाहीर केलें व रात्रीं दोन वाजतां, वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांसह, मौलाना आझादांना कारागृहांत दडपण्यांत आलें. तीन वर्षेंपर्यंत अहमदनगरच्या ऐतिहासिक किल्ल्यांत राजबंदी म्हणून आझादांना कोंडण्यांत आलें.

## प्रिय पत्नीचा वियोग

या दीर्घ कारागृहवासाच्या कालांत त्यांची प्रिय, सुशील व धर्मभीरु पत्नी बेगम आझाद पैगंबरवासी झाली. ती मृत्युशय्येवर असतांना पतीची

अंतिम भेट घेण्याची तिने इच्छा प्रदर्शित केली. सरकार आझादांच्या सत्त्वाचें हरण करून त्यांना सशर्त सोडण्यास तयार होतें. पण सत्त्वशील व करारी आझादांनी हें अमान्य केलें. सिंह भुकेला झाला तरी कोंड्याला स्पर्श करीत नाही. अखेर पतीची भेट न होतांच बेगम आझादांचें दुःखद प्राणोत्क्रमण झालें. देशाचा संसार हाच माझा संसार, अशा वृत्तीच्या मौलानांनी प्रिय पत्नीच्या चिरवियोगाचें दुःख गिळलें. कोण ही देशभक्ति व मानधन वृत्ति ! अशा करारी देशभक्ताला सामान्य जनता डोक्यावर कां वरें घेणार नाही ? वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांसह मौलाना बाहेर पडले, आपल्या बंदिस्त सैनिकांसह सेनापति शत्रूच्या हातांतून सुटला.

## स्वतंत्र भारताचे शिक्षणमंत्री

पुढे अल्पावधींत वाटाघाटींचा काळ आला. मौलाना पडले कसलेले मुत्सद्दी. त्यांनी कॉंग्रेसच्या वतीने इंग्रज सरकारशीं यशस्वी वाटाघाटी केल्या, समेट केले व स्वातंत्र्याची प्राप्ति करून घेतली. कॉंग्रेसचे अध्यक्ष मौलाना आझाद मोठे भाग्यशाली कीं, ज्यांच्या अध्यक्षीय कालांत स्वातंत्र्याचें अभिवचन इंग्रज सरकारने दिलें, त्यांच्या कर्तृत्वाचा व गाढ विद्वत्तेचा उचित गौरव म्हणून त्यांना स्वतंत्र भारताच्या शिक्षणमंत्र्याचें महत्पद देण्यांत आलें आहे. शिक्षणासंबंधी त्यांचे विचार प्रगतिपर, उदात्त व मूलगामी आहेत. कांही शैक्षणिक योजना ते लवकरच कार्यान्वित करतील. दिल्ली येथे एक मध्यवर्ति ग्रंथालय लवकरच उभारलें जाईल. शेकडो हिंदी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन परदेशांत तांत्रिक व शास्त्रीय विद्या संपादनास पाठविण्यांत येत आहे. राष्ट्राला अत्यंत उपयुक्त असेंच त्यांचें हें शैक्षणिक कार्य होत आहे.

## साहित्य ‘ अकाडमी ’

त्यांच्याच मूळ कल्पनेनुसार भारतसरकारने ‘ साहित्य अकाडमी ’ नांवाची एक अभिनव संस्था १९५४ मध्ये स्थापन केली. या संस्थेच्या-द्वारां भारतांतील सर्व प्रमुख भाषांमध्ये प्रतिवर्षीं प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांचें सम्यक् परीक्षण करण्यांत येतें व पहिल्या श्रेणीच्या ग्रंथकारांना अनुरूप

पारितोषिकें भारतसरकारतर्फे सन्मानपूर्वक देण्यांत येतात. मौलानांनी १९५५ च्या एप्रिल व मे महिन्यांत युरोपखंडांतील सर्व प्रगतिपर देशांमध्ये सहेतुक परिभ्रमण केलें. ते प्रत्येक विश्वविद्यालयांत गेले व त्याचें त्यांनी सूक्ष्म अवलोकन केलें. त्यांनी निरनिराळ्या देशांतील शिक्षणपद्धतींचा तुलनात्मक अभ्यास केला व त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचें यथार्थ आकलन केलें. आता भारताच्या विशिष्ट परिस्थितीला अनुसरून कोणती व कशा-प्रकारची शिक्षण-पद्धति येथे प्रचलित केली पाहिजे, यासंबंधी ते गंभीरपणें विचार करीत आहेत. शैक्षणिक क्षेत्रांत क्रान्तीची अपेक्षा करणें गैरवाजवी आहे. उलट शैक्षणिक प्रगति उत्क्रांति-तत्त्वानुसारच होणें इष्ट आहे. तेव्हा मौलाना आझाद सुधारलेली व उपयुक्त शिक्षण-पद्धति भारतांत यथाकाल चालू करतील अशी दृढ आशा आहे.

• • •

# भारतरत्न पं. जवाहरलाल नेहरू

(जन्म १८८९)

" पं. जवाहरलालमें जहाँ एक वीर योद्धा की तेजी और अधीरता है वहाँ एक राजनीतिज्ञका विवेक भी है। वह स्फटिकमणी की भांति पवित्र है; उसकी सत्यशीलता सन्देह के परे है। वह अहिंसक और अनिन्दनीय योद्धा है। राष्ट्र उसके हाथ में सुरक्षित है। "


—म. गांधी (१९२९)

" पं. जवाहरलाल मेरा वारीस है।

—म. गांधी (१९४२)

## पुत्र व्हावा ऐसा

" पित्याचें अपूर्ण राहिलेलें काम पुत्र पुरें करील " असे उद्गार पं. मोतीलाल नेहरू यांनी लाहोर येथे काढून हिंदी राष्ट्रीय सभेचा



कांटेरी मुकुट आपल्या प्रिय पुत्राच्या शिरावर ठेवला. तो प्रसंग इतका गंभीर व रमणीय होता कीं, पाहणाऱ्यांना एक प्रकारची धन्यता वाटली. सुपित्याचा सुपुत्र सहसा आढळत नाही, पण नेहरू पिता-पुत्रांचें भाग्यच अलौकिक होतें. पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिन्ही लोकीं झेण्डा॥ हें सुभाषित येथे सत्य सृष्टींत उतरलें. ही त्रिखंड-कीर्ति पं. जवाहरलालजींनी कशी संपादन केली हा उद्बोधक जीवनवृत्तान्त आपण अभ्यासूं या.

## वैभवांत वाढले

पं. जवाहरलाल यांचा जन्म १८८९ मध्ये नोव्हेंबरच्या १४ तारखेला प्रयाग येथे एका उच्च व सुसंपन्न काश्मिरी कुळांत झाला. त्यांच्या मातोश्रींचें नांव स्वरूपाराणी होतें, तर पित्याचें नांव मोतीलाल नेहरू होतें. नांवांत-देखील कोण रम्यता व यथार्थता! स्वरूपाराणीचा पुत्र रूपवान् असणार व मोतीलालांचा मुलगा जवाहरच असणार. अमृतवेलीला कडू निंबोळ्या का लागणार? चंदनाचा दुर्गंध का सुटणार? कस्तुरी दुर्वास का सोडणार? पंडित मोतीलाल पडले नामांकित वकील व अखिल भारतीय राष्ट्रपुढारी. तेव्हा 'बापसे बेटा सवाई' "Greater son of a Great father", ही गोष्ट जगाच्या इतिहासांत विरळी. इंग्लंडच्या इतिहासांत पिट् दी एल्डरचा पिट् दी यंगर हा एक सवाई बेटा आढळतो. त्यांचेंच काय तें साम्य नेहरू पिता-पुत्रांशीं. निसर्गांत असें दिसतें कीं, मोठ्या वृक्षांच्या छायेंत इतर वृक्ष वाढत नाहीत, तसेंच जवळ जवळ मानवी व्यवहाराचें आहे. पण पं. जवाहरलाल याला अभिनन्दनीय अपवाद आहेत. कारण पं. मोतीलालजींनी त्यांना तशा रीतीनेच वाढविलें. पं. मोतीलालजींचीं पहिलीं दोन अपत्यें वारल्यामुळे त्यांचें तिसरें अपत्य पं. जवाहरलाल, आईबापांचे एकमात्र आशातंतु आणि प्रेमस्थान होतें. त्यांचें बालपण वैभवांतच गेलें. चांदीच्या नव्हे तर सोन्याच्या चमच्यांतून त्यांना दूध पाजण्यांत येत असे. एखाद्या राजपुत्राने त्यांच्या लाडाचा हेवा करावा. पं. मोतीलालजींना इंग्रजी भाषेचें, भूषेचें व जीवनपद्धतीचें मोठें आकर्षण होतें म्हणून त्यांनी एका आंग्ल दासीला घरीं ठेवून इंग्लिश पद्धतीने पुत्राचें पालनपोषण करविलें.

## शैक्षणिक संस्कार

बाल जवाहरलालवर आंग्ल संस्कृतीचे संस्कार प्रथम झाले. शिक्षण-देखील एका इंग्लिश अध्यापकाकडून देवविलें. हा इंग्लिश अध्यापक होता आस्तिक व सनातनी वृत्तीचा. बाल जवाहरलालवर त्याच्या सात्त्विक राहणीचा योग्य तोच परिणाम झाला. बाल जवाहर धार्मिक बनला. एक दिवस त्याने पं. मोतीलाल नेहरूंबरोबर सिनेमाला जाण्याचें नाकारलें.

पं. मोतीलालजींना पुत्राची धार्मिक वृत्ति आवडली नाही. त्यांनी संतापांत त्या आस्तिक इंग्लिश अध्यापकाला आनंद-भवन पांच मिनिटांत सोडावयास लावलें. अशा मिजाशी वातावरणांत बाल जवाहर वाढला. पं. मोतीलालजींना हिंदी शाळा शुद्ध गधेघाट वाटत. म्हणून हिंदी शालेय वातावरणाचा त्यांनी पं. जवाहरलालला स्पर्शदेखील होऊं दिला नाही. त्यांनी तात्काळ एफ्. टी. ब्रुक्स या नवीन इंग्लिश शिक्षकाची योजना केली.

## सर्वधर्मसमभावना

ब्रुक्स पडले निष्ठावंत थिऑसॉफिस्ट. त्यांची शिफारस बेझंटबाईंनी केली होती. त्यांचा सहवास तीन वर्षे बाल जवाहरलालला लाभला. पं. जवाहरलालजींची ग्रहणशक्ति असामान्य. शिष्याच्या पात्रतेमुळे शिक्षकाच्या उत्साहाला भरती येते व तो अधिक ज्ञानप्रदान करतो. ब्रुक्ससाहेबांच्या सहवासयुक्त अध्यापनामुळे पं. जवाहरलालला वाचनाची गोडी लागली व त्याने डिकन्स, स्कॉट वगैरेंच्या कादंबऱ्या वाचल्या. विज्ञानशास्त्राचें दारहि ब्रुक्समुळे थोडें उघडें झालें. साधनांची व पैशाची उणीव नव्हतीच. कुमार जवाहराने एक छोटीशी रसायनशाला उभारली व तींत प्रयोग करण्यांत तो मग्न होई. ज्ञानाचें दालन कुमार जवाहरलालला उघडें झालें. सरस्वतीला लक्ष्मीची जोड मिळाली, नव्हे आधी असलेल्या लक्ष्मीला सरस्वतीची प्राप्ति झाली. पुढे काय? बौद्धिक पराक्रम व विक्रम! कुमार जवाहराच्या संस्कारक्षम मनावर थिऑसॉफीच्या विचारसरणीची अढळ छाप बसली. ब्रुक्स कुमार जवाहरला ॲनी बेझंटबाईंचीं व्याख्यानें अथवा प्रवचनें ऐकण्यास थिऑसॉफिकल लॉजमध्ये घेऊन जात. बेझंटबाई पडल्या वाग्देवता. त्यांच्या भाषणाने जवाहर थिऑसॉफीचे सभासद झाले व त्यांना दीक्षा दिली खुद्द ॲनी बेझंटबाईंनी. अशा थोरांमोठ्यांच्या सहवासांत जवाहरलाल वाढले. थोरपणा संसर्गजन्य आहे. सर्वधर्मसमभाव ही थिऑसॉफीची प्रमुख शिकवण. ती कुमार जवाहरलालांच्या रक्तांत भिनली ती भिनली. आजच्या धर्मातीत भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल असे बनले. ॲनी बेझंटबाई त्यांची एक शिल्पकार होती.

## राष्ट्रभक्तीचा बीजांकुर

१९०४ मध्ये आशिया खंडामध्ये राष्ट्रीयतेची ठिणगी पेटविणारें युद्ध रशिया व जपानमध्ये भडकलें. लहानशा जपानने देशप्रेमाच्या बळावर अवाढव्य व विशाल रशियाला पराजयाचे लोखंडी चणे चारले. देशप्रेमाच्या शक्तीवर लहानसें राष्ट्र अचाट कार्य व पराक्रम करूं शकतें, हें दृक्प्रत्ययास आलें. देशभक्त जपान्यांच्या विजयाने कुमार जवाहरलालांच्या हृदयांतील देशभक्तीचा स्फुलिंग प्रज्वलित केला. इवलासा जपान स्वातंत्र्य संपादून बलिष्ठ होऊं शकतो तर भारत कां होऊं नये ? कुमार जवाहर चिंताक्रान्त झाला. राष्ट्राभिमानाच्या विचारांनी त्याचें अंतःकरण भरूं लागलें. भारत इंग्रजांच्या दास्यशृंखलांतून कसा मुक्त होईल या विचाराचें चक्र त्याच्या डोक्यांत फिरूं लागलें. कुमार जवाहरलालला "मी वीरोचित कामें करीत आहें. हातांत तलवार घेऊन हिंदी स्वातंत्र्यासाठी लढत आहें, त्याला मुक्त करीत आहें." अशीं स्वप्नें पडूं लागलीं. मनीं वसे तें स्वप्नीं दिसे हेंच खरें. जपानचा विजयचन्द्र व कुमार जवाहरलालांचें हृदय चन्द्रकान्तमणि. जपानच्या विजयाच्या वार्तारूपी किरणांनी हा चन्द्रकान्त द्रवला, विरघळला. भारताच्या उज्ज्वल व वैभवशाली भूतकाळाने पं. जवाहरलालला देशप्रेमी बनविलें नाही, तर जपानच्या देशभक्तीच्या प्रखर उदाहरणाने त्याला देश-प्रेमाचे धडे दिले. एवम्, पं. जवाहरलालांची देशभक्ति केवळ भारतनिष्ठ किंवा आत्मनिष्ठ नसून ती परोद्भूत आहे. परोद्भूत असली म्हणून बिघडलें काय ? तिचें तेज तर दिपवणारें आहेना ! तिने त्यांना प्राणाचीहि पर्वा न करावयास लावलेंना ! सर्वस्वाचें बलिदान करण्यास प्रवृत्त केलेंना ! नदीचें मूळ पाहूं नये म्हणतात तें याचमुळे. ऋषीचें कूळ शोधूं नये म्हणतात तें याच-मुळे. ऋषि आत्मबलाच्या व तपश्चर्येच्या जोरावरच तपोधन होऊन जगांत प्रतिष्ठा संपादितो, तद्वत् पं. जवाहरलालजी स्वपराक्रमाच्या, त्यागाच्या व सेवेच्या बळावरच आज जनताहृदयसम्राट् झाले आहेत. त्याचा वृत्तान्त मोठा रोमहर्षणकारक आहे.

## हॅरो चा हिरा

केवळ पंधराव्या वर्षी पं. जवाहरलालांना लंडनच्या हॅरो विद्यालयांत

दाखल करण्यांत आलें. या विद्यालयांतून जे फार मोठे योद्धे, कवि, राजकारणी पुरुष बाहेर पडले, त्यांचीं कांही प्रमुख नांवें अशीं : पामर्स्टन, पील, बाल्डविन्, शेरिडन, बायरन्, लार्ड वेलस्ली वगैरे. हॅरो म्हणजे थोरांची खाण. हिऱ्यांच्या खाणींत हिरेच सांपडणार. इंग्लंडच्या इतिहासांत ज्यांचीं नांवें अजरामर झालीं, ज्यांनी इंग्लंडच्या भाग्याला कलाटणी दिली, उजळा दिला, अशांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमींत पं. जवाहरलालांचें शिक्षण झालें. जवाहरलाल मानसिक व शारीरिक दृष्ट्या वाढले. मग ते हॅरोचे हिरो “ Hero ” कां बरें होणार नाहीत? या विद्यालयांत असतांना जवाहरलालजींनी सर्व इंग्लिश खेळांत प्रावीण्य संपादन केलें. त्यांना वाचनाची हौस होतीच. विद्यार्थि-मंडळाच्या व्याख्यानमालांत व वादविवादांत ते भाग घेत. एक प्रतिभाशाली अष्टपैलू विद्यार्थी म्हणून ते सर्वांच्या आदरास पात्र झाले. येथून ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. अशा रीतीने इंग्लंडांतील सरदारांच्या, लक्ष्मीपुत्रांच्या व राजपुत्रांच्या सहवासांत जवाहरलाल यांचें माध्यमिक शिक्षण झालें. अमीर-उमरावांच्या रात्रंदिवस सहवासामुळे जवाहरलालांमध्येहि एक प्रकारची आढ्यता, सरदारी मिजास निर्माण झाली. नव्हे ती वारसाहक्काने त्यांना प्राप्त झाली. लोकशाहीचे निष्ठावन्त पुरस्कर्ते पं. जवाहरलाल इतके ऐटबाज व मिजाशी कां बनले याचें हें कारण आहे.

## केंब्रिजचे विद्यार्थी

विलायतेंतील अतिप्राचीन विद्यापीठ म्हणून केंब्रिजची ख्याति आहे. या विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणाची उत्कृष्ट व्यवस्था आहे. प्राध्यापकवर्ग आपल्या सखोल ज्ञानाबद्दल व अध्यापनाच्या कौशल्याबद्दल ख्यातनाम आहे. प्रश्न फक्त अति खर्चाचा आहे. पण तो प्रश्न पाण्यासारखा पैसा खर्च करणाऱ्या पं. मोतीलालजींना भेडसावूं शकत नव्हता. कारण लक्ष्मी त्यांच्या घरीं पाणी भरीत होती. तेव्हा लक्ष्मीपुत्र जवाहरलाल केंब्रिजमध्ये दाखल झाले. केंब्रिजच्या वातावरणांत ते रंगले व आपल्या प्रतिभेने चमकले. त्यांनी तेथे एक हिंदी विद्यार्थि-मंडळ स्थापन केलें. या मंडळाच्या सभांत ते अंतःकरणपूर्वक मूक भाग घेत व हिंदी प्रश्नावर जिवाभावाने विचार करीत. याच मंडळाने लजपतराय, गोखले व पालबाबूंसारख्या थोर देश-

भक्तांची व्याख्यानें तेथे करविलीं. दिव्याने दिवा पेटतो त्याप्रमाणे विचाराने विचाराला चालना मिळते. जवाहरलालांच्या हृदयांतील देशप्रेमाचा स्फुलिंग प्रज्वलित झाला, पण हा त्याचा क्षणिक व भाबडा भडका होता. आता त्यांचें बौद्धिक क्षितिज हळूहळू विस्तीर्ण होत होतें. त्यांचे विषय रसायन-शास्त्र, वनस्पतिशास्त्र आणि भूस्तरशास्त्र असे होते. ते हे विषय घेऊन प्रावीण्य संपादून बी. ए. झाले. पण त्यांच्या बुद्धीचा व्याप ह्या विषयांपुरताच मर्यादित नव्हता. नाही तर केवळ रसायनशास्त्रज्ञ झाले असते. इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र इत्यादि विषयांचेंहि ते अध्ययन करीत. वाचनाचें त्यांना व्यसनच होतें.

## बॅरिस्टर जवाहरलाल

केंब्रिजचें शिक्षण संपतांच वडिलांचा स्वतंत्र धंदा पत्करावा असें ठरवून ते बॅरिस्टरीच्या अभ्यासाकडे वळले. बॅरिस्टरीचा अभ्यास त्यांना सोपा वाटला म्हणून त्यांनी आपला वेळ सर्वसामान्य वाङ्मय वाचण्यांत, प्रस्तुत राजकीय चळवळींचें निरीक्षण करण्यांत व समाजवाद्यांशीं पुसट ओळख करण्यांत घालविला. ते १९१२ मध्ये बॅरिस्टर झाले.

## आयर्लंडला भेट

मध्यंतरीं १९१० च्या उन्हाळ्यांत ते आयर्लंडला गेले. तेथील जहाल पक्षाने–सिनफेन पक्षाने–त्यांचें मन आकर्षिलें होतें. या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी नाही नाही ते हाल सहन केले. ते हसत मुद्रेने फांसावर लटकले. युयुत्सु जवाहरलालांच्या मनावर त्यांच्या स्वदेश-प्रेमाचा कायमचा ठसा उमटला. देशभक्तीच्या वैभवाचें त्यांना ओझरतें दर्शन झालें. भोगवादाचें वैयर्थ्य कळलें. एवम्, विलायतेंत सात वर्षे शिक्षण संपादून, यूरोपखंडाचें भ्रमण व सूक्ष्म निरीक्षण करून, ज्ञानसंपन्न बॅरिस्टर जवाहरलाल १९१२ च्या हेमंत ऋतूंत मायभूमीला परतले. मुंबईच्या धक्क्यावर त्यांच्या स्वागताला उदरंभरू हमालांशिवाय कोण असणार ? या प्रसंगाचें ते असें वर्णन करतात. “ मुंबईच्या धक्क्यावर मीं पाय ठेवला, तेव्हां आढ्यतेखोरपणावांचून माझ्याजवळ वाखाणण्यासारखें कांही नव्हतें असें मला वाटतें. ” कोण ही आत्मजाणीव !

## भिन्न मनोवृत्ति

बॅ. जवाहरलालांनी अलाहाबादच्या हायकोर्टात वकिली सुरू केली खरी, पण त्यांचें चित्त तींत लागेना. बॅरिस्टरींत त्यांचें मन रमेना. पिता-पुत्रांत कोण हा फरक ! पं. मोतीलालजींना कोर्टातील वातावरण जीवनदायी होतें. ते मासोळीप्रमाणे त्यांत वावरत. पाण्याबाहेर मासा जसा तडफडतो तसे ते कोर्टाबाहेर बेचैन होत. पण जवाहरलालांची गोष्ट अगदी उलट. कोर्टात त्यांचा प्राण गुदमरत असे. त्यांना खुल्या, मैदानी जगांत बौद्धिक पराक्रम करावा असें वाटूं लागलें. ध्येयहीन आयुष्याची रूक्ष चाकोरी ओलांडण्याची तळमळ त्यांना लागली. पं. मोतीलालजींच्या हें लक्षांत आलें पण करतात काय ?

## बांकीपूरची काँग्रेस

१९१२ च्या नाताळांत बांकीपूरला भरलेल्या काँग्रेस अधिवेशनास ते प्रतिनिधि म्हणून हजर राहिले. हें काँग्रेसचें सर्वांत लहान अधिवेशन होतें. अमरावतीचे सुप्रसिद्ध मुधोळकर वकील हे अध्यक्ष होते. या अधिवेशनांतील प्रभावी व्यक्ति म्हणजे गोखलेच. जवाहरलालजींच्या भावुक मनावर गोखल्यांची छाप पडली. त्यांच्या भारतसेवक समाजानें त्यांचें मन वेधून घेतलें. १९१२ मध्ये पं. जवाहरलालजींचा काँग्रेसशीं जो संबंध जुळला तो जुळलाच. त्या वेळची काँग्रेस मवाळांच्या हातांतील बाहुलें होती. इंग्रजी शिकलेल्या वरिष्ठवर्गीयांचाच तींत भरणा होता. छानपैकी इस्त्री केलेल्या विजारी आणि कोट घालून, राजकारणाचा सिगारेटच्या झुरक्यासरशीं बातचीत करणारे पर्यंकपंडित तेथे जमत. गोखलेच काय ते एक अपवाद जवाहरलालजींना आढळले. तरी पण भारताची एकमेव राष्ट्रसभा समजून पंडित जवाहरलालांनी काँग्रेसमध्ये राहूनच कार्य करण्याचें निश्चित केलें. पण त्यांची वीरवृत्ति मधूनमधून उसळे व ते परदेशस्थ हिंदी मजुरांवर व प्रजाजनांवर होणाऱ्या जुलमांच्या विरोधक चळवळींत उडी घेत.

## शिकारी जवाहर विरघळले

याशिवाय आपली धाडसी वृत्ति व मस्ती ते शिकारीच्या द्वारें जिरवून घेण्याचा प्रयत्न करीत. इंग्लिश लोकांच्या साहचर्याने त्यांना शिकारीचा

नाद लागला होता. पण एका करुण प्रसंगाने त्यांच्यांत अहिंसक क्रांति घडवून आणली. एकदा एक लहान निरुपद्रवी हरिणाचें पाडस त्यांच्या गोळीने घायाळ होऊन पडलें व अश्रूंनी डबडबलेल्या आपल्या टपोऱ्या डोळ्यांनी त्याने त्यांच्याकडे दृष्टि लावली. शिकारी जवाहरलाल विरघळले व त्यांनी हिंसक शिकार सोडली. त्या पाडसाचे ते करुणापूर्ण डोळे अद्यापिहि त्यांना कधी कधी दिसतात. म. गांधींच्या वारसाची ही भूमिका लक्षांत घेण्यासारखी आहे.

## जहालांचे अनुयायी

१९१४ मध्ये लो. टिळकांची सुटका झाली. महायुद्धाच्या ज्वाला भडकल्या. लो. टिळक बाहेर येतांच जहालांमध्ये जीवन संचारलें. कांही तरी भरीव देशकार्य केलें पाहिजे अशी तळमळ, हुरहूर जवाहरलालजींना लागली व त्यांच्या वीरवृत्तीने लो. टिळकांच्या नेतृत्वाकडे धाव घेतली. याच वेळीं होमरूल लीगची भारतव्यापी चळवळ सुरू झाली. आपले चरित्रनायक त्या चळवळींत तनमनधनाने पडले. जहाल कार्यक्रमांत ते रममाण झाले. केवळ बोलक्या राजकारणाचा त्यांना तिरस्कार वाटे. प्रत्यक्ष प्रतिकाराचे ते पुरस्कर्ते झाले. ते आता एका समानशील गुरूच्या शोधांत होते. ब्रिटिश सत्तेशीं निधड्या छातीने टक्कर देणाऱ्या गुरूची त्यांना आवश्यकता तीव्रपणें भासूं लागली. अशा अवस्थेंत ते १९१६ च्या लखनौ कॉंग्रेसला गेले.

## महात्माजींशीं तोंडओळख

म. गांधींची व त्यांची पहिली दृष्टादृष्ट या वेळीं झाली. दक्षिण आफ्रिकेंत धैर्याने लढलेल्या यशस्वी अहिंसक सेनापतीची व युयुत्सु जवाहरलालजींची ही पहिलीवहिली भेट होती. मनाने मनाला ओळखलें. पण या वेळीं तोंडओळखीपलीकडे ते जाऊं शकले नाहीत.

## संसारांत पदार्पण

याच वर्षीं वसंतागमन सूचित करणाऱ्या वसंतपंचमीच्या शुभ मुहूर्तावर दिल्ली शहरांत त्यांचें लग्न मोठ्या थाटामाटांत साजरें झालें. त्यांच्या सहधर्मचारिणीचें शुभनांव "कमला" होतें. त्यांना अनुरूप पत्नी लाभली.

ते मधुचंद्रासाठी तीन महिने काश्मीरमध्ये राहिले. हिमालयाची वनशोभा त्यांच्या नवपरिणीत जीवनांत आल्हाद निर्माण करी.

### एक भयंकर दिव्य

जवाहरलाल म्हणजे धाडसाचा व उत्साहाचा झरा. हिमालयाच्या या शृंगावरून त्या शृंगावर ते आनंदाने आरोहण करीत, दऱ्याखोऱ्यांत भ्रमण करीत, निर्झरांत अवगाहन करीत. अशा स्थितींत त्यांच्यावर एक भयंकर प्रसंग ओढवला. अमरनाथची गुहा पाहण्याची त्यांना इच्छा झाली. ते कमरेला दोऱ्या बांधून कित्येक हिमनद्या ओलांडून तिकडे गेले. वाटेंत अनेक चर होते, पण नुकत्याच झालेल्या बर्फाच्या वर्षावामुळे ते झाकून गेले होते. या बर्फामुळे पं. जवाहरलालजींची इतिश्री होण्याचा भयंकर प्रसंग ओढवला. एका प्रचंड चराच्या जबड्यांत पं. जवाहरलाल गडप झाले. पण त्यांचा तोल सुटला नाही व मन गोंधळलें नाही. चराच्या कडांना त्यांनी चट्ट धरून ठेवलें. त्यांच्या प्रसंगावधानाने त्यांना वांचविलें. वाटाड्यांनी त्यांना वर खेचलें व पं. जवाहरलाल सहीसलामत बाहेर पडले. हिमालयाच्या उंच उंच शृंगांनी त्यांना इतका चटका लावला कीं, अद्याप-देखील फुरसत मिळतांच ते काश्मीरकडे अथवा त्यांच्याकडे धाव घेतात.

### वडिलांना विरोध

१९१९ च्या पूर्वार्धात लखनौला प्रांतिक कॉंग्रेसचें अधिवेशन पं. मोतीलालांच्या अध्यक्षतेखाली भरलें. अध्यक्षमहोदय मवाळांच्या पद्धतीला अनुसरून इंग्रजांच्या न्यायबुद्धीची तारीफ करूं लागले. इतक्यांत 'संशय' असा आवाज श्रोत्यांमधून आला. पं. मोतीलालजी मनांत चरफडले. पण करतात काय? तो आवाज त्यांच्या प्रिय पुत्राचा होता. अनेक वेळां या पिता-पुत्रांचा मतभेद होई, ध्येयभेद होई. पण तरुण पुत्राने आपल्या वृद्ध पित्याला त्याग, तपस्या आणि कंटकमय मार्गावर आणलें. इतिहासांतील कोण ही अद्वितीय घटना!

### सत्याग्रही सैनिक

म. गांधींनी काळ्या रौलट ॲक्टाविरुद्ध १९१९ मध्ये सत्याग्रहाचें रणशिंग फुंकलें. पं. जवाहरलालांच्या तारुण्यसुलभ उत्साहाला भरती आली.

पं. मोतीलालजी चिंताक्रान्त झाले. दोघांच्याहि मनाची तगमग सुरू झाली. पं. मोतीलालजींच्या आग्रहामुळे म. गांधी प्रयागला गेले. त्यांनी पं. जवाहरलालांना पुत्रवत् कुरवाळलें. त्यांच्यामध्ये हृदयसंवाद झाला. दोघांचे घनिष्ठ संबंध जुळले ते जुळलेच, ते कधीहि खंडित झाले नाहीत. मतभिन्नता झाली, ध्येयें वेगवेगळीं दिसूं लागलीं, मार्ग निराळे होण्याची शक्यता दिसूं लागली, पण प्रेमाचे बंध सैल झाले नाहीत. आपुलकीची भावना क्षीण झाली नाही. कोण ही हृदयैक्यता ! म. गांधींनी वडिलांना न दुखविण्याची सल्ला दिली. पण पितृप्रेमावर देशप्रेमाने विजय प्राप्त केला व पं. जवाहरलाल सत्याग्रही सैनिक झाले.

## विवेकशील संयम

पं. जवाहरलाल आपल्या अत्यवस्थ प्रिय पत्नीला व मातोश्रीला हवा-पालट करण्यासाठी १९२० च्या मे महिन्यांत मसूरीला घेऊन गेले. त्या वेळीं तेथे अफगाण व ब्रिटिश वकिलांमध्ये तहाच्या वाटाघाटी सुरू होत्या. पं. जवाहरलालांचें तेथील अस्तित्व इंग्रज सरकारला भयप्रद वाटलें, म्हणून त्यांना तात्काळ मसूरी सोडण्याचा हुकूम देण्यांत आला. या अन्यायी हुकुमामुळे शीघ्रकोपी जवाहरलाल चिडले, पण अत्यवस्थ कमलेकडे पाहून त्यांनी संयम राखला.

## शेतकऱ्यांची सेवा

१९१९ ते २१ पर्यंत पं. जवाहरलालांनी संयुक्त प्रांतांत शेतकऱ्यांची संघटना निर्माण केली. सर्वसामान्य शेतकऱ्यांची अशी धारणा झाली कीं, विलासी व आनंदभवनांत आयुष्य कंठणारा जवाहर दुःखी शेतकऱ्यांत स्वतःला पूर्ण विसरतो. शेतकरी-चळवळीने अल्पावधींतच एवढें प्रचंड स्वरूप धारण केलें कीं, सरकारला जागृत शेतकऱ्यांच्या निःशस्त्र जमावावर गोळीबार करावा लागला. जालियनवाला बागेतील हत्याकांडाने त्यांच्या हृदयावर ज्या जखमा झाल्या होत्या, त्यांवर सदरहू गोळीबाराने मीठ चोळलें. शेतकरी खवळले व सरकार नमलें. सरकारने "औंध शेतकरी ॲक्ट" बनवून त्यांच्या मागण्या स्वीकारल्या. पं. जवाहरलाल शेतकऱ्यांचे हृदयसम्राट् झाले. ही अभेद्य संघटना बनविण्यासाठी त्यांनी रात्रंदिवस

खेड्यापाड्यांत दौरा केला, पायीं प्रवास केला व शेतकऱ्यांची जाडीभरडी व कोरडी भाकर मिटक्या मारीत खाल्ली. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही. पं. जवाहरलाल अशा रीतीने पुढारीपणाचा सोपान चढून श्रेष्ठत्व प्राप्त करून घेत होते.

## तुरुंगवासाचा श्रीगणेशा

'जया अंगीं मोठेपण। तया यातना कठीण' ही तुकारामांची उक्ति सत्य आहे. म. गांधींनी असहयोगाची तुतारी फुंकली. सारा भारतवर्ष खडबडून जागा झाला. एखाद्या झुंजार वीराप्रमाणे पं. जवाहरलाल मैदानांत उतरले व त्यांनी पं. मोतीलालजींनाहि आपल्यामागे खेचलें. युवराजांच्या स्वागतावर बहिष्कार टाकण्याच्या आरोपाखाली त्यांना प्रथम सहा महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. १९२१ पासून १९४५ पर्यंत पं. जवाहरलालजींचा एक पाय तुरुंगांत तर एक पाय बाहेर, अशी जीवनावस्था झाली. सुटतांच त्यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली दीड वर्षाची सजा ठोठावण्यांत आली. ती त्यांनी हसत मुखाने स्वीकारली. तुरुंग हा त्यांचा दुसरा गृहवासच बनला, नव्हे तें त्यांच्या विश्रांतीचें धाम बनलें, चिंतनाचें स्थळ झालें. नऊ महिन्यांनंतर त्यांची सुटका झाली.

त्यांची लोकप्रियता दुणावली. अलाहाबादच्या जनतेचे ते आवडते पुढारी झाले, तरुणांचें स्फूर्तिस्थान झाले. झुंजार योद्धा म्हणून त्यांनी ख्याति मिळविली. योद्ध्याचें काम विध्वंसक व विनाशक असतें. त्यांत विधायक कर्तृत्वापेक्षा अचाट पराक्रमाला जास्त महत्त्व असतें. पण पं. जवाहरलालजी बहुगुणी आहेत. त्यांची विधायक शक्ति लवकरच प्रत्ययास आली.

## नामांकित नगराध्यक्ष

१९२३ मध्ये प्रयागच्या म्युनिसिपल कमिटीचे त्यांना एकमताने अध्यक्ष निवडण्यांत आलें. ते सर्वांत धाकटे अध्यक्ष होते. पण 'लहान मूर्ति आणि कीर्ति मोठी' ही म्हण त्यांच्या बाबतींत खरी ठरली. त्यांनी नगरपालिकेला कार्यक्षम बनविलें. स्वच्छता, आरोग्य व शिक्षण ह्या खात्यांमध्ये क्रांतिकारक बदल व प्रगति घडवून आणली. कार्यक्षमता ( Efficiency ) हा गुण तर त्यांना फार आवडतो. नव्हे, कार्यक्षमतेची प्रत्यक्ष मूर्ति पं. जवाहरलाल आहेत.

Efficiency thy name is Jawaharlal Nehru. नव्या योजना आखण्यांत आल्या व जुन्या अनिर्णित प्रकरणांची घाण त्यांना उपसावी लागली. हीं सर्व कामें उरकावयास त्यांना दररोज पंधरा तास काम करावें लागे. एक निःस्पृही व कळकळीचा नगराध्यक्ष म्हणून ते लोकादरास पात्र झाले. त्यांची शासनक्षमता प्रत्ययास आली. सरकारी उच्चाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यांची प्रशंसा केली.

**सरन्यायाधीश शरमिंदे होतात**

एकदा पं. जवाहरलालांना अगदी अनपेक्षितपणें अलाहाबाद हायकोर्टचे सरन्यायाधीश सर ग्रिमवुड यांचें त्यांना भेटण्यासंबंधी आग्रहाचें निमंत्रण आलें. सौजन्य म्हणून पं. जवाहरलाल त्यांच्या भेटीसाठी बंगल्यावर गेले. चहापान करीत असतांना इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी झाल्या. सर-साहेबांनी जवाहरलालांची नगरपालिकेच्या कामाबद्दल तोंडभर स्तुति केली. त्यांना वाटलें, जवाहरलाल स्तुतीने भारले जातील व मग आपण त्यांना जाळ्यांत अडकवूं. त्यांनी पं. जवाहरलालांना संयुक्त प्रांताचे शिक्षणमंत्री होण्याचा कानमंत्र दिला. त्यांनी फक्त संमति द्यावी म्हणजे काम तात्काळ फत्ते होणार होतें. पण संयुक्त प्रान्ताच्या गव्हर्नराने सरन्यायाधीशांच्या वतीने टाकलेलें हें सुवर्णजाल जातिवन्त देशभक्त पं. जवाहरलालांना गुरफटूं शकलें नाही. त्यांनी तात्काळ ही विनंती अव्हेरली. कॉंग्रेसचा त्या वेळीं कायदेमंडळांवर बहिष्कार असल्यामुळे सरकारशीं सहकार्य करणें त्यांना पक्षद्रोह व देशद्रोह वाटला. कोण ही व्यक्तिनिरपेक्षता, पक्षनिष्ठता व देशभक्ति ! असे पं. जवाहरलालजी कॉंग्रेसजनांचे हृदयसम्राट् झाले, तर त्यांत नवल तें कोणतें !

**कॉंग्रेसचे कार्यक्षम सरचिटणीस**

१९२३ मध्ये ते कॉंग्रेसचे सरचिटणीस झाले. ते या पदावर सतत सात वर्षे होते. या सरचिटणिसाची बढती पुढे अध्यक्षपदावर होते, पण स्वकर्तव्याच्या बळावर हें सर्व कांही घडतें. प्रयत्नशील ते होतेच, पण भाग्यदेवतेची त्यांच्यावर अपार कृपा होती. मंत्रिपद स्वीकारतांच ते नाभा संस्थानांत शीख-सत्याग्रहाचें निरीक्षण करावयास गेले. त्यांच्यावर संस्थान-प्रवेश-बंदीचा हुकूम बजावण्यांत आला.

वीर संकटांच्या आव्हानाला भीक घालीत नसतो. योद्धा कठीण प्रसंगीं डगमगत नसतो. जवाहरलालांनी संस्थानांत निर्भयतेने प्रवेश केला. नाभाच्या महाराजांनी त्यांना दीड वर्षांची सजा ठोठावली. हें मिळालें कॉंग्रेसचे सरचिटणीस होण्याचें बक्षीस. "जया अंगीं मोठेपण । तया यातना कठीण" हेंच खरें. पण यातनांना यातना देणारे पडले वीर जवाहर !

## सेवादलाचे सेनापति

कोकोनाड्याला झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनामध्ये हिंदुस्थानी अथवा कॉंग्रेस–सेवादलाच्या प्रस्थापनेचा ठराव मंजूर झाला. या सेवादलाचा सेनापति कोण असणार ? अर्थात् तरुणांचे आवडते पुढारी पं. जवाहरलाल. कॉंग्रेसचे सरचिटणीस असल्यामुळे हिंदुस्थानी सेवादलाला त्यांनी कॉंग्रेस-संघटनेचें एक प्रबळ अंग बनविलें. कॉंग्रेसचे सरचिटणीस होतांच त्यांनीं कॉंग्रेस-कार्यालयाला व्यवस्थित स्वरूप देऊन त्याची कार्यक्षमता व प्रतिष्ठा वाढविली.

## जागतिक साम्राज्यविरोधी परिषदेचे अध्यक्ष

कमला नेहरूंच्या औषधोपचारासाठी ते युरोपखंडांत गेले. १९२७ मध्ये ब्रुसेल्सला जागतिक साम्राज्य-विरोधी परिषद् भरली. हिंदी राष्ट्रसभेचे प्रतिनिधि पं. जवाहरलाल तींत सामील झाले. त्यांच्या साम्राज्यशाहीविरोधी तीव्र वृत्तीची सर्वांना तात्काळ जाणीव झाली. त्यांच्या भेदक व विधायक बुद्धिमत्तेची सर्वांनी प्रशंसा केली. त्यांनी साम्राज्यशाहीविरोधी एक विधायक कार्यक्रम तेथे मांडला. या परिषदेच्या अध्यक्षांच्या पंचकांत त्यांचें नांव समाविष्ट झालें. ते आंतरराष्ट्रीय पुढारी झाले.

## समाजवादाकडे

१९२८ मध्ये रशियाच्या दशवार्षिक उत्सवांत एक सन्माननीय निमंत्रित पाहुणे म्हणून ते उपस्थित होते. एक सप्ताह मास्कोला त्यांचें वास्तव्य होतें. त्यांनी रशियाचें सूक्ष्म अवलोकन केलें. तेथे अल्पकालांत झालेली आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक व सांस्कृतिक प्रगति पाहून त्यांना समाधान वाटलें. त्यांच्या बिंबग्राही मनावर समाजवादाचा इष्ट तो परिणाम झाला. ते तात्त्विक दृष्ट्या समाजवादाकडे कलूं लागले. त्यांना नवी दृष्टि प्राप्त झाली. एवम्,

नवीन दृष्टि घेऊन व आंतरराष्ट्रीय कीर्ति संपादून ते मायभूमीस परतले. आता त्यांच्या भाषणांत व लेखनांत एक प्रकारचें नवें ओज दृग्गोचर होऊं लागलें. ते राजनीतीमध्ये समाजनीतीचा आग्रहाने समावेश करीत. राजकीय स्वातंत्र्याबरोबर आर्थिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करीत. शोषणरहित नवीन समाजरचनेचा त्यांनी जाहीरपणें पुरस्कार केला. एखाद्या कडव्या भाई-प्रमाणे ते देशवासीयांना समाजसत्तावादाचा उपदेश करीत.

त्यांनी अनेक प्रांतिक सभांचें व युवकसभांचें अध्यक्षस्थान स्वीकारून राष्ट्रांत नव-चैतन्य निर्माण केलें. देशाच्या जीवनांत चहुमुखी क्रांति प्रतिपादून स्वातंत्र्याचा व्यापक अर्थ जनतेला पटवून दिला. कॉंग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय मान्य करावें म्हणून त्यांनी " हिंदी स्वातंत्र्यसंघ " स्थापन केला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचें त्यांनी सहकार्य मिळविलें. भाई जवाहरलालजी मजुरांचें आशाकेन्द्र बनले.

## मजूर-कॉंग्रेसचे अध्यक्ष

१९२९ सालीं नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय मजूर-कॉंग्रेसचे ते एकमताने अध्यक्ष निवडले गेले. निढळाच्या घामाने संपत्ति निर्माण करणाऱ्या श्रमिक जनतेबद्दल त्यांना आत्यंतिक कळवळा असल्यामुळे अशा जनतेचें रक्तशोषण न होऊं देणारी समाजरचना स्थापण्याचें ध्येय त्यांनी येथे प्रतिपादिलें. मजूर-कॉंग्रेस प्रबल करून राष्ट्रीय स्वातंत्र्याचा झगडा मजुरांनीच निकराने लढवावा, असा त्यांनी ऊर्जस्वल संदेश दिला. एवम्, जवाहरलाल शोषित जनांचें आशाकेन्द्र बनले.

## पित्याविरुद्ध पवित्रा

१९२८ च्या डिसेंबरमध्ये कलकत्ता येथे पं. मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेसचें वैभवशाली अधिवेशन झालें. खुद्द जवाहरलालजींनी " नेहरू-योजनेला " कसून विरोध केला. कारण तिचें ध्येय ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य हें होतें. पं. मोतीलालजींना आपल्या पुत्राचा तात्त्विक विरोध दुःसह झाला. त्यांनी राजीनामा देण्याची धमकी दिली. कारण सर्व युवकवर्ग पं. जवाहरलालजींच्या मागे होता. तें दृश्य मोठें उदात्तरम्य होतें.

वडील वयस्करांचे पुढारी तर पुत्र तरुणांचा पुढारी. दोघेहि तत्त्वनिष्ठुर. आपआपल्या परीने कर्तबगार. पण कर्तबगार बापाला सवाई कर्तबगार पुत्रापुढे हात टेकावे लागले. एकबाणी रामचंद्राला लव-कुशांनी पराभूत केलें. इतिहासाची किती मधुर ही पुनरावृत्ति ! पण म. गांधींच्या प्रभावी मध्यस्थीमुळे पं. मोतीलालजींची प्रतिष्ठा राखली गेली व पं. जवाहरलालांनी एक वर्षापुरती नेहरू-योजना सशर्त स्वीकारली. शर्त ही कीं, ब्रिटिश सरकारने ३१ डिसेंबर १९२९ पर्यंत भारताला वसाहतींचें स्वराज्य द्यावें. नाही तर भारत संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय जाहीर करील व तें मिळविण्यास योग्य ती चळवळ करील. त्या ठरावांत पुत्राच्या विजयाचीं बीजें होतीं. हिंदी स्वातंत्र्य-संघाच्या तरुण अध्यक्षाकडे—पं. जवाहरलालांकडे—सर्वांचे डोळे लागले. अपेक्षे-प्रमाणे ब्रिटिश सरकारने कॉंग्रेसची मागणी फेटाळली. पुढे काय ! स्वराज्य भिक्षा मागून मिळत नसतें. तें स्वसामर्थ्याने संपादावें लागतें. कॉंग्रेसने इंग्रज सरकारचें आह्वान स्वीकारलें. आता या युद्धेच्छु कॉंग्रेसचा कर्णधार कोण होणार ? राष्ट्र कोणाला सेनापति नेमणार ? पं. जवाहरलालजींशिवाय राष्ट्राची अपेक्षा कोण पूर्ण करणार ? पित्यामागून पुत्र हें खरें ठरणार. पित्याचें अपूर्ण काम पुत्र पुरें करणार. पं. जवाहरलाल कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले.

## कॉंग्रेसचा कांटेरी किरीट

१९२९ च्या डिसेंबरच्या ३१ तारखेस लाहोर येथे कॉंग्रेसचें क्रांति-कारक अधिवेशन झालें. अध्यक्ष होते क्रांतिकारक पं. जवाहरलाल. या अध्यक्षांची मिरवणूक एखाद्या लढावयास निघालेल्या सेनापतीप्रमाणे घोड्या-वरून काढण्यांत आली. त्यांच्या वृद्ध मातापित्यांचें हृदय गहिंवरून आलें, नेत्रांतून आनंदाश्रु मोत्यांसारखे टपकले. तें मोठें उदात्तरम्य दृश्य होतें. पं. जवाहरलाल नेहरूंनी संपूर्ण स्वातंत्र्य हेंच आमचें ध्येय म्हणून जाहीर केलें. रात्रीं बारा वाजल्यानंतर एक मिनिटाने सर्वांनी स्वातंत्र्यप्राप्तीची शपथ घेतली. त्या प्रसंगाचें गांभीर्य कोण वर्णन करूं शकणार ? भारताच्या इतिहासां-तील हा अविस्मरणीय गंभीर प्रसंग आहे. पं. जवाहरलालांचें लढाईला सिद्ध असणाऱ्या सैनिकांपुढे उत्तेजनपर भाषण झालें. त्यांनी हिंदी तरुणांना

स्वातंत्र्याचें वेड लावलें. इकडे सरकारने दडपशाही करावयास प्रारंभ केला. वाऱ्याने अग्नि भडकावा त्याप्रमाणे राष्ट्रीय भावना भडकूं लागल्या. राष्ट्राध्यक्ष जवाहरलाल वायुवेगाने संयुक्त प्रांतांत दौरा काढून युद्धाचें शिंग फुंकूं लागले.

## कायदेभंग व कारागृहवास

पं. जवाहरलालांनी १० एप्रिलला अलाहाबाद येथे मिठाचा कायदेभंग केला व त्यांना अटक झाली. सर्वच नेहरू कुटुंब तुरुंगांत गेलें. अगोदर प्रिय पुत्र व मग वृद्ध माता-पिता. पं. मोतीलालजींची प्रकृति क्षयाच्या विकाराने अत्यवस्थ झाली. त्यांची मुक्तता झाली. पण हृदय तिळतिळ तुटे, प्रिय पुत्राच्या—जवाहरलालच्या भेटीसाठी. मोतीलालजी भीष्म-पितामहाप्रमाणे शरपंजरीं होते, तर जवाहरलाल देशभक्तीच्या गुन्ह्याखाली तुरुंगांत डांबले गेले होते. कोण ही देशभक्ति ! कोण ही व्यक्तिनिरपेक्षता ! सारेंच थोर ! पित्याच्या मृत्यूआधी केवळ त्यांच्या भेटीसाठी त्यांना मुक्त करण्यांत आलें. वडिलांचे प्राण डोळ्यांत एकवटले होते. पितापुत्रांची दृष्टा-दृष्ट झाली व पित्याने सुखाने प्राण सोडला. धन्य तो पिता ! धन्य तो पुत्र ! दोघांनीहि देशभक्तीचें कठोर व्रत आमरण चालविलें !

पुन्हा १९३२ च्या प्रारंभीं कायदेभंग सुरू झाला. पण त्या वेळीं सरकारने पं. जवाहरलालांना अगोदरच अलगद उचललें व त्यांना तीन वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. ही दीर्घ शिक्षा त्यांनी स्मित-मुद्रेने स्वीकारली. सौ. कमला नेहरूंच्या भेटीसाठी त्यांना मुक्त केलें. भेट झाली. पत्नीला समाधान वाटलें. पण देशसेवा जवाहरलालांना पत्नीची सेवा-शुश्रूषा करूं देईना.

## भूकंपग्रस्तांना मदत

१९३४ मध्ये बिहारमध्ये 'न भूतो' असा धरणीकंप झाला. लाखो देश-बांधव निराश्रित झाले, अन्नाला मोताद झाले. प्रिय पत्नीला मृत्युशय्येवर सोडून बाणाप्रमाणे पं. जवाहरलाल बिहारकडे धावून गेले. त्यांनी भूकंपाचें सूक्ष्म निरीक्षण केलें. मदतीची योजना आखून दिली. स्वतः हातांत कुदळ-फावडें घेऊन आपद्ग्रस्तांना मदत केली. त्यांची लोकप्रियता दुथडी भरून वाहू लागली. नोकरशाहीला हें पाहवलें नाहीं. सरकारने त्यांना कलकत्ता

येथे केलेल्या एका भाषणाबद्दल अटक केली व दोन वर्षांची शिक्षा ठोठावली. एका वर्षानंतर क्षयग्रस्त सौ. कमला नेहरू अत्यवस्थ झाल्यामुळे त्यांची मुक्तता झाली. ते त्यांना औषधोपचारासाठी युरोपांत घेऊन गेले.

## साहित्यिकश्रेष्ठ जवाहरलाल

जवाहरलाल कसलेले व नामांकित लेखक आहेत. त्यांच्या लेखनांत वर्तमान-पत्रकाराचा आवेश व चमक नाही, पण साहित्यिकाची कला व भाषासौष्ठव आहे. त्यांची लेखणी त्यांच्या वाणीपेक्षा जास्त प्रभावी व कुशल आहे. त्यांना लिहिण्यास अवधि मिळाला तो तुरुंगांत. एरव्हीं त्यांचें जीवन धावतें व प्रवासी आहे. वाचनाचें त्यांना व्यसन आहे. आगगाडींतून अथवा विमानांतून प्रवास करीत असतांना ते पुस्तकें चाळीत असतात. विषयांचें त्यांना बंधन नाही, म्हणून ते बहुश्रुत आहेत. जसें वाचन तसें लेखन. रूक्ष विषयाला मनोरंजक अथवा आकर्षक करण्यांत ते प्रवीण आहेत. कुमारी इंदिरेला त्यांनी पाठविलेलीं इतिहास शिकविणारीं पत्रें किती मनोरंजक, ज्ञानपूर्ण व कलापूर्ण आहेत. त्यांनी इतिहास किती सुबोध व कलात्मक रीतीने कथन केला आहे ! तसेंच त्यांचें दुसरें पुस्तक 'आत्मचरित्र.' किती कलात्मक आत्मप्रकटीकरण त्यांत पाहावयास सापडतें ! भाषेचें सौंदर्य तरी किती आकर्षक ! लेखनाचा प्रवाह गंगेसारखा शांत व सखोल. एक अमूल्य आत्मचरित्र आहे हें. तिसरा प्रसिद्ध ग्रंथ 'विश्व-इतिहासाची झलक.' लालित्यपूर्ण भाषेंत प्राचीन व अर्वाचीन इतिहासाची कथनपर मांडणी त्यांत केली आहे ! त्यांचा चौथा अत्यंत प्रसिद्ध ग्रंथ "Discovery of India" 'भारताचा शोध.' यांतदेखील त्यांची विवेचकता परमोत्कर्षाला पोहोचली आहे. पं. नेहरू एक थोर विचारी पुरुष आहेत. एक तत्त्वविवेचक व चिकित्सक लेखक आहेत. ते सर्वसामान्य वक्ते आहेत, पण असामान्य लेखक आहेत; लोकप्रिय साहित्यिक आहेत. भाषण करतांना ते अडखळतात, बाकी ओढतात व त्यांचा वाक्प्रवाह खंडित होतो, पण त्यांचा लेखनप्रवाह, अप्रतिहत वाहतो.

## स्पेनच्या यादवींचें निरीक्षण

प्रिय पत्नीच्या औषधोपचारासाठी ते व्हिएन्नाला गेले, पण त्यांचें मन

त्यांना एका स्थळीं राहूं देईना. याच वेळीं स्पेनमध्ये फॅसिस्ट व लोकतंत्रवादी पक्षांत यादवी भडकली. लोकतंत्रवादाचे पुरस्कर्ते जवाहरलाल जातीने तेथे गेले व आकाशांतून भयंकर बॉम्बवृष्टि होत असतांना त्यांनी लोकशाहीला सक्रिय पाठिंबा दर्शविला. त्यांच्या धैर्याचें सर्वांनी अभिनंदन केलें.

## प्रिय पत्नीचा वियोग

व्हिएन्नाच्या रुग्णालयांत कमला नेहरू मृत्युपंथास लागल्या. पंडितजींनी तिची शक्य ती सेवा केली. पण काळानें कमलेला ग्रासलें. मरतां मरतां "माझ्यासाठी देशस्वातंत्र्याचें कार्य तुम्ही दूर करूं नका" असा त्या वीरांगनेने संदेश दिला. धन्य हें देशभक्त जोडपें! धन्य नेहरू पितापुत्र! धन्य नेहरू मातापुत्र! धन्य नेहरू पतिपत्नी! आणि धन्य नेहरू भाऊ-बहीण!

## तीन वेळां राष्ट्राध्यक्ष

ते यूरोपांत असतांनाच लखनौ कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडले गेले. या वेळीं त्यांनी अध्यक्षीय भाषणांत गांधीवादाचा समाजसत्तावादाशीं समन्वय करण्याचा प्रयत्न केला. देशभर अविश्रांत दौरा करून कॉंग्रेसची संघटना बळकट केली व राष्ट्रांत नवचैतन्य निर्माण केलें. फैजपूर येथे भरलेल्या पहिल्या ग्रामीण कॉंग्रेसचे ते अध्यक्ष निवडले गेले. एवम्, कॉंग्रेसचा अध्यक्ष तीनदा होण्याचा बहुमान दादाभाई नौरोजींनंतर पं. जवाहरलालांनीच पटकाविला. कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर जन्म घेऊन पन्नाशी गाठण्यापूर्वीच त्यांनी हा बहुमान मिळविला हें विशेष होय.

## परराष्ट्रीय दूत

त्यांना कॉंग्रेसतर्फे वेळोवेळीं सिलोन, ब्रह्मदेश, चीन, मलाया वगैरे देशांत जावें लागलें. ते जेथे जेथे गेले, तेथे तेथे स्वप्रतिभेने, व्यक्तिमत्त्वाने आदरास पात्र झाले. ते संकुचित राष्ट्रवादी नसून उदार विश्ववादी आहेत. त्यांच्या विचारांची गरुडभरारी आंतरराष्ट्रीय आहे.

## सुदीर्घ बंदिवास

१९४० सालीं म. गांधींनी वैयक्तिक सत्याग्रह आरंभिला. पं. जवाहरलालांनी सत्याग्रह करण्यापूर्वीच त्यांना राजद्रोहात्मक भाषण केल्याच्या

आरोपाखालीं तीन वर्षांची शिक्षा देण्यांत आली. ती त्यांनी स्मितमुद्रेनें स्वीकारली. पुढे १९४२ ची चळवळ सुरू झाली. तींतहि ते होतेच. या वेळीं त्यांना साडेतीन वर्षांचा दीर्घ बंदिवास भोगावा लागला. त्यांच्या देशसेवेच्या तीन दशक वर्षांपैकी एक दशक तुरुंगांत गेलें. असा स्वार्थत्यागी, प्रतिभासंपन्न व लोकोत्तर देशवीर देशाचा प्रधानमंत्री झाला तर त्यांत काय विशेष झालें! पं. नेहरू पहिले प्रधानमंत्री झाले नसते, तर आम्ही भारतीय लोक रत्नपारखी न ठरतां गाजरपारखी ठरलों असतों!

## आझाद हिंद-सेनेचे वकील

१९४५ मध्ये त्यांची मुक्तता झाली. या वेळीं इतिहासप्रसिद्ध दिल्लीच्या लालकिल्ल्यांत आझाद हिंदसेनेच्या तीन प्रमुख अधिकाऱ्यांवर खटला सुरू होता. पं. जवाहरलाल त्यांच्या बचावासाठी धावून गेले. बरोबर पंचवीस वर्षांनी लोकांना जवाहरलालजी कोर्टांत घालावयाच्या बॅरिस्टरच्या विशिष्ट पोषाखांत दिसले. बॅरिस्टर जवाहरलालजींना तीन कॅप्टन्स् आरोपींनी सादर प्रणाम केला. तें दृश्य हृदयाला पाझर फोडणारें होतें. राष्ट्रकार्यार्थ पं. जवाहरलाल प्रसंग पडल्यास वाटेल तें करावयास सिद्ध असतात. प्रसंगीं श्रीकृष्णाप्रमाणे आपली प्रतिज्ञाहि ते मोडतात. आंतरराष्ट्रीय कीर्तीचा पुढारी बचावाचें काम करीत असल्यामुळे सदरहू खटल्याचें स्वरूप आंतरराष्ट्रीय झालें व तिन्ही सेनानायक निर्दोष सुटले. पं. जवाहरलालजींच्या धवल कीर्तींत यामुळे भरच पडली.

## स्वतंत्र भारताचे प्रधानमंत्री

१९४६ च्या ऑगस्ट महिन्यांत ते मध्यवर्ती सरकारच्या कार्यकारी मंडळाचे प्रधानमंत्री झाले. त्यांच्याकडे परराराष्ट्रीय खातें आलें. पं. जवाहरलाल म्हणजे कार्यक्षमता. अल्पावधींतच त्यांनी अनेक प्रमुख राष्ट्रांत आपल्या वकिलाती स्थापन करून हिंदुस्थानचे परदेशांशीं राजकीय संबंध जोडले. हिंदुस्थानचें जागतिक राजकारणांत महत्त्व वाढलें. स्वतःच्या धाकट्या भगिनीस—विजयालक्ष्मीला—रशिया, अमेरिकेसारख्या प्रबल राष्ट्रांत त्यांनीं परराष्ट्रीय वकील म्हणून नियुक्त केलें. विजयालक्ष्मींनी संयुक्तराष्ट्रसंस्थेंत हिंदुस्थानची बाजू प्रभावीपणें मांडून दाखविली. त्यांची कामगिरी हिंदी

इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहिली जाईल. धन्य जवाहरलाल व भगिनी विजयालक्ष्मी ! वडील बंधु प्रधानमंत्री व धाकटी बहीण परराष्ट्रीय वकील, ही घटना जागतिक इतिहासांत विजोड आहे. केवळ एका वर्षाच्या अल्पावधींतच ते स्वतंत्र भारताचे प्रधानमंत्री झाले. त्यांचें स्वातंत्र्याचें ध्येय गाठलें गेलें. जन्माचें साफल्य झालें.

**म. गांधींचा वारस शतायु होवो !**

म. गांधींनी त्यांना आपला वारस म्हणून १९४२ सालींच जाहीर केलें. तेव्हा सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. मोठे लोक असेच धक्के जगताला देत असतात. त्यांची भिन्नता बहिरंगांत व बाह्य साधनांत होती. दोघांचेंहि अंतरंग गंगेसारखें विशुद्ध होतें. म. गांधी व पं. जवाहरलाल यांचें जीवन–स्रोत गंगा व यमुना यांच्या प्रवाहासारखें उगमांत भिन्न, पण एका दिशेने वाहणारें होतें. कांही काल भिन्न प्रवाहांनी आपापल्या परीने समाजोपकारक कार्य केलें, पण पुढे त्यांचा पवित्र संगम झाला. यमुना गंगेंत विलीन झाली. प्रयागनंतर गंगेचेंच अस्तित्व राहिलें. तद्वत् स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंडितजींनी म. गांधींचें संपूर्ण शिष्यत्व अंगीकारलें. इतकेंच नव्हे तर संयुक्तराष्ट्रसंस्थेंत त्यांनी आपल्या गुरूच्या–म. गांधींच्या–उदात्त अहिंसेच्या मार्गांचें जगाने अवलंबन करावें असें उच्च स्वरांत प्रतिपादिलें. आज ते स्वतंत्र भारताचे कर्णधार आहेत. त्यांची लोकप्रियता अनन्यसामान्य आहे. वयाने ते सासष्ट वर्षांचे आहेत. पण उत्साहाने व धैर्याने केवळ सोळा वर्षांचे अभिमन्यु आहेत. त्यांचें व्यक्तिमत्त्व आकर्षक व स्फूर्तिदायक आहे. त्यांच्या एका शब्दावर हजारो भारतीय तरुण प्राणांचें बलिदान करावयास तयार आहेत. ता. १७ जुलै १९५१ च्या टाईम्स ऑफ इंडियांत जॉन मथाईसारखा हिशोबी वृत्तीचा गृहस्थ असें प्रांजलपणें कबूल करतो कीं, "Pandit Jawaharlalji is so inspiring that after my first meeting with him, I should find it difficult to refuse to go to prison if he asked me to do so." "पं. जवाहरलालजींच्या पहिल्या भेटीनंतर त्यांनी मला तुरुंगांत जा असें सांगितलें असतें तर मला तें नाकारणें दुष्कर झालें असतें." इतकें पंडितजींचें व्यक्तिमत्त्व प्रभावी व स्फूर्तिप्रद आहे.

## परदेशांत जयजयकार

पं. जवाहरलालांची भारतांत अपूर्व लोकप्रियता आहे. ती इतकी अमर्याद आहे कीं, पंडितजींना स्वतःलादेखील त्यांच्यावरील जनतेचें अलोट प्रेम बघून आश्चर्य वाटतें. गेल्याच वर्षी त्यांनी असे विस्मययुक्त उद्‌गार काढले कीं, " भारतीय जनसमूहाचें माझ्यावर जें विलक्षण प्रेम आहे त्यापेक्षा अधिक आश्चर्यकारक गोष्ट मला या जगतांत आढळली नाही." पंडितजी कोठेहि व केव्हाहि गेले तरी त्यांच्या दर्शनाला व भाषणाला लाखांनी लोक जमतात व त्यांच्या जयजयकारांनी आकाश भरून जातें. पंडितजींचें व्यक्तिमत्त्व असें अलौकिक आहे कीं, त्यांच्या बाबतींत जें भारतांत घडतें तेंच परदेशांत घडतें. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या आमंत्रणावरून ते १९५० मध्ये तेथे गेले, सर्व संयुक्त संस्थानांत त्यांचा व्यापक दौरा झाला. ते जेथे जेथे गेले, तेथे तेथे त्यांचें अभूतपूर्व स्वागत झालें व त्यांनी प्रचंड सभांमध्ये भाषणें केलीं. असें वाटावयास लागलें होतें कीं, मधमाशांप्रमाणे उद्योगरत असणारे अमेरिकेचे लोक हिंदी लोकांप्रमाणे वेळेचा अपव्यय करून त्यांच्या दर्शनाला व भाषणाला झुंडीच्या झुंडीने कां येतात? अमेरिकेंतील प्रमुख विश्वविद्यालयांनी पंडितजींना बहुमानदर्शक डॉक्टरेटची पदवी भव्य समारंभ करून अर्पण केली. तीच स्थिति कॅनडांत होती. इंग्लंडबद्दल तर लिहावयाची आवश्यकताच नाही. कारण पंडितजींना इंग्लंड व इंग्लंडचें जें जें कांही आहे तें तें प्रिय आहे व इंग्लिश लोकांना पंडितजी प्रिय आहेत. त्यांचा संबंध अर्धशतकाचा आहे. तेथेदेखील ऑक्सफर्ड, केम्ब्रिज व लंडन विश्वविद्यालयांनी त्यांना डॉक्टरेट्‌स्‌ अर्पण केल्या. पंडितजींच्या भाषणाला तेथे जितके श्रोते येतात तितके इतर कोणाच्याहि भाषणाला येत नाहीत. हीच स्थिति फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंड इत्यादि देशांची आहे. पंडितजी गेल्या दोन वर्षांत कम्युनिस्ट चीन, रशिया, युगोस्लाव्हिया, बल्गेरिया, पोलंड, रूमानिया, इजिप्त, इंडोनिशिया इत्यादि देशांत त्या त्या देशांच्या सरकारांच्या आमंत्रणावरून सन्माननीय सरकारी पाहुणे म्हणून दीर्घ भ्रमण करून आले आहेत. ते चीनमध्ये पंधरा दिवस होते. नवचीनचे कर्णधार माओत्से तुंग व चौइन लाय ह्यांनी त्यांचें हार्दिक व वैभवशाली स्वागत

केलें. त्यांचीं लक्षावधि जनसमूहापुढे अनेक भाषणें झालीं. चीनच्या जनतेने त्यांचें उत्स्फूर्त स्वागत केलें. चीनशीं परस्पर मैत्रीचा करार करून ते भारताला परतले. गेल्या जून महिन्यांत रशियन सरकारच्या खास आमंत्रणावरून ते रशियांत गेले. तेथेहि कम्युनिस्ट सरकारतर्फे व जनतेतर्फे त्यांचें विराट् व हार्दिक स्वागत झालें. आतापर्यंत कोणत्याहि अन्य परदेशस्थ पुढाऱ्याचें इतकें भव्य, वैभवशाली व आपुलकीने रशियांत स्वागत झालें नाही. त्यांची मास्कोच्या हमरस्त्यामधून प्रचंड मिरवणूक निघाली. तींत इतकी गर्दी झाली होती कीं, क्षणभर असा भास झाला कीं, हें मास्को नसून कलकत्ता शहर आहे. हीच स्थिति रशियाच्या प्रत्येक शहरांत व खेड्यांत झाली. त्यांनी तेथील अत्याधुनिक विशाल कारखान्यांचें व यांत्रिक साधनांनी मशागत केल्या जाणाऱ्या सामूहिक शेतीचें सूक्ष्म अवलोकन केलें. एवम्, रशियाच्या व नवचीनच्या समाजव्यवस्थेची बारीक पाहणी करून ते भारताला परतले. या दोन्ही विशाल व साम्यवादी देशांत त्यांचा जयजयकार झाला.

## समाजवादी अर्थव्यवस्था

पंडितजींचें अंतःकरण व मेंदू फार संस्कारक्षम आहेत. ते नित्य नूतनाने त्वरित आकृष्ट होतात. चीनने अल्पकालांत केलेल्या आर्थिक क्रांतीमुळे त्यांच्या मनावर इष्ट परिणाम झाला. त्यांनी गंभीरपणें विचार केला व १९५४ च्या फेब्रुवारीमध्ये आवडी येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत पुढील समाजवादी अर्थव्यवस्थेच्या आशयाचा ठराव मांडून काँग्रेसला समाजवादाकडे वळविलें.

( १ ) प्रत्येकाला समानसंधि आणि राजकीय, आर्थिक व सामाजिक हक्कांची समानता या तत्त्वावर अधिष्ठित असें सहकारी संघराज्य शांततामय व सनदशीर मार्गाने प्रस्थापित करणें हें काँग्रेसचें उद्दिष्ट आहे. हें उद्दिष्ट साध्य करण्याकरिता समाजवादी स्वरूपाची अर्थव्यवस्था काँग्रेस स्थापन करील.

( २ ) समाजवादी स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेंत स्त्री-पुरुषभेद, जातिभेद, धर्मभेद, वर्णभेद व वर्गभेद राहणार नाहीत. प्रत्येक नागरिकाला काम व जीवनवेतन मिळण्याची शाश्वती राहील.

( ३ ) राष्ट्रांतील प्रमुख उद्योगधंदे व भौतिक ह्यांवर राष्ट्राची मालकी राहील.

( ४ ) संपत्तीचें केंद्रीकरण होऊन सामूहिक अहित होणार नाही अशा दृष्टीने ही समाजवादी अर्थव्यवस्था राहील.

( ५ ) राष्ट्रीय संपत्तीचें न्याय्य वितरण करून प्रचलित आर्थिक विषमता नष्ट केली जाईल.

( ६ ) आर्थिक व राजकीय सत्तेचें विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने गृह, ग्रामोद्योग व लहान उद्योग ह्यांना सक्रिय प्रोत्साहन सरकार देईल व ग्रामपंचायतींचा विकास-विस्तार अशा रीतीने केला जाईल कीं, त्यायोगें त्या स्वयंपूर्ण राज्यघटक बनतील.

एवम्, पंडितजींनी कॉंग्रेसकडून समाजवादी स्वरूपाचें ध्येय मान्य करून घेतलें. केंद्रित उद्योगाधिष्ठित समाजवाद व विकेंद्रित हस्तोद्योगाधिष्ठित सर्वोदय यांची सांगड ते कशी काय घालतात, हेंच पाहावयाचें आहे. परंतु एवढें मात्र खरें कीं, पंडितजींच्या मनाला समाजवाद पटला आहे व भारताने ह्याच दृष्टीने प्रगति करावी, अशी त्यांची उत्कट इच्छा आहे. म्हणून १९५५ च्या फेब्रुवारी महिन्यांत त्यांनी पार्लमेंटांत असें अधिकृत रीतीने जाहीर केलें कीं, भारतसरकारचें आर्थिक धोरण, समाजवादी स्वरूपाची अर्थव्यवस्था प्रस्थापित करण्याला पोषक असें राहील व याच दृष्टीने प्रथम व द्वितीय पंचवार्षिक योजनांची आखणी करण्यांत आली आहे. परंतु पं. नेहरू हे प्रकृतीने लोकशाहीवादी आहेत म्हणून ही अर्थ-व्यवस्था शांततामय व लोकशाहीप्रधान पार्लमेंटरी पद्धतीने भारतांत स्थापन करण्याचा आपला मनोदय त्यांनी मोकळ्या मनाने जाहीर केला. हिंसाप्रधान वर्गयुद्धाच्या ते विरुद्ध आहेत. उदात्त मानवी मूल्यांवर त्यांचा विश्वास आहे. म्हणूनच राष्ट्रसंत विनोबा भावे यांनी प्रवर्तित केलेल्या भूदान-यज्ञाकडे ते सहानुभूतीने पाहतात. ग्रामोद्योगांना पूरक धंदे म्हणून साहाय्य व प्रोत्साहन देतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पंडितजी पूर्णतया भौतिक व हिंसाप्रधान समाजवादाचें संस्करण, शुद्धीकरण व उदात्तीकरण करीत आहेत व त्याला भारताच्या सांस्कृतिक परंपरेला अनुरूप असें लोकशाही-

प्रधान स्वरूप प्रदान करीत आहेत. त्यांना या उदात्त कार्यांत यश प्राप्त होवो अशीच कोणाचीहि इच्छा असणार.

## जगाचे आशातंतु भारतरत्न जवाहरलाल

आज जगांतील सामर्थ्यसंपन्न राष्ट्रांमध्ये शस्त्रास्त्रांच्या निर्मितीसंबंधी स्पर्धा लागली आहे. विश्वसंहारक अण्वस्त्र व हायड्रोजन बॉंब यांचे भयानक स्फोट करण्यांत अमेरिका व रशियासारखीं राष्ट्रें गुंतलीं आहेत. त्यांचे ओठ विश्वशांततेची पोपटपंची करीत आहेत, पण हात मात्र विध्वंसक युद्धाची तयारी करण्यांत गर्क आहेत. भिन्न भिन्न राष्ट्रगटांमध्ये शस्त्रसंधि होत आहेत. भारत मात्र असा एकच देश आहे कीं, जो विश्वशांतीची बांसरी शांत मनाने वाजवीत आहे व सहजीवन आणि पंचशील ह्या महान् मानवी सिद्धान्तांची प्रस्थापना करण्यास तनमनधनाने लागला आहे. याचें सर्व श्रेय आमचे प्रिय प्रधान व परराष्ट्रमंत्री पं. नेहरूंनाच आहे. त्यांच्याच कल्पने-नुसार बांडुंग येथे दक्षिण आशियांतील व आफ्रिकेंतील सर्व राष्ट्रांचें संमेलन भरलें होतें. या संमेलनांत सहजीवन व पंचशील तत्त्वांना मान्यता मिळाली. पं. नेहरू या अधिवेशनाचे केन्द्रपुरुष होते. हा महान् सिद्धान्त रशियाचे कर्ण-धार मार्शल बुल्गानिन, युगोस्लाव्हियाचे निर्माते मार्शल टीटो व नवचीनचे कर्णधार माओत्से तुंग आणि चौइन लाय ह्यांनी सहर्ष मान्य केला व त्या-प्रमाणे भारताशीं शांततेचे करार केले. हा पंडित जवाहरलालजींचा अद्वितीय नैतिक विजय आहे. तसेंच गेल्या डिसेंबर महिन्यांत नवीन सोळा राष्ट्रांना त्यांनी राष्ट्रसंघाचें सभासदत्व प्राप्त करून दिलें आहे. पंडितजींच्या न्याय्य मध्यस्थीला रशिया वळला व वरील सोळा राष्ट्रांचा यू.नो.मध्ये प्रवेश झाला. या अपूर्व यशाबद्दल अमेरिकेच्या अध्यक्षानी पंडितजींचे प्रगट आभार मानले. एवम्, पंडित नेहरू आज विश्वशांततेचे आशातंतु आहेत.

## 'भारतरत्न' पंडित नेहरू

गेल्या दीड वर्षांमध्ये जागतिक शांततेसाठी पं. नेहरूंनी जे अविरत प्रयत्न केले व त्यांच्या योगाने भारताला आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रांत जें स्पृहणीय स्थान प्राप्त करून दिलें, त्याबद्दल राष्ट्रपति राजेन्द्रप्रसाद ह्यांनी त्यांना 'भारतरत्न' ही सर्वोच्च बहुमानाची पदवी अर्पण करून

गौरविलें. मुळांत जवाहर रत्न होतेच, परंतु आता ते ' भारतरत्न ' झाले आहेत. महात्मा गांधींच्या देशसेवेप्रमाणे त्यांची देशभक्ति, विश्वसेवेचा, मानवतेच्या उद्धाराचा अविभाज्य अंश आहे. ते थोर व उदार मानवतावादी पुढारी आहेत. अशा लोकोत्तर प्रधानमंत्र्याला, महात्माजींच्या वारसाला, महात्माजींचें रामराज्य अथवा समाजवादी स्वरूपाची अर्थव्यवस्था सत्यसृष्टींत उतरविण्यास जगन्नियंता उदंड आयुरारोग्य देवो, हीच त्या दयाघनाला कोणत्याहि भारतवासीयाची प्रार्थना असणार !

• • •

20624 वि ... ९८।७०६
८.३६

# साहाय्यक टीपा

पृष्ठ

१ **न...प्रसाधितम्**—जें कार्य शस्त्रें, गजेन्द्र, घोडदळ व पायदळ यशस्वीपणें पूर्ण करूं शकत नाहीत तें कार्य बुद्धि करते.

१ **सांस्कृतिक क्रांति**—सोळाव्या शतकांत यूरोपमध्ये धर्म, शिक्षण व कला यांच्यांत झालेली एकदम प्रगति.

१ **औद्योगिक क्रांति**—यांत्रिक उत्पादनाने केलेला बदल.

३ **मॅझिनी**—इटलीचा थोर देशभक्त ग्रंथकार. (१८०५ ते १८७५)

११ **शतेषु.....न वा**—शंभरांत एखादा शूर निपजतो. हजारांत एखादा विद्वान् असतो. दहा हजारांत एखादा वक्ता असतो, तर दाता पुरुष विरळाच असतो.

१२ **ब्रिटिश खाविंद...मान**—ब्रिटिश सरकाररूपी धन्याच्या चरणांपाशी एकनिष्ठतेने राहणारे.

१३ **इलबर्ट बिल**—वृत्तपत्रस्वातंत्र्यावर गदा आणणारें बिल.

१४ **पिट, बर्क, फॉक्स**—इंग्लंडांतील १८ व्या शतकांतील वक्ते व ग्रंथकार.

१५ **प्रागतिक संघ**—मवाळांची १९१५ मध्ये स्थापन झालेली सभा.

१५ **वंगभंग**—१९०५ मध्ये झालेली बंगालची फाळणी.

१६ **वाच्छा**—सर दीनशा वाच्छा (१८४४ ते १९३६) कॉंग्रेसचे अध्यक्ष.

१७ **उमेश बॅनर्जी**—पहिल्या कॉंग्रेसचे अध्यक्ष. (१८४४ ते १९०६)

२० **मुहूर्त...चिरम्**—दीर्घ काळपर्यंत धूर सोडीत राहण्यापेक्षा क्षणांत जळून जाणें बरें.

२२ **आंतरः कोऽपि हेतु**—अंतःकरणांतील हेतूची जाणीव.

पृष्ठ

२२ **सार्वजनिक सभा**—न्या. रानडे यांनी जनतेच्या गाऱ्हाण्या सरकार-पुढे मांडावयास स्थापन केलेली पुणे येथील संस्था.

२३ Blue Books—इंग्रजी पार्लमेंटरी कायद्यांची पुस्तकें.

२४ **मोर्ले**—एक विद्वान् भारतमंत्री. यांच्या नांवाने १९१० चा सुधारणांचा हप्ता आहे.

२५ **लॉर्ड कर्झन**—हिंदुस्थानचे १८९८ ते १९०७ पर्यंतचे अरेराव गव्हर्नर जनरल.

२९ **नाभिषेको...मृगेन्द्रता**—सिंहाचा वनांत कोणींहि राज्याभिषेक केला नाही. स्वपराक्रमानें तो पशूंचा राजा आहे.

४१ **अॅडॉल्फ हिटलर**—जर्मनीचा १९३२ते४५ पर्यंतचा सर्वाधिकारी.

४२ **अॅनी बेझंट**—आयरिश विदुषी. कॉंग्रेसच्या अध्यक्ष. स्वराज्य-संघ व थिऑसॉफीच्या संस्थापक. (१८४६ ते १९३३)

४४ **सर व्हॅ. चिरोल**—एक ब्रिटिश वर्तमानपत्रकार प्रवासी.

४५ **वाण्येका...भूषणम्**—सर्व अलंकार नाहीसे होणारे आहेत. म्हणून मधुर वाणीचें भूषण सर्वांत श्रेष्ठ होय.

५१ **शेरेडन**—इंग्लंडांतील १८ व्या शतकामधील नट व वक्ता.

५६ **मानो...धनम्**—मोठ्याचें धन मान हेंच आहे.

५८ **आर्यसमाज**—स्वामी दयानंदांनी १८७२ मध्ये स्थापन केलेला वेदानुयायी पंथ.

५८ **कार्लाईल**—१९ व्या शतकांतील सुप्रसिद्ध इंग्लिश ग्रंथकार.

६१ **समाजसत्तावाद**—सामुदायिक मालकी व आर्थिक समता असणारी समाजरचना.

६२ **ग्यारीबाल्डी**—इटलीला स्वतंत्र करणारा वीर देशभक्त. (१८०७–१८८२)

६३ **शेक्स्पिअर**—विश्वविख्यात इंग्लिश कवि व नाटककार. याने ३० च्यावर नाटकें लिहिलीं आहेत.

पृष्ठ

६३ **ज्यूलिअस सीझर**—प्राचीन रोमचा एक मानी व पराक्रमी राज्यकर्ता.

७३ **गुरुदेव**—रवीन्द्रनाथ ठाकूर–विश्वकवि. यांना "गीताञ्जली"बद्दल १९१२ मध्यें नोबेल पारितोषिक मिळालें. शांतिनिकेतन या शैक्षणिक संस्थेचे संस्थापक. ( १८६२ ते १९४२ ).

७४ **स्वामी श्रद्धानंद**—आर्यसमाजाचे थोर पुढारी. गुरुकुल कांगडीचे संस्थापक. यांचा १९२७ मध्ये एका धर्मांध मुसलमानाने खून केला.

८७ To......Unusual—थोर पित्याला थोरतर पुत्र असणें विरळ.

८७ John Gunthar—जगविख्यात चरित्रलेखक 'Inside Asia'-चा कर्ता.

९३ **अरविंद**—महान् योगी, देशभक्त व ग्रंथकार. (१८७०ते१९५०)

९५ **वानरम्......विनायकम्**—वानर करायला गेला तर गणपति झाला. वाइटांतून चांगलें बाहेर येणें.

९८ **नेताजी बोस**—सुभाषचन्द्र बोस. कॉंग्रेसचे अध्यक्ष, 'आझाद हिंद'-सेनेचे सेनापति. ( १८९७ ते १९४५ )

९८ **बॅ. सेनगुप्ता**—बंगालचे कॉंग्रेस पुढारी. ( १८८९ ते १९[illegible] )

९८ **डॉ. घोष**—डॉ. प्रफुल्लचंद्र घोष. बंगालचे पुढारी व माजी पंतप्रधान.

१२८ **नरेन्द्र**—स्वामी विवेकानंद. यांनी हिंदुधर्माचा त्रिखंडांत प्रचार केला. जन्म १८६९ समाधि १९०२.

१२८ **रामकृष्ण परमहंस**—विवेकानंदांचे गुरु. महान् कालीभक्त.

१४४ **नेपोलियन**—फ्रान्सचा सम्राट्. जन्म १[illegible]० मृत्यु १८२०

१५० **डिकन्स**—इंग्लिश कादंबरीकार.

१५० **स्कॉट**—स्कॉटलंडचा ऐतिहासिक कादंबरीकार.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

REFBK-0008910